
१९६०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. २०५



REFBK-0017224

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २५६०० वि: भू. प्रवास
क्रमांक २८०८ नों दि: ११/१२/६०

# महाराष्ट्र-दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १५२२८
REFBK-0017224

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगांव, मुंबई ४

© गो. नी. दाण्डेकर

प्रथमावृत्ति :
विजयादशमी, १८८२

मुखपृष्ठ :
दीनानाथ दलाल

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २

मूल्य साडेसात रुपये

श्रीशिवछत्रपतींचे चरणीं ---

गोपाळ नीळकण्ठ दाण्डेकर

## अनुक्रमणिका


नमन ५
महाराष्ट्रस्तोत्र ७
मनु आणि मासा ९
सह्याद्रिस्तोत्र ११
वृक्ष–संभार २८
कसा पिकला गहूं ग हरभरा ! ४८
इये वनींचे पशुपक्षी ७०
सागरतीरीं ८५
किल्ले आणि कोट– ९३
अठरा कारखाने– १११
प्राचीनत्वाचीं कांहीं गमकें ११९
नगररचना– १२४
बारा बलुतेदार– १४०
आणखी कांहीं जमाती– १४८
वासुदेव आणि पांगुळ– १५२
गिरिजन– १५९
चैत्यें आणि गुहा १६५
कांहीं मंदिरांच्या मूर्ति– १८०
कांहीं देवताविषयक कल्पना– १९१
कांहीं दिव्यें– १९४
इतिहासकालीन शस्त्रें– १९८
प्रवास : कांहीं साधनें– २०५
नद्या : त्यांचे घाट– २०८
वेशभूषा २१०
कांहीं अलंकार– २१४
कांहीं नाणीं : कांहीं मापें– २१७
आहार आणि आरोग्य– २२२
दिनचर्या– २२९
कांहीं उत्सव : कांहीं सण– २३३
संत आणि संप्रदाय– २३९
महाराष्ट्राचें साहित्य– २४५
कांहीं धुरेचे वीर– २५२
संकीर्ण २६१
नवे धुमारे २६६

## नमन—

मी अंगठ्याएवढा माणूस. आभाळाएवढ्या महाराष्ट्रपुरुषाचें दर्शन लिहायला धजलों. माझें हें निर्गुंडीचें त्रिदळ महाराष्ट्रदेवतेच्या अंगुष्ठावरही धड पोंचूं शकलें कीं नाहीं, कोण जाणे! मीं चवड्यावर उभा राहून तें वहायचा यत्न मात्र केला आहे.

मीं गेलीं तीस वर्षें महाराष्ट्र पाहिला आहे. उन्हांत तापत असलेला. पावसांत भिजत असलेला. थंडीनें काकडत असलेला. रात्रीं, बेरात्रीं, पायीं रखडत, धुळीनें अंग माखीत, उपाशीतापाशी—असा महाराष्ट्रभर हिंडलों आहें. सत्तर-ऐंशीं किल्ले पाहिले आहेत. डोळसपणें पाहिले आहेत. शें-शंभर डोंगर पालथे घातले आहेत. कड्यांवरून घडपडलों आहें. ठेचकाळलों आहें. नद्या दुथडी भरून वाहात चाललेल्या डोळेभरी न्याहाळल्या आहेत. ज्वारींतलीं वाळकें शोधीत चिराळलीं शेतें पालथीं घातलीं आहेत. इथल्या माळरानांवरल्या सौंदड-हिंवरांच्या सावलींत तोंड लपवून उन्हाच्या झळा टाळल्या आहेत. अनेक खेड्यांतल्या मारुतीच्या देवळांतून हातपाय पोटाशीं घेऊन रात्र रात्र झोंपलों आहें. पहाट फुटतांच चालूं लागलों आहें. अनेक वस्त्यांच्या आश्रयानें उघड्या आभाळाखालीं चांदण्या मोजीत रात्री घालवल्या आहेत. किती किती ठिकाणें आठवताहेत. पाणवठे. स्मशानांतल्या चिंचा. ओसाड देवळें.

किती किती मायामाउल्यांनीं मला अन्न देऊन जगविलें आहे. तेव्हां तर त्यांचे उपकार मानूं शकलों नाहीं. म्हणून आतां मागेन म्हणतों. मीं पाहिलेल्या, ऐकलेल्या, वाचलेल्या महाराष्ट्राचें दर्शन लिहून काढून त्यांचें ऋण फेडीन.

पण सद्‌बुद्धीनें जाब पुसला, कीं तूं पाहिलास, त्याच्या शतसहस्रपट महाराष्ट्र तर तुला कळलाच नाहीं. तुझें महाराष्ट्रासंबंधींचें ज्ञान आहे हातांतल्या आचमनाएवढें, तर महाराष्ट्र आहे समुद्राएवढा. तूं महाराष्ट्राला कवेंत कसें घेशील?

चिंतेनें काळंजून बसलों, तों आठवली ज्ञानोबांची एक ओवी. त्यांनीं म्हटलें, कीं सूर्य साऱ्या सृष्टीवर प्रकाशाचे स्रोत टाकतो. तरी त्याला काडवातीनें आपण ओवाळतोंच ना ! समुद्रांत अर्घ्य नाहीं का देत ?

मग धीर आला. म्हटलें, कीं माझी दुर्बळाची ही शब्दपूजा महाराष्ट्रपुरुष खात्रीनें रुजू करून घेईल.

आणि हा कांहीं महाराष्ट्राचा संदर्भग्रंथ नव्हे. महाराष्ट्रभर हिंडत असतां एका उनाड भटक्याच्या मनावर जीं प्रतिबिंबें उमटलीं, त्यांचें आहे हें शब्दचित्र. त्या मनाच्या फळ्यावर कांहीं माहिती चुकीची नोंदली गेली असेल. कुठें याचें शेपूट त्याला लागलें असेल. त्याचें याला. कित्येक संदर्भ चुकले असतील. त्यांचें विस्मरण झालें असेल.

होई ना का ! त्यामुळें फारसें कांहीं बिघडत नाहीं.

महाराष्ट्रपुरुषाच्या पूजेसाठीं एवढें पुरें.

इथेंच ऋणनिर्देश करायला हवा. मीं अनेक रात्री खेड्यांपाड्यांमधून म्हाताऱ्याकोताऱ्यांच्या तोंडून महाराष्ट्राची कथा ऐकण्यांत घालविल्या आहेत. नांगरामागें हरभरा पेरीत हिंडलों आहें. कुळव हांकला आहे. कोळपें धरलें आहे. असें किती किती केलें आहे. त्या त्या शास्त्रांतल्या माझ्या साऱ्याच गुरूंचें ऋण माझ्या मस्तकीं आहे, एवढें म्हटलें कीं पुरे.

सदूभाऊ जोगळेकरांचा ‘ सह्याद्रि ’ तर माझ्या पारायणांतला ग्रंथ. तीच कथा आत्रे यांच्या ‘ गांवगाड्या ’ची. त्याचीं हावरटासारखीं पारायणें करून मीं माझी माहिती त्यांतील माहितीशीं ताडून पाहिली आहे. असेंच माझें आवडतें पुस्तक भाव्यांचें ‘ पेशवाईकालीन महाराष्ट्र ’.

पण आवडत्यांचें ऋण मानायचें नसतें. तो केवळ उपचार ठरतो.

अशा या मधुकरी मागून जमवलेल्या अन्नाच्या नैवेद्यानें माझा महाराष्ट्रपुरुष संतुष्ट होवो !

तळेगांव दाभाडे<br>[ महाराष्ट्र ]

**गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर**

# महाराष्ट्र-स्तोत्र

हें महाराष्ट्र-स्तोत्र आहे. याच्या पठनानें, मननानें आणि चिंतनानें महाराष्ट्र-पुरुष मूर्तरूप धारण करून अंतर्दृष्टीसमोर उभा ठाकेल. संपूर्ण आणि समग्र महाराष्ट्र-पुरुष. कणखर आणि कांहींसा उग्र भासणारा. पण तें भासणें केवळ त्याचें बाह्य दर्शन मात्र आहे. त्याच्या अंतःप्रदेशांतून स्नेहाचे झरे झुळझुळतात. वात्सल्याचे धुमारे फुटतात.

हा महाराष्ट्र-पुरुष अति प्राचीन आहे. कधींकाळींचा. पूर्वी याला दक्षिणापथ, दक्षिणखंड, 'म्हराष्ट' देश, महाराष्ट्र-मंडळ, अशा नानाविध नावांनीं गौरविलें गेलें—जसें परमेश्वराला नाना नांवांनीं ओळखतात, तसें.

कधींकाळीं नर्मदेचा दक्षिणतट दंडकारण्य या नांवानेंही ओळखला गेला. इथें पावन पाय फिरले राम-जानकीचे !—वर्षांनुवर्षं श्रीरामचंद्राचा सहवास लाभण्याचें भाग्य इथल्या वृक्ष-लतांचें !

या महाराष्ट्रमंडळांतला विदर्भ, हें माता रुक्मिणीचें माहेर. म्हणजे श्रीकृष्ण हा महाराष्ट्रिकांचा जांवई. हें सासुरवाडीचें ऋण फेडण्यासाठींच बहुधा तो उत्तरकालीं पंढरपुरीं येऊन कर कटेवरी ठेवूनिया विटेवर उभा ठाकला असावा !

या अशा वृद्ध महाराष्ट्र-पुरुषाचें हें अस्फुट स्तोत्र आहे. हें रचण्यांतला हेतु काय ?

एवढाच, कीं तो महाराष्ट्र-पुरुष दृष्टीसमोर उभा ठाकावा. त्याचें झांवळें झांवळें दर्शन घडावें. परिचितांना पुनः प्रत्ययाचा लाभ व्हावा. जाणत्यांना खूण पटावी. अबोधांना बोध व्हावा. त्यांचे बाहु फुरफुरावेत.

आम्ही महाराष्ट्रिक कसे ? आमचें वैभव काय ? आमची महत्ता कशी ? आमच्यांतले गुण आणि दोष काय ? आमच्यांतलें वैगुण्य कुठें दडलेलें ? या आणि इतर कांहीं प्रश्नांचीं उत्तरें मिळावींत, हा या स्तोत्र-रचनेचा हेतु.

कुणी म्हणतात, महाराष्ट्र दरिद्री आहे. आम्ही हो म्हणून मान

डोलावतों. पण दरिद्री म्हणवून घेण्याजोगें महाराष्ट्राजवळ कांहीं नाहीं. असलें तरी तें फार थोडें आहे.

कोंकण-गोमंतकांतल्या हापूस-पायरी आंब्यांचें वैभव साऱ्या जगांत अद्वितीय आहे. मावळांतल्या आंबेमोहोर तांदुळाची चव क्वचितच कुण्या तांदुळाला असेल. कृष्णा, तापी आणि पूर्णाकांठसारखी ज्वारी अन्यत्र कुठेंच आढळत नाहीं. कापूस पिकवावा विदर्भ आणि मराठवाड्यानें. अणुशक्तीच्या निर्मितीस आवश्यक असणारी एल्मेनाइटयुक्त वाळू एका मालगुंडलाच समुद्रतीरीं मिळते, आणि वेरूळच्या कैलास लेण्याकडे ताजमहालच्या निर्मात्यानेंही डोळेभरी न्याहाळून पाहिलें असतें, तर तो म्हणता, कीं हें तर देवकृत्य आहे.

आंग्रेजांना संपूर्ण भारत जिंकण्यापूर्वी शेवटची लढाई इथल्याच ठेंगण्या, काळसर मावळ्यांशीं खेळावी लागली. ती युद्धश्री, ती रग, तो आवेश अजूनही मावळला नाहीं. कधीं मावळेलसें दिसतही नाहीं. हा गुण डोंगरावरून वाहात येणाऱ्या भराट वाऱ्याचा आहे. कृष्णा, कोयना, पवना, भीमेच्या पाण्याचा आहे.

तेव्हां महाराष्ट्र श्रीमंत आहे. कर्मीत कमी स्वाभिमानी तर अवश्य आहे. मोडेल पण वाकणार नाहीं. मित्रांसाठीं जीव देणारा आहे. कणखर आहे. चिवट आहे. भक्तिभावानें गहिंवरणारा आहे. लढतांना प्राण तळहातीं घेणारा आहे. थोडासा भांडखोरही आहे. थोडीशी हिरवटपणाची झांक आहे. पण किती ! चंद्रावरल्या डागाएवढी. ज्यानें महाराष्ट्रावर लोभ केला, त्याच्या पायतळीं आपला जीव अंथरण्यापुरता तो भोळाही आहे. आतिथ्यशील आहे. किंबहुना तो आहे गिरिशिखरांच्या दैवतासारखा. शंभु महादेवासारखा. संतापला तर, त्रिभुवनें पेटवील. संतुष्ट झाला तर कारुण्याची गंगा वाहवील.

त्या महाराष्ट्राचें हें दर्शन.

\+ \+ \+

# मनु आणि मासा—

फार जुनी कथा. नेमकी कधींची, तें माहीत नाहीं. पण सृष्टि निर्माण होऊन अनेक कल्पें उलटून गेलीं होतीं, अन् जलप्रलयाची कल्पांतवेळा जवळ आली होती.

मनूनें स्नान उरकलें, अन् तो संध्येचीं आचमनें टाकूं लागला. अर्घ्य देण्यासाठीं त्यानें अंजुळींत पाणी उचललें, अन् झालें काय, कीं त्या अंजुळींत एक छोटासा मासा पोहत असलेला मनूला दिसला. मनूनें करुणार्द्र दृष्टीनें त्याला न्याहाळलें, त्या क्षणीं तो मासा मनुष्यवाणीनें बोलूं लागला !

मनु आश्चर्यमुग्ध झाला होता. मासा बोलतच होता.

" भगवन्, तुम्हीं आश्रय न दिलांत, तर माझ्या लेखीं सृष्टि बुडाली ! "

मनूनें चमत्कारून विचारलें,

" मी तुला कुठें ठेवूं ? "

" तुमच्या कमण्डलूमध्यें ! "

पण मनूनें त्याला कमण्डलूमध्यें ठेवतांक्षणीं तो कमण्डलूएवढा झाला. मोठें जलपात्र, विहीर, तळें, अशीं आश्रयस्थानें बदलीत तो अद्‌भुत मासा समुद्राएवढा झाला. आश्चर्याच्या धुक्यांत बुडत मनूनें विचारलें,

" तूं आहेस तरी कोण ? "

" सृष्टीचा तारक ! "

" मग माझ्या आश्रयाला कशासाठीं आलास ? "

" तुला माझें सामर्थ्य जाणवून देण्यासाठीं. "

माशाशीं ठरलेल्या संकेताप्रमाणें जळप्रळय ओढवतांच मनु एका लहानग्या नावेंत बसला. सगळ्या वनस्पतींचीं बीजें त्यानें आपणांबरोबर घेतलीं, आणि घेतली मूठभर माती !

प्रळयाच्या विकराळ लाटा सारी सृष्टि बुडवून टाकीत चहूं दिशांनीं हिंदकळूं लागल्या. क्षणभर मनूचें चित्त अस्वस्थ झालें. तोंच त्याला त्या खवळलेल्या जळांत लीलेनें विहार करीत असलेला तो महामत्स्य दिसला. तो नावेजवळ येतांच मनूनें त्याच्या शिंगाला नावेच्या दोरीचें टोंक बांधलें. तत्क्षणीं नावेला त्राण लाभलें.

तें प्रळयजळ बराच काळपर्यंत कल्लोळत होतें. मात्र महामत्स्याच्या आश्रयानें सुरक्षित झालेली मनूची नाव जळाचा क्षोभ उणावण्याची वाट पाहात होती.

शेवटीं जळ शांत झालें. मनूनें आपल्याबरोबर घेतलेली मूठभर माती त्या असीम जलाशयांत टाकली. लवकरच धरित्री जळाबाहेर डोकावूं लागली.

त्या वेळीं ज्या कुलाचलांनीं प्रथम आकाशदर्शन केलें, त्या सात पर्वतांपैकीं महेन्द्र, मलय, शुक्तिमान्, ऋक्ष, विन्ध्य आणि पारियात्र आपापल्या जागीं उभे आहेत. सातवा आमचा सह्याद्रि !

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २०६०० वि: ...
क्रमांक २८८४ ... नों: दि: २३/१२/६०

# सह्याद्रिस्तोत्र—

वर सांगितली एक पौराणकथा. भूगर्भशास्त्रज्ञ काय म्हणतात ?

ते म्हणतात, कीं पृथ्वी हा सूर्यापासून सुटावलेला एक तेजोगोल. वातावरणामुळें त्याचें बाह्य स्वरूप थंड पडत चाललेलें. पण अन्तर्गर्भ मात्र अजून रसरशीत. उकळता. चहूं बाजूंनीं आक्रसत चाललेलें कवच. आंतली उष्णता चवताळते. खवळते. बाहेर निघायला पाहाते. धडक्या देते. मग कुठें तरी तिला मिळतें एखादें बारीकसें दार. त्या दारावाटे, छिद्रावाटे ती उष्णता बाहेर झेंप घेते.

तोंपर्यंत बाहेरचें जीवन फळत असतें. फुलत असतें. नाना रंगांनीं सुशोभित होत असतें. धरित्रीच्या आश्रयानें निश्चिंत असतें. नाना प्रकारचे संकल्प करीत असतें. आशांचे डोलारे रचीत असतें. मनोरथांचे इमले बांधीत असतें. पृथ्वीच्या अन्तर्गर्भांत चाललेल्या खळबळीची त्याला लवमात्र जाणीव नसते.

आणि अचानक होतो एक प्रचण्ड स्फोट. दिशा डळमळूं लागतात. दिग्गज आपापलें स्थान सोडून ढळूं लागतात. बारा आदित्य कोपून प्रकाशूं लागतात.

पृथ्वीचें कवच उकलतें. आंतून वाफ, धुराचे लोट, तापून लालभडक झालेले पाषाण, राख, असें बाहेर उसळूं लागतें. आकाशावेरीं पोहोंचतें. मग त्याच्या पाठोपाठ बाहेर येतो पृथ्वीच्या आंतील कवचाचा तप्त रस. उकळणारा. तो बाहेर येतो, अन् जिभल्या चाटीत चहूं दिशांना पसरूं

लागतो. असें वाटतें कीं, आतां हा समुद्रावेरीं जाऊन पोहोंचणार. समुद्राचें पाणीही उकळूं लागणार. धरित्रीवरील जीवांप्रमाणेंच जलचरेंही बिचारीं तडफडून जीव टाकणार !

पण याच वेळीं दुसरें एक महाभूत जीवसृष्टीच्या साहाय्यासाठीं धांवतें. सोसाट्याचे वारे वाहूं लागतात. पसरूं लागलेला लाव्हा रस त्या वाऱ्यांमुळें गोठूं लागतो. जागच्या जागीं थिजूं लागतो. त्याच्या घड्यांवर घड्या पडूं लागतात. हळूं हळूं त्याचा संकोच होतो, आणि बनतें पृथ्वीच्या बाह्य भागावरलें एक अभेद्य असें कवच. सारी धरित्री वितळली, तरी हें वितळत नाहीं.

हळूं हळूं हें कवच निवून थंडगार होतें. वारा वाहातच असतो. चहूं दिशांतून तो आपल्याबरोबर माती, धूळ, बीजें, असें नाना परीचें सर्जन-साहित्य घेऊन येतो. मग त्या कवचावर पावसाची शिंपण होतांक्षणीं पुनः गवतें रुजूं लागतात. रोपें धुमारतात. वेली पसरतात. थोड्याच काळांत सृष्टि पूर्वीं होती, तशी होते—प्रसन्न, नवनवोन्मेषशालिनी.

तर शास्त्रज्ञांच्या मतें आपला हा महाराष्ट्र या जातीचा कवच-प्रदेश आहे. फार पूर्वीं कधींतरी झालेल्या एका भूकंपामुळें या प्रदेशाची रचना झाली आहे. त्या कवचाच्या अंतरंगाचें अस्फुट दर्शन आपल्यालाही घडूं शकतें.

आपण आपल्या पर्वतमालांवर एकदां सहज नजर टाकावी. सह्याद्रीचे थर एकदां नीट न्याहाळावेत. म्हणजे आपल्या ध्यानीं येईल, कीं वरवर पाहातां जरी हा पाताळावेरीं गेलेला काळाकभिन्न पाषाण एकसंध वाटत असला, तरी वस्तुतः हा तसा नाहीं. हे थरावर थर रचले आहेत. मोठमोठ्या नद्यांच्या दरडी अशाच रचलेल्या असतात. तळाशीं एक संस्कृति नांदलेली असते. पुढें येतो महापूर. तें सगळें जीवन पाण्याखालीं विलीन होतें. वर जमतो चिखलाचा थर. कांहीं वर्षांनीं त्या चिखलावर रोपें रुजतात, आणि पुनः नवें जीवन उषःकालाचीं गीतें गातें. पुनः एकदां महापूर. पुनः चिखलाचा थर. पुनः नवें जीवन. कृष्णा, तापी, नर्मदा अशा थोर थोर नद्यांच्या कांठीं असलेल्या या जातीच्या दरडी, म्हणजे इतिहाससंशोधकांना केवढें खाद्य !

नेमके असेच प्रचण्ड पाषाणखण्ड आपल्याला सह्याद्रीच्या रचनेंत आढळतात. हे लाव्हाचे लोट. एकाच वेळीं घड्यांवर घड्या पडून थिजलेले. यांच्या आंगिक प्रकृतींत फारसा फरक नाहीं. सगळाच पाषाण काळाकभिन्न. वर कुदळ मारतांक्षणीं ती उलटायचीच. भूगर्भशास्त्रज्ञ या पाषाणाला ' डेक्कन ट्रॅप ' म्हणतात. आपण ग्रावा म्हणावें.

या ग्राव्याच्या अभावामुळेंच भाकडा धरणाचा पाया खणीत दोनशें फूटपर्यंत पाताळांत डोकावावें लागलें. अन् कोयना धरण या ग्राव्याच्या मजबूत पायावर उभें असल्यामुळेंच हेळवाक ते पोफळी, असा चारपांच मैल लांबीचा बोगदा खणून पाणी खालीं नेण्याचा बेत सहज रचतां आला. किंबहुना सह्याद्रीच्या कुशींत असलेलीं त्रिभुवनसुंदर लेणीं, हें या ग्राव्याचेंच वरदान आहे !

अर्थ असा, कीं सह्याद्रीची अन्तर्गत रचना अशी स्तरबद्ध आहे. पुण्याहून आगगाडीनें मुंबईस जात असतां उजव्या हाताला राजमाची माळेचे जे डोंगर दिसतात, त्यांच्याकडे जरी पाहिलें, तरी ही स्तररचना ध्यानीं येऊं शकावी.

पण या लाव्हासिद्धान्ताहून निराळाच असा दुसरा एक सिद्धान्त शास्त्र-कारांना अलिकडेच सुचला आहे. त्याचें नांव ढालींचा सिद्धान्त.

## ढालींचा सिद्धान्त—

शास्त्रज्ञ ज्या कथा सांगतात, त्या केवळ हूं हूं म्हणून ऐकाव्यात, एवढेंच काय तें. आपणां सामान्यांना फारसें त्यांतलें कळतें किंवा उलगडतें, असें मात्र नव्हे.

शास्त्रज्ञ काय म्हणतात, कीं पृथ्वीचा गोळा लाखों वर्षांपूर्वीं सूर्यापासून सुटावला, तेव्हांपासूनच त्याच्यावर कांहीं ढाली होत्या. ढाली म्हणजे अभंग प्रदेश. खणखणीत. पहिली ढाल दक्षिणखण्डाची. दुसरी हिमालयाच्या पलिकडे सायबेरियांत. तिसरी आफ्रिका खण्डांत. पुढें जेव्हां अन्तर्गत उष्णतेमुळें पृथ्वीची बाह्य रचना विस्कटली, तेव्हां या ढाली होत्या तशाच राहिल्या; बाकी सगळ्या रचनेंत मात्र मनस्वी बदल झाले.

अगदीं कालपरवांच शास्त्रज्ञांना आफ्रिकेंत सांपडत असलेल्या एका

वाळवीचा शोध ब्रह्मदेशांतही लागला आहे. यावरून असें अनुमान निघूं शकतें, कीं हजारों वर्षांपूर्वी का होईना, पण अरबी समुद्र अस्तित्वांत नव्हता. आफ्रिका खण्ड आणि भरतखण्ड हे दोन्ही भूभाग जोडलेले होते. कधीं एकदां पृथ्वीचें अंतरंग ढहुळलें. या ढाली होत्या तशाच राहिल्या आणि मध्यें निर्माण झालें खिंडार. तें सागराच्या पाण्यानें भरून गेलें.

इकडे भला प्रचण्ड खड्डा पडला, तर तिकडे हिमालय कधीं नव्हता तो वर उठून तारांगणें न्याहाळूं लागला. हिमालय हा अगदीं तरुण पर्वत आहे, हें तर त्याच्या अन्तर्गत रचनेवरून सहज ध्यानीं येतें. समुद्रतटाकीं सांपडूं शकतात, असे गुंडगुळे दगड, समुद्रकांठचीच पांढरी बुरबुरीत वाळू, हीं आणि अशाच प्रकारचीं विपुल चिन्हें हिमालयांतून वाहात येणाऱ्या नद्यांच्या पात्रांत आढळतात. भंवतालच्या टेकड्या खणूं जातां याच प्रकारची अन्तर्गत रचना तिथें आढळते.

अनुमान काढायचें, तें असें, कीं हिमालयाच्या जागीं फार पूर्वीं कधीं तरी प्रचण्ड समुद्र होता. पृथ्वीच्या अन्तरांतील घडामोडींमुळें जेव्हां तिच्या बाह्य रचनेंत बदल होऊं लागला, तेव्हां दक्षिणखण्डाची ढाल आणि सायबेरियाची ढाल, या दोन्हींच्या मध्यें चेपाटून हिमालय त्या समुद्राच्या जागीं उभा राहिला आणि समुद्र मागें सरला.

कांहीं का असेना, दक्षिणखण्डाची ढाल होती तशीच राहिली. अभंग, अक्षय्य. अर्थ असा, कीं सह्याद्रि हा पर्वत जसा सुदृढ, तसाच अतिप्राचीनही. तो वैदिक कालाइतका जुना तर खासच आहे.

## सह्याद्रि आणि त्याचे मांडलिक—

सह्याद्रि हा भारताचा दक्षिणबाहु आहे. किंबहुना तो भरतवर्षाचा बलदण्ड आहे. तो कसा दिसतो ? छातीशीं काटकोन करून प्रणाम करीत असलेल्या एखाद्या दक्ष सैनिकासारखा. त्याचें शरीर दक्षिणोत्तर पसरलेलें आणि बाहु आहे सातपुडा.

सह्याद्रीची लांबी किती ? सुमारें आठशें मैल. सातपुड्याची लांबी सुमारें सहाशें मैल, तर रुंदी ऐंशीं मैलांपासून वीस मैलांपर्यंत. उत्तरेस आडवा, एखाद्या अजगरासारखा पसरलेला विन्ध्य, आणि सातपुडा, यांच्या नेमकी

मधून सातपुड्याची सगळी लांबी मोजीत वाहाते नर्मदा नदी! एखादी चिखलाची लांब लादी रचावी अन् कुणा खोड्याळ पोरानें काठीचा वार घालून तिचे नेमके दोन उभे भाग करावेत, तशी. नर्मदेचें खोरें उत्तरेकडून विन्ध्यानें वेंघेंत घेतलें आहे, तर दक्षिणेकडे सातपुड्यानें. अर्थ असा, कीं उत्तरेकडे सातपुड्याच्या विस्ताराला नर्मदेची निसर्गसिद्ध मर्यादा आहे, तर दक्षिणेकडे त्यानें आपले हातपाय जवळ जवळ ऐंशीं नव्वद मैलांपर्यंत पसरले आहेत. कुठें कुठें मात्र तो हातपाय आखडून बसला आहे.

सातपुड्याची उंची सुमारें अडीच हजार ते चार हजार फूट. चिखलदरा या थंड हवेच्या पठाराची उंची आहे छत्तीसशें फूट. सातपुडा आणि सह्याद्रि यांची अन्तर्गत रचना थोड्याफार फरकानें जशी सारखी, तशीच त्या दोन्ही पर्वतांवरली वनसृष्टीही सारखीच म्हणायची. क्वचित् वेगळेपणच जर सांगायचें झालें, तर सातपुड्यावर रोशेल तेल ज्यापासून काढतात, तें गवत सापडतें. अन्तर्गत रचनेंतही थोडा फरक सांगायचा, तर सातपुड्यांत गार अधिक. नर्मदेच्या पात्रांत गारेचे दगड सांपडतात, त्या मानानें कृष्णाकोयनेची वाळू निखळ काळी.

सह्याद्रीचा दक्षिण भाग आणि उत्तर भाग यांतही थोडासा फरक आहेच. विशेषतः दक्षिणेकडील टेकड्या अधिक तांबूस आहेत. अर्थ काय? त्या बाजूला डोंगरांत लोह आहे.

पण असे कांहीं किरकोळ भेद सोडून द्यावेत. कारण ते केवळ बाह्य भेद आहेत. एकूण विचार करतां सह्याद्रि आणि सातपुडा यांचें अंतरंग सामान्यपणें एकच आहे, असें म्हटलें पाहिजे. त्याचें शास्त्रीय नांव आहे कृष्णप्रस्तर.

सातपुडा हा जर महाराज सह्याद्रीच्या दरबारांतला पहिल्या क्रमांकाचा मानकरी, तर दुसरा क्रम द्यावा लागेल सातमाळ रांगेला. सप्तशृंगी, वेरूळ, अजिंठा हीं सर्व भूमातेचीं लेणीं याच रांगेंत. तिसरी सह्याद्रीची रांग, म्हणजे नाशिक-नगरच्या जोडावरून फुटून बेदर-गुलबर्ग्यापर्यंत धांवलेली बालाघाट रांग. चौथी रांग महादेवाची. ही रायरेश्वर ते शिखर शिंगणापूर, अशी पूर्वपश्चिम धांवली.

महाराष्ट्र हा अदमासें त्रिकोणाकृति आहे, असें गृहीत धरलें, तर त्याच्या

उत्तर आणि पश्चिम, दोन्ही दिशांना या दोन उत्तुंग पर्वतमाला आहेत. त्रिकोणाच्या तिसऱ्या बाजूस मात्र सामान्यपणें सपाटी आहे.

महाराष्ट्राची उंची किती ? म्हणजे समुद्रसपाटीपासून ?

तींतही नानाविध परी आहेत. सागरतीरीं ती जेमतेम पांच फूट. म्हणजे भरतीचें पाणी भरलें, कीं तें अंगणांत खेळतें. झोंपड्यांना वेढा घालतें. अशीं एक नव्हे, सहस्रावधि घरें समुद्रतीरीं उभीं आहेत. बहुधा सगळीं मच्छीमारांचीं. समुद्र दुवक्त आपल्या या लाडक्यांना भेटायला येतो. त्यांना त्याचें मुळींच भय नाहीं. किंबहुना थोडें अतिशयोक्तीनें बोलायचें, तर मच्छीमारांचीं लहानगीं रांगायला शिकण्याच्या अगोदर पाण्यांत पोहायला शिकतात.

समुद्रसपाटीवरच वसलेलीं हीं झोंपडीं, हा जर अगदीं तळाचा बिंदु म्हणायचा, तर महाराष्ट्राची सर्वांत अधिक उंची आहे पांच हजार चारशें तीस फूट. एवढ्या उंचीवर कळसूबाईच्या शिखरावर कळसूबाईचें देऊळ उन्हापावसाशीं झटप्या घेत उभें आहे.

या दोन उंच्यांच्या मधें सारा महाराष्ट्र वसलेला आहे.

## भौगोलिक रचनाविशेष—

महाराष्ट्रांतल्या प्रदेशांचीं वैशिष्ट्यें ?

नाना प्रकारचीं. इथें समुद्रसपाटीवरची झुळझुळती हवा आहे. रात्रंदिवस वाहाणारी.कांहींशी दमट भासणारी. कडेपठारांवरून वाहाणारा भराटवाराही आहे. कधीं कधीं कड्यांच्या टोंकांवर उभें राहावें, तर भुतासारखा वाहाणारा वारा अक्षरशः उलथून पाडतो. कड्यावरून एखादा रुमाल खालीं टाकावा, तर तो उलट वर उडतो, आणि डोक्यावरून पलिकडे उडत जातो. छत्री निजामपूरची कथा तर प्रसिद्धच आहे. रायगडाच्या टकमक टोंकावर शिवछत्रपति उभे होते. मस्तकीं एक मावळा छत्र धरून उभा होता. कड्याखालून वाऱ्याचा एक प्रचण्ड लोट आला, आणि छत्रीसुद्धां मावळा वर उडाला. छत्रपतींनीं ओरडून छत्री घट्ट धरून ठेवायला सांगितलें. नाना तारांगणें होऊन शेवटीं तो उतरला खालीं निजामपुरावर—जवळ जवळ अडीच हजार फूट खालीं !

सह्याद्रीच्या माथ्यावर असें वाऱ्याशीं झुंजावें लागतें, तर घाट उतरून पठारावर उतरलें, कीं वाऱ्याविना माशागत तडफडायला होतें. झाडाचें पान कांहीं हलत नाहीं. सारें निश्चळ, शपथ घातल्यासारखें स्तब्ध उभें असतें. जसें कुणीं चित्रच काढून समोर मांडलें आहे.

वऱ्हाड-खानदेशांत अमाप उन्हाळा. लू लागून पटापटा जनावरें प्राण सोडतात. कुत्रीं ल्हालल्हा करीत बसतात. आकाशांत उडतां उडतांच पांखरें शुद्ध हारपून टपटपा खालीं पडतात. सावलींतून बाहेर तोंड काढवत नाहीं. घागर घागर पाणी पोटांत जातें, अन् घामाच्या वाटेनें बाहेर पडतें.

पण कांहीं ठिकाणीं मात्र हवा अतिशय प्रसन्न असते. जांभळींमधून अन् आंब्यांमधून ती वाहात येते. बरोबर आणते वनचमेलीचे अन् रानमोगऱ्याचे वास. कुड्याच्या फुलांचे अन् करवंदांच्या. त्या झाडझाडोऱ्यांमधून मनसोक्त भटकावें. अळू आणि तोरणें शोधीत. केसरी वर्णाचीं पळसफुलें आणि तांबड्या रंगाचीं पांगारीं निरखीत.

उन्हाळ्यांत हीं अशीं नाना प्रकारचीं हवामानें अनुभवीत असावें, तों हळूंच पावसाची चाहूल लागते. काळेसांवळे ढग भरभरून पश्चिमेकडून समुद्रावरून येऊं लागतात. अगोदर ते धडकतात पश्चिम किनाऱ्याजवळच्या डोंगरपट्टीवर. एक पुंजका धडकतो, तों दुसरा लोटतो. पाठोपाठ. मग तिसरा. चौथा. बदबदा पाऊस कोसळूं लागतो. कोंकणांतल्या थोर उतारांवरून दणादणा खालीं वाहात तो समुद्रावेरीं जाऊन पोहोंचतो.

मग कांहीं ढग या अडथळ्यावरून वर झेंपावतात, आणि घाटमाथ्याचीं शिंपणें शिंपीत मराठवाड्यांत अन् वऱ्हाडकडे दिसेनासे होतात. कोंकणांत ते जवळ जवळ दीडशें ते अडीचशें इंच पाऊस ओततात. वर घाटमाथ्यावर तो चाळीस ते पन्नास इंच इतका उणावतो. नगर जिल्ह्यांत तर तो पंधरा ते वीस इंच असा जेमतेम पडतो. पुनः ढग एकत्र होतात, अन् हेंच पावसाचें मान वऱ्हाडांत अन् मराठवाड्यांत तीस-पस्तीस इंचांपर्यंत वाढतें. कांहीं ढग सह्याद्रीच्या रांगांवर अडतात, कांहीं सातपुड्याच्या. त्यांच्या उपत्यकांमधूनही पाऊस बराच पडतो म्हणायचा. त्यामुळें डोंगरांच्या उतारांवर नाना जातींचीं, भलीं उंच वाढणारीं गवतें रुजतात.

पाणलोट—

या पर्जन्यवृष्टीचा परिणाम ?

तो मोठा मजेदार होतो. सह्याद्रीच्या पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांना वेग फार. पण त्यांची लांबी जेमतेम तीस ते चाळीस मैल. पुढें समुद्र आडवा उभा राहिला. त्यामुळें त्या नद्या पावसाळ्यांत अपार वेगानें खळाळत वाहातात, तर उन्हाळ्यांत नव्हे, हिंवाळ्यांतच कोरड्या ठणठणीत पडतात. अगदीं संध्येचीं आचमनें टाकण्यापुरतेंही पाणी कुठें सांपडत नाहीं. समुद्राची गांठ पडतां तर त्यांचें पाणी खारें होतें. मागें पंचवीस-तीस मैलपर्यंत दर भरतीबरोबर वर चढतें, ओहोटीबरोबर खालीं उतरतें. त्यांच्या कांठची शेतजमीनही त्यामुळें खारावली जाते. तिला म्हणतातच मुळीं खार जमीन.

या डोंगरउतारांवरून खालीं येतांना पाणी आपल्याबरोबर डोंगरचा गाळ वाहून आणतें. डोंगर नागली अन् वरी-सावा पेरण्यासाठीं दरवर्षीं उकरले जातात. पावसाळ्यांत ही डोंगरमाती धुपते. पाणलोटांबरोबर वाहात जाऊन ती खाड्यांच्या तोंडाशीं एकत्र होते. खाड्या ओहोरूं लागतात. त्यांचीं मुखें गाळानें भरून येतात.

मग गलबतांचा मार्ग बंद होतो. इतिहासकालीं महाड, खेड, गोवळकोट, चिपळूण हीं नामांकित बंदरें होतीं. अरब, रूमशाम, ग्रीस इथपासूनचा माल चौल, दाभोळ अन् नालासोपारा या बंदरांत यायचा. तिथून मग तो धाकट्या गलबतांमधून या आंतल्या बंदरांपर्यंत आणला जायचा. आतां बहुधा सगळ्या खाड्या ओहोरल्या आहेत. या जर अशाच ओहरत गेल्या, गाळ काढून टाकायची कांहीं व्यवस्था जर झाली नाहीं, तर मग कांहीं वर्षांनीं आज चालू असलेली वाहतूकही बंद पडेल. खाड्या अधिक रुंदावतील, आणि जेमतेम मासळी पागायचीं होडगीं खाड्यांवर तरंगूं पावतील.

पश्चिमेकडे सह्याद्रींतून धांवणाऱ्या नद्यांची ही गंमत होते, तर पूर्वेकडे वाहाणाऱ्या पाणलोटांबरोबर वाहात जाणारा गाळ नद्यांच्या मळ्यांतून सांठतो अन् नद्यांच्या कांठचे प्रदेश अधिक समृद्ध होतात.

तसें जर बोटेंच मोजायचें ठरवलें, तर पश्चिम प्रदेशांतल्या लहानमोठ्या

नद्या जवळ जवळ तीस भरतील. लहान लहान ओढे तर असंख्य. पण त्यांना ओढे म्हणून भागायचें नाहीं. कारण ओढा का असेना, तो ज्या गांवाशेजारून वाहात जातो, तिथलीं भोळीभाबडीं त्याला गंगाच म्हणतात. तरी या लहानसहान गंगांकडे दुर्लक्षच केलेलें बरें.

तर सप्त महानद्यांतली एक गोदावरी महाराष्ट्रांत उगम पावली. ब्रह्मगिरी-जवळ. ही गोदामाई नाशिकचीं वनें-उपवनें फुलवीत खालीं मराठवाड्यांतून पलिकडे आंध्रांत उतरली. हिच्याच तटीं नेवाशास महाग्रंथ ज्ञानेश्वरी आकारास आला.

दुसरी पुण्यवती तापी. ही सूर्यकन्या. पुराणांतरीं प्रसिद्ध असलेली. मात्र महाराष्ट्रांतल्या नद्यांचा पूर्वेकडे वाहाण्याचा नियम मोडून ही एकटीच नर्मदेचें बोट धरून पश्चिमेकडे वाहिली. सातपुड्यांत हिचा उगम. सुरतेजवळ ही सख्या सागराला भेटली. हिला मिळाल्या गिरणा, पूर्णा, कांटेपूर्णा अन् बोरी. या बहुधा सगळ्याच नद्यांनीं वऱ्हाडची काळी अधिक समृद्ध केली आहे.

तिसरी विख्यातकीर्ति कृष्णा. ही केवळ नदी राहिली नाहीं. ती अनेक माहेरवाशिणींची अन् सासुरवाशिणींची सखी झाली आहे. सामान्यपणें नद्यांना आई म्हणावें, असा प्रघात. पण कृष्णाकांठच्या मायलेकींनीं अन् सासवासुनांनीं तिला नाना परींनीं आळवून अन् गौरवून अगदीं आपल्या-बरोबर दळायकांडायला सुद्धां निमंत्रिलें आहे. असा कृष्णेला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनांत सखीचा ठाव मिळाला आहे.

कोयनेचेंही नांव घेतलें पाहिजे. न घेतलें, तर महाराष्ट्राच्या दीपवतीला डावलल्यासारखें होईल. कोयना उगम पावली कृष्णाबाईला खेटून. येऊन मिळाली कऱ्हाडजवळ कृष्णेलाच. पण या एवढ्याशा प्रवासांत ती जो जळसंभार घेऊन येते, तो शिल्पज्ञांना हेवा करावासा वाटला. त्यांनीं हेळवाकजवळ एका प्रचण्ड घळींत तिला अडविलें आहे. ती तांबडगहिरें पाणी घेऊन फुंफाटत हेळवाकजवळ येईल. तिथें एक नवल घडेल. डोंगरांत खोदलेल्या बोगद्यांवाटे तें पाणी पोफळीजवळ कोंकणांत उतरेल. तिथें डोंगराच्या पोटांतच प्रचण्ड चाकें फिरवून तें वीज निर्माण करील, आणि मग वासिष्ठीच्या गळ्यांत गळा घालून पश्चिम सागराला भेटेल. या विजेनें

मुंबानगरी प्रकाशित होईल. अख्ख्या महाराष्ट्रांतल्या कारखान्यांच्या यंत्रांचीं चाकें गरगरा फिरूं लागतील.

भीमेला विसरून अजिबात भागायचें नाहीं. भीमा ही तर महाराष्ट्राची धर्मसंजीवनी. पहिलें असें, कीं ती एका ज्योतिर्लिंगाचे चरण प्रक्षाळीत निघाली. मग तिनें आलिंगन दिलें इन्द्रायणीला. इन्द्रायणीचें भाग्य फार थोर. नदी जेमतेम चाळीस-पन्नास मैल लांबीची. पण भारतभूमीचीं दोन अपूर्व कौतुकें हिच्या तीरीं जन्मलीं, नांदलीं, आणि अदृश्य झालीं. पण ज्ञानोबा-तुकाराम, ही केवळ महाराष्ट्राचीच ठेव नव्हे. एकट्या भारत-भूमीनेंही त्यांच्यावर अधिकार सांगू नये. ज्ञानोबानें म्हटलें, 'हें विश्वचि माझें घर' तुका तर आकाशाएवढा झाला !

तर इंद्रायणीला आलिंगून भीमा पोंचली पंढरपुरीं. तिथें ती अर्ध-वर्तुळाकार वाहिली. चन्द्राकृति. आणि मग तिच्या भल्या प्रचण्ड वाळवंटीं साधुसन्तांनीं खेळ माण्डिला ! रावळांतल्या पांडुरंगाला दण्डाला धरून त्यांनीं बाहेर खेंचलें आणि आपल्याबरोबर धुमाळी तालांत नाचायला लावलें.

पवना, मुळा, मुठा या नद्या तशा किरकोळ. नानासाहेब पेशव्यांच्या शब्दांत सांगायचें झालें तर कर्नाटकांतील नद्यांचें वर्णन करतांना ते लिहितात, " इकडील नद्या अमृतोपम—ज्यांचे सहचारे वोढ्याची उपमाही आमच्या राक्षसस्वभाव नद्यांस न ये ! "

अर्थ असा, कीं तिकडल्या ओढ्यांशींहीं आमच्या या नद्यांची तुलना करतां यायची नाहीं. तरी महत्त्वाच्या दृष्टीनें मात्र या नद्या तिळमात्र उण्या नव्हेत. या तिघींच्या भरीला घालायला हव्यात नीरा आणि गुंजण. असें हें नदीपंचक, म्हणजे मावळाच्या प्राणवाहिन्या. या नद्यांच्या तटीं छत्रपतींचे मावळे जन्मले. यांचें पाणी पिऊन ते मोठे झाले. किंबहुना त्यांच्या तरवारींनाही याच नद्यांच्या पाण्यानें अभिषिक्त केलें होतें, एवढें सांगितलें कीं पुरे !

प्रवरा निघाली कळसूबाईच्या शिखराच्या साक्षीनें. हिचा मुद्दाम उल्लेख करायचा, तो अशासाठीं, कीं दक्षिणखण्डांतला पहिला शेतकरी, दक्षिणेच्या दण्डकारण्यांत सर्वप्रथम नांगर घालणारा अगस्ति इथें प्रवरातीरीं क्षणभर विसांवला होता !

पंचगंगा ही कोल्हापूर-मावळाची प्राणदात्री. तिच्या तीरीं जगदंबा ठाण मांडून बसली आहे अन् ज्योतिबा टेकडीवर बसल्या बसल्या हिचा परिसर न्याहाळतो आहे. त्या परिसराच्या भल्याबुऱ्याकडे त्याचें लक्ष आहे. विदर्भांतल्या वैनगंगा, पैनगंगा आणि वर्धा या नद्यांचा उल्लेख करायला हवा, तो अशासाठीं, कीं या नद्या दक्षिणवाहिनी आहेत ! या वऱ्हाडाच्या दक्षिणेस वाहात जातात. या नद्यांची श्रीमंती काय पुसावी ! यांच्या कांठींच माता रुक्मिणीचें माहेर असलेला विदर्भ नांदतो आहे.

संपन्न आणि सुखी विदर्भ. मायबाईचें माहेरच तें ! तेव्हां त्याच्या समृद्धीचें वर्णन काय करावें ! काळी कसदार जमीन. तीस तीस फूट खणावें तरी दगड सांपडायचा नाहीं. नुसतें काळें लोणी. अशा या काळींत उभ्या असलेल्या ताडामाडाएवढाल्या ज्वारीवर जेव्हां गाड्याएवढालीं कणसें डोलतात, तेव्हां आश्चर्य असें वाटतें, कीं हीं कृश ताटें एवढा भार तोलूं तरी कशीं शकतात !

तर या सगळ्या नद्यांचीं उगमस्थानें आहेत एक तर सह्याद्रींत किंवा सातपुड्यांत. या पर्वतांत नाना वनस्पती रुजतात. त्यांच्या तळापासून झिरपलेलें पाणी—त्यांतही औषधी गुणधर्म उतरतात. तें पाणी डोंगरांतून खालीं उतरत असतां आपल्याबरोबर डोंगरांतली कसदार माती घेऊन येतें. अन् मग त्या कसदार गाळानें या नद्यांच्या तटांचे प्रदेश समृद्ध होतात. तापीकांठची गाळाची जमीन, कृष्णागोदांचे मराठवाड्यांतले अन् आंध्रांतले तट, विदर्भाची संपन्नभूमि—या सगळ्या समृद्धीचा बीजमंत्र हा आहे.

प्रमाणच पाहायचें असेल, तर या नद्यांच्या मळया पाहाव्यात. विशेषतः कृष्णाकोयनेच्या मळया. अशी संपन्न जमीन उभ्या शिवारांत दुसरी मिळायची नाहीं. वर्षभर कांहीं ना कांहीं पिकतच असतें. जोंधळा, मकई, शेवरी, काकड्या, वाल, ऊस, खरबुजें—असें परोपरीचें. कधींही या मळया मोकळ्या मिळायच्या नाहींत.

एक तर हा असा समृद्धीचा गारवा. शिवाय भरीला भर म्हणून तीरांवरील करंज, पिंपळ, वड, निंब, आंबा, यांच्या डुलत्या छाया. मग तर काय, उठावेंसेंच वाटत नाहीं. चार मुईमुगाचे टहाळे उपटावेत, अन्

शेंगा चावीत सावलीला गपगार पडून असावें. सर्व प्रकारच्या चिंतांपासून लांब. निद्रानाशाचा रोग जडलेल्यांनीं एकदां हें औषध करून बघायला हवें !

पण या साऱ्याच नद्यांच्या दर्शनाचें सुख भोगायचें असेल तर यांच्या कांठांवरून हिंवाळ्यांत हिंडावें. नदीकांठच्या बाभळींच्या गुंतवळ्यामधून सूर्य लवकर वर येत नाहीं. यांच्या कांठांवर शेकोट्या पेटलेल्या असतात. पोरेंसोरें धांवत जाऊन कुठून कुठून हरभरा किंवा मूठभर गव्हाच्या ओंब्या घेऊन येतात. त्याची चव इतरांबरोबर आपल्यालाही चाखायला मिळते.

महाराष्ट्रांतला हिंवाळा फारसा त्रासदायक कुठेंच नसतो. कोंकणांत तर तो मुळींच जाणवत नाहीं. घाटावर आलें, कीं एखादें घोंगडें किंवा ब्लँकेट पांघरावेंसें वाटूं लागतें. पण ही थंडी पंजाबांतल्या थंडीसारखी जीवघेणी मात्र नव्हे. खानदेश-वऱ्हाडांत ती थोडकीशी अधिक आहे खरी. पण माणसाला जाम करून घरांत कोंडून घालील, अशी ती कुठेंच नसते.

एखादें लोकरीचें कुडतें घालावें. कानाला एखादी टापशी गुंडाळावी. अन् मग हिंवाळ्यानें मांडलेली शोभा बघत, दंवानें भिजलेलीं गवतें तुडवीत रानावनांमधून हिंडावें. विशेषतः खेडीं धुक्याबाहेर येतच नाहींत. त्या धुक्याच्या जणूं काय शेंड्याच, असे शेकोट्यांच्या धुरांचे फराटे आकाशांत वर उठलेले असतात. या धुक्यानें वेढलेल्या दृश्यांमधून जेव्हां गाईगुजींच्या घंटांचे स्वर ऐकूं येतात, तेव्हां असें वाटतें, कीं जणूं हे देवदूतांच्या विमानांच्या क्षुद्रघण्टिकांचेच स्वर आहेत !

## पर्वतशिखरें—

महाराष्ट्राचा आणिक एक प्राकृतिक विशेष, म्हणजे त्याचीं पर्वतशिखरें.

सह्याद्रीच्या किंवा सातपुड्याच्या कुठल्याही उपत्यकेंत उभें राहावें, आणि एकवार या श्रेष्ठ पर्वतराजीकडे नजर टाकावी. ठेंगण्याठुसक्या टेकड्यांच्या दाटींतून मस्तक वर काढून भंवतालीं डोळेभरी पाहात असलेलीं किती तरी पर्वतशिखरें आपल्या दृष्टीस पडूं शकतील.

विशेषतः सह्याद्रीच्या उत्तरभागांत, म्हणजे मुंबईजवळ आणि मनमाड-जवळ अंकाईटंकाईनजीक हें वैशिष्ट्य अधिक तीव्रतेनें जाणवेल.

इथें एक तर पार्वत प्रदेश संपत आलेला तरी आहे, किंवा सुरू तरी

झाला आहे. त्यामुळें इथल्या शिखरांना एक विशिष्ट आकार आहे. सुळके आधाराविना आकाशावेरीं धांवताहेत. कुठें कुठें असे सुळके एकमेकां-शेजारीं चिकटून उभे असतात. मग बहुजनांत श्रुति पसरते, कीं या दोघी सासवासुना आहेत, किंवा हें संपूर्ण कुटुंब इथें उभें आहे. तो थोरला सुळका दादला. धाकटी तो बाईल. बारीक आहेत तीं पोरें. हीं कशाची वाट पाहात आहेत? जळप्रळयाची?

पण जनसाधारणामध्यें मिसळल्यावर या दंतकथांवर हळूं हळूं आपलाही विश्वास बसूं लागतो.

ही अशी सुळक्यांची रचना असल्यामुळें कांहींसे उग्रदर्शन भासणारे डोंगर नाशिक आणि नगर जिल्ह्यांच्या सीमेवर, कळसूबाईपाशीं एक-वटले आहेत. कळसूबाई हें शिखर त्यांपैकींच एक. हे सारे कडे चढायला अतिदुर्गम असतात. मग कुणीतरी पुरुषार्थी मावळा वर चढून, जिवाच्या कसोशीवर कड्याच्या टोंकाला शेंदूर लावून येतो. तेंही एक यात्रेचें ठिकाण बनतें. कुणी तळहातीं शिर घेणारा भगत दरवर्षी वर चढतो. कुण्या वेलाच्या आश्रयानें. तो त्या दिवशीं वर दिवली किंवा टेंभा लावून येतो. तेवढाच त्या दैवताजवळचा दीपोत्सव.

अशीं कितीतरी दैवतें या भागांत पसरलेलीं आहेत. कळसूबाई हें त्यांतलेंच एक. कळसूबाई चढून जाणें, हेंही कांहीं वर्षांपूर्वी एक दिव्यच होतें. पण आतां खडकांत लोखंडी खांब रोवून अन् त्यांना सांखळ्या बांधून एकूण सगळा मार्ग कांहींसा सोपा केला आहे.

कळसूबाई हें महाराष्ट्राचें सर्वोच्च शिखर. त्यावर कळसूबाई कशी जाऊन बसली? अन् या सर्वोच्च शिखराला कळसूबाई हें नांव तरी कसें मिळालें?

कळसूबाई हें एका कोळ्याच्या मुलीचें नांव. हें नांव ठेवणारा जोशी मोठा भविष्यद्रष्टा असला पाहिजे. कळसूबाई जन्मजात विजनवासिनी होती. तिला डोंगरदरे भटकायची मोठी हौस. ती पायथ्याशीं असलेल्या इंदूर नामें गांवीं हिंडत फिरत आली. तिथल्या कुणा घरंदाज कोळ्याला घरकामाला मोलकरीण पाहिजे होती. त्यानें या अनोळखी मुलीला न ओळखतां कामाविषयीं पुसलें. तिनें हंसून म्हटलें कीं, काम करीन, पण

भांडीं घासणें आणि झाडलोट करणें,हीं दोन कामें वगळून. पण कुणा एकाच्या लग्नांत हा नियम ध्यानीं राहिला नाहीं. कुणा वरमाईनें कळसूबाईला भांडीं घासायला अन् झाडून काढायला सांगितलें.

कळसूबाईनें काम तर केलें. पण दुसऱ्या क्षणीं ती इंदुरांतून बाहेर पडली. तिनें ठरवलें कीं, आतां घरकामाचा संबंध येणार नाहीं, अशा ठिकाणीं राहायचें. आकाश पांघुरायचें. कंदमुळें खायचीं. वृक्षातळीं राहायचें. मग ती डोंगराला लागली अन् अति अवघड कडा येंगून वर गेली. मग वरचें रान तिचें झालें. ती त्या रानाची झाली.

योगायोगानें कोळ्यांना ही बातमी कळली. कळसूबाईचें तपस्विनीचें जीवन त्यांनीं पाहिलें. मग त्यांनीं तिला उरींशिरीं वागविलें. कळसूबाईच्या मागें त्यांनीं तिचें देऊळ बांधलें. तिथपासून कळसूबाईचें शिखर एक यात्रास्थान झालें.

या शिखरावर नाना प्रकारच्या वनस्पती आहेत. दरवर्षी यात्रेच्या वेळीं वैदू इथें येतात. नाना वनस्पती खणून बरोबर नेतात. मग वर्षभर त्यांची विक्री करीत राहातात. आयुर्वेदांत असंख्य वनस्पतींचें वर्णन केलेलें आहे. पारा बांधणाऱ्या वनस्पती. हिऱ्याचें भस्म करणाऱ्या वनस्पती. विषबाधा घालविणाऱ्या वनस्पती. जाणकारांनीं त्या दृष्टीनें हें शिखर पाहाण्यासारखें आहे. कदाचित् एखादी सर्पगंधेसारखी अद्भुत वनस्पति सांपडेल आणि सहस्रावधि रोग्यांचें कोटकल्याण होईल.

या शिखरावर उभें राहावें अन् भंवतालची शोभा न्याहाळावी. कांहीं तरी अपूर्व दिसतें एवढें खरें. जणूं उंचच्या उंच सुळक्यांचें साम्राज्यच मांडलेलें दिसतें. तिथून हरिश्चंद्रगड आणि अलंगकुलंग हे किल्लेही दिसूं शकतात. आंब्यांच्या एखाद्या राईत कुण्या आंब्याच्या शेंड्यावरून पाहावें, तसा भास होतो. मात्र हे सगळे सुळके वेगवेगळ्या आकारांचे. कुणी आकाश फोडीत वर निघालेला. कुणी एखाद्या काठीचा आधार घेऊन उभा असलेला. एखादा कुण्या वांकलेल्या म्हाताऱ्यासारखा. कुण्या एकानें आपलें तीक्ष्ण खड्गच वर उचललेलें. अशा नानापरींच्या सुळक्यांची सम्राज्ञी जी कळसूबाई, तिच्यासमोर आपण उभे असतों.

फार जोराचा वारा वाहात असतो. जणूं त्याचें वाहाणें आपल्याला

दिसतेंच. अन् मग आकाशांतून उतरतात उन्हें. त्यांत मिसळलेल्या शिखरांच्या छाया. खालचीं इवलीं इवलीं घरें. शेतें. गवताच्या गंज्या. मधूनच वाऱ्याबरोबर येणारा कढीलिंबाचा वास–हो, हें सांगायचेंच राहिलें. कळमूबाईच्या डोंगरावर कढीलिंब खूप होतो. इथून ट्रकमधें भरभरून कढीलिंबाचीं ओझीं मुंबईस जातात–असें सगळें जगावेगळेंच दृश्य पाहून आपणही जगावेगळे होऊन जातों.

पेणजवळचा कर्नाळा किल्ला हाही असाच एक सुळका आहे. तसेंच खंडाळ्याजवळचें ड्यूक्स् नोज्. पवन मावळांतला तुंगीगड हेंही एक टोंकदार शिखरच. साताऱ्याजवळचा जरंडा हेंही याच जातीचें शिखर.

जरंडा शिखराविषयीं रूढ असलेली दंतकथा इथेंच सांगून टाकायला हवी. रावणाची शक्ति लागून लक्ष्मण मूर्च्छित झाला. रामराय परमशोकाकुल होऊन त्याला मिठी मारून बसले. त्या वेळीं सुषेणाच्या सांगीवरून मारुतिराय कोटिच्या कोटि उड्डाणें फेंकीत उत्तरेकडे झेंपावले. त्यांनीं वनस्पतींनीं दाटलेला द्रोणागिरि शेपटीचा विळखा घालून उचलला, अन् ते झपाट्यानें लंकेकडे निघाले. मार्गांत द्रोणागिरीचा एक कळपा निखळून खालीं पडला. तो हा जरंड्याचा डोंगर. यावरही अपार अपार वनस्पती आहेत. मात्र या डोंगराचा आकार उग्र नाहीं, मवाळ आहे.

या शिखरांच्या दाटींतून दक्षिणेकडे निघावें, आणि साताऱ्यापलीकडे पांचगणीजवळ थबकावें, तों पर्वतराजीची आणिक एक मौज दिसते. हा एवढाच टापू 'टेबललॅण्ड्स्'नीं भरलेला आहे. शिखरें नाहींत. नुसतींच लांबच्या लांब पठारें. तींहीं कशीं सुरेख, सपाट. श्रावण-भाद्रपदांत पाऊस जरा उणावल्यावर वर चढावें, तर जसा प्रचण्ड गालिचाच समोर पसरला असावा, तसें दिसतें. मधें सोनकीच्या अन् तेरड्याच्या फुलांची पिवळी, गुलाबी नक्षी. क्षणभर आपलें प्रौढपण विसरून या गालिचावर लोळावेंसें वाटलें, तर कांहीं फारसें नवल नव्हे !

सह्याद्रि आणि सातपुड्याच्या मुख्य रांगा सोडून जिथें ते पर्वत महाराष्ट्राच्या इतर भागांत हातपाय पसरून बसले आहेत, तिथें शिखरें अधिक, एवढें खरें.

सातपुड्यांत शिरून जों जों पूर्वेकडे चलावें, तों तों पाषाणाच्या रंगांत

थोडथोडा फरक पडत चालतो. पाषाणाचें निखळ काळेपण मोडून तो पांढऱ्या, कुरुंदी वर्णाकडे ढळूं लागतो. नागपुराजवळ रामटेकचें शिखर, हा या कुरुंदी पर्वतश्रेणीचा एक नमुना म्हणून दाखवतां येईल.

## आणखी कांहीं प्राकृतिक वैशिष्ट्यें—

मागें सह्याद्रीच्या दक्षिणभागाच्या तांबडपणाचा उल्लेख येऊन गेला. त्या दगडांत लोखंड सांपडतें, हेंही सांगितलें. आतां त्या पाषाणाच्या अन्तर्गत रचनेविषयीं थोडेंसें—

सह्याद्रि हा लाव्हानिर्मित पर्वत आहे, हें या तांबड्या पाषाणाच्या रचनेवरून खरें वाटूं लागतें. जसा एखादा रस तापून मग पुढें थंड व्हावा, थंड होतांना त्यांत सांपडलेल्या घन पदार्थांभोंवतीं रसाचीं वेष्टनें असावींत, तशी या पाषाणांची रचना आहे. माळव्यांत उज्जैनच्या पलिकडे असलेला प्रस्तरही याच जातीचा. कोंकणांतला प्रस्तर त्या मानानें थोडा मऊ. फोडायला सोपा. त्याला कोंकणांत जांभा दगड म्हणतात. कुंभार जांभ्या दगडावर हत्यारें चालवून त्याचे विटांच्या आकाराचे ठोकळे पाडतात. मग बांधतात घरें. देवळें. विहिरी. चौथरे.

या जांभ्या दगडांमधूनच कुठें कुठें धरित्रीमधून गरम पाणी वर येत असतें. त्याला असतो कांहींसा गंधकाचा वास. असें एक कुंड आहे महाड आणि दासगांवच्या मधें. दुसरें आहे वज्रेश्वरीला. त्वचारोग या पाण्याच्या स्नानानें बरे होतात. मात्र फार वेळ पाण्यांत डुंबूं नये. चक्कर आल्यासारखें होतें. कुठें कुठें पाण्याचें उष्णतामान सौम्य असतें. मात्र कुठें कुठें तें अगदीं उकळतें असतें ! अन् आश्चर्य असें, कीं अगदींच शेजारून थंड पाण्याचा एखादा झरा वाहात असतो.

आणिक एक प्राकृतिक विशेष. पर्वतांच्या कुशींत नव्हे, तर मैदानांत आढळणारा. मोठा फसवा, धोकादायक. त्याला म्हणायचें रांजण. रस्त्याच्या कडेला कुठें तरी चवाळेंभर जमिनीवर चिखल असलेला दिसतो. वरचा पापुद्रा किंचित् हडकलेला.

उन्हाच्या काहिलीनें त्रासलेलीं जनावरें जरा चिखलाचा गारवा लाभेल, म्हणून त्या जागीं जातात. जातांक्षणीं तीं आंत रुतूं लागतात. चारी पाय

जर चिखलांत फसले असले, तर मग त्या जनावराची आशा करूं नये, हें उत्तम ! कारण जों जों जनावर बाहेर निघायची धडपड करतें, तों तों रुतावा वाढत चालतो. पाहातां पाहातां जनावर शिंगांसुद्धां दिसेनासें होतें ! एक उंट बुडावा, एवढाला खोल चिखल कुठें कुठें आढळतो. पंचवीस-तीस वर्षांपूर्वीं मराठवाड्यांत या जातीचे रांजण होते. कुणीही माणूस नकोसें झालें असेल, तर उचलावें, अन् रांजणाच्या स्वाधीन करावें !

महाराष्ट्रांत जसे कडे आहेत, तशा कपारीही आहेत. दऱ्या आहेत, दरकुटेंही आहेत. विशेषतः पश्चिम घाटाच्या माथ्यावर उभें राहावें, अन् खालीं कोंकणांत दृष्टि घालावी, तर मन क्षणभर विस्मयचकित होतें. असें वाटतें, कीं या दऱ्या नव्हेतच. हें आहे कुण्या मगरीनें पसरलेलें मुख. खालीं लांबपर्यंत पसरलेल्या टेकड्या हे मगरीचे दांत आहेत. तुटलेले कडे, या विकराळ दाढा आहेत. यांत दाटलेलें धुकें हें अनादिकाळापासूनचें भय आहे. असे क्षणभर थक्कित होऊन आपण उभे राहातों—आणि पाहातों.

या प्रचण्ड दऱ्या, कडे, कपारी, शिखरें, पाणलोट, मैदानें, माळरानें, खाड्या, खाजणें, रांजण—महाराष्ट्राचें प्राकृतिक वैभव असें नाना परींचें आहे. या सर्वांवरून वाजत गाजत येतात आणि निघून जातात प्रकृतीचे तीन पुत्र—उन्हाळे, हिंवाळे आणि पावसाळे.

✤ ✤ ✤

# वृक्ष-संभार

फार प्राचीन कालापासून महाराष्ट्राचे - तीन भाग प्रसिद्ध. पहिला अपरान्त म्हणजे कोंकण. दुसरा दण्डकारण्य म्हणजे घाटमाथ्यावरील भाग. तिसरा विदर्भ.

पैकीं अपरान्त हा भाग भगवान् परशुरामानें वसवला. दन्तकथा बऱ्याच आहेत. बाण मारून त्यानें समुद्रापासून जागा घेतली आणि तिथें कांहीं कुळें वसविलीं. अर्थ असा, कीं ही वसती होण्यापूर्वी तो भाग ओसाडीनें भरलेला, अरण्यानें दाटलेला असला पाहिजे. दण्डकारण्य हें तर सरळ अरण्यच होतें.

भगवान् श्रीरामचन्द्र जेव्हां दण्डकारण्यांत प्रवेशले, तेव्हां तें त्यांना कसें दिसलें ? तर——

"इथें धव, अश्वकर्ण, ककुभ, बिल्व, तिंदुक, पाटल, बदरी, खदिर इत्यादि महावृक्षांची नुसती दाटी झाली आहे. झिल् झिल् असा शब्द करणाऱ्या कीटकांच्या समुदायांनीं हें युक्त आहे. यांत नाना प्रकारचीं श्वापदें नुसतीं दाटलीं आहेत. दारुण शब्द करणारे भास पक्षी, सिंह, व्याघ्र, वराह, गज इत्यादि पशूंच्या संचारामुळें नाना महावृक्ष उन्मळून पडले आहेत——"

रामायणाचें अरण्यकाण्ड सहज चाळूं लागलें, तरी या जातीचीं अनेकानेक वर्णनें पानोपानीं आढळतात.

आज अरण्यांचा अन्-वृक्ष—वनस्पतींचा हिशेब करायचा झाल्यास

महाराष्ट्राचे दोन भाग करावे लागतील. पहिला पार्वतीय प्रदेश, म्हणजे डोंगरदऱ्यांचा भाग, अन् दुसरा सपाटीचा प्रदेश.

पैकीं डोंगरदऱ्यांविषयीं बोलायचें, तर दण्डकारण्य तर राहोच, अगदीं पन्नास-पाऊणशें वर्षांपूर्वी या पार्वतीय प्रदेशांत जितकी झाडी होती, तितकी आतां राहिली नाहीं.

शिवकालांत जावळीकडल्या झाडीचें वर्णन असें आढळतें, कीं अस्वलीच्या अंगावर जसे केस, तशी जावळीच्या रानांत झाडावळ दाटली आहे! एकदां या रानांत माणूस सांपडला कीं अनोळखी, अपरिचित माणसास वाट गावायची नाहीं. आजही महाराष्ट्रांतील सह्याद्रीच्या अगदीं अन्तर्भागांत गेलें, तर या वर्णनाचा प्रत्यय अगदीं सहज येऊं शकतो.

पण झाडी तुटली फार. अगदीं उदाहरणच द्यायचें झालें, तरी स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीं भोरच्या रानांत अपार हिरडा पिकायचा. हिरडोशी नामें वरंध्या घाटांत एक गांवच आहे. हिरड्याचें झाड म्हणजे कांहीं झुडूप नव्हे. तो चांगला घनदाट वृक्ष आहे. महावृक्ष नसला, तरी आंब्याएवढा खासच. छाया नामांकित. लाकूडही चांगलें मजबूत. या हिरड्याचें उत्पन्न मावळांत अमाप व्हायचें. झाडाला स्पर्श करायचें कांहीं कारणच नाहीं. नुसता खालीं पडलेला हिरडा वेंचला कीं झालें.

पण स्वातंत्र्य मिळालें, संस्थानें विलीन झालीं, आणि या हिरड्याच्या उत्पन्नाची रया गेली! सहस्रावधि हिरड्याचीं झाडें तुटलीं. एक तर त्यांचा कोळसा झाला, नाहीं तर फाटीं तरी! शेंकडों झाडांची तोड तर जमीन लागवडीला काटायची, या गोंडस नांवाखालीं झाली. राजरोसपणें. ही तोड करतांना आंबा पाहिला नाहीं, जांभूळ पाहिली नाहीं, वड नाहीं कीं पिंपळ नाहीं. समोर आलीं, तीं झाडें निर्विकार मनानें तोडीत गेले!

सह्याद्रींत अन् सातपुड्यांत खैराचीं झाडेंही विपुल होतीं. खैराचा निघे काथ. हा काथ काढायचें काम जे करीत, त्यांचें नांव काथोडी किंवा कातकरी. तेही झाडें तोडीत नसत. झाडांच्या बुंध्यांना चिरे द्यायचे. त्यांतून झरेल, तो काथ गोळा करायचा. नेऊन व्यापाऱ्यांना विकायचा.

पण आतां खैराचीं झाडेंच राहिलीं नाहींत! तेव्हां काथ पाडणार तरी कसला? खैराच्या झाडाचा कोळसा उत्तम होतो म्हणे! एका

माणसानें सोन्याचीं अंडीं देणाऱ्या कोंबडीचें पोटच कापून एकदम सगळीं अंडीं काढून घेण्याचा खटाटोप चालविला होता !

तर या कोळसेवाल्यांनीं खैर तोडला, हिरडा तोडला, वड तोडले, पिंपळ तोडले.

वडाचें भलें भरदार झाड कसें देखणें दिसतें ! लांब लांब पारंब्या. थेट जमिनीपर्यंत टेकलेल्या. काळसर हिरवा रंग. अशा एखाद्या भरदार, प्रचण्ड वटवृक्षाकडे पाहिलें, कीं मन एकदम स्थिरावतें. गांभीर्यानें भरून येतें.

मनाचें एक असो. पण अगदीं व्यावहारिक दृष्टीनें विचार करायचा, तरी छाया कशी ? साऱ्या वृक्षांच्या छायांमध्यें वटवृक्षासारखी घनदाट छाया दुसरी नाहीं. तीही लहानसहान नव्हे, तर दोनदोनशें बैलगाड्या खालीं उतरूं शकाव्या इतकी प्रचण्ड.

पेशवे दप्तरांत उल्लेख आहेत, कीं मुद्दाम सडकांच्या दुतर्फा रस्त्यांनीं वडाचीं अन् आंब्याचीं झाडें लावलीं होतीं. पाणपोई चालविण्याचें जेवढें महत्त्व, तेवढेंच तें वडाचें झाड लावण्याचें. एक झाड लावलें, कीं एका पुत्रोत्पत्तीएवढें पुण्य लाभायचें. पुत्र वंशाचें नांव चालवील. वृक्ष शिणल्या-भागल्यांना छाया देईल. झाडें लावावींत. त्यांखालीं ओटे बांधावेत. म्हणजे वाटसरू येतील. ओट्यांवर बसतील. विश्रांति घेतील. आशीर्वाद देतील.

पण हीं जुनीं जुनीं, शें-शें दोन-दोनशें वर्षांचीं वडाचीं झाडेंही या फाटीं आणि कोळसेवाल्यांच्या बुभुक्षित नजरांतून सुटूं शकलीं नाहींत !

वाटसरूंचे आशीर्वाद, ही एक अशी गोष्ट आहे, कीं जी दिसूं शकत नाहीं. पण आंबे तर प्रत्यक्ष दिसतात ना ? डॉलर्स पैदा करतात ना ? रुचीला जाऊन भिडतात ना ? पोट भरतें ना त्यांनीं ?

मग आंबराया कां तुटाव्यात ? पन्नास वर्षांपूर्वीं जेवढीं आंब्याचीं झाडें महाराष्ट्रांत होतीं, त्यांपैकीं जवळ जवळ पंचवीस टक्के झाडें गेल्या कांहीं वर्षांत फाट्यांसाठीं तुटलीं, आणि जेमतेम एक टक्का नवीं लागलीं.

कोंकणांतला हापूस आणि पायरी हीं दोन्ही नामांकित फळें. दूर दूर देशांपर्यंत यांची कीर्ति. पण आज कोंकणांत जिथें तरुण माणूसच दिसेनासा झाला आहे, तिथें आंब्यांना कोण विचारतो ? वानरांनीं आंबे खाऊं नये, तर काय करावें ? रसरसलेलीं भरदार फळें कुणी उतरवील का, अशी वाट

पाहात हजारों आंब्याचीं झाडें उदासवाणीं उभीं राहातात, अन् शेवटीं कुणा कुऱ्हाडवाल्याच्या स्वाधीन आपापले देह करतात !

साग ही तर सरळ पैसा देणारी वस्तु. ज्या सागाच्या राजकारणासाठीं डांग महाराष्ट्रापासून तोडला गेला, त्या सागाचीं प्रचण्ड झाडें महाराष्ट्रांत कमी का होतीं ? औंढ्या नागनाथाच्या भंवतालचें मराठवाड्यांतलें जंगल, सातपुड्यांतलें जंगल, ठाणें जिल्ह्यांतलें जंगल, कुलाबा जिल्ह्याचा कांहीं भाग, अशा नाना ठिकाणीं सागाचीं झाडें अमाप होतीं.

महाराष्ट्रांत इनामदारांचे अन् जहागिरदारांचे, इजारदारांचे अन् देशमुखांचे, पाटलांचे अन् सरदारांचे जुने प्रचण्ड वाडे दिसतात. आतां त्यांची पडझड होत चालली असली, तरी अजून लांकूडकाम बेलाग उभें आहे. तीन-तीनशें वर्षं टिकलेलें हें लांकूड काय विलायतेंतून आणलें ?

तर मग आतांच या सागांना काय झालें ? जेमतेम बांबूच्या जाडीचे असे वासे कां निघूं लागले ? तुळवटें, अन् प्रचण्ड तुळया कां दिसेनाशा झाल्या ? कीं जमिनीचा कस कमी झाला ? कीं तिला प्रचण्ड वृक्षावळीचा भार सहन होईनासा झाला ? कीं तिचे गर्भ कोमेजून जाऊं लागले ?

सागाचीं झाडें तर चोरून फाटीं तोडणारांच्या कुऱ्हाडींना बळी पडलीं. सरकारी राखीव जंगलांतून सागाचे वासे चोरून तोडून आणून पुनः निर्लज्जपणें दांत विचकीत आम्हीं जंगलसत्याग्रह केला, असें सांगणारीं माणसें आढळूं लागलीं.

सर्वांत कळस म्हणजे मोळीवाल्यांच्या मोळ्यांमधून चन्दनाचीं लांकडें सर्पण म्हणून विकायला येतात !

चहूंकडून अशी डोंगरदऱ्यांतल्या झाडझाडोऱ्याची तोड होत्ये आहे, तरी वृक्षसृष्टि अजून कशीबशी जीव धरून उभी आहे.

पुराणकालीं महाराष्ट्रांत तमाल, देवदार असे गगनभेदी वृक्ष असल्याचे उल्लेख आढळत असले, तरी आज त्यांचा मागमूस उरला नाहीं. मात्र सुमारें दोन-सवादोन हजार वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत कोणकोणतीं झाडें होतीं, याचे उल्लेख मिळूं शकतात. गाथासप्तशतींत त्यांचे स्पष्ट संदर्भच सांपडतात.

एका सखीच्या पाठीवर अंकोटाचीं पानें चिकटल्याचा दाखला देऊन दूती सांगत आहे, तीं गुपचुप पुसून टाक ! आज अंकोट नामक झाड कुठें

कुठें कोंकणांतच काय तें आढळतें.

कुणा एका भ्रमरानें अशोकाच्या लालभडक फुलांत आपलें तोंड लपवल्याची कथाही सांगितली गेली आहे. एका ठिकाणीं नायिकेच्या नाजुक बोटांना अशोक वृक्षाच्या पातळ, कोंवळ्या पानांची उपमा दिली आहे. अशोकाचें झाड फार देखणें. पानांनीं भरगच्च भरलेलें, डेरेदार. यामुळें कवींचें तें आवडतें असावें, यांत कांहींच नवल नाहीं. अशोकाचा आणिक एक नाजुक संकेत रूढ आहे. पुष्पवतीचा लत्ताप्रहार झाल्याशिवाय तो फुलतच नाहीं म्हणे !

आम्रवृक्ष हें तर महाराष्ट्राचें वैभव. त्याचे गाथासप्तशतींत अनेकानेक उल्लेख न आढळले, तरच नवल. एका ठिकाणीं कोयींतून बाहेर निघालेल्या पानाचा कोंवळा रंग वर्णिला आहे, तर दुसरीकडे कलशांत ठेवलेल्या आंब्याच्या डहाळीचा अन् मोहोराचा उल्लेख आहे. आणिक एका ठिकाणीं आंब्याचें एक जुनाट, खुजें झाडही मोहोरलें असल्याची खूण सांगितली आहे, तर एका गाथेंत आम्रवनांत गुंजारव करणारे भुंगे वर्णिले गेले आहेत.

एरंड महाराष्ट्रांत सर्वत्र होत असलेला. पारशा एरंड नामें त्याची आणिक एक जातही प्रसिद्ध. या झाडाच्या ठेंगणेपणाबद्दल ' निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते,' अशी सुभाषितकारांनीं थोडी याची टर उडवलेली. ' उंच वाढला एरंड, तरि कां होय इक्षुदण्ड,' असा तुकारामबावांनींही त्याचा अधिक्षेप केलेला. तरी एरंडाचें पान देखणें यांत वाद नाहीं. गाथा-सप्तशतींत उल्लेख आहे तो असा, कीं कुंपणाच्या छिद्रांतून एरंडाचीं पानें बाहेर डोकावत आहेत.

कदंब हें झाड वैष्णवांमध्यें अत्यंत प्रिय. श्रीहरि कदम्बवृक्षातळीं देहुडें ठाण मांडून मुरली वाजवीत उभा आहे. पण कदंबाचीं केवळ वर्णनेंच महाराष्ट्रिकांना माहीत. कदबाचें दर्शन फारसें अलिकडे घडेनासें झालें आहे. कारण झाडांच्या तोडींत कदंबही नष्ट झाले !

गाथेंत डोंगरांतील नदीच्या पुरांत एक कदम्बाची डहाळी वाहात आली, आणि तिच्या पुष्पांचे पराग वाहून गेले, असा उल्लेख आहे.

करंज ही महाराष्ट्राची एका अर्थानें संपत्तीच म्हणायची. झाड कांहीं तसें फारसें मोठें नाहीं. बुंधाही बारीकच. वासही किंचित् उग्र. पण जें

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत 

कांहीं त्याचें रूप आहे ! [illegible] नर्तिका नृत्य करीत असावी; तसा त्याच्या लवलेल्या फांद्या दिसतात. [illegible]ंच्या वर्णही अति मनोहर. छाया तर थंडगार. विशेषतः हीं झाडें ओढ्यांच्या अगर नद्यांच्या कांठीं उगवायचीं. त्यामुळें छायेच्या गारव्यांत या गारव्याची भर. गुराखी गुरें चारणीला लावून देऊन करंजाच्या तळीं खुशाल झोंपा काढीत असायचे.

पण संपत्ति म्हटलें, तें करंजाच्या बियांसाठीं. करंजाच्या बियांचें तेल निघतें, तें औषधि असतें. अनेक त्वचारोगांवर त्याचा उपयोग होतो. पण याहीपेक्षां त्याचें मोठें मोल असें, कीं साबण करण्यासाठीं त्याचा बहुमोल उपयोग होऊं शकतो.

या करंजांच्या फांद्या कुणीं तोडल्या. गाथासप्तशतीकार त्याला विचारतो, कीं तुला स्वर्गात जायची एवढी का घाई झाली आहे ?

कवठ हेंही बहुगुणी झाड. शंकराला तें फार प्रिय. म्हणून शिवरात्रीला तें अवश्य खावें, असा एक संकेत. गाथासप्तशतीकार भुंग्याला म्हणतो, कीं तूं कवठाच्या वासावर लुब्ध होऊन कमलाचा त्याग केलास ! कवठाचा पित्तशमनाचा गुण बहुधा त्या गाथाकारानें इथें दृष्टिआड केला असावा.

कुड्याच्या झाडाला तसें कांहीं झाड म्हणतां यायचें नाहीं. खरें पाहिलें तर तें झुडुप, वनस्पति. हेंही एक बहुगुणी झुडुप. आंवेवर रामबाण, असें कुटजारिष्ट प्रसिद्ध आहे. कुड्याची पाळ हरघडी लागणारी वस्तु. गाथाकार कुटजाच्या पुष्पांचा वर्ण जणूं हास्याचाच आहे, अशी त्याच्या पांढरेपणाची स्तुति करीत आहे.

केतकी अन् केवडा यांतला फरक निवळ झाड पाहिलें, तर नवख्याला ओळखूं यायचा नाहीं. पण केवड्याचें कणीस पांढरेंशुभ्र असतें, तर केतकीचें नाजुक पिवळसर. जिथें पाणी विपुल, तिथें हीं झाडें असायचीं. केवड्याच्या पानांत घालून ठेवलेला काथ सुगंधी होतो. केवड्याचें कणीस बरेच दिवस टिकतें, अन् बकुळीच्या फुलांप्रमाणें त्याचा गंध तर नष्ट होतच नाहीं. गाथाकारानें याच त्याच्या गुणाचा उल्लेख केला आहे. केवड्याला म्हणजे त्याच्या पानांना धारदार कांटे असतात. शेख महंमदानें म्हटलें, कीं 'कांटे केतकीच्या झाडा, आंत जन्मला केवडा !' केवडा महाराष्ट्रांत सर्वत्र होतो.

चन्दन तर दक्षिणेची मिराशी. महाराष्ट्राच्या दक्षिणेस असलेला नील-

ागिरि चन्दनासाठीं सुप्रसिद्ध. पण महाराष्ट्रांतही चन्दनाचीं झाडें बरींच म्हणायचीं. चन्दन कविजनांना फार प्रिय. त्याविषयीं नाना प्रकारचे संकेत रूढ असलेले. विरही जनांचा विरहाग्नि शमन करण्यासाठीं चन्दनाचा लेप लावीत; पण त्याचा उपयोग काय व्हायचा ? अर्थात् शून्य !

ज्ञानेश्वरांनीं सांगितलें, ' चांदु वो चान्दणें चांपे वो चन्दनें, देवकीनंदनें-वीण नावडे वो ! '

गाथाकार उल्लेख करतात, तो चन्दनाच्या धुराचा. तो जिथें जातो, तिथें सुवास सवें घेऊन जातो. तसें सज्जनांच्या कीर्तीचें.

जांभूळ हेंही फळ महाराष्ट्राच्या आवडीचें. आंबरस पोटभर खाल्ल्यावर चार जांभळें खावीं, म्हणजे आंबरसाचा दाट उतरतो. त्या जांभळांचे दोन प्रकार. बारकें अन् मोठें. बारकीं जांभळें म्हणजे केवळ तोंडचाळवणी. टोपलीभर खावीं, तेव्हां शिंपलीभर गर पोटांत जायचा. मोठीं जांभळें फार चविष्ट. दहापंधरा खाल्लीं, कीं एक सुरेख ढेंकर यायचा.

कुण्या एका कवीपुढें ' गुळुगुग् गुळुगुग् गुळुः ', अशी ओळ समस्या-पूर्तीसाठीं मांडली. त्यानें लगेच श्लोक रचला, कीं ' जम्बूफलानि पक्वानि पतन्ति विमले जले । कपिः कम्पति शाखाग्रं गुळुगुग् गुळुगुग् गुळुः ॥ '

गाथाकार म्हणतो, कीं कुण्या एका माकडाला भुंगा चावला होता. म्हणून जांभूळ दिसल्यावर तें त्याला हात लावीना ! एकदम दूर सरलें !

तालवृक्ष फार करून कोंकणांत आढळायचा. ताडाच्या उंचपणाबद्दल कवींनीं त्याची थट्टाही केलेली. पण ताडपत्रें हें प्राचीन ग्रंथ लिहून ठेवायचें एक महत्त्वाचें साधन. सुबक कापलेलें, आडवें, मजबूत ताडपत्र. त्यावर अक्षरें कोरून काढायचीं. तांब्याची किंवा चांदीची कडी करून तिच्यांत हीं कोरलेलीं ताडपत्रें क्रमानें व्यवस्थितपणें अडकवून ठेवायचीं आपल्याकडे आडव्या छापलेल्या पोथ्या असतात, तें ताडपत्रांचेंच अनुकरण. सध्यां ताडपत्रांचा उपयोग होतो पंखे करण्याकडे. शिवाय ताडफळें सोलून तीं खातात या ताडफळांचा उल्लेख तर श्रीकृष्णचरित्रांतही आढळतो. गाथाकारानें म्हटलें आहे, कीं एका लावण्यवतीच्या कानावर तालवृक्षाचा कोंवळा कोंब ठेवला आहे. कानावर एखादें सपर्ण पुष्प ठेवणें, किंवा एखाद्या कोंवळ्या, नाजुक झाडाची डिकशी ठेवणें, ही पद्धत अलिकडे लुप्त होत चालली असली, तरी

पूर्वीं तें हौशीचें लक्षण मानलें जात होतें.

• निंब हा अमृतवृक्ष. रुचीला कडू, पण गुण बहुमोल. पाडव्याला सकाळीं निंबाचीं पानें अन् जिरें खायचें, कीं वर्षभर रोगांच्या कवेंत जायला नको. निंबाच्या काड्यांचें सुरेख दांतवण. निंबाचा जुना पाला धान्यांत घालून ठेवा, त्याला कीड लागायची नाहीं. लिंबोळ्यांचं तेल साबणासाठीं वापरायचें. तें त्वचारोगावर औषधही आहे. निंबाचें लाकूड इमारती कामाला उपयोगी पडायचें.

अशा बहुमोल निंबाला कवींनीं तर वाळींत टाकलेंच, पण संतांनींहीं त्याच्यावर अवकृपा केली. ज्ञानेश्वरांनीं म्हटलें, कीं निंबाच्या निंबोळ्या केवळ कावळ्यांच्याच उपयोगाच्या ! गाथाकारही नेमकें असेंच म्हणताहेत.

पण निंबाच्या शीतळ छायेंत अनेक वाटसरूंनीं उन्हाची कड मोडली आहे. रस्त्यांच्या दुतर्फा लावायला निंब हें एक उत्तम झाड आहे. विशेषतः मराठवाडा, घाटमाथा अन् विदर्भाची हवा निंबाला चांगली मानवते.

त्यानंतर आठवण व्हायची पलाशवृक्षाची. हा वैदिक वृक्ष. अनेक होम-होमांगांत याच्या समिधा लागायच्या. याचीं पानें बेलासारखीं त्रिपुटीयुक्त असायचीं. म्हणून भटो घाटावर गेला, तरी पळसाला पानें तीनच असल्याचा उल्लेख येऊन गेला. याच्या पानांच्या पत्रावळी अन् द्रोण करायचे. तसें सोज्वल अन् सात्त्विक झाड.

पण पळसाचें झाड मुख्यतः लक्षांत राहातें, तें त्याच्या केशरी वर्णाच्या फुलांमुळें. छे छे ! इतकीं देखणीं फुलें क्वचितच सांपडतील. ताम्हान्याचीं फुलेंही अशींच विपुल आणि दृष्टीस मोहून टाकणारीं. पण तीं जांभळीं, कांहींशीं मादक भासणारीं. पळसाचीं घनदाट फुलें फुलेरलीं, कीं सारें अरण्य अगदीं पेटल्यासारखें वाटतें. असा शांत, तेजस्वी, लखलखीत, दृष्टीची धणी पुरवणारा अग्नि कुठें पाहिला नाहीं. इंग्रजींत पळसाच्या फुलांना ' फ्लेम ऑफ् द जंगल ' म्हणतात. हें लक्षांत घ्यायला हवें, कीं ही ज्वाला भडाग्नीची नसून यज्ञाग्नीची आहे.

गाथाकार म्हणतात, पोपटाच्या चोचींच्या रंगाचीं फुलें पाहून असें वाटतें, कीं जणूं हे बुद्धभिक्षूंचे संघच आहेत. रसराज शृंगारांत मनसोक्त अवगाहन करणाऱ्या गाथाकारांनाही हीं फुलें पाहातांच भिक्षूंची आठवण

व्हावी, यावरून या फुलांचें सात्त्विकपण ध्यानीं यावें.

बकुल हा तर सुगंधी पुष्पांच्या कुळींतला राजा. चिरसुगंधी असणारें नाजुक, देखणें बकुलपुष्प खालीं पडतांक्षणीं वाळूं लागतें, पण त्याच्या सुगंधांत कणभरही उणावा येत नाहीं. दंतधावनाच्या कामीं बकुळीच्या काड्यांचा उपयोग होतो. सालीचा कोळसा दंतमंजनाच्या कामीं येतो.

गाथाकाराला काय पाहून बकुळीच्या फुलाची उपमा सुचली ? तर स्वतःच्या पोटांतून काढलेल्या एका धाग्यावर कोळी लटकला आहे. कवीला वाटलें, कीं जणूं एका धाग्यांत ओवलेलें हें एकुलतें बकुळीचें फूलच आहे !

गाथेंत बेलाचा उल्लेख आहे. बिल्वपत्र शंकराला फार प्रिय. या झाडाची छायाही घनदाट. बेलाचें फळ खायलाही रुचकर. मात्र बीचा भाग थोडा उग्र असतो. बेलफळाचा मुरंबा पोटदुखीवर चांगला. दुसरा गुण, बेलाचें फळ वीर्यवृद्धिकर आहे.

बोर हें फळ तसें पाहिलें तर साऱ्या भारताचें. बदरिकावनीं व्यासांनीं तपश्चर्या केली, म्हणून ते बादरायण झाले. रानबोरें कांहींशीं तुरट, आणि किंचित् कडू. पण एकूण फळ निरोगी.

गाथेंतला उल्लेख मोठा मजेदार आहे. एका बालकानें आपल्या नवीनच उगवलेल्या दातांचे व्रण बोरावर उठवले. ते पाहून पत्नी सलज्ज हंसून नवऱ्याला म्हणते, थ्या ! आतां ?

बोराचीं वनें मराठवाड्यांत पुष्कळ. एक चांगलें भरगच्च वन गंगाखेड-जवळ. जळगांवजवळ मेहरूणचीं बोरें तर प्रसिद्धच आहेत. बनारसी बोरांएवढीं मोठीं नव्हेत. पण चवीला फारच उजवीं !

गाथेंत विपुल उल्लेख आहेत मोहाचे. तिथें मधूकवृक्ष असा उल्लेख आहे. मोहाचीं झाडें सातपुड्यांत फार. सह्याद्रींतही तीं कांहीं प्रमाणांत आहेत. मोहाचीं फुलें म्हणजे गरिबांची भाकरी. खायला गोड, रुचिकर. या फुलांचें मद्य उत्कृष्ट होतें. नाशिक स्टेशनजवळ मोहाच्या फुलांचें मद्य करायचा एक कारखाना होता.

गाथाकार म्हणतो, बा मधूक वृक्षा, गोदातीरावर तुझी गर्द राई आहे. छायाही घनदाट आहे. पुष्पभारानें तुझ्या फांद्या अगदीं जमिनीवेरीं लवल्या आहेत. तूं तुझीं फुलें हळूं हळूं कां ढाळीनास ?

पुढें एका गाथेंत मोहाच्या फुलाच्या गंधानें वाटसराला घरची—प्रियेची?—आठवण झाल्याचा नाजुक उल्लेख आहे.

मोहाच्या बिया म्हणजे द्रव्यदायी वस्तु. त्यांचें तेल फार कामाचें. साबण करण्याच्या कामीं तर त्याचा उत्तम उपयोग होतोच, पण त्याचे उपयोग इतरही अनेक आहेत.

वटवृक्ष भारताचें भूषणच. गाथाकारानें म्हटलें, कीं वडाजवळ आलेले वाटसरू पाहून त्यावर फळें खाण्यासाठींच कीं काय बसलेला पोपटांचा थवा भुर्रदिशीं उडून गेला. एका गाथेंत गांवाशेजारचें वडाचें झाड तोडल्या-बद्दल खेद प्रगट केला आहे. एका गाथेंत वडाखालीं असलेल्या विहिरीचा उल्लेख आहे, तर दुसऱ्या गाथेंत शिविवर असलेला वटवृक्ष सुदूरपर्यंत पसरला असल्याचें सांगितलें आहे.

वेळूचें झाड महाराष्ट्रांत सर्वत्र. भगवान् गोपाळकृष्णाची वेणु वेळूचीच. यामुळें या झाडावर भारताचें अपूर्व प्रेम. उपयोग किती? असंख्य. याच·मुळें सर्वत्र याची लागवड. विशेषतः कोंकणांत तर सामान्यपणें प्रत्येकाचें एकेक वेळूचें बेडें असायचेंच. सातपुड्यांतही वेळूचीं बेटें विपुल.

भरदार अन् पोकळ, असे वेळूचे दोन प्रकार. पैकीं भरदार वेळूचीं बेटें थोडीं ठेंगणीं. पोकळ वेळूचीं भरपूर उंच. त्यांचे फांदोरे एकमेकांत असे गुंतलेले, कीं सुटतां सुटत नाहींत. वेळूला फुलें एकदांच येतात. त्यानंतर येतात गव्हासारखे दाणे. यांची भाकरी करून खायची. पण वेळू पन्नास-साठ वर्षांनीं एकदां फुलोरला, कीं मग तें बेट सुकायचें. ज्ञानोबांनींही ही खूण सांगितली आहे.

गाथेंत एक उल्लेख आहे तो घनदाट वेळूच्या बेटाचा—इतकें घनदाट, कीं त्यांत वाराही शिरत नाहीं!

शेवटीं ज्याचा उल्लेख गाथेनें केला आहे, असा वृक्ष म्हणजे शिरीष. शिरीष जसा आपल्या गर्द छायेबद्दल प्रसिद्ध, तसाच तो सुकोमल पुष्पां-बद्दलही. कवीनें एका सुकुमारीच्या यौवनकांतीचा उल्लेख करून म्हटलें आहे, कीं शिरीषाचें फूल चुरगळावें तशी ती कोमेजली!

मात्र गाथा कांहीं वृक्षवर्णनपर ग्रंथ नव्हे. त्यांत वेगवेगळ्या निमित्तांनीं प्रसंग उद्भवले, तिथें ज्या वृक्षांसंबंधीं बोललें गेलें, त्यांचा उल्लेख वर केला.

त्या काळीं असतील, आणि ज्यांचा उल्लेख गाथासप्तशतींत आला नसेल, असेही अनेक वृक्ष त्या काळीं महाराष्ट्रांत असले पाहिजेत.

उदाहरणार्थ बाभूळ. बाभूळ हें महाराष्ट्राच्या बाबतींत कल्पतरूचें धाकटें भावंड ! या झाडाचें कांहींच वांया जायचें नाहीं. खोड औतें भरायच्या कामीं यायचें. उरलेल्या लांकडांचीं फाटीं व्हायचीं. सालीचा कोळसा दन्त-मंजनाच्या कामीं यायचा. सालींतून झाड उभें असतां डिंक निघायचा, तो बहुगुणी. बाळंतिणींच्या लाडवांत तो डिंक पहिल्या क्रमाचा पदार्थ. पाला, फुलें आणि शेंगा बकऱ्यांचें अत्यंत आवडतें खाद्य. उरले कांटे, ते कुपाटीच्या कामीं यायचे. बाभूळ हें झाड कोरड्या हवेंत सहजगत्या होणारें. नुसतें बीं टाकून दिलें कीं पुरें. निगा राखायची जरुरी नाहीं.

मराठवाड्यांत मोठमोठीं बाभूळ बनें. वऱ्हाडांतही. किंबहुना गांव आहे, आणि तिथें बाभूळ नाहीं, असें क्वचितच व्हायचें. गांवकींत जितकी जरुरी पाटील-कुलकर्ण्यांची, तितकीच बाभळीची.

आंबरायाही फार प्राचीन काळापासून महाराष्ट्रांत असल्या पाहिजेत. महाराष्ट्रिकांना वेड कशाचें म्हणाल, तर आंबरायांचें. हें वेड राजांत, तसें रंकांत. दहावीस आंब्यांचीं झाडें नाहींत, तो गांव करंटा. शिवछत्रपतींना तर आंब्यांचा छंद होताच होता. त्यांच्या लहानपणीं दादोजी कोंडदेवांनीं शिवापुराजवळ मोठी प्रचण्ड आंबराई जोपासली होती. मोठेपणीं छत्रपतींनीं रायगडजवळ नामांकित आंबे आणून यत्नपूर्वक लावले होते.

जशी बाभूळ, तसाच उंबर. औदुंबरवृक्षाचे उल्लेख पुराणग्रंथांमधून आढळतात. उंबराची छाया थंड, फळही किडी वगळल्या वर मोठें मधुर. कशा कोण जाणे, उंबराचें फळ—प्रत्येक फळ—बंद असतांच त्यांत किडी होतात. असंख्य. प्रत्येक उंबरफळ किडींनीं नुसतें बुजबुजलेलें असतें. या किडींविषयीं तुकारामबावांनीं म्हटलें, कीं 'उंबरांतील कीटका, हेंचि ब्रह्माण्ड ऐसें लेखा !' त्या कीटकाच्या लेखीं तें उंबर हेंच ब्रह्माण्ड !

पुढें उंबराचें झाड देवत्व पावलें. त्याच्या खालीं दत्तगुरूंचा वास. दुसरें असें, कीं उंबराचें झाड, हें जमिनींत पाणी असल्याचें चिन्ह. पाणाड्यांचा तो एक मदतनीसच म्हणायचा.

नाना प्रकारच्या दन्तकथा पिंपळाच्या पाराभंवतीं एकवटल्या आहेत.

सामान्यपणें गांवांत पिंपळाचें झाड असायचें, अन् त्याला ओटा असायचा. त्याच्या जवळपास असायचें मारुतीचें राऊळ. पारावर शेंदूर माखलेल्या चार-दोन देवता. पिंपळावर मुंजा असायचाच. तो कुणाला एरवीं त्रास मात्र द्यायचा नाहीं. या त्याच्या निरुपद्रवीपणामुळेंच बारा पिंपळांवरचा मुंजा, ही कांहींशी कुचेष्टेखोर म्हण रूढ झाली. पिंपळाला प्रदक्षिणा घातल्यानें मूल होतें, अशी दृढ धारणा. आळंदीचा सुवर्णपिंपळ प्रसिद्ध. ' जयाचिये द्वारीं सोन्याचा पिंपळ, ' अशी ज्ञानोबाची स्तुतिही झालेली. किंबहुना संसारवृक्षाचें वर्णन करतांना श्रीकृष्णांनीं त्याला अश्वत्थ म्हटलें, अन् असें पिंपळाला देवत्व आणून दिलें.

पिंपळ पालवला म्हणजे त्याचीं कोंवळीं पानें भारी सुरेख दिसतात. उंबराचा अन् पिंपळाचा चीक, हें एक बहुगुणी औषध.

शेवग्याचें झाड फार नाजुक. तसेंच तें फार देखणेंही. शेंगांना फार मोठी लज्जत. तीच लज्जत फुलांना. फुलांची भाजी फार चांगली आणि चवदार व्हायची. शिवाय हीं दोन्ही वातनाशक. कोंकणांत बहुधा घरोघरीं एका परीनें विहीर नसली तरी चालेल. पण शेवगा असलाच पाहिजे.

सीताफळ आणि रामफळ हीं दोन्ही झाडें तशीं ठेंगणीं ठुसकींच. पण फळें मात्र अप्रतिम. पण हीं झाडें सगळीं गांवाभंवतालीं अगर गांवांत असायचीं.

बाभळीच्या बरोबर हिवर आणि सौंदड या दोन कांटेरी झाडांचा उल्लेख करायला हवा. हिवराची सावली जरी थंड असली, तरी ज्ञानेश्वरांच्या मतें ती सज्जनांनीं बहिष्कृत केलेली. तसलेंच, पण कांटे थोडे कमी असलेलें झाड शमीचें.

शमीचीं पानें गणपतीच्या पूजेसाठीं लागायचीं. शमीवर पांडवांनीं शस्त्रें ठेवलीं होतीं, म्हणून अन् विजयादशमीला शमीपूजन करायचें, म्हणून शमीही एक धार्मिक वृक्ष झाला आहे.

हिरड्याचा उल्लेख मागें येऊन गेला. बेहेडयाचाही करायला हवा. रानांत अन् गांवाशेजारीं सांपडणारा बहुगुणी आंवळा हिशेबीं धरला, कीं त्रिफळाचूर्णाची सिद्धता झाली. पण आंवळा हेंही एक सांस्कृतिक महत्त्वाचें झाड. कार्तिकांत अष्टमीस स्त्रिया आंवळीचें पूजन करतात. कृष्णावळी ही जात केवळ पोरासोरांना लोभसवाणी. खायला तीं फळें मोठीं रुचकर. या

फळांचा एरवीं उपयोग कांहीं नाहीं. मोठ्या आंवळ्यांचें तसें नाहीं. मोरावळा, आवळकाठी, आवळाविड्या असे, आंवळ्याचे नाना उपयोग.

असेंच गांवाचा आसरा करून असणारें, अन् विशेषतः रस्त्यांच्या दुतर्फा सावलीसाठीं लावलें जाणारें झाड म्हणजे पिंपरीचें. पिंपर आणि वड यांची कुळी एक. पिंपरीचेंच दुसरें नांव नांदुरकी. नांदुरकी हें झाड वारकऱ्यांचें अप्रुकीचें. कारण तुकारामबाबा अन्तर्धान पावले, ते नांदुरकीच्या झाडाजवळून.

इथेंच उल्लेख करायला हवा अजानवृक्षाचा. ज्ञानेश्वरांची समाधि अजानवृक्षाच्या तळवटीं. हीं झाडें फारशीं कुठें दिसत नाहींत. एका ठिकाणीं तीं आढळलीं, सातारा जिल्ह्यांतल्या स्वामीच्या वडगांवीं.

अंजनाचा पाला गुरांचा फार आवडता. हीं गोल गोल पानें दिसायला मोठीं देखणीं. तसेंच रानचें आणिक एक देखणें, सरळसोट वाढत जाणारें झाड म्हणजे आइनाचें. या सरळपणावरून आठवण झाली शिंदीची. शिंदीच्या शिंदोळ्या चविष्ट, हें तर खरेंच. पण त्या झाडापासून मिळणारी नीरा हें एक पौष्टिक पेय. विशेषतः ठाणें जिल्ह्यांत शिंदी अमाप.

महारुखाचें झाड भलें प्रचण्ड खरें, पण त्याच्या लांकडाचा उपयोग केवळ तरवारींचीं अन् कट्यारींचीं म्यानें करण्याच्या कामीं.

कोंकणच्या वृक्षावळी—

नारळी, पोफळी, फणस, काजू, बिम्बा, उंडी, मुचकुंद, भोपा, तिवर, मारांडी–अशा या कोंकणीं झाडांमध्यें मानाचें पान नारळीला.

नारळीचें म्हणजे माडाचें कांहींच वांया जात नाहीं. म्हणून तर त्याला कोंकणचा कल्पवृक्ष असें नांव मिळालें. फळासंबंधीं बोलायलाच नको. नारळ अचानक गुप्त झाला, तर लक्षावधि गृहिणींचे स्वयंपाक अगदीं बेचव होऊन जातील. खोबरेल तेल सर्वांच्या परिचयाचें. कोंवळ्या नारळाचें पाणी अमृतमधुर, तशीच माडाची नीरादेखील. करवंटीचीं होतात बटनें अन् माळवी पुरंध्रींच्या बांगड्या. करवंटीचें तेलही चर्मरोगावर बहुगुणी. फळावरचें कवच म्हणजे काथ्या. तो भिजवून कुटायचा. त्याच्या दोऱ्या वळायच्या. हजारों मच्छीमारांच्या व्यवसायांतला तो एक अत्यंत आवश्यक घटक.

नारळीचीं पानें म्हणजे झाप. कोंकणांतलीं बहुधा सगळीं गरिबांचीं घरें झापांनीं शाकारलीं जायचीं. एकदां झापांनीं शाकारणी काढली कीं सात-आठ वर्षें झाप बदलायला नकोत. कलावंत झापाच्या एका फागोरीच्या नाना प्रकारच्या वस्तू करायचे. झापाचे हीर निघायचे, त्यांचे खराटे सर्वोत्तम. हे खराटे गुप्त झाले, तर हजारों शहरें धुळीनें अन् कचऱ्यानें अगदीं बरबटून जातील.

नारळीचें खोड म्हणजे उत्तम लग. एकदां घराला घातली, कीं पांच-पन्नास वर्षें बघायला नको. मधून कोरून काढलें, तर गुरांना पाणी प्यायला उत्तम डोण.

पण हें सगळें वगळूनही नारळीचा रोपा म्हणजे बागेची केवढी शोभा ! चांगली सुरेख बाग लावा, अन् तींत दोन कोपऱ्यांत दोन माड लावून द्या, कीं बस ! फुलझाडांची सगळी कमतरता भरून निघून बाग एकदम जरीचें पाटाव नेसलेल्या एखाद्या कुलशीलवतीसारखी दिसायला लागेल. तेव्हां नारळी हा केवळ कोंकणचा कल्पवृक्ष नव्हे, तर तो महाराष्ट्रवनश्रीच्या भाळींचा कुंकमतिलकच म्हणावा लागेल !

हा कल्पवृक्ष, तर महाराष्ट्रवनश्रीच्या कुळांतली नाजुक नार म्हणजे पोफळ ! पोफळीसारखें नाजुक अन् देखणें झाड दुसरें नाहीं. हीही नारळीच्याच जातीची. म्हणजे सामान्यपणें तसेंच रूप. फळें धरण्याची तऱ्हाही जवळजवळ तीच. पण माड पुरुषप्रकृतीचा, तर पोफळ म्हणजे युवती. पोफळींच्या बागेंत प्रवेश केला, कीं हळदीकुंकवासाठीं जमलेल्या तरुणींच्या समुदायांत प्रवेश केल्यागत वाटतें.

पोफळीचीच सखी केळ. केळीवर अधिकार सबंध महाराष्ट्रानें सांगावा पाहिजे तर. खानदेशाचीं केळीं फार प्रसिद्ध. अगदीं पंजाबपर्यंत जायचीं. पण कोंकणच्या उंचसडक, किंचित् पिंवळसर, हिरव्या रंगाच्या केळीचें सौंदर्य कांहीं आगळेंच ! नाना परींचीं केळीं कोंकणानेंच पिकवावींत !

फणसाविषयीं शेख महंमदानें म्हटलें, कीं 'फणसाअंगीं कांटे, आंत अमृताचे सांठे !' हें तर अक्षरशः खरें बोलला शेख महंमद. त्यांत बरक्यापेक्षां कापा फणस म्हणजे कांहीं मौज आहे. बरक्यांतलीही लसण्या नांवाची जात म्हणजे आगळीच. बरें, फळ केवढें, तर घागरीएवढें. झाडाच्या बुंध्यापासून तों

शेंड्यापर्यंत कुठेंही लागायचें. जितका चवदार फणसाचा गरा, तितकीच भाजल्यावर खमंग फणसांतली आठळी. तर फणस कोंकणांत विपुल व्हायचा, तीच पर गोमंतकाची.

काजूच्या झाडाचें वैशिष्ट्य हें, कीं एकदां रोपा रुजला, कीं त्याला वरून पाणी घालायला नको. सताठ-दहा वर्षांत फळें धरायचीं. फळाबाहेर बीं, अशी एका काजूचीच. शिवाय काजू हेंही डॉलर पैदा करणारें फळ. जर कोंकणानें काजूची वज न राखली, त्याचें हें महत्त्व न ओळखलें, तर कोंकण खरोखरीच दरिद्री म्हणावें लागेल !

उंडीच्या फळांचें कडू तेल औषधी तर खरेंच. पण झाडाचें देखणेपण जसें अपूर्व, तसाच अपूर्व फुलांचा सुवास. उंडिणीचीं पांढरीं लख्ख फुलें, त्यांतला पिंवळा केसर, म्हणजे दृष्टीचाही विषयच. भोपा, तिवर, मारांडी हीं सारीं खाजणांतलीं झाडें. मुचकुंद, बिब्बा हीं डोंगरांतलीं. पण बिबव्यावर स्वामित्व एकट्या कोंकणानें सांगूं नये. सातपुड्यांतही बिबवा भरपूर होतो, तसाच तो अजंठ्याच्या डोंगरांत, म्हणजे मराठवाड्यांतही.

ऐकून आश्चर्य वाटेल. पण चिंच आणि पपई हीं झाडें महाराष्ट्रीय नव्हेत. बाहेरून आलेलीं. पण आतां विशेषतः चिंच महाराष्ट्राची झाली आहे. आमरायांसारखीं चिंचांचीं मोठमोठालीं बनें वऱ्हाड, मराठवाडा, घाटमाथा, अशीं सर्वत्र आढळतात. विशेषतः चिंच प्रसिद्ध, ती झाडाच्या गूढतेमुळें. एक प्रकारचें गूढ काळेपण चिंचेभोंवतीं साकळलेलें असतें. म्हणूनच बहुधा म्हाताऱ्या बायांनीं चिंच हें हडळींचें निवासस्थान ठरवून दिलें असावें. जसा मुंजा पिंपळावरच राहायचा, तशी हडळ नामक अमानवीय सृष्टि चिंचेवरच मुक्काम ठोकून असायची.

येकळी, निर्गुंडी, टाकळी, करवंदी अशा झुरपुडांच्या उल्लेखावांचून ही वृक्षावळीची नोंद अपुरी राहावी. कारण तुकारामानेंही ‘ चन्दनाच्या संगें बोरिया बाभळी, येकळी टाकळी चन्दनची ’, असा येकळी-टाकळींचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. त्याबरोबर कांडे साबर आणि फड्या निवडुंग, या दोन वनस्पतींची दाद घेतली, कीं सामान्यपणें ही यादी संपूर्ण झाली म्हणायची.

पैकीं कांडे साबर किंवा कांडे निवडुंग हें एक निरुपद्रवी, उपयोगी झुडूप.

कुंपणाच्या कामीं यायचें. अंगीं असलेल्या बारक्या कांट्यांमुळें गुरूं आंत शिरायला धजायचें नाहीं. गुरूं मोडलें, तर हाड बसविण्याच्या कामीं याचा चीक बहुमोलाचा. प्लास्टरसारखा या चिकाचा उपयोग होतो. याच्या कांडकांना सामान्यपणें चार किंवा पांच कांटेरी धारा असतात. तसाच त्रिधारी निवडुंगही कुठें कुठें सांपडतो.

फड्या निवडुंग मात्र उपद्रवी. कुंपण पक्कें, हें तर खरेंच. मागें दहावीस वर्षांपूर्वीं गांवाभोंवतीं, मुख्यतः खेड्याभोंवतीं या निवडुंगाचा कोटच उभा असायचा. तो कोट भेदून आंत शिरायचें सामर्थ्य कुणाच्याही अंगीं असायचें नाहीं. कांटा भला लांब, आणि अति विषारी फळें मात्र तांबडीं, खायला अति मधुर. पण जेव्हां निडुंगाचा उपद्रव फार झाला, तेव्हां मग सरकारनें कुणीकडून कोण जाणे, एक पांढरी कीड आणली. तिनें एवढ्या महाराष्ट्रभर माजलेल्या निवडुंगाचा अगदीं चुना करून टाकला, आणि स्वतःही नामशेष झाली.

कुंपणावरून आणिक दोन राहून गेलेल्या झाडांची आठवण आली. पहिलें शेर, अन् दुसरें पारशा एरंड. पारशा एरंडाचें दांतवण नामांकित. शेराची फांदोरी घरांत आणून टांगावी, कीं तिच्यावर चिलटें एकत्र होतात. रात्रीं जाळून टाकावीं.

शेराच्याच कुळांतली आणिक एक वनस्पति म्हणजे सोमवल्ली. ही सह्याद्रींत सांपडते. विपुल प्रमाणांत मात्र नव्हे. सोमवल्ली ही वैदिक वनस्पति. हिच्या रसाचें महत्त्व यज्ञयागांत फार. सोम आणायचा केव्हां, कांडायचा कशामध्यें आणि कशानें, रस काढीत असतां कोणता मंत्र म्हणायचा, सोमपानांत पहिला क्रम कुणाचा, असें या सोमवल्लीचें मोठें शास्त्र होतें. सह्याद्रीमध्यें सोमवल्ली सांपडावी, हें एका अर्थानें सह्याद्रीच्या प्राचीनत्वाचेंही एक गमकच म्हणायचें.

आतां ज्या वृक्षांचा नामोल्लेख राहून गेला असेल, त्यांनीं क्षमा करावी, असें म्हणून वनस्पतींकडे वळावें.

## अठरा भार वनस्पती—

वनस्पती म्हणजे लहानग्या वनस्पती, हें ओघानेंच आलें. या वनस्पतीं-

विषयींही महाराष्ट्रांत समृद्धि आहे. कांहीं औषधी वनस्पतींचा उल्लेख आवर्जून करायलाच हवा.

तुळस सर्वत्र होते आणि पूजिली जाते. बहुतेक घरटीं तुळशीवृंदावन असतेंच. कांहीं जण यामागें कांहीं एक आरोग्यविषयक कल्पना चिकटवितात. तें असो बापडें. तुळस ही बायाबापड्यांची मायबहीण. दरवर्षी तुळशीचा विवाह लंगड्या बाळकृष्णाशीं व्हायचा. एक आजीगीत आहे : 'तुळशी तुळशी तूं माझी काशी !'

पण औषधी गुणधर्म मात्र तुळशींत नामांकित आहेत. ताप-थंडी झाली तर तुळशीचा काढा. खरचटलें असेल तर तुळशीचा रसच काय, पण तुळशींतली माती देखील उपयोगीं आणली जाते ! तुळशीचें बीं नामांकित शीतगुणवर्धक औषधी उष्णता वाढल्यावर घ्यावें. तुलसीपत्र श्रीविष्णूला अत्यंत प्रिय. सगळ्या वारकरी मंडळीच्या गळ्यांत तुळशीच्या काष्ठांची माळ !

सब्जा किंवा रानतुळस म्हणजे तुळशीचा पर्याय. तुळस उपलब्ध नसली तर सब्जाचा उपयोग केला जातो.

ब्राह्मी ही बहुगुणी वनस्पती. पान खायला मिरमिरीत लागतें. खाल्ल्यानें बुद्धि वाढते म्हणतात. पण तेल मात्र शीतगुणवर्धक अक्कलकाऱ्याचें फूलही अक्कल वाढण्यासाठीं खातात. अकलेची वाढ होते कीं नाहीं, तें कुणास कळे, जीभ मात्र बेचव झाली असली, तर चव परत येते. ब्राह्मी तेलासारखेंच माक्याचें तेलही गुणकारक. वातावर फार चांगलें. नागरमोथ्याचें तेल, हा केंस जाण्यावरचा उत्तमपैकीं उपाय.

आलें ही एक बहुगुणी औषधी. ताप, खोकला, थंडी इत्यादि विकारां-वर उत्तम. लहान मुलांच्या बाबतींत वेखण्डही असेंच शीतरोधक. गवती चहाही बहु उत्तम. पडसें झाल्यास झोंपतांना चार तुळशीपानें अन् इवला आल्याचा तुकडा टाकून घ्यावा, कीं दुसरे दिवशीं प्रकृति साफ.

दूर्वा जशा गणपतीला अत्यंत प्रिय, तशा त्या एक उत्तम औषधि. अनेक रोगांत दूर्वांचा रस हें अनुपान. आतां दगडी किंवा ब्रह्मदण्डी हें एक नासुकलें रोपटें. पण जखमेवर त्याचा बहुमोल उपयोग.

दर्भ हें तसें पाहिलें तर गवत. पण धर्मकृत्यांत अत्यंत उपयोगी. दर्भाचें पावित्रक घातल्याशिवाय एकही धर्मकृत्य पार पडायचें नाहीं. नद्यांच्या,

विशेषतः मोठ्या ओढ्यांच्या कांठीं दर्भ विपुल सांपडावा. तसेंच सामान्यपणें नद्यांच्या कांठीं सांपडणारी आणिक एक वनस्पति म्हणजे कडू इन्द्रावन. वनस्पति कांटेरी, फळ बोराएवढें, वांग्याच्या जातीचें. दांतांना कीड लागली, तर फळाची धुरी घ्यावी, दांतदुखी कमी होते.

गुळवेलीचा उल्लेखही वनस्पतींतच करायला हवा. उष्णतेवर गुळवेलीचें सत्त्व जसें बहुगुणी, तसेंच गुळवेलीच्या काढ्याचेंही महत्त्व. एका आईनें मागें एकदां आपल्या पोराला भुलावणी दिली होती, कीं ‘ शिखा ते वर्धते वत्स श्रद्धया गुडुचीं पिब ! ’

अशा कितीतरी वनस्पती. नानाविध गुणांनीं युक्त. एक दिवसभर सूर्य-प्रकाशांत तापवली, तर रात्रीं उजेड देणारी. एक लहान लेकराच्या गळ्यांत बांधली, तर त्याला शीतबाधा न होऊं देणारी. एक अशी दर्पयुक्त, कीं जिवाणू जवळ फटकत नाहीं. एक फणफणून ताप आणणारी, तर दुसरी घेतांक्षणीं तापाचा जोर कमी करणारी. एक पाण्यांत टाकतांच पाण्याचे दोष शुद्ध करणारी. एक जवळ ठेवून जेवा—वाटेल तेवढें, अन् पुनः पाव घटकेनें जेवायला बसा ! पोट मोकळेंच्या मोकळें. एक पाण्यांत टाकतांक्षणीं तळाला जाणारी, तर दुसरी दूध नासवणारी.

अशा नाना प्रकारच्या दिव्य वनस्पतींनीं महाराष्ट्राचीं वनें नुसतीं भरलीं आहेत. केवळ ओळख पटली, कीं झालें. मग या नाना सिद्धि वश होतात.

पुष्पवल्ली—

फुलांचें प्रकरण सुरू झालें, कीं अगोदर आठवण व्हायची गुलाबाची. पण तें फूल मूळ महाराष्ट्रांतलें नव्हे. म्हणून त्याचा विचार न केला तरी चालेल.

दुसरें भारतीय महत्त्वाचें फूल म्हणजे कमळाचें. कमळाचें कवींना किती कवतिक ! नाना परींनीं त्यांनीं त्याचें वर्णन केलें. कुणीं कमलकलिकेचें, तर कुणीं त्याच्या मकरंदाचें. कुणीं त्याच्या केसराचें तर कुणीं त्याच्या अलिप्तपणाचें.

ज्ञानेश्वरांनीं म्हटलें, कीं एकदां कमलकलिका गंधानें धाली, तृप्त झाली, कीं तो तिला चोरून ठेवतां येत नाहीं. दुसऱ्या ठिकाणीं ते म्हणाले, कीं

कमलदलांतला केसर कुचुंबूं नये, म्हणून भ्रमर त्यावर अगदीं हळुवार पाय टेकवितो. तुकारामबावांनीं त्याच्या जळांत राहून जळावेगळें राहण्याच्या गुणाची वाखाणणी केली. एकदां त्यांनीं म्हटलें, ‘ सूर्यविकासिनी नेघे चन्द्रकळा ! ’

गाथासप्तशतीकारांचें तर कमल अतिशय आवडतें. एका दयितेनें अंथरलेल्या नीलकमलांच्या पायघड्यांचा त्यांनीं उल्लेख केला आहे; तर दुसऱ्या एकीनें कानांवर ठेवलेल्या कमलपुष्पांतील पराग तिच्या डोळ्यांत उडाल्याची नाजुक खूण सांगितली आहे. एका ठिकाणीं त्यांनीं नीलकमलाच्या गंधानें सुगंधित झालेल्या मधाचें वर्णन केलें आहे, तर एक मुग्ध युवती आत्याबाईला विचारते, कीं आपल्या तळ्यांत जणूं आकाशच उतरलें आहे बघ ! ना कमलपुष्पांचे ताटवे तुडवले गेले, ना त्यांतले हंस उडवले गेले !

अशीं हीं कमळें महाराष्ट्रांत, विशेषतः सह्याद्रींत सर्वत्र. कोंकणांत तर विशेषच. कोंकणांतले तलाव कमळांच्या वेलींनीं तुडुंबलेले असायचे.

मोगरा, मालती, चमेली, कुसरी, जाई, जुई, कुन्द—हीं सगळीं खास महाराष्ट्राचीं फुलें. अगदीं रानावनांत सुद्धां फुलणारीं. एकदां फुललीं, कीं सारें रान धुंद करून टाकणारीं. हीं सगळीं एकाच कुळांतलीं. असाच धुंद करून टाकणारा गंध पारिजातकाचा. हेंही झाड रानोवनीं फुलणारें. पहाटेस झाडाखालीं प्राजक्तीच्या तांबडदेठी फुलांचा नुसता सडा पडलेला असायचा. करवंदीचा गंधही सामान्यपणें चमेलीच्याच जातीचा.

असाच मन्द, मादक गंध चम्पकाचा. महाराष्ट्रांत चांफ्याच्या नाना परी. पहिली, अन् महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांत पसरलेली पर म्हणजे पांढरा चांफा. कुठेंही, कुण्याही माळावरल्या देवळापुढें एक असायची दीपमाळ—महाराष्ट्राचें बोधचिन्ह, अन् दुसरा असायचा पांढरा चांफा. या झाडाचें एक विलक्षण. पार पतझड झाल्याशिवाय फूल उगवायचें नाहीं, असा साधारणपणें संकेतच. याची शेंग दुधांत शिजवायची, अन् मग ती सर्पविषावर उतारा म्हणून वापरायची.

दुसरा उन्मादकारक गंध असलेला प्रकार म्हणजे हिरवा चांफा. याचा सुवास कांहींसा पिकल्या केळ्यासारखा, कांहींसा फणसासारखा. फूल झाडांतून ओळखून काढणें कठिण, पण सारा भंवताल गंधानें नुसता उसळत असायचा.

मंद, मोहक गंध सोनचांफ्याचा. फूल दिसायला देखणें. विशेषतः कोंकणांत, बागायतींत घरटीं एक-दोन रोपीं असायचींच. तांबडा चांफा, अन् कवठी चांफा या चांफ्याच्या आणिक दोन जाती.

शेवंती, कृष्णकमळ, माधवी यांचा सुवासिक फुलांच्या यादींतच उल्लेख करायला हवा. दवणा हा खण्डोबाचा आवडता. शंकराचाही. दवण्याचें फूल अगदीं बारीक. पण गंध मात्र मादक. मरव्याचेंही तसेंच.

अबोलीचें फूल म्हणजे जणूं मुग्धेचें अपर रूपच. तेरडा हें पावसाळी फूल, तर जास्वंद हें बागायती. कण्हेरी ओढ्याच्या कांठानें आढळायची. गुलबक्षी एक बहुवर्णी फूल आणि मुलींचें भारी आवडतें. गणपतींत गुलबक्षीच्या वेण्या माळलेल्या पोरी चहूंकडे हुंदडत असायच्या.

भुईकमळ अन् सीतेचीं आंसवें, हीं दोन फुलें म्हणजे कोंकणची अपूर्वाई. पावसाळ्यानंतर नाना वर्णांच्या अन् नाना आकृतींच्या फुलांनीं सह्याद्रि नुसता डंवरून निघतो. गंध महकत असतात. फुलपांखरें उडत असतात. ऊन्ह ढगांमधून उतरत असतें, लपत अन् सांपडत असतें. असा सगळा आनन्द आनन्द असतो.

शेवटीं कांहीं वेलींचा उल्लेख केला, कीं हें वृक्षवेली-वनस्पती प्रकरण पुरें झालें. गुंजांच्या वेलीवर शेंगांतून गुंजा तांबडे डोळे उघडून टकाटका पाहात असतात. कवंढाळाच्या वेलींवर चेंडूसारखीं तांबडीं कवंढाळें लटकलीं, म्हणजे मोठें देखणें दिसतें. वाघांटीच्या वेलीचीं वाघांटीं, म्हणजे खास महाराष्ट्रीय भाजी. अमरवेलीचें नांव अशासाठीं घ्यायचें, कीं जमिनीपर्यंत न पोंचतांच ही बांडगुळासारखी झाडांवर वाढत असते.

नागवेल ही एक उत्पन्नाची बाब, तर मिरवेल महाराष्ट्रांत तरी केवळ कौतुकाची. खानदेश, रामटेक, वसई या बाजूंचीं नागवेलींचीं पानें आपापल्या वेगळ्या चवींचीं. हिंदुस्थानभर प्रवास करणारीं. पानबाज लोकांना एका परीनें रामटेकचें रामाचें देऊळ माहीत नसेल, पण रामटेकी पान मात्र माहीत. कांहींसें तिखट, तुरट पान म्हणजे एक चांगलें पाचक.

# कसा पिकला गहूं ग हरभरा !

महाराष्ट्रांतला पहिला शेतकरी अगस्ति. त्यानें या भूमींत सर्वप्रथम नांगर घातला. पण इथली जमीन कशी होती ?

यासंबंधीं कांहीं थोडें तर पाणलोटासंबंधीं विवेचन करीत असतां येऊन गेलें. पण तपशीलवार बोलायचें, तर कोंकणची जमीन जेमतेम पिकणारी.

कारण उघड आहे. कोंकण म्हणजे फार अरुंद पट्टी. अतिशयोक्तीनें बोलायचें, तर घाटाच्या तोंडाशीं आंघोळ केली, तर तें पाणी जाऊन मिळायचें समुद्रांत ! बरें, या डोंगरपट्टीची उंची किती ? तर अंदाजें अडीच ते तीन हजार फूट. अर्थ असा, कीं फार उतार. तेव्हां या उतारावरून धांवतांना पाणी जमिनीचा सगळा कस धुऊन न्यायचें. काय खाडीकांठीं जेमतेम थोडी सपाटी असेल, तेवढीच. बाकी सगळा उन्हाळा. मग पिकावें कसें ?

ही परवड पश्चिम पट्टीची. आतां पूर्वपट्टीसंबंधीं बोलायचें, तर पहाड संपल्यावर जिथून नद्यांच्या वहावांचे प्रदेश सुरू होतात, ती जमीन सुपीक म्हणायची. तापीकांठ, म्हणजे बहुधा सगळा खानदेश चांगला भरदार मुलूख. गोदा जिथें मराठवाड्यांतून वाहूं लागते, तिथें सगळा मुलूख भरगच्च. हीच कथा पूर्णा, काटेपूर्णा, वर्धा या नद्यांची. मात्र वऱ्हाडच्या दक्षिणेकडल्या नद्या कांहींशा बरड मुलुखांतून वाहातात.

अर्थ असा, कीं महाराष्ट्रांतले पहिल्या प्रतीचे सुपीक प्रदेश, म्हणजे

वऱ्हाड, खानदेश, मराठवाड्याचा कांहीं भाग, अन् घाटमाथ्याचा पूर्वेकडला हिस्सा.

काळी शार माती. फूटच्या फूट खालीं खणत जा, धर म्हणून कांहीं लागायचा नाहीं. पाणी धरून ठेवायचें सामर्थ्य अधिक. अर्थातच कमी पाऊसही पुरतो. तेवढ्या पावसावरच उत्तम पीक पैदा होतें. जमिनीचा कस असा, कीं खतावलेल्या जमिनींत नुसतें पाऊल ठेवलें, तर त्याला देखील कोंब फुटतील!

उरली सह्याद्रीच्या अन् सातपुड्याच्या उतारांवरली माळजमीन. हिच्यांत मुरमाटी अधिक दाट. झाडी सगळी सह्याद्रींत अन् सातपुड्यांत. या माळरानांमध्यें केवळ बाभळी, येकळी, टाकळी, सौंदड, हिंवर असलीं झुडपवजा झाडोरीं इथें एक तिथें एक, अशीं उभीं असलेलीं. मधूनच शेतें पाडलेलीं. त्यांत पाऊस कितीही पडला, तरी या मुरमाटीमुळें तो टिकायचा नाहीं. सगळा वाहून जायचा. तेव्हां या शेतांमधून काय पिकत असेल, त्याचा अंदाज कुणीही करावा, चुकायचा नाहीं.

अशा स्थितींत महाराष्ट्रभरांत पिकें काय काय होतात, याचें अनुमान सहज करण्याजोगें आहे.

कोंकणांत उतारांवरून वाहात येणारें भरपूर पाणी. तें बांध घालून अडवलें, कीं तेवढ्यापुरता पालापाचोळा अन् मावटा त्याच्याबरोबर शेतांत थांबायचा. मग या मावट्याच्या कसावर पिकायचें भात. नाना परींचें. हळवें, जिरेसाळ, आंबेमोहोर, वरंगल, भडस, धानेसाळ, तांबडभात.

कोंकणच्या भूमीला म्हणे सीतेनें शाप दिला, कीं भूमि जळो! मग शेतकऱ्यांनीं दीनवाणें होऊन उःशाप मागितला, तर सीतामाई म्हणाली, जळो, पण पिको!

तेव्हांपासून कोंकणांत जमीन भाजायची, अन् त्यांत रोपें करायचें. भाजायचा, तो तुकडा नीट तयार करायचा. म्हणजे खालीं गवरी करायची. इवले इवले वाळलेले शेणकुटाचे तुकडे पिस्कारायचे. त्यावर मग कवळ अंथरायचा.-कवळ म्हणजे झाडाझुडपांचे तोडलेले अन् वाळवलेले फांदोरे. हा कवळ पातेरीनें म्हणजे पालापाचोळ्यानें झांकायचा. मग वर टाकायचा गळाठा. म्हणजे गवताचा कूट. अशी ही सगळी रचना बारीक मातीनें

नीट आच्छादून काढायची. मग ती दंवानें भिजते. मऊ होते. मग एका चांगल्या छान पहाटेस ती पेटवून द्यायची.

पहिला दुसरा पाऊस सपकला, कीं या भाजलेल्या चोंढ्यांत पिस्कारायचें भात. तें हळूं हळूं रुजायला लागतें.

तंवर बाकी चोंढे तयार करून ठेवायचे. बारके, हलके नांगर. दोन बैलांनीं चालायचे. त्यांनीं चोंढा नांगरायचा. मग ढेंकळें फोडून ठेवायचीं. त्याला म्हणायचें फोड करणें. असा हा फोड केलेला चोंढा, त्यांत पुनः बेर करायची, म्हणजे पुनः एकदां नांगर फिरवायचा अन् पावसाच्या पाण्यानें चोंढा तुडुंब भरला, म्हणजे करायची तेर. तेर म्हणजे पुनः नांगर चालवून चिखल करायचा.

पाऊस पडतच राहतो. भुतासारखा. त्या पडत्या पावसांत अंगावर इरलीं घेऊन कोंकणांतले जान्या आडविलकर अन् तान्ह्या करंबेला खपत असतात. बायका पेजेचीं गाडगीं घेऊन त्यांची वाट पाहतात. डोळे मिचकावून त्यांच्याकडे बघत जान्या आडविलकर म्हणतो, 'बाऱ्या रे तुझी बारीक झुलवनी, माल्याच्या पोरीला हलुच खुनावली !'

त्याच्या या ग्राम्य थट्टेकडे लक्ष द्यायला कुणाजवळच वेळ नसतो. पावसाची मस्ती साऱ्यांच्याच अंगीं भरते, अन् मग भाजल्या चोंढ्यांतलीं रोपीं उपटीत, त्यांच्या पेंढ्या बांधीत, अन् तयार केलेल्या चिखलांत तीं लावीत असतां सगळेच चकवे गातात. बाया अन् बाप्ये.

पावसाची मुसळझरणी सुरू असते, अन् चुपुचुपु पाणी पीत रोपें वाढतात. हळूं हळूं पाऊस उणावतो, अन् वाऱ्याच्या मंद झुळका सुरू होतात. चांगल्या कसदार शेतांतलें भात मांडी मांडी वाढतें. हळूं हळूं तें फुलोऱ्यावर येतें. शेतें घमघमूं लागतात.

मग एका सोनेरी सकाळीं आडविलकराच्या ध्यानीं येतें, कीं भात निसवलें आहे ! मग त्या रात्रीं भजनांचा अन् लावण्यांचा धुमाकूळ उसळतो.

या साळींचा मोह तर श्रीरामचन्द्रांनाही पडला होता. ते गोदातीरींच्या साळी पाहून लक्ष्मणाला म्हणाले होते, 'बघ लक्ष्मणा, या सोनेरी साळी कशा नम्र झाल्या आहेत ! त्यांचे लोंबे खजुरीच्या फुलासारखे दिसताहेत. ते दाण्यांनीं भरून आले आहेत ना ?' म्हणून.!'

खर्जूरपुष्पाकृतिभिः शिरोभिः पूर्णतण्डुलैः ।

शोभन्ते किञ्चिदानम्राः शालयः कनकप्रभाः ॥

जसा धुमाकूळ लावणीचा, तसाच कापणीचाही. भात पिकून पिवळें पडतें. क्वचित् खालीं लोळतेंही तें. मग सुरू होतो कापणीचा बाज. तीच घाई. तेच चकवे. सगळें अगदीं जसेंच्या तसें.

चार दिवस भात ठिकाणींच सुकावलें, कीं पेंढे बांधायचे. उडव्या रचायच्या. खळीं करायचीं. भातें झोडायचीं. कणग्या भरायच्या. कुणाच्या घरची अन्न-परसादी अजिबात सरलेली असते. मग कच्चींच भातें झोडायचीं, कांडायचीं, शिजवायचीं, कीं बोला पुण्डलीक वरदे !

नागली, वरी, सावा ही मंडळी जरा खालच्या दर्जाची. साळीबाईची तब्येत जरा नाजुक. त्यांच्यासाठीं मेहनतही अधिक करावी लागते. वेगळ्या भाषेंत बोलायचें, तर साळीबाई जर पांढरपेशा घरची, तर नागली श्रमिका-घरची घरधनीण ! तीच कथा वरीची. सावा, कोद्रू, कुटकी, ही मंडळीही याच पंगतींतली.

नागलीसाठीं उतारावरची जमीन उकरायची. जशी जमेल तशी. उखर-वाखर नांगर हांकतां आला, तर अहोभाग्य. नाहीं तर गेला बाजार शेत कुदळीनें खणून काढायचें. भाताच्या रोपांसारखीच नागलीची रोपणी करायची. मात्र तितकी दाट नव्हे. अंतर सोडून. नागली भरास आली, कीं दाण्यांचे तुरे वर डोलूं लागतात. हाताचीं बोटें जुळवून एकत्र धरावीं, तसें नागलीचें बोंड दिसतें. जणूं आईचे द्वित्रिंशत्कोटि हातच वर उभावले आहेत.

नागलीचा दाणा बारीक, गोल, दिसायला कांहींसा मोहरीसारखा. नागलीची ताजी भाकर खाण्यांतला आनंद अवीट आहे. बरोबर हवी नारळाची ओली चटणी, लसूण घालून वाटलेली.

भाताच्या कितीतरी जाती. रायभोग, चिमणसाळ, आंबेमोहोर, कोळंबा—हीं अशीं कांहीं त्यांतल्या वरिष्ठ जातींचीं नांवें. नामांकित भात पिकतें कुलाबा जिल्ह्यांत. किंबहुना कुलाबा जिल्हा, हें कोंकणचें साळी-भांडारच म्हणावें.

नागपूरच्या पूर्वोत्तर बाजूचा भागही तांदुळाकरतां प्रसिद्ध. तिकडची जमीन पांढरी, भुरकट. चिकणी नव्हे. पाणी सामावून घेणारी. तेव्हां तिकडेही भाताच्या कांहीं नामांकित जाती पिकतात. पुण्याभंवतालचीं मावळें पिकण्याच्या बाबतींत जेमतेमच. पण या जमिनींतही कांहीं गांवीं असें नामचंद भात पिकतें, कीं त्याच्या पेजेंत भिजलेली वात मेणबत्तीसारखी पेटवावी !

घाट चढून वर यावें, तों शेतांमधून भाले खोवले असल्याचा भास होतो. भाले नव्हेत ते, तीं असतात बाजरी अन् ज्वारीचीं ताटें. भुरक्या रंगाची बाजरी, अन् मोत्यानेंही लाजावें, अशी तजेलदार ज्वारी.

काढणी झाली, कीं थोडक्याच दिवसांत वावरें तापूं लागतात. सकाळपासून जो उन्हानें ताणा बांधलेला असतो, तो संध्याकाळ झाली, तरी ढिला पडत नाहीं. मग शेतें चिराळूं लागतात. त्या भेगांमधून वाफारे उमळूं लागतात.

मग सर्जेराव अन् येंकटराव नांगरणी करायला भिडतात. साताऱ्याकडे लहानग्या हत्तीएवढे दहा दहा बैल. लोखंडी नांगर. मागें हळ्या देत चाललेले आउतकरी. त्यांच्या खांद्यावर खुळखुळत असलेले आसूड.

भुई फाडीत चाललेले नांगरांचे फाळ. त्या भुईमधून दरवळत असलेले मातीचे गंध. नांगरट झाली, तिथें आपल्या उंच पायांनीं उड्या मारीत चाललेले बगळे. शेतांच्या बांधावर न्याहारीच्या भाकरी, अन् कालवणाचीं गाडगीं टोपल्यांतून घेऊन थांबलेल्या मायमावश्या. झाडांवर नेमके त्यांच्या टोपल्यांवर टप धरून कावकाव करीत असलेले कावळे.

घाटावर, खानदेशांत, मराठवाड्यांत, वऱ्हाडांत—जिथें जिथें काळी आहे, तिथें तिथें सामान्यपणें याच जातीचें दृश्य दिसायचें. कमीअधिकपणा व्हायचा, तो केवळ बैलांच्या उंचींत, संख्येंत आणि नांगरांच्या लहानथोरपणांत. कुठें सबंध नांगर लोखंडी असायचा, तर कुठें फाळ तेवढा लोखंडी, बाकी भाग लांकडी. हळस, रुमणें—सगळें.

अशी जमीन फोडून काढायची. खालून वरून तापली, म्हणजे मग चालायचे कुळव. कुळवांनीं ढेंकळें फुटायचीं. तंवर एखादा अपघाती वळवाचा सपका बरसून जातो. बीं रुजतें. गवताचें, कुरडूचें, आघाड्याचें अन्

कशाकशाचें. थोडी जमीन हडकली, कीं कुळवाची दुसरणी. या पाळीला कुळवांच्या मागें चालतें बुरखुंडें वेचणें. काडी, कचरा, तण, पार सगळें उचललें जातें.

मग चालतात फरार्टी. कुठें कुठें कुळवच उलटे करून फिरवले जातात. अशा रीतीनें सगळें शेत फुटून मऊ भुसभुशीत होतें, पेरणीजोगें.

तंवर लागतो मिरीग. मृगाचें हें नक्षत्र अलीकडे बेभरवशाचें झालें आहे. म्हणून मृग उलटतो. आर्द्रा पडूं लागतात. मग दोन-चार दिवस जरा पाऊस थांबून वापसा झाला, कीं भराभर पाभरी बाहेर पडूं लागतात.

घाटावरल्या शेतांमधून पाभरींच्या नळकांड्यांमधून उतरते ज्वारी अन् बाजरी. लक्ख, बेडाग दाणा. वर्षभर पाखडून पुखडून राखेंत घालून मोठ्या वजीनें ठेवलेला. त्याच्यासाठीं निराळीं डालगीं. भरायचीं, अन् शेणानें लिंपून हवा बंद करून ठेवायचीं.

गोदामाईच्या कांठाकांठानें, मराठवाड्यांत अन् विदर्भांत होते ज्वारीची पेर. चार पाभरींचीं तासें टाकून मधेंच एक ओळ तुरीची. एकाद ओळ मुगाची. एकाद उडदाची. मराठवाड्यांत क्वचित् तुरीऐवजीं करडईची पेर व्हायची.

अन् याच काळ्याशार वावरांतून, हीच घात साधून पाभरींच्या नळकांड्यांतून उतरते सर्की. सर्कीचा पेरा ज्या वावरांत झाला त्यांत मात्र ज्वारीसारखें तुरीउडदाचें मिळवण घालायचें नाहीं. कपाशी म्हणजे निखळ कपाशी. विशेषतः विदर्भांत तर कपाशीचा पेरा म्हणजे एक कला आहे. कसें इथपासून तिथपर्यंत एका सुतांत पेरलेलें असायचें. एक ओळ कांहीं इकडली तिकडे व्हायची नाहीं. भूमितिवाल्यांनीं आपआपल्या पट्ट्या त्या ओळींवरून दुरुस्त करून घ्याव्यात !

एकामागून एक नक्षत्रें आभाळांमधून बरसतच रहातात. शेतें पाणी पितात. उन्हाळ्याभराची आग निवते. काळी आई तृप्त तृप्त होते. मग त्या ओलीमुळें, त्या उबेमुळें एकेक दाणा पोटुशी रहातो. हळूंच त्यांतून एकेक लवलवता कोंब बाहेर डोकावतो. कालपर्यंत शेतें काळीं होतीं. आज तीं हिरवळूं लागतात. होतां होतां साऱ्या सृष्टीचें रूप पालटतें. चहूंकडे पिवळसर हिरव्या रंगाची मैफल सजते.

प्रत्येक दाण्याचा कोंब वेगळाला. बाजरीचा नाजुक. ज्वारीचा किंचित् थोराड, तजेलदार. कपाशीचा कोंब जणूं काळीच्या पोटांतून दोन्ही हात जोडून वर आलेला. होतां होतां हीं बोटभर उंचीचीं रोपीं हातभर होतात. अन् मग त्यांची मशागत सुरू होते.

कष्टाचा शेतकरी असतो, तो एकही घात हातची न दवडतां लगेच कोळपीं जुंपतो. तासातासांतून कोळप्याचीं फाळें फिरतात. गैरजरुरीचें तण उपटलें जातें. याचबरोबर सारें शिवार खुरपायला आलेल्या बायांच्या कलकलाटानें जिवंत होतें. खरें बोलायचें तर खुरप्यांपेक्षां यांचीं तोंडेंच अधिक चालतात. मग शेतकरी घाईस येतो. उणेंदुणें बोलतो. पण त्या बोलण्यानें पिकते केवळ खसखस. तेवढ्यापुरते हात जरा वेगानें चालूं लागतात.

तण म्हणजे तरी काय काय ? नाना परींचें. कुठें रुजतो नागरमोथा. कुठें हरळी. कुठें शिंपी. कुठें कुई. हें सारें तण खुरपायला आलेल्या बायांच्या दृष्टीनें मोलाची वस्तु. संध्याकाळीं घरीं परततांना त्या डोईवर गांठोडीं बांधून घेऊन जातात. तेवढेच मिर्ची-मसाल्यापुरते आणा-दोन आणे सुटतात.

आकाशात सावलीदिवलीचा खेळ सुरू असतो. कधीं मेघ भरभरून येतात. कधीं ते धबाधबा बरसतात. कधीं नुसतीच वंचिका देऊन जातात. लख्ख उन्ह तळपतें, अन् त्या उन्हाच्या लोभानें रोपांना भराभर जिभा फुटूं लागतात. तीं चहूं बाजूंनीं पात्यांनीं डंवरतात, अन् उंचीच्या बाबतींत आकाशाला मिठ्या मारायला धांवतात.

एके दिवशीं पहाटे हरबा अन् नारबा शेतांवर जातात. त्यांच्या सराईत दृष्टीला काय होत आहे तें उमगतें. प्रसन्न मनानें ते एकमेकांना सांगतात, ज्वारी निसवली.

मग भराभर कणसें बाहेर डोकावतात. कोंवळीं, लुसलुशीत. हळूं हळूं तीं भरूं लागतात. दाणे पोसूं लागतात. शेतांवर पांखरांचे थवे उतरूं लागतात.

हीं पांखरें वर्षभर कुठें असतात कुणास ठाऊक ! पण शेतांतून कणसांनीं भारावलेलीं ताटें उभीं राहिलीं, कीं यांचे थवेच्या थवे आकाशांतून पोकळी चिरीत खालीं उतरतात. पाहातां पाहातां गच्च भरलेलीं कणसें रिकामीं होतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों. दि. ..................

मग या दाण्यांच्या जपणुकीसाठीं शेतकरी जिवाचें रान करतात. शेतां-शेतांतून चार अनगड मेढी उभ्या करून त्यांच्यावर दांडकीं टाकतात, अन् पाय टेकण्यापुरता आसरा उभा करतात. मग गोफणींचे फटकारे, हव्या, रिकाम्या डब्यांचे आवाज, असें सारें शिवार गर्जून निघतें.

हळूं हळूं हिरवळलेलीं रानें सोनेरी होऊं लागतात. तो सोनेरी रंग करडा होत जातो, अन् मग शेतकरी कापणीकरितां माणसें शोधूं लागतात.

मधें एकदां दाणे कोवळिकीवरून जूनपणाकडे ढळूं लागले, म्हणजे शेतां-शेतांतून शेकोट्या पेटतात. खानदेश व वऱ्हाडांत यांना जगरीं म्हणायचें. मग भोरड्यांसारखेच पांढरपेशांचे थवे शहरांमधून खेड्यांतील शेतांकडे वळूं लागतात.

बाजरी, ज्वारी या दोन्ही मेव्यांना हुरडा म्हणायचें. ताजा, गरम, लोण्यासारखा तोंडांतल्या तोंडांत विरघळणारा हुरडा म्हणजे केवढी अपूर्वाई! दहीं, लसणाची चटणी, कोवळें खोबरें, तिळकूट, अशा मसाल्याबरोबर वाणी, भातवाणी, मोगरी—अशा नामांकित, हुरड्यासाठींच पेरलेल्या जाती चाखणें म्हणजे एक सर्वोत्तम मेजवानी!

हुरडा भाजायचीं जगरीं विझतात अन् विळे पाजण्यासाठीं लोहारांच्या भट्टया धगधगूं लागतात. मग शेतांशेतांतून विळ्यांचीं पातीं लखलखूं लागतात. भराभर ताटें आडवीं होतात. पेंढ्यांभोंवतीं शेतकऱ्यांच्या हातांचे विळखे पडतात अन् सुड्या रचल्या जातात.

मग एकीकडे खळीं तयार केलीं जातात, दुसरीकडे गव्हाळी अन् हरभऱ्याचीं शेतें नांगरलीं जातात. खळ्यांच्या मधोमध रोवतात मेढ. ती मेढ रोवण्याचाही एक छोटासा विधि आहे. मग मेढीभोंवतीं चालते बैलांची पात. जमीन बैलांच्या पावलीनें कठिण होते. मग तिच्यावर चार-दोन सारवणें करायचीं.

तंवर सुड्या चांगल्या तापतात. वास घमघमूं लागतात. मग कणसें मोडायचें काम सुरू. वऱ्हाडांत सुडी रचण्यापूर्वींच ज्वारीचीं कणसें कापून घ्यायचीं अन् तीं लगेच मेढीभोंवतीं पसरायचीं. चांगलीं तापलीं, म्हणजे मग त्यांच्यावर बैलांची पात धरायची. भराभर दाणे पोटऱ्यांतून ढळतात अन् खालीं गळतात.

मग वाट पाहिली जाते वाऱ्याची. वाऱ्याच्या झुळुकीवर झुळुकी सुरू होतात. त्या वाऱ्याच्या धारेवर धान्य उफणलें जातें. मोत्यासारख्या दाण्यांची रास खळ्यांमधून उभी राहाते.

गव्हाळ्यांची अन् हरभऱ्याच्या शेतांची मेहनत जरा विशेष आपुलकीनें होते. कारण गहूं हें पीक जरा लाडकें. त्या शेतांतलें तण, काडी, कचरा सगळें वेचून जमिनीचा पोत न्यहार केला जातो. अन् मग दिवाळीच्या करंज्या खाल्ल्या कीं, गव्हाचें बीं झांकून ठेवलेलीं डालगीं उपसलीं जातात.

गव्हाची पेर ही ज्वारी-बाजरीसारखीच. पण हरभऱ्याच्या पेऱ्याचे दोन प्रकार. पहिला, मोघडांतून—हरभरा पेरायच्या अवजाराला मोघड म्हणायचें—हरभरा खालीं उतरवला जातो. दुसरा प्रकार, अधिक कौशल्यानें हाताळायचा. म्हणजे काय कीं, पुढें चालायचा लांकडी नांगर. प्रत्येक तास अगदीं दोरींत. अन् त्या नांगराच्या मागोमाग मुठींतून एकेक एकेक हरभरा टाकीत कुणी जाणकार चालायचा. काम जरा कसबाचें आहे. बीं दाटतां उपयोगाचें नाहीं, कीं पातळ होतां उपयोगाचें नाहीं. नांगराच्या मागें टाकोटाक बीं जमिनींत पडत असल्यामुळें उलटत असलेल्या ढेपाडांनीं तें सहजच झांकलें जातें. एकदां जरूर पडली, तर वरून फराट फिरविलें कीं झालें.

अन् मग भुई फोडून गहूं-हरभऱ्याचे कोंब बाहेर निघतात. एखादा-दुसरा पावसाचा सपका बरसून जातो. पण तो न बरसला, तरी गहूं-हरभरा वाढायचा. दहिंवर पिऊन. रात्रभर थंडी जमत राहाते. संध्याकाळीं लावलेल्या विरजणासारखी. अन् मग विरजणावरचा साईचा थर वर उठावा, तसें पहांटे पहांटे दहिंवर जमूं लागतें.

पहांटेस तशा जीवघेण्या थंडींत, त्या दहिवरल्या शेतांत पाऊल घालवत नाहीं. पण तेवढी हिंमत करील त्याची दृष्टि धन्य होते. कुणाही हरभऱ्याच्या टोंबाजवळ जाऊन बसावें, अन् मग पहावें कीं, हरभऱ्याच्या इवल्याशा पानावर तरंगलेला दहिंवरचा थेंब कणाकणानें मोठा होत जातो. मोठा होतो, आणि मग अलगद खालीं तळाशीं ढळतो. हा असा स्राव रोज पहांटे सुरू असतो. यांतूनच गहूं-हरभरा वाढीस लागतो.

वऱ्हाडांत, मराठवाड्यांत अगर नगर जिल्ह्याच्या कांहीं भागांत ह

वेळपर्यंत शेतांतून पांढरी श्रीमंती भरास आलेली असते. कापसाचीं रोपीं जेवढीं उगवलीं, तेवढीं सगळीं ठेवलीं, तर पीक उणावतें. म्हणून शहाणा शेतकरी अंदाजें वीतभर जागा मधें राहील, अशा बेतानें रोपीं ठेवतो. बाकीचीं उपटून टाकतो. जसें गव्हाचें पीक आपरुकीचें, त्यापेक्षां कांकणभर जास्त आपरुकी कापसाविषयीं. कारण कापूस हें सोनें देणारें पीक. म्हणून मग कापसाच्या शेताची मशागत फार व्हायची. खुरपीं दोन-तीनदां तरी फिरायचीं. सारी जमीन पोकळ करून ठेवायची. भुसभुशीत. कापसाच्या मुळापर्यंत खेळता वारा पोहोंचला पाहिजे.

दिसामासांनीं रोपें ढोपराएवढीं होतात. अन् मग त्यांवर फुलें धुमारतात. गुलाबी, पिवळीं अन् पांढरीं फुलें. कसा त्यांचा रंग. कसें त्यांचें रूप. फुलांनीं मोहोरलेलें कापसाचें शेत पाहाणें म्हणजे एक मोठें दृष्टिसुखच. या फुलांवरून फुलपांखरें धांवतात. आपले पंख तरतर हलवीत तीं या फुलावरून त्या फुलावर उडतात. फुलें कोणतीं अन् फुलपांखरें कोणतीं, हें ओळखणेंही कठिण होऊन जातें.

मग हळूं हळूं फुलें झडतात अन् आंतून निसवतात बोंडें. हिरवीं. देवळावरल्या कळसासारखीं टोंकदार. वर तापतें उन्ह. खालून उसळते वाफ. या दोन्हींचें मिश्रण होतें. एक प्रकारची घात साधली जाते अन् या घातींतच बोंडें आठी अंगांनीं मोठीं होऊं लागतात. हळूं हळूं त्यांचा रंगही बदलतो. फिका होत चालतो.

अन् मग एका सकाळीं पागोट्यावर धोतर लपेटून वावरांत गेलेल्या गोमाजी पाटलाला दिसतें कीं, बोंडें चिराळलीं असून आंतून दुधिया रंगाचें वैभव बाहेर डोकावतें आहे. हळूं हळूं बोंडें पूर्ण उमलतात. कापूस बाहेर हिसूं लागतो. दहाबारा दिवस उन्हाच्या वाफाऱ्यांनीं तो हडकला कीं, मग गोमाजी पाटील कापूस वेंचणाऱ्या बाया शोधण्याच्या मागें लागतो.

शेतमजुरांचे चार पैसे मिळवायचे हेच तर दिवस असतात. मग त्यांचे भाव आण्याभरानें वाढतात. जरा ओढाओढी होते. मग कुठेंतरी मध्यावर येऊन सौदा तुटतो. पाठीवर धोतराचे किंवा लुगड्याचे पालू बांधून त्या पालवांत कापूस वेंचणाऱ्या लक्षुम्यांच्या कलकलाटानें सगळीं वावरें जिवंत होतात. नाहीं त्या चर्चा. न ऐकल्या बातम्या. भुताखेतांच्या, सास्वासुनांच्या,

दिराभावजयीच्या. पण असलें कांहीं उजवें-डावें हवेंच असतें. त्याशिवाय काम होणार तरी कसें ?

असे वेंच्यावर वेंचे होतात अन् मग कापूस बाजाराकडे निघतो. गाडयांच्या साट्यांवर दांडकीं बांधून त्यावर तढव चढवले जातात. त्या तढवांमधून हें पांढरें वैभव भरलें जातें अन् मग गाडयांची माळची माळ बाजाराकडे निघते.

बैलांना रस्ता माहीत असतो. ते आपल्या गतीनें चालतात. या तांडयांतला म्होरक्या तेवढा जागा असला म्हणजे झालें एरव्हीं बाकीच्यांनीं कडुसें पडल्यावर। बैलांचे कांसरे खुंटाळ्याला बांधून ताणून दिली तरी चालतें. मराठवाडयांतल्या किंवा वऱ्हाडांतल्या कुठल्याही शहरांतून पहांटेच्या सुमारास बाहेर पडावें, तर ही पांढऱ्या सोन्यानें लादलेल्या गाडयांची माळ शहरांत शिरत असलेली दिसते.

कंबरेला नोटांचे कसे बांधून शेतकरी परत फिरतात, अन् भिडतात गव्हाच्या ओंब्यांवर अन् हरभऱ्याच्या हुळ्यावर. गहूं जुनारला म्हणजे चामट होतो. ओंब्यांची मजा जाते. तेव्हां ओंब्या भाजाव्यात गहूं दुधानें भरला म्हणजे. हरभऱ्याचें मात्र उलटें आहे. तो जों जों पिकूं लागतो, तों तों हुळा अधिक चविष्ट लागतो. सालपट काढलें कीं, आंतून भाजला गेल्यामुळें उललेला पिवळसर हरभऱ्याचा दाणा हातीं येतो. एकेक दाणा तोंडांत टाकतां टाकतां हरभऱ्याचीं कडपेंच्या कडपें संपतात. पण हुळा खाणें संपत नाहीं.

हरभऱ्याच्या हुळ्याबरोबरच कोंकणांतल्या वाल-पावट्यांची दखल घेतली पाहिजे. एरवीं डाळिंब्यांसारख्या चविष्ट पदार्थाचा अपमान केल्यासारखें होईल.

भात काढलें कीं, नांगरामागें वाल पेरून किंवा पिस्कारून टाकायचे. वेळीं काटकीनें टोचायचें अन् आंत वाल रोवून द्यायचा. आठापंधरा दिवसांत वाल बाहेर डोकावतो. त्याचीं पानें आश्चर्यानें थक्क होऊन बाहेरील विश्वाकडे टकाटका बघतात.

या वालाला जपायचें गुरांढोरांपासून. कारण हिरवे वालाचे वेल, हें त्यांचें मोठें चवीचें खाद्य.

वेल धुमारतात. त्यांना मुगारे फुटतात. अन् मग त्या मुगाऱ्यांवर जांभळसर पांढरीं फुलें डोकावूं लागतात. फुलांच्या मागोमाग शेंगेचें कोंवळें कलेवर बाहेर येतें. शेंग टापुसली, कीं समजावें, दाणा भरला.

जशी हरभऱ्याच्या ओल्या दाण्याची उसळ, तशी वाल-पावट्याच्या ओल्या दाण्यांची उसळ म्हणजे एक नामांकित पदार्थ. हरभऱ्याचें कांहीं वायां जात नाहीं, तसें वालाचेंही नाहीं. शेंगा काढून झाल्यावर वेलाचें जें काय उरतें, तें बैलांच्या खाण्यांत कुटार म्हणून मिसळलें जातें.

इथें थोडें बींवडाविषयींही सांगितलें पाहिजे. गव्हाहरभऱ्याचें पीक भरदार यावें, यासाठीं पावसाळा लागतांच गव्हाळींत पेरतात ताग. तो कंबर कंबर वाढला कीं मग गव्हाळींत नांगरट करून ताग मोडून काढतात. तो नांगरटीबरोबर जमिनींत दडपला जातो, अन् त्याचें होतें उत्तम खत. याला म्हणायचें बींवड. असाच उडदाचा बींवड गव्हाहरभऱ्याच्या अंगीं लागतो.

आतां थोडें उजव्याडाव्या धान्याविषयीं, आणि गळितांविषयीं. चवळी, मसूर, मूग, मटकी, उडीद हीं सगळीं उजवींडावीं कडधान्यें. इतर धान्या-बरोबर यांचीं तासें टाकलीं जायचीं. हरभऱ्यावालासारखें यांचें मुख्य पीक काढायचा प्रघात नाहीं. तुरीची गोष्ट मात्र वेगळी. अगदीं कोंकणांतसुद्धां तुरीचें स्वतंत्र पीक घेतात. अन् पीक घरीं आलें कीं, अंगणांमधून तुरीचीं वाळवणें पडतात. पोरेंसोरें हातांत काठ्या घेऊन या वाळवणांची राखण करतात.

गळितांपैकीं तीळ, जवस, करडई अन् खुरासनी—यालाच काळे कारळे म्हणूनही ओळखतात—यांचींही क्वचित् तासें टाकायचीं. क्वचित् सलग पेरा करायचा. देखणें पीक करडईचें. करडईचीं फुलें फुललीं म्हणजे त्यांतले तंतू केसरासारखे दिसतात. खुरासनीचें पिवळें फूलही मोठें देखणें दिसतें—सोनकीच्या फुलासारखें.

करडईचा दाणा भरला, म्हणजे आकाशांतून करकोच्यांच्या माळाच्या माळा खालीं उतरतात. एरवीं हे कुठें असतात कोण जाणे. पण नेमके या दिवसांत आकाशांत तरंगूं लागतात. करकोच्यांची माळ दिसते बगळ्यांच्या माळेसारखी. पकापका पंख हलवीत हे खालीं उतरतात अन्

शिवारभर पसरतात. करडईचे दाणे वेचीत शेतांतून हिंडणें हा करकोच्यांचा मोठा आवडता छंद.

मुख्य गळिताचें पीक म्हणजे शेंगदाणा. त्याच्या कितीतरी जाती. पण महत्त्वाच्या तीन. गांवरान, विलायती अन् घुंगऱ्या. पैकीं चवीच्या बाबतींत गांवरान शेंगेची बरोबरी कुठलीच शेंग करूं शकत नाहीं. ती कच्ची खा, उकडून खा किंवा भाजून खा. दुसऱ्या दोन जाती या निव्वळ तेलाच्या उपयोगाच्या. हें तर खरेंच कीं, गांवरान शेंगेचें तेल कमी निघतें. घुंगऱ्याचें पीक मोठें जबरदस्त. चांगलें भरदार पीक तयार झालें, तर एक ठोंबा उपटावा, अन् तळाशीं शें-शें, दीड-दीडशें शेंगा मोजून घ्याव्यात. मात्र घुंगऱ्या दाणा खाण्याच्या उपयोगाचा नाहीं. हटकून पित्त व्हायचें.

आणखी एका पिकाचा उल्लेख केला कीं, हें 'कसा पिकला गहूं ग हरभरा !' प्रकरण शेवटास आलें म्हणायचें.

श्रीविठ्ठलाची मूर्ति कमरेवर हात ठेवून या पिकाची उंची दाखवते. गणपति वरदहस्तानें पानांचा आकार दाखवतो. तथागत बुद्ध चिमूट मिटून याच्या सेवनाचें प्रमाण सांगतात. अन् हनुमंत चपेटा उगारून धाक दाखवतो, कीं जो या वल्लीचें सेवन करणार नाहीं, त्याचें थोबाड मी इकडून तिकडे करून टाकीन !

पण ही केवळ थट्टा झाली. पिकाचें नांव तंबाखू. चांगलें सुरेख जेवण व्हावें, वर रामटेकचें पान जमावें अन् मग तंबाखूची चिमूट नसली, तर अत्यंत अस्वस्थ व्हावें, हा अनुभव तर अनेकांना यायचा. तंबाखूच्या सेवनाचें प्रमाण पांढरपेशांत जरा कमी. मात्र शेतकऱ्यांत अन् कष्टकऱ्यांत तंबाखू फारच लोकप्रिय. खाऊन, नाकावाटे, अन् धूर गिळून असा त्रिविध तंबाखूचा उपयोग होतो. कुठेंही वाटचालींत झाडाखालीं वाटसरूं विसावले, कीं तंबाखूची देवघेव व्हायची. किंबहुना खिशांत तंबाखूचा बटवा असला कीं, अनेक निरगांठी फटाफटा सुटत चालायच्या.

हें तंबाखूचें पीक विशेषतः दक्षिण महाराष्ट्रांत अन् क्वचित् मराठवाड्यांत व्हायचें. प्रत्येक रोपा अगदीं रेषेंत लावायचा. शेताबाहेरून उभें, आडवें, या बाजूनें, त्या बाजूनें, कुणीकडूनही पहा. तंबाखूच्या रोपांच्या ओळीच्या ओळी दिसायच्या.

तंबाखूच्या पिकांत खुडणीचें फार महत्त्व. वर खुडणी झाली कीं, खालचीं पानें खूप भरायचीं. तीं पिवळ्या रंगावर झुकलीं कीं मग तोडा व्हायचा, अन् दुमडून, एकावर एक घालून दडपून ठेवून द्यायचीं.

तंबाखू खाणें आणि ओढणें हे दोन प्रकार जरी पांढरपेशांत फारसे रूढ नसले, तरी तपकीर तर सगळीकडे लोकप्रिय. गरीबगुरिबें मस्कापुरी तपकीर ओढायचीं, तर सुगंधी, काळी तपकीर हा जरा वरच्या वर्गाचा छंद. तंबाखूवर पुटें चढवून अन् त्यांत नानाविध सुगंधी पदार्थ घालून करायची गुडाखू. साधी तंबाखू हें जर नगरी जाडेंभरडें पातळ, तर गुडाखू म्हणजे भरजरी पैठणी. ती मोठ्या नजाकतीनें ओढायची–गुडगुडी-मधून किंवा हुक्क्यांमधून.

अर्थ असा कीं, महाराष्ट्रांतली शेती बहुविध प्रकारची. तींत पिकणारीं पिकेंही बहुविधच. जिथें जिथें जसजसा ऋतु बदलतो, तिथें तिथें तसतसें पीक बदलायचें. एकूण सारे षड्रस सिद्ध व्हावेत, अशी महाराष्ट्राची धान्यसंपदा.

### फळें मधुर रसाळें—

वन्य फळांच्या बाबतींत तर सह्याद्रि आणि सातपुडा दोन्ही श्रीमंतच म्हणायचे. वन्य फळें किती म्हणून सांगावीं? करवंदें, तोरणें, बोरें, अळूं, जांभळें, अंजणें, भोंकरें, नीव–नानापरी. पण प्रकरण सुरू झालें तें बागायती फळांचें. आंब्यांचा उल्लेख मागें येऊन गेलाच. इथें एक गोष्ट सांगितली कीं झालें.

फळांची अन् फुलांची आवड, हें रसिकपणाचें एक अंग. महाराष्ट्राचें रसिकपण घडविण्यांत छत्रपति शिवाजीराजांचा हात फार मोठ्या प्रमाणांत. झालें काय, कीं खेड शिवापूरच्या आंब्यांच्या बागा केवळ छत्रपतींसाठीं आवर्जून लावल्या गेल्या. पुढें मग एवढ्या युद्धांच्या अन् मोहिमांच्या भाऊगर्दींत व्यग्र असूनही छत्रपतींनीं फळांचा छंद जोपासला. रायगड-भंवतीं त्यांनीं नामांकित आंबराई मुद्दाम लावली. केवळ रायगडच नव्हे, तर इतरत्रही किल्ल्यांवरून त्यांनीं लागलीं, तिथें झाडें जोपासलीं असलीं पाहिजेत. एरवीं रामचंद्रपंत अमात्यांनीं आज्ञापत्रांत पुढील उल्लेख केलाच नसता—

" गडावर झाडें जीं असतील तीं राखावीं. याविरहित जीं जीं झाडें आहेत तीं आंबे, फणस, चिंचा, वड, पिंपळ आदि करून थोर वृक्ष, निंबें, नारिंगें आदिकरून लहान वृक्ष, तसेंच पुष्पवृक्षवल्ली किंबहुना प्रयोजक अप्रयोजक जें झाड होत असेल तें गडावर लावावें. जतन करावें. "

या ' अप्रयोजक ' झाडांच्या लावणीपासून लाभ काय ? लाभ आहेच !

" समयीं तितकेही लांकडाचे तरी प्रयोजनास येतील ! "

आहे कीं नाहीं संग्राहकबुद्धि ! यामुळेंच महाराष्ट्राचें चातुर्य वाढलें.

तर हीं झाडांची आवड छत्रपतींची. संभाजी आणि राजाराम दोघांनाही अगदीं स्वस्थता मिळाली नाहीं. ती लाभली शाहूराजांना. तेव्हां मग त्यांनीं आपल्या वडिलांची ही मिराशी जोपासली. त्यांनीं सारखा पेशव्यांभोंवतीं तगादा लावावा. मिळतील तिथून फळझाडें मागवावींत. नानापरींचीं. कांहीं मागवावींत औरंगाबादेहून. एरवीं स्वतः स्वराज्यांत हिंडत असतां जिथें जें नामांकित झाड ऐकूं येईल, तें तें शाहूराजांनीं मागवावें.

विही, शेव, अळू, शफताळू, बेदाणा, नासपाती, गलगल, चकोतरा, कौला, संतरा, कमरंद, फणस, बदाम—या यादींतलीं कांहीं फळें परदेशी, तर कांहीं देशी. वेगवेगळ्या हवामानांत होणारीं. पण शाहूराजांनीं हीं सगळीं कौतुकानें साताऱ्यास गोळा केलीं.

अशी नेत्याच्या अंगीं रसिकता असली, कीं ती त्याच्या अनुयायांत उतरते. राजांची ही रसिकता थेट पेशवे-सेनापतींपासून तों साधुसन्तांवेरीं पोहोंचली. धावडशीचे ब्रह्मेन्द्रस्वामी, त्यांनींही हाच छंद केला. धावडशीला त्यांनीं एक नामांकित फळबाग लावली. तींत साखरनिंबें, नारिंगें, पेरू अशीं जातिवंत रोपीं जोपासलीं. राजांच्या या छंदामुळें साताऱ्याभंवतींच फळांचा छंद निर्माण झाला. शेतकऱ्यांत सुद्धां. निंबचा पेरू आजही प्रसिद्ध. राजेवाडीचीं अंजिरें त्या काळापासूनचीं.

पेशवे तर कोंकणचे. म्हणजे ते फळझाडांच्या माहेरचे. त्यांनींही खूप छंद केला. पुण्याभंवतीं त्यांनीं किती झाडें औरंगाबादेहून आणून लावलीं ? संत्रीं, द्राक्षें, अंजीर, डाळिंब, पेरू, मोतिया, गुलाब, बेलिया, पिवळी जाई, पोपई, हदगा, मदनबाण, सोनचांफा, रामफळ, बटमोगरा, दवणा, पाच—असंख्य ! यांतलीं अनेक महाराष्ट्रांत अगोदरपासून होतींच. पण बाजी-

रावांनीं औरंगाबादेहून यत्नपूर्वक आणून लावलीं, एवढेंच ध्यानीं घ्यायचें.

पेशव्यांच्या पाठोपाठ अनेक कुटुंबें कोंकणांतून घाटावर आलीं. त्यांनीं आपल्याबरोबर आणला कोंकणचा कल्पवृक्ष–नारळ. पुण्यांत कुण्याही उंच जागीं चढून बघावें, तर वाऱ्याच्या झुळकींबरोबर माडांच्या झांवळ्या डोलतांना दिसतील. एकटें पुणेंच काय, पण पेशवे आणि त्यांचे संगीसाथी जिथें जिथें जाऊन राहिले, जिथें तिथें त्यांनीं हें झाडांचें वेड आपल्या-बरोबर नेलें.

तळेगांव हें सेनापति दाभाडयांचें गांव. त्यांनीं आपल्या बागेंत यत्न-पूर्वक माड लावले. नुसते माडच नव्हेत, तर इतर नानापरींचीं झाडें.

आंबेगांव हें नाना फडणिसांचें आवडतें गांव. तिथें त्यांनीं आंबराई लावली. वाई हें गांव रास्त्यांनीं वसवलें. तिथें तर त्यांनीं गांवच वृक्षमय करून टाकला. धोम, मेणवली, अशीं कृष्णाबाईच्या उगमाकडलीं सगळीं गांवें आंबराईनें झांकून टाकलीं. सगळा कृष्णाकांठ सावलीनें शीतळ केला. वाईत असंख्य माड लावले. नाना परींचीं फळझाडें. अन् आंब्याबद्दल गोमंतकाचें ऋण किती मानावें ! हापूस, पायरी, कलमी हीं रोपीं तर गोमंतकाचीच उपज !

कायगांव टोकें, पुरंदरचा पायथा, सुपें, आंबी, हिराबाग वडगांव– अशा अनेक गांवीं बागा वसल्या. पुण्याभोंवतीं तर बागांचें जाळेंच पसरलें. कोथरूड, हिंगणें, औंध, पाषाण हीं सगळीं गांवें फळबागांनीं वेढलीं. रायआंवळे, सीताफळें, रामफळें, पेरू, अशा नाना परींच्या फळझाडांनीं पर्वती अन् विठ्ठलवाडीकडला भाग दाटला आहे.

शेवटीं एक उदाहरण दिलें कीं पुरे. कामशेटहून आंदर मावळांत चालूं लागावें. चारपांच मैलांवर एक गांव आहे. नांव करंजगांव. त्या गांवीं एक कर्वे नामक माणूस राहायचा. त्याच्या मनीं उपजलें, कीं इथें आंबराई लावावी. झालें, त्यानें सुमारें हजार-दीड हजार झाडें लावलीं ! अन् रोज पहाटे उठून एक काम. खांद्यावर कावड घ्यावी, अन् या सगळ्या रोपांना पाणी घालावें ! दुसरा छंद नाहीं, व्यसन नाहीं, नाद नाहीं. वर्षानुवर्षं एवढाच एक उद्योग ! राजदरबारीं आपली खबर जाऊन पोहोंचावी, असें देखील बापड्याच्या मनीं आलें नाहीं. पांच-दहा वर्षांत

गांव आंबराईनें झांकून गेला.

शेवटीं कुणींतरी ही वार्ता पेशव्यांपर्यंत पोंचवली. या उद्यमावर संतुष्ट होऊन पेशव्यांनीं त्याला सगळें गांव इनाम म्हणून बहाल केलें. मात्र तो भला माणूस शेवटपर्यंत आंबराई जोपाशीत राहिला !

असा हा फळांचा सुसंस्कृत छन्द महाराष्ट्रानें आजतागाईत जोपासला आहे.

आतां उंसाला फळ म्हणावें, कीं काय ? ऊंसच म्हणावें झालें. मात्र हें ध्यानीं घ्यायला हवें, कीं फळें खायचीं, तसाच ऊंसही खायचा ! खाण्याचा ऊंस महाराष्ट्रभर व्हायचा, विशेषतः पश्चिम अन् दक्षिण महाराष्ट्रांत. खाण्याचा ऊंस मऊ. दातांनीं आबालवृद्धांना सोलतां यावा. विशेषतः चांगल्या गोड उंसासाठीं कृष्णाकांठ प्रसिद्ध.

पण हल्लीं या उंसाची लागवड कमी होत चालली. साखर अन् गूळ या दोन्हींसाठीं उपयोगीं पडणारा कडक, बारीक, तुरेदार ऊंस—त्याची लागवड महाराष्ट्रांत भरपूर वाढली. विशेषतः कोल्हापूर, बारामती, नगर जिल्हा, या जिल्ह्यांत पहावें तिकडे उंसाच्या तुऱ्यांपलिकडे कांहींच दिसत नाहीं. कालवे वाहाताहेत. शेतें भिजताहेत. ऊंस वाढतो आहे. अन् विशेष असा, कीं महाराष्ट्रांत पिकणारा हा ऊंस साखर आणि गूळ पैदा करण्याच्या बाबतींत भारतांत सर्वश्रेष्ठ आहे !

केळें हें तर पूर्णान्न. कच्च्या केळ्याची भाजी व्हायची. वाळवलें तर पीठ व्हायचें. मावश्यांच्या अन् आजींच्या उपासाच्या कामीं हा पदार्थ फारच उपयोगी. त्यांचीं हवीं तर थालीपिठें करा. भजीं करा. खीर करा. शिरा करा. तीच तऱ्हा पिकलेल्या केळ्याची.

असें हें बहुगुणी केळें भरपूर होतें भुसावळ-जळगांवकडे. बागाच्या बागा केळ्यांच्या पानांनीं नुसत्या हिरव्यागार. खानदेशी केळी जरा आडव्या बांध्याच्या. म्हणजे उंचीला कमी. पानही जरा थोराड. केळें पिकलें, तरी सालीचा रंग हिरवा. हीं केळीं लांब लांब जातात. अगदीं सिमल्यालाही खानदेशी केळें विकत घेऊन चवीनें खावें.

वसईचीं सुकेळीं प्रसिद्ध. तिथलीं तांबडीं केळीं, त्यांची एक विशिष्ट चव. सुकेळीं हा प्रकार केवळ वसईसच व्हायचा. म्हणजे काय कीं तें केळें पिकलें, कीं वाळत घालायचें—सोलून ! चांगलें वाळतें. वर्ष वर्ष टिकतें.

याशिवाय वेलची केळीं ही एक वसईच्या बाजूस अन् कोंकणांत होणारी नाजूक जात. करंगळीएवढें बारीक केळें. पण खायला अति मधुर! कोंकणांत अन् गोमंतकांत तर रसबेळीं, राजेळीं, म्हशेळीं अशा केळ्यांच्या नाना जाती.

किंबहुना केळीचें झाडच महाराष्ट्रीयांचें आवडतें, पुराणकालापासून आवडतें. त्यामुळें जिथें जिथें पाणी उपलब्ध आहे, तिथें तिथें केळीचें झाड मागील दारीं असायचेंच. त्याच्या शेजारीं असायचा अळवाचा खड्डा. ज्या परसांत केळीचें झाड, अळवाचा खड्डा अन् तुळशीवृंदावन आहे, तें घर महाराष्ट्रिकाचें म्हणून खुशाल ओळखावें.

वसईजवळचें एक लोकप्रिय फळ म्हणजे चिकू. मोठें मधुर. मुंबईहून उत्तरेला निघावें, तर चिकूच्या बागा मैलोमैल पसरलेल्या दिसतात. मात्र हें फळ वऱ्हाड-खानदेशांत किंवा मराठवाड्यांत फारसें आढळायचें नाहीं.

या दोन्ही मुलखांचें खुणेचें फळ म्हणजे संत्रा. तशी तर औरंगाबाद ही इतिहासकालीं साऱ्याच शौकिया वस्तूंची उतारपेठच असायची. कारण तें होतें दिल्लीच्या सुभेदाराचें ठाणें. त्याचा संबंध थेट उत्तरेंत असायचा. यामुळेंच त्या काळीं नासपाती, सेव, द्राक्षें असलीं हिमालयांतलीं फळें देखील औरंगाबादेच्या बागांतून आढळायचीं. पुढें औरंगाबादेचें महत्त्व उणावलें, तसतशा या बागादेखील रोडावत चालल्या.

मात्र मराठवाड्यानें आणि नागपूरनें आपल्या संत्र्यांची शान बिघडूं दिली नाहीं. विशेषतः नागपुराकडे संत्र्याच्या बागा म्हणजे मोठी तोला-मोलाचीच वस्तु. संत्र्याचे दोन बार. पैकीं उन्हाळी बाराचीं संत्रीं अधिक मधुर, अधिक चवदार. आतां नागपूरचा संत्रा म्हणायचें झालें; पण वस्तुतः संत्रा होतो नागपूरच्या उत्तरपूर्वेस. हा नागपूरचा संत्रा देशभर तर जातोच, अन् विलायतेंतही! एवढें मोठें फळ क्वचितच दृष्टीस पडायचें.

औरंगाबादेकडील आणिक एका फळाचा उल्लेख करायला हवा. तशा तर डाळिंबाच्या बागा पुण्याशेजारींही आहेत. पण औरंगाबादेकडलें डाळिंब खानदानी. बरेच दिवसपर्यंत टिकणारें. दाणा तांबडा लाल. पोसलेला. तसें पाहिलें, तर डाळिंब हें फळच अमीरी. गोरगरिबांची ती वस्तु नव्हे.

संत्र्याचाच भाऊ मोसंबें. विशेषतः नगर जिल्ह्यांतला राहुरी भाग या फळांसाठीं प्रसिद्ध. मोसंबीचें झाडच देखणें. पण एकट्या मोसंबीचेंच कां, तसें पाहिलें, तर संत्रें, लिंबू, इडलिंबू, पपनस, हीं सगळींच फळें ज्या कुळांतलीं तें कूळच तसें देखणें. झाड सामान्य उंचीचें. पण डेरेदार. काळसर हिरवीं पानें. फळें लटकलीं म्हणजे अगदीं खालीं वाकायचें. मग त्याला लावावे लागायचे टेके. हीं झाडें नीट ओळींत लावलेलीं असायचीं. फुलोरा धरला, कीं कांहींसा उग्र सुगंध चहूंकडे दरवळत असायचा.

नाशकाकडलीं द्राक्षें फार प्रसिद्ध. नाशिकच्या घाटांवर संध्याकाळचें जाऊन बसावें. चार-दोन आण्यांचा चिवडा खरेदी करावा. जोडीला असावींत फक्कडी द्राक्षें. मग वाहातें पाणी पाहातां अन् यात्रेकरूंची गर्दी निरखतां वेळ कसा जातो, कळत देखील नाहीं.

पण नागपूरसारख्याच खुद्द नाशिकलाही द्राक्षांच्या बागा कमीच. मुख्यतः द्राक्षें पिकायचीं त्र्यंबकच्या बाजूला. देखणे वेल मांडवांवर चढलेले असायचे. पानही कसें कातरल्यासारखें. अन् या पानांमधून द्राक्षांचे घडच्या घड लटकलेले असायचे. कितीतरी त्यांच्या जाती. कांहीं काळीं. कांहीं लांबुळकीं. कांहीं तांबूस. कांहीं बिनबियांचीं. अशा द्राक्षांच्या गमती गमती.

जशीं नाशिकचीं द्राक्षें, तशीं मेहरूणचीं बोरें. तसें पाहिलें तर बोर हें फळ वन्य. अगदीं रामायणकालापासून प्रसिद्ध. एकदां कधींतरी श्रीरामानें तें चाखलें, तेव्हांपासून त्याला प्रतिष्ठा लाभली. बायांच्या संक्रांतीच्या वाणांत त्याची प्रतिष्ठापना झाली. बोर जसें पोरासोरांचें आवडतें, तसा बोरकूट म्हाताऱ्या बायांना प्रिय.

तर खानदेशांतल्या मेहरूणला केवळ तिथल्या बोरांमुळें प्रतिष्ठा लाभली. तीं बोरें गांवरानच. कांहीं बनारसी बोरांसारखीं आकारानें मोठालीं नव्हेत. पण चवीला बनारसीपेक्षां उजवीं. जसें खानदेशी लोणी प्रसिद्ध, तशींच, कांकणभर सरसच मेहरूणी बोरें.

सीताफळें, रामफळें, हीं फळें महाराष्ट्रभर व्हायचीं. राम अन् सीता महाराष्ट्राच्या जीवनांत अशीं मिळून गेलीं, कीं अगदीं फळांनासुद्धां त्यांचें नांव मिळालें.

शाकभाजी—

गंमत अशी कीं, शाकभाजीच्या बाबतींत महाराष्ट्रांतल्या मैदानापेक्षां डोंगराळ भाग, विशेषतः सह्याद्रीची उजवी-डावी बाजू अधिक सुखी. मराठवाडा अन् विदर्भ, या दोन्ही भागांत एक हिंवाळा सोडला तर एरवीं भाजीचा दुष्काळच. एकदां पाऊस बरसून गेला म्हणजे नद्यांच्या कांठांनीं कुठें व्हायच्या काकड्यांच्या वाड्या. कुठें वांग्यांच्या. भरीला भर म्हणून ज्वारींतलीं वाळकें भाजीच्या कामीं यायचीं; अगदीं क्वचित् कुठें एकादी पालेभाजी. एरवीं मग सकाळीं भाकरी आणि वरण, संध्याकाळीं वरण आणि भाकरी. वऱ्हाडांत असायचें याच्या जोडीला जवसाचें तेल.

तात्पर्य, या भागांतलीं खेडीं म्हणजे भाजीबिजीचीं सोय फारशी नसलेलींच. शहरांतून मात्र शेजारीं मळ्यांतून पिकवलेली कांहीं भाजी आढळायची.

पण पश्चिमेकडे जावें, तसतशा बाजारांत अधिकाअधिक भाज्या दिसूं लागतात. विशेषतः तापीकांठचीं वांगीं फार प्रसिद्ध. भलें मोठें फळ. काळेंकुळकुळीत. विशेषतः त्याचें भरीत चांगलें व्हायचें. खानदेशच्या मळ्यांमधून नानाप्रकारची पालेभाजी तरारत असलेली दिसायची. कांदा, लसूण, भेंडी, गोवारी अशा शाकांना इथपासून प्रारंभ व्हायचा.

पण अगदीं खरें बोलायचें, तर भाजीची श्रीमंती पहायची असल्यास मुंबईचें भायखळा मार्केट अन् पुण्याची मंडई या दोन ठिकाणांनाच भेट दिली पाहिजे. भायखळा मार्केट म्हणजे सर्व प्रकारच्या भाज्यांची उतार-पेठ. तिथें वसईकडून वांगीं अन् फुलकोबी यायचीं. कच्चीं केळीं अन् शेवग्याच्या शेंगा यायच्या. तळेगांवहून बटाटे यायचे. नाशिकहून कांदे यायचे. चाकणहून नानापरीचा माळवा यायचा. कोंकणांतून कच्चे फणस यायचे. कळसूबाईच्या डोंगरांतून कढीनिंब यायचा. नारायणगांवहून कोथिंबीर यायची. पेण-पनवेलकडून दुधी भोपळे अन् भोपळी मिरच्या यायच्या. महाबळेश्वरहून तांबडे बटाटे यायचे. दोन्ही कोंकणांतून वालाच्या ओल्या शेंगा यायच्या. पुणें अन् साताराकडून मटार यायची. कोबी यायची. मुळे यायचे.

असे भाजीचे ढीगच्या ढीग तिथें रिचवले जायचे अन् हातोहात गाळे रिकामे व्हायचे. पण या बाजारांत स्वस्थपणें हिंडायची सोय नाहीं. इथें सगळी घाई. घेवाऱ्यांची घाई. शेतकऱ्यांची घाई. दलालांची घाई. लिलावाचे आंकडे, दिले, घेतले, असा सगळा कोल्हाळ कोल्हाळ सुरू असायचा.

म्हणून मग देखणा, आंखीव, रचनाबद्ध असा भाजीबाजार पहायचा असेल, तर पुण्यासच आलें पाहिजे. भाजीच्या या चवी पुण्यानें पेशवाई-पासूनच जोपासल्या आहेत.

सवाई माधवरावांच्या लग्नांतल्या पंगतींचीं वर्णनें उपलब्ध आहेत. तीं एकदां वाचून पहावींत म्हणजे महाराष्ट्राच्या रुचीचें वैभव लक्षांत येईल. त्यांत इतर पक्वान्नें तर बहुत आहेतच, पण किती प्रकारच्या भाज्या !

कांहीं चिरून केलेल्या, कांहीं निवडून, कांहीं शिजवून, कांहीं उकडून, कांहीं कोरड्या, कांहीं आंगरस असलेल्या, कांहीं पातळ, कांहीं तळलेल्या ! किती प्रकारचीं भरीतें. किती प्रकारचीं लोणचीं. किती प्रकारचें उजवें-डावें.

अर्थ असा कीं, पुण्याच्या आसमंतांत भाजी पिकेही भरपूर, आणि चवीचे खाणारेही भरपूर. असा समसमा संयोग साधल्यानें पुण्याच्या मंडईची श्रीमंती वाढली असल्यास नवल नाहीं. मंडईत किती प्रकारची भाजी ? नाना प्रकारची. कोणती एक शाक त्या त्या ऋतूंतली मंडईत मिळत नाहीं, असें नाहीं.

असें वाटतें कीं, भाजीच्या बाबतींतला हा चौकसपणा फार जुना असावा. झालें काय कीं, रामदासांच्या स्फुट प्रकरणांमध्यें एक आहे बाग-प्रकरण. त्यांत त्यांनीं कुठलीं कुठलीं झाडें वजीनें लावावींत, याचें भलें तपशीलवार वर्णन दिलें आहे. त्या वर्णनांत आहेत असंख्य भाज्यांचीं नांवें.

मेथी आहे. चवळाई आहे. माठ आहे. चाकवत आहे. करडई आहे. शेपू आहे. चंदनबटवा आहे. असें स्मरतें कीं, लसूण आणि कांदाही आहे. शेवगा आहे. हादगा आहे. गोवारी आहे. अशीं कितीतरी ज्ञात आणि अज्ञात नांवें त्या भाजीप्रकरणांत आहेत.

या सगळ्या पालेभाज्या, झालेंच तर वांगीं, मुळा, गोवारी, कारलीं, करटुलीं, भेंडी, घोसाळीं, दोडकीं, पडवळें, वाघाटी, दुध्या भोपळा, तांबडा भोपळा, या सगळ्या भाज्या ऐन देशी. महाराष्ट्राच्या प्रकृतीशीं

जुळणाऱ्या. तर बटाटा, कोबी, फ्लॉवर, फणसबी, श्रावणघेवडा, टोमॅटो, या सगळ्या भाज्या परदेशी. पण आतां त्याही महाराष्ट्राच्या आंगिक प्रकृतीशीं अगदीं मिळून मिसळून गेल्या आहेत. एवढेंच नव्हे तर महाराष्ट्रांतले कांहीं भाग या भाज्यांसाठीं विशेष प्रसिद्ध. जसें तळेगांवचा बटाटा.

वस्तुतः जशीं नागपूरचीं संत्रीं हें अर्धसत्य, नाशिकचीं द्राक्षें हेंही अर्धसत्य, तसेंच तळेगांवचा बटाटा हेंही खरें नव्हे. खरें बोलायचें तर बीं येतें सिमल्याहून. बटाट्याच्या पेरणीच्या अगोदर सिमल्यांतलीं सगळीं हॉटेलें खेड, मंचर, चाकणकडल्या पागोटीवाल्या शेतकऱ्यांनीं भरून जातात. कमरेला कसे बांधून हे शेतकरी सिमल्याला येतात. आपल्या तुटक्या-फुटक्या हिंदींत भाव करतात अन् बटाट्याचें बियाणें खरेदी करून हातासरशीं काशी-प्रयाग उरकून घेत आपापल्या गांवीं परततात.

मग खेड, चाकण, जुन्नरकडे पिकणारा बटाटा तळेगांवमार्गें मुंबईस रवाना होतो, म्हणून त्याला तळेगांवचा बटाटा म्हणायचें.

थोडें महाराष्ट्राच्या वन्य भाज्यांविषयींही लिहिलें पाहिजे. पावसाळ्यांत नाना प्रकारच्या पालेभाज्या डोंगरांत उगवतात. भारंगी ही असलीच एक डोंगरांतली भाजी. विशेषतः उदरविकारावर बहुगुणी. कुर्डूची भाजी अशीच पथ्यकर. तरोट्याची भाजी वातनाशक. घोळाची भाजी पावसाळ्या दिवसांत महाराष्ट्रांत चहूंकडे होते. फार काय सांगावें, फड्या निवडुंगाच्या कोंवळ्या पानांचीसुद्धां भाजी करतात. वडारी, कोलाटी या भटक्या जमाती तर हवा तो पाला उकडून मीठमिरची घालून खातात.

अर्थ असा कीं, महाराष्ट्रांतली फळभाजी चणीनें लहान. उदाहरणार्थ— गाजरें, मुळे, कृष्णाकांठचीं वागीं. हीं सगळीं फळें लहानखुरीं. गंगाकांठच्या मुळ्यागाजरांसारखीं आंगभर पसरलेलीं नव्हेत. पण चवीच्या बाबतींत मात्र त्यांनीं गंगायमुनाकांठच्या या भाज्यांना कितीतरी मागें टाकलें आहे. जसा सह्याद्रीवरून वाहाणारा वारा अमाप, तशी महाराष्ट्राच्या दऱ्याडोंगरांतल्या या भाजीची चवही आगळीच म्हणायची!

✤ ✤ ✤

# इये वनींचे पशुपक्षी

अगोदरच सांगून टाकायला हवें कीं, महाराष्ट्रांत हत्ती नाहींत. सिंह नाहींत. रानगेंडे नाहींत. पाण-घोडे नाहींत. नागराज नाहींत. पट्टेदार वाघही नाहींत. पण बाकी बहुधा भारतांत सगळीकडे आढळणारीं रानटी जनावरें महाराष्ट्रांत आहेत, विपुल आहेत.

प्रारंभ करायला हवा चित्त्यापासून. सह्याद्रींत, बालेघाटांत, महादेवाच्या डोंगरांत अन् सातपुड्यांत चित्ते भरपूर. सातपुड्यांत अन् बालेघाटांत एखादद्ुसरा ढाण्या वाघही भेटावा. पण चित्ता हें जनावर महा-राष्ट्राच्या ओळखीचें. पर्वतवासीयांशीं याची अधिकच वसट. अंधारलें नाहीं, तंवरच रावसाहेब आपलें दिवसभराचें आश्रयस्थान सोडून बाहेर पडायचे. जमिनीला तोंड लावून थोडेंसें डुरकायचे, अन् मग जांभया देत सावज शोधीत इकडे तिकडे हिंडायचे. एकटदुकटी गाय, बैल, सुमार आकाराची म्हैस, पाडा, वासरूं, बकरूं, मेंढरूं, यांच्यावर स्वारीचा डोळा असायचा. घात साधून यांतलें एखादें हळूंच लुंगवायचें, अन् आडोशाला नेऊन खाऊन टाकायचें. यांपैकीं कांहींच सांपडलें नाहीं, तर गेला बाजार कोंबडीसुद्धां कांहीं बिबट्याला कडू लागत नाहीं.

पण डोंगरदऱ्यांतलीं माणसें या स्वारीला फारशी भीक घालीत नाहींत. कोळी-ठाकरांच्या बायकादेखील नुसत्या दांडक्यांनीं वाघराला हुसकून लावतात. त्याला पळावें तर लागतेंच, पण प्रसंगीं ‘ मेल्या ! ’ ‘ हत् तुझा मुडदा गेला ! ’ अशा खमंग शिव्याही खाव्या लागतात. तात्पर्य. चित्ता हें

जनावर महाराष्ट्राच्या संवयीचें. कोंकणांत चित्ते धरण्याकरितां लांकडी पिंजरे लावतात. अन् एकदां त्यांत चित्ता सांपडला, कीं मग पोरेंसोरेंसुद्धां त्याची रेवडी उडवतात !

चित्तोपंतानंतर मान रानडुकराचा. हें बलदंड जनावर विशेषतः ओढ्या-खोबळींतून दिवसभर लपून असायचें. रात्रीं झुंडच्या झुंड बाहेर निघायची, अन् मग ज्वारी, बाजरी, भुईमूग, बटाटा, रताळीं, ऊंस—काय हातीं लागेल तें पीक खाऊन फस्त करायची.

शिकारी सांगतात कीं, चित्त्याच्या शिकारीपेक्षां डुकराची शिकार अधिक धोकेबाज. चित्ता गोळी लागूनही वेळीं पळून जाईल, पण डुकराची मुसंडी चुकवणें महाकर्म कठीण !

पण अशाही या डुकराची नुसत्या भाला-कुऱ्हाडींनीं शिकार करणारे मर्द महाराष्ट्रांत भरपूर आहेत. कोल्हापुराकडे तर डुक्कर अंगावर चालवून घेऊन मग भाल्यानें त्याला ठार करणारे घोडेस्वार मर्द अजूनही मावळले नाहींत !

डुकरानंतरचा क्रमांक लांडग्याचा. लांडगे महाराष्ट्रांत शपथेपुरतेच आहेत, पण आहेत. मोठें हिंस्र, दगाबाज जनावर. लांडग्याच्याच कुळांतला कोल्हा मात्र महाराष्ट्रांत विपुल, सगळीकडेच सांपडावा. कोंबड्या, लहान-सहान बकरीं, गेला बाजार कलिंगडें, टरबुजें हें कोल्होबांचें आवडतें खाद्य.

फिरस्त्या धनगरांना लांडग्यांचा अन् कोल्ह्यांचा फार त्रास. किंबहुना हीं जनावरें धनगरांबरोबरच हिंडत असतात. जिथें धनगरांच्या मेंढयांचा कळप मुक्कामासाठीं असेल, त्या रानांत हीं द्वाड जनावरें ओढया-खोगळींना दडून असायचीं.

लांडगा भारी धीट. प्रसंगीं मेंढरूं उचलायला अडथळा केला. तर माणसा-वरही हल्ला करायला मागेंपुढें पाहायचा नाहीं. फाडून काढील. कोल्हा त्या मानानें भेकड, पण अधिक युक्तिबाज.

आतां खेकडा हैंही तसें म्हटलें तर एक जनावरच. वस्तुतः किती क्षुद्र ! पण कसा तापदायक ! भाताचीं खाचरें बांधबंदिस्तीनें कितीही पक्कीं केला, तरी एकदां खेकडा मुक्कामाला आला कीं त्यांचें झालें वाटोळें ! वीणही भयानक. चौंढाभर बिळें करील. चोंढयांत सांठलेलें पाणी सगळें वाहून जातें,

अन् पेरलेलें भात खेकड्याच्या भक्ष्यस्थानीं पडतें.

म्हणून कोंकणांत तर दरवर्षी खेकड्यांविरुद्ध मोहीम काढावी लागते ! शेण आणि पाणी एकत्र कालवायचें, अन् बिळांत ओतून द्यायचें. उबगून खेकडा बाहेर आला, कीं एका टोल्यांत पार ! दुसराही एक उपाय. बिळांत काठी घालायची. खेकडा तिला चावण्यासासाठीं म्हणून धरतो. ओढून बाहेर काढायचा, अन् मुक्कामावर पोंचवायचा. प्राणी असा विद्रूप, चाल अशी तिरकी कीं पुसूं नये !

पण खेकडा हेंही एक खाद्य आहे. मांसाहारामध्यें खेकड्याला एक विशिष्ट स्थान आहे. विशेषतः कंबर दुखत असली, कीं खेकड्याचा रस्सा त्यावर फारच गुणकारक.

तर कोल्हा हा या खेकडाकुलाचा मोठाच शत्रु. कोल्ह्याची शेपटी भली झुबकेदार. ती तो खेकड्याच्या बिळांत घालतो. खेकडा चिडून शेपटी धरून ठेवतो. लगेच ती बाहेर ओढायची, अन् पंजानें पार करून गट्टम करून टाकायचा !

याच कुळांतलें आणीक एक जनावर म्हणजे तरस. मागल्या टांगांपेक्षां पुढल्या अधिक उंच. त्यामुळें मागले पाय ओढीत चालतें. भारी ओंगळ. मेलेलीं गुरें सडलीं, म्हणजे त्यांच्यावर अक्षरशः तुटून पडायचें. हें फार आवडतें खाद्य. पण हें न मिळालें, तर लुंगीं-सुंगीं कुत्रीं किंवा कोंबड्याही तरसाला चालतात. या त्याच्या ओंगळपणामुळें शिकाऱ्यांना या जनावराचा भारी तिटकारा. त्याला गोळी घालणें म्हणजे ती वांयाच दवडणें !

शेतकऱ्याचा प्राण खाणारें आणखी एक जनावर म्हणजे हरीण. वस्तुतः हरीण हें जनावर देखणें. तृणभोजी. ऋषींच्या आश्रमांतलीं हरिणशावकें फार प्रसिद्ध, अन् लाडकीं. सर्वांनाच आवडणारीं. सुवर्णमृगाची कथा तर सगळ्यांनाच माहीत. हरिणाचें कातडें मृगाजिन या नांवें प्रसिद्ध. तें ध्यान-धारणेसाठीं फार उपयुक्त.

असें हरिण भारतीय संस्कृतीचें एक अंग बनलेलें. पण हरिणांचे कळप म्हणजे शेतीचें वाटोळें ! एकेका कळपांत शेंशंभर हरिणी असायच्या, अन् एखादा पुष्ट काळवीट त्यांचा नेता. ही हरिणधाड पहातां पहातां यायची, अन् हातोहात शेत उलगवून दिसेनाशी व्हायची. पळायच्या बाबतींत फार

चपळ. नुसतें उडी फेकीत जायचें. टाकीत किंवा मारीत नव्हे, तर फेकीत ! हरिणांचा थवा पळतांना बघणें, म्हणजे मोठें सुख. जणूं सगळा कळपच्या कळप हवेंत तरंगतो आहे !

हरणांचें वरदान सपाट प्रदेशाला, विशेषत: माळरानांना लाभलें. डोंगरां-डांगरांतून हरणें कमी. म्हणून बारामतीकडे, दक्षिण महाराष्ट्रांत, दक्षिण विदर्भांत, मराठवाड्याच्या वन्य भागांत हरणें अधिक.

अस्वलांचा उल्लेखही इथेंच करायला हवा. जिथें झाडी भारी दाट, तिथें अस्वलांचा संभव अधिक. ती दाट हवी, अन् वेलींचा अन् झुडपांचा गुंतवळा अधिक हवा. अशी झाडी विशेषत: सह्याद्रींत. त्यांतल्या त्यांत महाबळेश्वराची झाडी अस्वलें राहण्यास अधिक अनुकूल.

अस्वल हें जनावर मुख्यत: शाकाहारी. पोळ्यांतला मध हें याचें आवडतें खाद्य. अंगावरल्या दाट केसावळीमुळें मधमाशांच्या नांग्या कातडी-पर्यंत पोंचायच्या नाहींत. तेव्हां मग केवळ हातांनीं तोंडासमोरल्या माशा मारल्या कीं भागलें. तेवढें अस्वल करतें.

शाकाहारी खरें, पण अस्वलाचीं नखें भारी वाईट. अंग फाडून काढायला कमी करायचें नाहीं. मात्र अस्वलें सह्याद्रींतूनही कमाच होत चाललीं आहेत. जों जों झाडीवर कुऱ्हाडी चालताहेत, तों तों अस्वलांचाच काय, सगळ्याच रानजनावरांचा आसरा उणावत चालला आहे.

बाकी मग उरलीं किरकोळ जनावरें. मुंगूस महाराष्ट्रांत विपुल. दिवसा-ढवळ्या खेड्यांतल्या रस्त्यांवरून वावरण्याजोगें धीट. मसण्या ऊद रात्रीं कौलांवरून उड्या मारीत हिंडायचा. रानमांजरेंही क्वचित् आढळायचीं. संतापलीं, तर वाघाइतकींच हिंस्र.

घोरपडीभोंवतीं तर आख्यायिका गोळा झाल्या आहेत. तानाजीची यशवंती घोरपड पोरासोरांच्या तोंडीं. एकदां नखें खबदाडींत रोवून घोरपड बसली, कीं मग तोडली तरी सुटायची नाहीं. घोरपडीचें तेलही मोठें औषधी.

ससा महाराष्ट्रांत सर्वत्र. दिवसभर झुडपांजवळच्या बिळांत लपून असायचा. अंधार पडला, कीं मग बाहेर पडायचा. सशाची वीणही अशीच प्रचंड. सशाचें मांस, हें शिकाऱ्यांचें आवडतें खाद्य. त्यांत तें रुचकरही असतें. ससे मारणें अगदीं सोपें. अंधार पडल्यावर बंदूक घेऊन डोंगरांत

निधावें. सशाचे डोळे रात्रीं लख्ख चमकतात. ते दिसले, कीं छरेभरली गोळी झाडावी.

सरपटणारीं जनावरें विशेषतः सह्याद्रींत विपुल. त्यांच्याही नाना जाती. कांहीं विषारी. कांहीं बिनविषारी. विषारी जातींत पहिला क्रम नागाचा. फणेवर दहाचा आंकडा असलेला नाग, म्हणजे मृत्यूला निमंत्रण! पण बत्तीस शिराळ्याला या नागांनाही खेळवणारे जवान मर्द आहेत! ते तर नागांची जत्राच भरवतात! नाग धरायचे, खेळवायचे, अन् सोडून द्यायचे.

नागाहून कांकणभर कमी विषारी, पण तेवढींच प्राणघातकें, म्हणजे नानेटी, कवड्या, अधेला, कांबळ्या, मण्यार अन् घोणस. फुरसें ही कोंकणी वस्तु. एकलहऱ्या क्वचित् आढळतो, पण तोही असाच जीवघेणा.

धामणीची लांबी खूप, मात्र तें जनावर बिनविषारी. दुतोंडें, विरूळा, या आणखी बिनविषारी जाती. विरूळा पाण्यांत राहायचा.

अजगरही क्वचित् महाराष्ट्रांत आढळतो. पण त्याची लांबी कांहीं कारवारच्या किंवा केरळच्या जंगलांतल्या अजगराएवढी नव्हे.

मात्र मुंगूस आणि मोर हे दोन सर्पजातीचे शत्रू! या दोघांची गांठ पडली, तर साप फडा टाकून गरीबवाणा व्हायचा. अगदीं नागसुद्धां. गारुडी लोक तर सापामुंगसाची लढाईच खेळवतात!

## इये वनींचीं पांखुरें—

सह्याद्रीच्या कडेकपारींतून बघावें तों बऱ्याच उंचावर कड्याच्या पोटाशीं घारींच्या ढोली दिसतात. नीट निरखून पाहिलें तर त्या ढोलींमधून काड्या-कुड्या एकत्र करून घारींनीं जमवलेलीं घरटींही लक्षांत येतात. हीं सगळींच घरटीं कांहीं घारींचीं नाहींत. अगदीं क्वचित् एखादें गरुडाचेंही असतें. पण गरुडपक्षी सहसा महाराष्ट्रांत आढळांत येत नाहीं, हेंच खरें.

सह्याद्रि-सातपुड्याच्या कोणत्याही कड्यावर उभें रहावें, आकाशांत संथपणें आपल्या पंखांचें सुकाणु पेलीत तरंगत असलेली घार दृष्टीस पडेल. या पांखराची दृष्टि मोठी तीक्ष्ण. तिला फार लांबचें दिसतें. पंच-क्रोशीभरांत कुठेंही असलेलें भक्ष्य हेरून बोल बोल म्हणतां घार त्याच्या-वर झडप घालते. घारीला मृत मांस चालतें. सर्पही घारीचें आवडतें खाद्य.

सर्प धरण्याची घारींची युक्ति मोठी अभिनव. एका झेपेसरशीं सर्पाला मधें पकडून घार वर उंचावते, अन् झटका देऊन त्याला खालीं टाकून देते. सर्पाला व्याकुळ व्हायला एवढा झटका पुरेसा होतो. मग मजेंत दुसऱ्या फेरींत त्याला आपल्या पंजांत उचलून घार आपल्या घरट्यांत घेऊन जाते. पिलांना भली मजेशीर मेजवानी होते.

घारीसारखाच दुसरा मृतमांसभोजी पक्षी गिधाड. हें पांखरूं भारी ओंगळ. भली हातभर लांब मान. पंख अजिबात नसलेली. याही पांखराला मेलेल्या जनावराचा ठावठिकाणा फार दुरून कळतो. यांचीं घरटीं कुठें आढळांत येत नाहींत, पण कुण्याही खेड्यांत एखाद्या पाटलाघरचें जनावर मेलें, म्हणजे त्याला बाहेर ओढून टाकतात, तिथें जमतो गिधाडांचा थवा.

गिधाड एकटें येत नाहीं. दहा, वीस, पंचवीस एकदम येतात. पका-पका पंख वाजवीत येतात. अगोदर तीं सावधपणें भक्ष्यापासून लांब उतरतात. जनावर मेलें आहे अशी खात्री पटली कीं, मग ओंगळपणें किंचाळत तीं जनावराभोंवतीं भिडतात. पहातां पहातां तें जनावर होतें नव्हतें करून टाकतात.

एका अर्थानें गिधाड हें महाराष्ट्राला वरदानच म्हणायचें. एरव्हीं मेल्या जनावरांच्या दुर्गंधीनें जीव अगदीं नकोसा झाला असता.

घार-गिधाडांबरोबरच आणिक एका पांखराचा उल्लेख करायला हवा—कावळ्याचा. महाराष्ट्रांतली फार मोठी दुर्गंधि या पांखरानें दूर केली आहे. बहुधा कावळ्याला त्याच्या कर्कश ओरडण्यामुळें अमंगळ मानीत असावेत. पण कावळ्यासारखा शिस्तशील पक्षी दुसरा क्वचितच आढळेल.

पिंडांना कावळ्याचा स्पर्श झालाच पाहिजे. न झाल्यास मेल्या जिवाला सद्गति मिळाली, असें मानलें जात नाहीं. दारच्या शेवग्यावर किंवा आंब्यावर सकाळच्या रामप्रहरीं कावळा ओरडला, तर तें शुभचिन्ह मानलें जातें. कुणी पाहुणा घरीं येत असल्याची ती खूण आहे. अलिकडे पाहुणाच मुळीं नकोसा झाला आहे. पण पूर्वीं महाराष्ट्र एवढा कृपण नव्हता. त्या वेळीं ज्ञानेश्वरांनीं मोठ्या जिव्हाळ्यानें कावळ्याला म्हटलें, 'उड उड रे काऊ। तुझे सोन्यानें मढविन पाऊ। पाहुणे पंढरीरावू। घरां कैं येती सांगें !'

मेलीं जनावरें खाण्यांत घार-गिधाडांच्या पाठोपाठ कावळ्याचा क्रम. जीं जनावरें त्यांच्या क्षुद्रपणामुळें घार-गिधाडाच्या लक्षांत येत नाहींत, अशीं सरडा, उंदीर, चिचुंद्री, कुठेंही मेलीं कीं, कावळ्यांनीं उचललींच.

वर कावळ्याच्या शिस्तीचा उल्लेख केला आहे. त्यासंबंधीं कावळ्यांच्या न्यायसभेचें उदाहरण दिलें कीं पुरे. एकाद्या अपराधाबद्दल कुणी कावळा दोषी ठरला, तर शेंकडों कावळे त्याला टोंचटोंचून ठार मारतात. तो कावळा पार मरेपर्यंत कावळ्यांची सभा तेथून उठत नाहीं !

आणखी एक मांसभोजी पक्षी म्हणजे ससाणा. हा शेतांमधून चरत असलेल्या चिमण्यांची शिकार करीत हिंडायचा.

कावळ्याच्या पाठोपाठ चिमणीचें नांव घ्यायला हवें. या अल्लाप पांखरावर विशेषतः महाराष्ट्रांतल्या बालचमूनें अगदीं मनापासून प्रेम केलें आहे. चिमणीचें रूपही मोहक. आकारही लहानसा, गोजिरवाणा. अगदीं निरुपद्रवी. चिमण्या अशा माणसाळलेल्या कीं, घरांच्या छपरांत घरटीं बांधतात. माणसाचें त्यांना भयच नाहीं. या त्यांच्या सलगीमुळेंच चिमणी हें पांखरूं महाराष्ट्राचें इतकें आवडतें झालें आहे. आजीच्या गोष्टींत चिमणीला भाव नेहमींच जास्ती. तिचें घर मेणाचें !

चिमणीच्या पाठोपाठ असाच एक निरुपद्रवी पक्षी म्हणजे मैना. मैनेच्या गायनकलेवर बायाबापड्यांचा विश्वास. मात्र तुकारामबोवांनीं गाण्याचें प्रशस्तिपत्र साळुंकीला दिलें आहे.

चिमणी, मैना, साळू हीं पांखरें इतकीं घरगुती झालीं कीं, महाराष्ट्रांतल्या अनेक मुलींचीं नांवें चिऊताई, मैनाबाई अन् साळूमावशी !

असेंच घरघुशेपण केलें पोपटानें. खानदेश, वऱ्हाड अन् मराठवाडा या भागांत पोपटराव हें नांवही खुशाल वापरांत आहे.

कोकिळेचें स्वरज्ञान तर सगळीकडेच प्रसिद्ध. कोकिळा हा जसा विशिष्ट मोसमांत गाणारा पक्षी, तसे महाराष्ट्राच्या ब्रह्मारण्यांत आणखी कांहीं मोसमी पक्षी आढळतात. उदाहरणार्थ, पावशेगो पक्षी केवळ पावसाळ्यांतच आपली आर्त साद घालीत असायचा. भोरड्या सुगीच्या घातीला दिसायच्या. भारद्वाज हा मोसमी पक्षी नव्हे, पण त्याचें अन् नीलकण्ठाचें दर्शन हा महाराष्ट्रांत एक शुभयोगच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सातबाया समूहानें असायच्या, तर न्हावी व सुतार हे एकलकोंडे. कुठल्याही नदीवर किंवा ओढ्यावर, आकाशांत खालीं नेम साधून खंड्या फडफडत असलेला दिसायचा, अन् मग एकाद्या बाणासारखा खालीं झेपावून मासा पकडून अदृश्य व्हायचा.

बगळा, करकोचा अन् पाणकोंबड्या हे जलपक्षी. बगळ्याच्या अति-सावधपणें पाण्यांत पाय घालण्याच्या गुणाला ज्ञानेश्वरांनींही वाखाणलें आहे. एकूण इतर प्रांतांच्या मानानें महाराष्ट्रांत तळीं थोडीं. पण बहुधा त्या साऱ्याच तळ्यांत पाणकोंबड्या विपुल. नदीकांठानेंच साद घालीत हिंडणारा आणिक एक पक्षी म्हणजे टिटवी.

तित्तिर महाराष्ट्रांत फारसे आढळत नाहींत. अगदीं क्वचित्. हरियाळ अन् कवडे मात्र विपुल. हीं दोन्ही पांखरें शिकाऱ्यांचीं मोठीं आवडतीं. महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यांतून जुनीं देवळें आहेत. त्यांच्या गाभाऱ्यांतून पाकोळ्यांची वस्ती. क्वचित् वटवाघळेंही. पण मुख्यतः वटवाघळें वडापिंपळावर आढळायचीं.

आणिक एक थवा करून राहाणारें आणि माणसाळलेलें पांखरूं म्हणजे कबुतर. पेशव्यांच्या दप्तरांतून कबुतरें पाळल्याचे अनेक उल्लेख आहेत. घमासान युद्धें चाललीं असतां किल्ल्यावरून निरोप आणण्याच्या अन् पोंचवण्याच्या कामीं कबुतरासारखा विश्वासू प्राणी दुसरा नाहीं.

अंधाऱ्या रात्रीं आपल्या भेसूर आवाजानें पोराबाळांनाच काय, थोरांनाही भिववणारें घुबड. हें दाट चिंचांमधून, वडापिंपळामधून आढळायचें. महाराष्ट्रांत तरी या बटबटीत डोळ्याच्या पांखराचा तिरस्कारच केला जातो.

आतां कोंकणांतल्या कांहीं पक्ष्यांचा उल्लेख केला म्हणजे महाराष्ट्रांतले पक्षी संपले म्हणायचे.

खेकाटी, बोलाडी, गवळण हीं पांखरें कोंकणांत विशेष आढळणारीं. शिवाय नाना सागरपक्षी. पाणबगळे. पण कोंकणांत असंख्य पांखरें अशीं आहेत कीं, ज्यांचीं नांवें फार थोड्यांना माहीत.

सह्याद्रींत, सातपुड्यांत, बालेघाटांत, कुठल्याही डोंगरांतल्या दाट झाडींत शिरावें. वेळ पहांटची साधावी अन् मग जें काय आनंदमंगल त्या शुभ-प्रभातीं कानीं येतें ! नाना पांखरांचे नाना आवाज. कांहीं शीळ घातल्या-

सारखे. कांहीं बासरीच्या स्वरासारखे. कांहीं षड्जापासून तार सप्तकापर्यंत पोहोंचणारे, कांहीं थांबून थांबून गाणारे. असें जणूं स्वरसंमेलन सुरू असतें. भारतांतल्या इतर कुठल्याही प्रांतांत सह्याद्रींतला हा ब्रह्मगानाचा आनंद नाहीं. सह्याद्रि तो सह्याद्रींच !

कांहीं जनावरें माणसाळलेलीं—

महाराष्ट्रांतली गाय ठेंगण्या बांध्याची. दूधही कमीच म्हणायचें. कारण महाराष्ट्रांत चारा कमी. पण महाराष्ट्रांतलीं जनावरें काटक.

या ठेंगण्या गायींचे लेक लहानखोर बैल जेव्हां पुढें झुकून झुकून एवढाले प्रचंड लोखंडी नांगर ओढतात, तेव्हां असें आश्चर्य वाटतें कीं, या ठेंगण्या-ठुसक्या बैलांत इतकें सामर्थ्य आलें कुठून ! एका सातारा जिल्ह्यांतच काय ते बैल जरा कानकळाशीदार अन् देखणे. त्यांची उंचीही चांगलीच म्हणायची. मग महाराष्ट्रभरांतले नामजद शेतकरी आवर्जून हे बैल शेती-साठीं विकत घेतात.

अशाच ठेंगण्या अन् दुधातुपाला जरा कणसर महाराष्ट्रांतल्या म्हशी. खेड्यांतल्या म्हशी बहुधा सगळ्या हाडकुळ्या असायच्या. दूधही तांबुलीभर, अन् तें सुद्धां पातळ.

खानदेशांत मात्र तापीकांठची सर्की खाऊन म्हशींच्या अंगावर अंगभर मांस आढळतें. तिकडे बैलांचीही गत तीच. पण गायींची दशा मात्र सर्वत्र सारखीच ! एकूण दुधासाठीं गायी पाळाव्यात, ही दृष्टि महाराष्ट्रांत कमीच. गायी सांभाळायच्या केवळ गोऱ्हे देण्यासाठींच. एरव्हीं मग गायींची नुसती गोमाता म्हणून पूजा करायची. तिला खायला मात्र साऱ्या जनावरांत निकस घालायचें.

कोंकणांत रेड्यांना कामाला जुंपतात, यांत कांहींच आश्चर्य नव्हे. रेड्याला म्हणायचें खुळगा. खुळाच तो ! कांहीं तरी कुठें तरी ओढीत असायचें. वांकडें गेलें कीं मार खायचा. या खुळग्यासारखा निर्बुद्ध प्राणी साऱ्या पाळीव पशुसृष्टींत दुसरा क्वचितच आढळेल !

त्यानंतर उल्लेख करायला हवा बकरीं आणि मेंढ्यांचा. पैकीं बकरी हें जनावर गांवगन्ना आढळायचें. बोकडांचा उपयोग मुख्यतः कापून खाण्या-

साठीं. महाराष्ट्रांतल्या असंख्य ग्रामदेवतांपुढें लक्षावधि बोकड आजपर्यंत कापले गेले असतील. कुण्या देवतेपुढें तर एका हातीं पांच-पांच बोकडांची दावणच कापली जायची. रक्ताचे पाट वहायचे.

मेंढ्या धनगरांच्या जथ्याबरोबर गांवोगांव भटकत असायच्या. हे धनगर पावसाळाभर कुठें तरी एक्या गांवीं रहायचे. वाडे करून. वाडा म्हणजे मेंढ्यांसाठीं आसरा म्हणून उभारलेला परकोट एकदां पाऊस उणावला कीं मग हे धनगर गांवगन्ना बाहेर पडायचे. त्यांच्या फेऱ्या लांब लांबवर व्हायच्या. बारामतीच्या माळरानांवर किंवा यवतेश्वराच्या पायथ्याशीं पिढ्यान् पिढ्या रहात असलेले हे धनगर पावसाळा ओसरल्यावर मराठवाडा-विदर्भापर्यंत पांगायचे.

मेंढरें शेतांत बसविणें म्हणजे शेतांना नामांकित खत घालणें. तेव्हां मग धनगरांशीं करार होतो. भाव ठरतो. मग धनगर दिवसभर मेंढरांना ओढ्याखोडयांमधून चारतात, अन् संध्याकाळीं बोली झाली त्या शेतांत नेऊन बसवितात. खत म्हणजे त्या मेंढरांचें हगणें-मुतणें !

मेंढरांच्या या कळपांबरोबर असतात नामांकित कुत्रे. दिसायला कांहीं फारसे गोंडस नसतात. पण धनगरी कुत्र्यांच्या तावडींत कधीं सांपडूं नये, तेंच बरें ! असें प्रामाणिक, झुंजार, तिखट, भरंवशाचें जनावर विरळाच ! कोल्हीं अन् लांडगे जर कुणा जिवाला दबकत असतील, तर ते या कुत्र्यांना. ते मेंढरें पळवतात, पण या कुत्र्यांची दृष्टि चुकवून.

शपथ घातल्यासारखा कुत्रा रात्रंदिवस धनगराबरोबर किंवा कळपा-बरोबर राहील. इकडे तिकडे हलायचा नाहीं. भारी जागरूक. त्याच्या भरंवशावर कळप सोडून धनगर एखाद्या खेपेस जरा तंबाखू खायला इकडे तिकडे गेला तरी चालेल. कुत्रा मेंढरांपासून हलायचा नाहीं.

किंबहुना एकूणच महाराष्ट्रांतलीं कुत्रीं दिसायला सुमार. पण तिखट-पणाच्या बाबतींत त्यांची बरोबरी केवळ महाराष्ट्रिकांशींच करावी ! छत्रपति शिवरायांच्या वाघ्या कुत्र्याची रायगडावर समाधीच बांधली आहे. जेव्हां त्याच्या स्वामीला चितेवर ठेवलेलें त्यानें पाहिलें, तेव्हां मग चिता पेटतांच त्यानेंही आपल्याला चितेवर घालून घेतलें. बाहेर आलाच नाहीं !

मांजरें खेडोपाडीं आढळायचीं. मांजरें म्हणजे उंदरांचा काळ.

खेड्यांमधून उंदीर भरपूर. शेतांमधून, घरांतल्या धान्यांच्या डालग्यांमधून अन् टांगून ठेवलेल्या शिंक्यांवरून खाद्य शोधीत लुडबुडत असायचे. वरें झापांनीं किंवा गवतानें शाकारलीं असलीं, म्हणजे तर कांहीं बघायला नको. मग महाराष्ट्रांतले आदिवासी ठाकर एक युक्ति करतात.

त्यांचा नाचाचा ढोल फार तडाखेबंद वाजतो. कानांचे दडे बसतात. तो ढोल घेऊन ढोलच्यानें घरांत उभें राहायचें. बाकी सगळ्या भिडूंनीं घराभंवतालीं दांडकीं घेऊन सावध राहायचें. ढोलच्याच्या ढोलावरल्या थापा कडाम् कडाम् वाजूं लागल्या, कीं भीतीनें उंदीर पटापटा झापांवरून खालीं उड्या घेतात. दिसला उंदीर, कीं हाण टोला ! तेवढेंच भाकरीबरोबर कोरड्यास झालें !

पण उंदरांचा हा उपद्रव कांहीं आजकालचा नव्हे. एवढा प्रतापी राजा शिवछत्रपति, पण त्याच्या मनीं देखील असा धाक होता, कीं " उंदीर अविस्राच वात नेईल ! " म्हणजे सैनिक हो, तुम्ही रात्रीं बेसावध झोंपाल. पणत्या तशाच जळत ठेवाल. उंदीर तेलाच्या लोभानें पेटती वाट पळवतील. नकळत. मग गवताच्या गंज्या पेटल्या, तर घोड्यांना गवताची काडीसुद्धां मिळायची नाहीं !

कधीं काळीं महाराष्ट्रिकांचें आपल्या घोड्यांवर फार प्रेम ! आतां सायकल-मोटारीवर आहे, त्याच्या शतपट. सायकल-मोटार मोडली तर एखादा भाग बदलतां येईल. पण घोडें मोडलें, कीं कामांतून गेलें ! म्हणून मग घोड्याची फार वज. त्याचें ठाणें, आघाडी, पिछाडी, कळवा, खरारा, तोबरा, सारेंच तबियतीनें सांभाळायचें. घोडीं कसलीं, तट्टेंच तीं. भीमथडी तट्टें. पण मावळ्यांसारखींच काटक. पळायला मजबूत. मैलोमैल धांवलीं, तरी फेंस गाळायचीं नाहींत. उरीं फुटायचीं नाहींत. आतां वेग अन् उंची मात्र अरबी घोड्याएवढी नव्हे. पण इतर सर्व बाबतींत अरबी घोड्याशीं स्पर्धा करतील, अशीं हीं भीमथडी तट्टें !

या तट्टांचें मोल ओळखलें छत्रपतींनीं. त्यांनीं पागांवर स्वतंत्र सरदार नेमले. त्यांचें आडनांव झाले पागे ! या पागा घाटमाथाभर पांगलेल्या होत्या. एक होती कोंकणांत. तट्टें जोपासायचीं, तयार करायचीं, अन् सैन्याला पुरवायचीं, हें त्या पाग्यांचें काम.

थेट पेशवाई उलटेपर्यंत या पागांचें महत्त्व जसेंच्या तसें होतें. स्वराज्यांतल्या अठरा कारखान्यांतला एक कारखानाच मुळीं थट्टी नामें होता ! थट्टी म्हणजे तट्टांची वज राखण्याचें खातें. पेशव्यांच्या पागा बारामतीच्या माळांवर असत. याच भीमथडी तट्टांवरून एकदां राघोबा भरारींनीं मराठ्यांचा ध्वज अटकेपारच्या अंतराळांत फडफडविला होता.

महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनांत गाढवांचेंही महत्त्व कांहीं कमी नाहीं. गाढवासारखें अमोलिक जनावर दुसरें नाहीं. इतरांच्या खाण्यापिण्याची चिंता करावी लागते. काम संपलें कीं, गाढव रस्त्यावर हांकून द्यावें. उकिरडे फुंकून किंवा गांवखुरीस चरून आपच परत येतें. परीट, कुंभार, वडारी, बेलदार, या अशा वर्गांचें जीवनच गाढवाच्या अभावीं दुःसह व्हायचें. गाढव म्हणजे त्यांचा ट्रक. त्यांचा मालवाहक. एवढालीं ओझीं हें जनावर पाठीवर पेलतें, कीं आश्चर्य वाटतें, या भाराखालीं हा किरकोळ जीव कसा तग धरीत असेल ?

आपण नावडत्याला गाढव ही शिवी देतों. पण गाढवाचें मोलही कांहीं कमी नाहीं. गाढवांच्या किमती अडीचशें-तीनशेंपर्यंत जातात. कान्होबाच्या मढीला गाढवांचा केवढा मोठा बाजार. रंगीत म्होरक्या अन् मुसक्या घातलेलीं कानकळाशीदार गाढवें तिथें झुली पांघरून आणलीं जातात ! गाढवीचें पिलू गोजिरवाणें दिसतें. तुकोबांनीं म्हटलें, ‘ गाढवाचें तान्हें पालटतें क्षणोक्षणें ! ’ गाढवीच्या दुधाची हळी देत मुसकें अडकवलेली गाढवी सवें घेऊन कुंभार खेडोपाडीं हिंडतांना दिसतात. कारण गाढवीचें दूध हें मोठेंच औषध—लहान लेकरांना.

महाराष्ट्राच्या खेडोपाडीं आढळणारें आणखी एक जनावर म्हणजे गांवडुक्कर. बहुधा हीं वडाऱ्यांनीं किंवा बेलदारांनीं पाळलेलीं असायचीं. घाण आणि मळ खात खेड्यांमधून हिंडत असायचीं. जरी भंग्याचें काम हीं करून टाकतात, तरी यांचीही घाण कांहीं कमी नाहीं !

गांवांतून अन् खेड्यांमधून अधूनमधून आढळणारें आणखी एक जनावर म्हणजे माकड, वानर. वानर म्हणजे काळ्या तोंडाचें. माकडाची शेपूट वानराएवढी लांब नाहीं. तोंड तांबूस. वानर त्यांतल्या त्यांत मऊ स्वभावाचें. पण माकड मात्र रीस जात. वानरें कोंकणांत आणि वऱ्हाडांत

फार आढळायचीं. पिसाळलीं, म्हणजे भुभुःकार करीत, झाडांचे शेंडे गदगदा हलवीत, घरांचीं कौलें उस्कटून टाकीत थैमान घालायचीं. याची टोळी आली म्हणजे शेतांतलीं ओलीं कणसें, तुरीच्या शेंगा, कोंवळ्या मिरच्या, कापसाचे दोंडे, मांडवावरलीं पडवळें, घोसाळीं, दोडके—या सगळ्या पदार्थांचा निकाल लागायचा. घरांमधूनही शिरून खाद्यें पळवायला कमी करायचीं नाहींत.

माकडें घाटांत, त्र्यंबकला, रामटेकला-क्षेत्रांच्या ठिकाणीं हट्कून आढळायचीं. भारी त्रासदायक जनावर. सारखें तोंड विचकून भीति दाखवीत असायचें. किलकिलत असायचें. कसलाही खाद्यपदार्थ माकडासमक्ष जवळ ठेवायची सोय नाहीं. केव्हां लंपास करील किंवा ओरबाडून घेईल, सांगतां यायचें नाहीं. बरें, त्याला गोळी घालायची सोय नाहीं.

यामागें महाराष्ट्राची एक धार्मिक भावना दडलेली आहे. मारुतीराय हें वानर. मग त्याच्या वंशजांना मारायचें नाहीं. वाल्मीकीनें वानरांचें निरीक्षण फार बारकाईनें केलें आहे. प्रसन्न झालीं, रुष्ट झालीं, संतापलीं, म्हणजे वानरें वागतात कशीं, हें वाल्मीकि-रामायणांत वाचावें !

रामायणांत आणिक एक जनावराचा उल्लेख. महाराष्ट्रांतल्या खेडोपाडीं अवव्यांशीं परिचित आणि अवव्यांचें लाडकें, असें हें जनावर म्हणजे खार. सारखी तुरुतुरु धांवत असायची. धांवत नसेल तेव्हां शेपटीचा लफ्फा वर उभारून बसली असेल. दोन खारींचा पाठशिवणीचा खेळ म्हणजे मोठी प्रेक्षणीय गोष्ट. श्रीरामाच्या सेतुबंधनांतही हा लहानसा जीव साहाय्य करूं गेला, तेव्हां श्रीरामानें पाठीवर हात फिरवल्याची खूण त्याच्या पाठीवर अजूनही आहे.

पांढरींत सरडा अवश्य आढळायचा. एखाद्या चिंतामग्न ज्योतिष्यासारखा तो नेहमीं आकाशाकडे दृष्टि लावून बसलेला दिसायचा. सरडा म्हणजे ऋतूंच्या आगमनाची जणूं ध्वजाच. वारंवार त्याचे रंग पालटत असायचे.

घरांच्या आढ्यांवरून चुकचुकत हिंडणारी पाल, हें विखारी जनावर. दिसायलाही फारसें दृष्टिरम्य नाहीं. पण हिच्या चुकचुकण्यावरून भविष्यें वर्तवलीं जातात. विखारी म्हणजे दंश करीत नाहीं, पण स्वयंपाकांतल्या

एखाद्या पदार्थांत पडलें, तर अपाय मात्र हटकून व्हायचा.

मात्र पाल एका दृष्टीनें उपकारी. विंचवांची ती शत्रु ! विंचू हें जिवाणूं फार तापदायक. अडीअडचणींत, आढ्यांत, गोंवऱ्यांच्या ढिगांत, साठवलेल्या लांकडांत असें दडून बसायचें. याची बाहेर निघण्याची वेळ म्हणजे संध्याकाळ. एकदां यानें ठोका ठेवून दिला, कीं मग चोवीस तासांची निश्चिती. विंचवांत दोन प्रकार. तांबडा अन् काळा. कोणता जास्त उपद्रवी तें सांगणें कठिण. माळांवर दगडांखालीं विंचू हटकून आढळायचे. द्वाड पोरांचा हा छंदच. माळांवरून विंचू धरून आणायचे. त्यांच्या नांग्या खुडून त्यांना दोरी बांधायची. मग बायाबापड्यांना भेवडवीत हिंडायचें.

विंचू कुठें जाऊन बसेल, कांहीं सांगतां यायचें नाहीं. अगदीं शंकराच्या पिंडीवर सुद्धां ! तुकोबांनीं म्हटलें, ' विंचू देव्हाऱ्यावरी आला, देवपूजा नावडे त्याला. तेथें पैजाराचें काम, अधमासी तो अधम ! '

विंचवाहून भयानक, पण तुरळक आढळणारें जनावर म्हणजे इंगळी. हिरवट काळी इंगळी दिसायला सुद्धां भयानक असते. चांगलें तळहाताएवढें, किंवा त्याहूनही अधिक डगळ जिवाणूं. इंगळी अन् विंचू चावून मुलें गमावल्याच्या वार्ता कांहीं अजिबात दुर्मिळ नव्हेत.

महाराष्ट्राच्या खेड्यांमधून एक समज—चुकीचा—रूढ आहे, कीं शेण आणि दूध एकत्र करून ठेवून दिलें, म्हणजे विंचू पैदा होतात !

विंचवाहून जरा कमी विखारी जनावर म्हणजे गोम. हिच्या जातींतही एक हिरवट काळी महाविखारी जात आहेच. गोमेहून जरा कणभर उणा विखार म्हणजे गांधिलमाशी. ही आढ्याला, खांबांना, तुळवटींना घरटें करायची. चावली, कीं भली थोरली गांध यायची.

गांध आणणारें आणिक एक जिवाणूं म्हणजे काडमुंगी. साध्या मुंगीपेक्षां मोठ्या आकाराची. ही सामान्यपणें निंबाच्या झाडावर आढळायची.

याच जातीचे तांबडे मुंगळे कोंकणांत भरपूर. आंब्यांवर, फणसांवर, कोकमींवर यांची अधिक वस्ती. पोफळीच्या बागांमधून हटकून असायचे. भारी वाईट जात. एकदां डसला म्हणजे मग तोडला तरी सुटायचा नाहीं. यांचें घर म्हणजे आंब्याच्या पानांत केलेला कोळ्याच्या जाळ्यासारखा पांढुरका पोळा. त्यांत शेकडों मुंगळे राहायचे. तरातरा बागांमधून

धांवत असायचे. साही ऋतूंत.

विशेषतः पावसाळ्याच्या सुरवातीला महाराष्ट्रांत चहूंकडे काळे मुंगळे आढळतात. खोड काढली नाहीं, तर निरुपद्रवी. इतर ऋतूंत विशेषतः गुळाभोंवतीं अन् साखरेच्या पोत्यांमधून आढळायचे.

पण या सर्वांहून अधिक उद्यमी, अधिक चिकाटीची, अधिक शिस्तशील जात मुंग्यांची. यांचीं भलीं थोरलीं वारुळें महाराष्ट्रांत चहूंकडे आढळतात. वारुळें मुंग्यांनीं बांधायचीं, अन् त्यांमधून नागोबा आयतोबा होऊन राहायचे.

यांच्याही नाना जाती. धांवऱ्या, तांबड्या, काळ्या, जाड्या—किती तरी. पैकीं धांवऱ्या मुंग्या अजिबात चावायच्या नाहींत. तांबडी मुंगी चावली, कीं तिथें गांध यायचीच. भुईच्या पोटीं या सगळ्या जातींचीं केवढालीं नगरें. जणूं प्रचण्ड किल्लेच. आश्चर्य असें, कीं मुंगीला डोळे नाहींत. तिच्या मिशा हेच तिचे डोळे. पण तेवढ्या मिशांच्या भरंवशावर किती उद्योग करते मुंगी! अन्न गोळा करणें. तें सांठवणें. राणी मुंगी अंडीं घालील, त्यांचें रक्षण करणें. आपल्या किल्ल्यांत दुसऱ्या जिवाणूला येऊं न देणें—कितीतरी.

एवढाले हत्ती अन् अतुर्बळी नाग, पण इवल्याशा साध्या मुंगीपुढें बिचारे अगदीं हतबल! मुंग्या एखाद्या नागाच्या मागें लागल्या, कीं त्याचा फन्ना!

मुंगीहून अधिक उपद्रवी उधई, किंवा वाळवी. वाळवी काय खात नाहीं? सगळें कांहीं खाते—एक धातु सोडून. पण महाराष्ट्राचें भाग्य, कीं उत्तरेसारखा वाळवीचा उपद्रव महाराष्ट्रांत नाहीं. आपला शपथेला आहे, इतकेंच काय तें.

अनेक जीवांचा उल्लेख राहून गेला. उदाहरणार्थ, ढेंकूण, पिसू, कुंभारीण, भुंगा, सापसुरळी. पण महाराष्ट्राच्या व्यक्तित्वाची ओळख करून घेतांना त्यावांचूनहि काम भागेल.

✤ ✤ ✤

# सागरतीरीं

असा कांहीं थोडा महाराष्ट्राच्या काळीचा विचार केल्यानंतर पांढरीकडे वळण्यापूर्वी एकदां सागर-तीराची दखल घेतली पाहिजे. या दृष्टीनें महाराष्ट्र मोठा भाग्यवान्. त्याची सगळी पश्चिमा सागरानें वेढली आहे. त्याच्याजवळ मुंबईसारखें नामांकित बंदर आहे. नुसतें मुंबई हें नांव घेतलें कीं झालें. अधिक वर्णनाची आवश्यकता नाहीं. जगांतल्या सर्वोत्तम बंदरांतलें एक.

सागर आपली मर्यादा कधींच सोडीत नाहीं. पण यदाकदाचित् कधीं प्रळयाच्या वेळीं त्यानें मर्यादा सोडायचे मनांत आणलेंच, तर अडीच-तीनशें मैल लांबीचा सह्याद्रि त्याला शपथ घालून उभा आहे. तीन-साडेतीन हजार फूट उंचीचा.

पश्चिमेकडे जे पाणलोट समुद्रापर्यंत धांवले, त्या सगळ्यांच्या खाड्या झाल्या आहेत. जवळ जवळ थेट सह्याद्रीपर्यंत येऊन भिडणाऱ्या. म्हणजे अगदीं पावसाळ्यांत देखील तोही एक प्रवासाचा मार्ग.

महाराष्ट्राचा किनारा फारसा दंतुर नव्हे; तरी पण या खाड्यांमुळें किती तरी भरंवशाचीं बंदरें निर्माण झालीं आहेत. या बंदरांमधून किनारा-भर मालाची वहातूक होते. गलबतें, तरांडीं, मचवे, पगार अशा नाना आकारांच्या नावा खाड्यांमधून अन् उघड्या समुद्रावरून ऐटींत हिंडत असतात.

होतें काय, कीं पावसाळीं चार महिने उघडा समुद्र खवळतो. एरव्हीं

निवळ निळें दिसणारें त्याचें पाणी गढूळतें. टेकडीएवढाल्या लाटा उसळतात. त्यांत खाड्यांमधून पावसाचें पाणी समुद्रांत रिचवत असतें. भरतीच्या वेळीं असा दोहों बाजूंनीं जोर होतो. अन् मग सगळा किनारा लाटांच्याच चपेटांनीं अन् थापडांनीं नुसता गजबजून जातो—थेट तारापूरपासून गोमंतकापर्यंतचा.

महाराष्ट्रांतले तांडेल तसे मोठे हिमतीचे. त्यांच्या पोरांना रांगण्याच्या आधीं पोहायला येतें, हें कांहीं फारसें खोटें नव्हे. कुण्याही खाडीच्या कांठीं जाऊन पहावें, तर सगळा खाडीकांठ कोळ्यांच्या अन् नाखव्यांच्या पोरांच्या आरोळ्यांनीं नुसता गजबजलेला असतो. तीं लंगोट्या फेडून ठेवून नागवींच पाण्यांत डुंबत असतात. किंचाळत असतात. पोफळीच्या विऱ्यांच्या नावा करून त्या खाडींत सोडीत असतात. त्यांच्यामागें धांवत असतात. एकमेकांचे पाय धरून पाण्यांत ओढीत असतात. एकमेकांना बुडवीत अन् बुडत असतात. जाणतीं पोरें कांठाशीं बांधून ठेवलेल्या नावा सोडून खाडींत जातात अन् उगीच गळ टाकून बसतात. कांहीं मिळालें मिळालें-न मिळालें न मिळालें.

आईबापांना यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नसतो. बाप एक तर मासळी पागण्यासाठीं गेलेले असतात, किंवा मासळीमागें समुद्रांत रात्र काढावी लागल्यामुळें दिवसभर झोंपा तरी काढीत असतात. आयांना किती तरी काम असतें. मासळी बंदरांत आल्यापासून पुढील सगळी उस्तवार त्यांनीं करायची असते. यामुळें पोरें त्रास द्यायला नसलीं तेवढीं बरीं. मग तीं खाडीचेंच घर-आंगण करतात. तात्पर्य, कोंकणांतला नावाडी समुद्राला भीत नाहीं. समुद्रच त्याचा सखा, सहोदर, इष्ट, मित्र.

तरी पण पावसाळ्यांत उसळत्या वादळांत बहुधा कोणी उघड्या समुद्रांत गलबत घालीत नाहीं. गलबतें दोन कारणांसाठीं बाहेर काढायचीं. मासळी धरण्यासाठीं अन् मालाची नेआण करण्यासाठीं. पैकीं समुद्राचें सारें पाणी गढूळल्यामुळें मासळी अस्ताव्यस्त होऊन जाते. तिला त्राय उरत नाहीं. फार कशाला, समुद्रांतली मासळी खाड्यांमधून मागें सरत या दिवसांत भाताच्या चोंढ्यापर्यंतसुद्धां जाऊन पोंचते.

एरव्हीं नितळ पाण्यांत ठरलेली मासळी ठरल्या जागीं मिळायची.

सारंगा म्हणजे अमुक ठिकाणीं. पापलेट अमुक ठिकाणीं. बोंबील अमुक ठिकाणीं. कोलीम अमुक ठिकाणीं. शार्क अमुक ठिकाणीं. त्या त्या ठिकाणीं जाऊन नुसतें जाळें लावावें अन् काढून आणावें. जाळें लावण्याचा अन् काढण्याचाही बैदा असतोच. पण यापलिकडे कांहीं करावें लागत नाहीं.

अशी ही मासळी पावसाळ्यांत विस्कटल्यामुळें ठरल्या जागीं सांपडत नाहीं. बरें, माल भरून गलबतें बाहेर काढावींत, तर एक तर भांडीं नादुरुस्त होण्याची धास्ती अन् दुसरी तीं फुटून बुडण्याची. म्हणून सहसा हीं छोटीं-मोठीं गलबतें पावसाळ्याचे दोन-तीन महिने कुणी बाहेर समुद्रावर काढीत नाहींत. खाड्यांच्या किनाऱ्यावर ओढून ठेवतात.

हाही एक मोठा सोहाळाच असतो. सामान्यपणें मोठी भरती आली म्हणजे त्या भरतीसरशीं गलबतें ऐन कांठाशीं आणून ठेवायचीं. पाणी ओहोरलें कीं दो बाजूंनीं टेके देत, तळाशीं मोठमोठीं गोल दांडकीं आडवीं घालून गलबतें वर ओढायचीं. गलबत म्हणजे कांहीं लहान अवजार नव्हे. भले जाड नारळीचे दोर लावून पन्नास-पन्नास माणसें जेव्हां जीव खाऊन 'है शा ! है जा ! है भले !' अशा हळ्या देत जीव टाकीत गलबत ओढतात, तेव्हां तें मुंगीच्या गतीनें वर सरायचें. बरेंच वर ओढून ठेवलें कीं, दो बाजूंनीं पक्के खांबे देऊन तें उभें करून ठेवायचें. आगोट लागतां लागतांच बहुधा मोठमोठालीं गलबतें खाड्यांच्या कांठावरून ओढून ठेवलीं जातात.

मग त्यांच्यावर नारळीच्या झांपाचें झांकण घालायचें. हेतु हा, कीं मुसळधार पाऊस पडतो तेव्हां गलबतांत पाणी सांठूं नये. मग हे विश्रांतीचे दोन-तीन महिने त्या गलबतांची दुरुस्ती असायची.

कुठें गलबत खडकांवर धडकलेलें असायचें. कुठें शार्क माशानें धडाका दिलेला असायचा. कुठें पाण्याच्या चपेट्यांनीं एखादा भाग खिळखिळा झालेला असायचा. क्वचित् एखादी फळी कुजलेली असायची.

मग त्या गलबताजवळ सुताराचा मुक्काम पडायचा. त्याचें ठाकठोक सुरू असायचें. जहाजाची रंगरंगोटी सुरू व्हायची. फळ्यांमधल्या भेगा जुळवण्यासाठीं कापूस अन् डांबराचें लुकण वापरलें जायचें. अशा तऱ्हा तऱ्हा सुरू असायच्या.

याच दिवसांत जाळ्यांचीही दुरुस्ती सुरू असते. पाण्यांत भिजून भिजून जाळीं कुजत असतात. तीं कुजूं नयेत म्हणून सारखें रापण तयार करून त्यांत तीं बुडवून काढावीं लागतात. वाळवावीं लागतात. तरी शेवटीं तीं कुजतातच. धारदार दांतांचे मासे जाळीं फाडून टाकतात. या जाळ्यांची दुरुस्ती पावसाळाभर सुरू असते. तशी तर ती वर्षभरच सुरू असते. पण आगोटीच्या दिवसांत तिकडे लक्ष द्यायला अधिक फुरसत मिळायची.

याच दिवसांत दोर वळायचे. सुंभ बाजारांतून आणायचें अन् मग त्याला पीळ भरून त्याचे आठ पेडी दहा पेडी दोर तयार करायचे. हेंही काम पावसाळाभर पुरतें.

उन्हाळ्यांत वारे जोरानें वाहूं लागतात. त्या वाऱ्यांशीं झुंजतां झुंजतां शिडें फाटतात. तशीं तर तीं मध्यें वीतवितीवर समांतर दोऱ्या घालून मजबूत केलेलीं असतात. तरी पण खाऱ्या वाऱ्यामुळें कापड टिकत नाहीं. तेव्हां मग हीं फाटकीं शिडें शिवण्यासाठीं, पुन्हा तंदुरुस्त करण्यासाठीं, नवीं करण्यासाठीं वेळ हा एवढाच.

असे हे आगोटीचे अन् पावसाळ्याचे दोन-तीन महिने हीं सगळीं कामें उरकीत अन् टाळ-मृदुंगांचा कीस पाडीत घालवायचे. या दिवसांत बायकांच्या हातचें चवीचवीचें खायचें. मिळेल तितकें 'पिऊन' भांडणें अन् मारामाऱ्या करायच्या. कारण कामाच्या भाऊगर्दींत हेंही करायला वेळ मिळणार नसतो.

श्रावण पौर्णिमा ही नारळी पौर्णिमा. तो मोठा उत्सवाचा दिवस. त्या दिवशीं गोडधोड करायचें. जमलें तर नारळी भात करायचा. उंडेऱ्यांची खीर करायची. मग संध्याकाळीं समुद्राची पूजा करायची. शृंगारलेलीं गलबतें त्यांत लोटायचीं. लांबवर जाऊन समुद्राला नारळ द्यायचा. त्याला म्हणायचें, हें तुझें फळ तुला अर्पण! आतां आमचें गलबत वर्षभर जौळापासून, खडकांपासून सुरक्षित ठेव!

अन् मग दुसऱ्या दिवसापासून वाऱ्याचें तानमान पाहून समुद्रांतल्या सफरी सुरू व्हायच्या. गौरी-गणपति हा कोंकणांतला फार मोठा सण. तो उरकला कीं, व्यापारी नानापरींचा माल तयार ठेवतात. तो गलबतांतून भरायचा. अन् देवाचें नांव घेऊन चार-चार शिडें उभावीत गलबतें लांबच्या

प्रवासासाठीं मोठ्या समुद्रांत काढायचीं. कोंकणांतले हे खलाशी अन् तांडेल आपलीं शिडांचीं गलबतें घेऊन कुठवर जातात? खूप लांबवर. अगदीं कच्छ-काठेवाडपासून तों खालीं कोचीन-कन्याकुमारीपर्यंत.

मुख्यतः हे खलाशी मुसलमान असतात. हिमतीचे पक्के. छातीचे मजबूत. मुसलमान असले तरी नारळी पौर्णिमेला हे समुद्राची पूजा करायचेच.

हें धाडस, हें साहस या खलाशांत, दारुद्यांत, मांगेल्यांत, कोळ्यांत आणि तांडेलांत कुठून आलें?

हें तर वर्षोन् वर्षे जोपासलें गेलें आहे. सागररक्षणाची प्रतिष्ठा ओळखली शिवछत्रपतींनीं. बंदरांचें महत्त्व त्यांनीं जाणलें. या देशाचें पहिलें आरमार त्यांनीं तयार केलें. या सागरी जमातींतली ही साहसी वृत्ति त्यांनीं हेरली. हेरली अन् कामीं लावली. तारवें, तरांडीं, गुराब, फत्तेमाऱ्या, डोलकाठींचीं जहाजें, असें सगळें स्वतःचें आरमार त्यांनीं सिद्ध केलें.

या देशीं लाकूड भरपूर. तें लाकूडही त्यांनीं वायफळ वापरलें नाहीं. असें त्यांनीं आरमार लागीं लावलें, तेव्हां मग पुढें त्यांतून निर्माण झाले आंग्रे. इंग्रजही चळचळा कांपत असे आंग्रे!

आरमाराच्या बांधणीविषयींची ही जी शिस्त छत्रपतींनीं घालून दिली, तीच पुढें पेशवाईच्या भरांतही टिकली. आज्ञापत्रांतला यासंबंधींचा उल्लेख तर मनन करण्याजोगाच आहे—

" आरमारास तक्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लांकडें असावीं लागतात. आपले राज्यांत अरण्यांत सागवानादि वृक्ष आहेत. त्यांचें जें अनुकूल पडेल तें हुजूरचे परवानगीनें तोडून न्यावें. या विरहीत जें लागेल तें परमुलखीहून खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यांतील आंबे, फणस आदिकरून हेही लांकडें आरमाराच्या प्रयोजनाचीं. परंतु त्यांस हात लावूं देऊं नये. काय म्हणोन कीं, हीं झाडें वर्षा दोन वर्षांनीं होतात असें नाहीं. रयतांनीं हीं झाडें लावून लेंकरांसारखीं बहुत काल जतन करून वाढविलीं. तीं झाडें तोडिल्यावर त्यांचे दुःखास पारावर काय? एकास दुःख देऊन जें कार्य करीन म्हणेल तें कार्य करणारासहीत स्वल्पकाळेंच बुडोन नाहींसेंच होतें; किंबहुना धनियाचे पदरीं प्रजा पीडण्याचा दोष

पडतो. या वृक्षांच्या अभावें हानीही होते. याकरितां हे गोष्टी सर्वथैव होऊं न द्यावी. कदाचित् एखादें जें झाड बहुत जीर्ण होऊन कामांतून गेलें असलें, तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन, द्रव्य देऊन त्याचे संतोषें तोडून न्यावें. बलात्कार सर्वथैव न करावा.''

समुद्रकिनाऱ्यावर चांच्यांचा उपद्रव फार. पण या अशा कडक शिस्तीनें बांधलेल्या आरमारव्यवस्थेमुळें तो पार मोडून निघाला. एवढा अतुर्बळी जंजिऱ्याचा सिद्दी, पण त्यालाही पुढें हातपाय बांधून आपल्या कोटांत बसावें लागलें.

यामुळें तीरावरली जनता सुखावली. कधींमधीं सिद्दी, पोर्तुगीज अन् इंग्रजांची गर्दी येऊन पडे. विशेषतः सिद्दीचीं माणसें हतियारांनिशीं येऊन झांबडझुंबड करीत. दहावीस लोकांना पकडून नेत. पण ही आपत्ति कधीं-मधींच ओढवे. एरवीं सगळे व्यवहार सुखानें चालत.

म्हणूनच कसबी नाविकांच्या पिढ्या कोंकणांत नांदल्या. म्हणूनच मच्छी-मारीला एक प्रतिष्ठा लाभली. या भागांत मच्छीमार तांडेलांचा शब्द म्हणजे परवलीचा शब्द झाला.

आपण सहकारी जीवनाचीं गीतें आज गातों. या मच्छीमारांमध्यें सहकारी जीवन कधींकाळींचें सुरू आहे. कुणा एकाचें गलबत किंवा पगार असायचा. तो किंवा दुसरा कुणी त्या गलबतावरचा तांडेल. मग त्याच्या मदतीला आठ-दहा खलाशी. कुणा एकाचीं जाळीं असायचीं. किंवा सगळ्या खलाशांचीं मिळून सामाईक असायचीं.

मासळी धरण्यासाठीं उथळ समुद्रांत अन् खाड्यांमधून डांबे पुरून ठेवलेले असायचे. हे डांबे बहुधा माडाचे, किंवा येलकईचे. जाळ्यांचे दोर बांधून ठेवायला यांचा उपयोग करायचा.

संध्याकाळच्या सुमारास तांडेल अन् खलाशांची मासळी पागायला जायची गडबड सुरू व्हायची. भात रांधण्यासाठीं अलिमिनियमचें भगुलें, कोरडीं फाटीं, मीठ, मिरची, तेल, गोडें पाणी, एखादा धुरकटलेला कंदील, जाळीं, असा सगळा सरंजाम घेऊन मंडळी घाईघाईनें गलबताकडे निघायची. मागें राहिला, त्याला हाकारे-कुकारे सुरू व्हायचे. मंडळी गलबतावर एकत्र झाली, कीं गलबताचा दोर खुटायचा, अन् पाणी

कापीत गलबत पुढें निघायचें. मतलय नसली, वारें पडलें, तर चालायचीं वल्हीं. एका तालांत. खप्प खप्प आवाज करीत.

कुणी चुकार मागें राहिला असेल, तर तो एखादें होडगें घेऊन घाई-घाईनें गलबत गांठायचा. त्याच्यावर तांडेलाकडून अन् जोडीदारांकडून एकदां शिव्यांची बरसात व्हायची अन् मग पुनः गलबत शांत व्हायचें. कुणी एखादा रंगांत असला, तर एखादें गाणें सुरू करायचा, त्याच्या तालावर वल्हीं चालायचीं.

नस्त ओलांडून गलबत पुढें निघालें कीं, मग उघडा समुद्र लागायचा. मग शिडें ताणलीं जायचीं. गलबतांतली चूल धडकायची अन् त्यावर जाडभरड तांदळांचा भात शिजायला पातेलें चढायचें. तंवर येतात रोंवलेले खांब. मग मोठ्या कसबानें त्यांना जाळ्यांचे दोर बांधायचे. भरतीचा ताण असेल तर आंतल्या अंगाला जाळीं बांधायचीं. ओहोर असेल, तर बाहेरल्या अंगाला. एवढें झालें कीं, मग भरती अगर ओहोटीचा जोर उलटून जाईपर्यंत कांहीं काम नाहीं. समुद्राच्या लाटांवर डोलत वाट पहात असायचें.

तेवढा जोर उलटला कीं, मग पुनः घाई सुरू होते. जाळीं असतात चंबूच्या आकाराचीं. त्यांतून एकही मासा सुटून बाहेर जातां उपयोगाचा नाहीं. सावधपणें खांबांना बांधलेले दोर सोडून सगळें जाळें उचलून गलबतांत घ्यायचें !

माशांचा मृत्युयोग असला, तर मग भला लाग साधतो. तो नसला तर मग एवढे श्रम फुकट जातात. जें काय नशिबांत असेल, तें घेऊन मग परत फिरायचें. एकदां ती बलामत घरीं पोंचवली कीं मग हे गडी मोकळे ! त्यांनीं दुसऱ्या दिवशाची पुनः समुद्रांत जायची वेळ येईपर्यंत कांहीं करायचें नाहीं.

बंदरात कोळणी पाट्या घेऊन तयार असतात. त्यांनीं सगळा माल खालीं उतरवायचा. निवडायचा. बोंबील अन् कोलीम या दोन्ही जाती वाळवून विकायच्या उपयोगाच्या. बोंबील वाळवण्यासाठीं बांबू उभे करून त्यांना दोऱ्या बांधलेल्या असतात. दोन बोंबलांच्या तोंडाची गुंतवणूक करून ते दोरीवर वाळूं घालायचे. मच्छीमारांच्या बंदरांत जावें, तर अशा

बोंबलांच्या माळाच्या माळा टांगलेल्या आढळतात.

कोलीम ही बारकी मासळी. ती खडकांवर वाळूं घालायची. सकाळीं घालायची अन् संध्याकाळीं काढायची. पण याशिवाय मासळीचे कितीतरी प्रकार. त्यांतले ताजे विकायचे असतील, ते पाट्यांत घालायचे अन् एवढालीं तीं जड ओझीं घेऊन लपालप वांकत बायांनीं बाजारांत जायचें.

सहकाराचें सांगायचें राहिलेंच. गलबतवाला, त्याचे दोन वांटे. तांडेल, त्याचे दोन वांटे. अन् मग बाकी सगळा खलाशांचा एकेक वांटा. कुणी कितीही किरकोळ काम करीना का, त्याला एक वांटा मिळायचाच. हें असें वांटप वर्षोनुवर्ष चाललें आहे !

पावसाळे बरसतात, उणावतात. उन्हाळे तापतात, शीतळ होतात. पण हें चक्र बंद पडत नाहीं. बोंबील, बांगडा अन् कोलीम, ही मासळी सुकवून घाटावर धाडली जाते. तिथें तिला मोठें गिऱ्हाईक. मागें हा माल बैलांच्या पाठीवर येत असे. आतां तो ट्रक्समधून येतो.

आणिक कांहीं उद्योगांचा उल्लेख केला कीं, हें किनारापर्व संपलें. पूर्वीं नारळाची माडी निघायची. आतां नीरा निघते. माडाची पोय कापायची. तिला मडकें लावायचें. त्या पोईमधून माडाचा अंगरस थेंब थेंब झरत असायचा. तो नितळ, पांढुरका, अति मधुर अंगरस म्हणजे नीरा. नीरा आंबली कीं, तिची माडी व्हायची. हा उद्योग करणारे, ते भंडारी.

शिवाय नारळ सोलायचे. त्यांचीं सोडणें पाण्यांत कुजत घालायचीं. नीट कुजलीं, कीं बाहेर काढून तीं कुटायचीं. कुटल्यावर त्यांचा तंतु न् तंतु मोकळा होतो. त्याचा वळायचा काथ्या. असे हे नाना परींचे उद्योग. कष्टाचे. जिवापाड खपावें, तेव्हां जेमतेम पोटाला मिळावें. असा हा उद्योग पणजी ते तारापूर, असा किनाराभर चालायचा.

पण कोंकण्या माणूस खपतो. कष्टाला तो भीत नाहीं.

✢ ✢ ✢

# किल्ले आणि कोट—

स्वातंत्र्यप्रियता ही तर सह्याद्रीची आंगिक प्रवृत्ति. पारतंत्र्य त्याला सहनच होत नाहीं. पारतंत्र्याचें जोखड त्यानें फार काळ गळ्यांत वागवलें नाहीं. एक उदाहरण मोठें लक्षणीय आहे. शहेनशाह औरंगजेब मराठी राज्य बुडविण्यासाठीं खासा जातीनें दक्षिणेंत उतरला. बरोबर लक्षावधि सैन्य. तेंहि चतुरंग. हत्ती, उंट, घोडे, पायदळ—कोणता एक प्रकार औरंगजेबाच्या सैन्यांत नव्हता असें नाहीं. तोफाहि त्याच्या-जवळ मातबरच. पृथ्वी लुटून आणलेला पैका. अशी गजान्तलक्ष्मी त्याच्या मागोमाग बिचारी खुरडत, हातपाय कांट्यांकुट्यांमुळें ओरबाडत अशी केविलवाणी होऊन चाललेली. इराणी तुराणी असे अबलख छातीचे सेनापति. कोणतीहि एक गोष्ट उणी नाहीं.

पण महाराष्ट्र जिंकला गेला काय ?

नाहीं. त्रिवार नाहीं !

औरंगजेबानें धापा टाकीत, श्रमत, उसासे सोडीत जेमतेम एखादा किल्ला हस्तगत करावा अन् कसेंबसें पुढें चालूं लागावें. पुढल्या मुक्कामावर तंबूच्या खिळा ठोकल्या जात आहेत, तों मागून हायतोबा करीत खबर यावी, ‘ किल्ला काफरांनीं परत घेतला ! ’

औरंगजेबानें पगडी भुईवर आपटावी. दाढींत बोटें फिरवावींत. आकाशाकडे पाहून म्हणावें, ‘ या खुदा ! ’

शेवटीं बिचारा या मातींत धुळीला मिळाला. उत्तरेंत जाऊंच पावला नाहीं. तोबा तोबा करीत, मराठ्यांचें राज्य जिंकण्याच्या आपल्या स्वप्नांच्या

चिरफळ्या खुळ्यासारख्या चहूं दिशांना उधळीत तो इथें—या महाराष्ट्र-मंडळीं पंचत्व पावला !

त्याला बिचाऱ्याला महाराष्ट्राची नस कळलीच नाहीं. इतकीं वर्षें इथें राहून कळली नाहीं. सगळें तर कळत होतें. कुणाशीं कपट करावें कसें, कुणावर अपघाती मारेकरी घालावेत कसे, पोटच्चीं पोरें दूर राखावींत कशीं, भाऊ जीवें मारावेत कसे, बापाला चार भिंतींत जखडून टाकावें कसें, फकिरीचें ढोंग आणावें कसें—अवघें अवघें कळत होतें. एवढा बुद्धिमान, कुटिल, अपरचाणक्य असा शहेनशहा, पण त्याला केवळ महाराष्ट्राचीच नस काय ती कळली नाहीं !

हें तर सोपें होतें. कुण्याही किल्ल्यासमोर नतमस्तक होऊन तो उभा राहता अन् त्या किल्ल्याला नम्रपणें विचारता कीं, ' बा, दुर्गराजा, मराठ्यांच्या या स्वातंत्र्यप्रियतेचें रहस्य कशांत आहे ? "

त्याला उत्तर मिळालें असतें. सह्याद्रीवरून भराट वहात्या वाऱ्याकडून. उन्मुक्तपणें गात, आकाशाची पोकळी मोजीत हिंडणाऱ्या पांखराकडून. स्वच्छंदानें खळखळणाऱ्या झऱ्याकडून. लख्ख लख्ख तळपत्या उन्हाकडून. उघडी तरवार उशाशीं ठेवून सावधपणें झोंपणाऱ्या कुणाहि लंगोटी बहाद्दर महाराष्ट्रिकाकडून. किल्ल्याला बोलावें लागलेंच नसतें. तो केवळ इवलेंसें हसता अन् या सगळ्यांकडे खुणावता.

अर्थ असा कीं, सह्याद्रीनें महाराष्ट्रिकांना जगावें कसें तें शिकविलें आणि मरावें कसें, तेंहि शिकविलें. एकदां बघावें त्याच्या उत्तुंग शिखरांकडे. अशीं शिखरें, कीं जीं एकेकटींच आकाशाशीं झट्या घेत आहेत. वारे वाहतात. वादळें कोसळतात. धांवधांवून मेघांचे समुदाय चालून येतात. विजा कडकडतात. आकाशांतून निखळून पाताळावेरीं शिरतात. तरी हे कडे जसेच्या तसे—अभंग-अडग. या कड्यांनींच महाराष्ट्रिकांस स्वातंत्र्याचे पाठ दिले. म्हणून औरंगजेबाला जर महाराष्ट्राच्या गळ्यांत पारतंत्र्याचें जोखड जखडवायचेंच होतें तर त्यानें एक करावयास हवें होतें. हे सारे उत्तुंग कडे, हीं सारीं गगनभेदी शिखरें मातीला मिळवायचीं. भुईसपाट करून टाकायचीं. पण एवढेंच औरंगजेबाच्या लक्षांत आलें नाहीं. तो बिचारा मूर्तींच फोडीत बसला !

रहिमतपुरीं कुण्या एका यवनसेनापतीची कबर आहे. तीवर एक अरबी शिलालेख आहे. त्या शिलालेखांत मोठ्या गौरवानें असा दंभ गायिला आहे कीं, 'या इथें तो झोंपला आहे, ज्यानें अनेक मूर्ति धुळींत मिळविल्या !'

खुळा बिचारा. त्याला 'सर्वं विष्णुमयं जगत्' हें एक बारकेंसें तत्त्व माहीतच नव्हतें. लहानशी मूर्ति फोडून त्यानें काय मिळविलें? हे जे स्वातंत्र्यदेवतेचे प्रासाद चहूंदिशांना इथून तिथपर्यंत उत्तुंग कड्यांच्या आणि पर्वतशिखरांच्या रूपानें उभे आहेत, हे तर त्यानें पाडलेच नाहींत !

तर सह्याद्रीनें जें शिकविलें तें महाराष्ट्रिकांनीं उरींशिरीं बाळगलें. मग त्यांनीं सह्याद्रीचे हे दुर्गम कडे आणि शिखरें दगडी बुलंद तट उभारून अधिकच दुर्गम करून टाकलीं, आणि या पाषाणशिल्पांना नांव मिळालें, दुर्ग !

दुर्ग म्हणजे चढायला कठिण. आंत शिरायला कठिण. जिंकायला कठिण. म्हणून त्याला दुर्ग म्हणायचें. किल्ला हें त्याचें अगदीं अलिकडलें नांव. या शब्दांतील 'ल'ला जें द्वित्व दिलें, तें आम्हीं रांगड्या मराठ्यांनीं. मूळचा अरबी शब्द 'किला' असा आहे. आम्ही धसमुसळेपणानें 'बाले-किल्ला' असा शब्द वापरतों. वस्तुतः तो शब्द आहे, 'बाला-इ-किला.' असेना का ! आम्हीं त्याला सध्यां अगदीं मराठी बनवून टाकलें आहे.

असे हे किल्ले सह्याद्रींत विपुल. कुण्याही पर्वतशिखरावर जाऊन उभें रहावें आणि सभोंवार न्याहाळावा, तर दोनचार किल्ले तर दिसतातच. केवळ गिरिदुर्गच नव्हेत. जों जों पार्वत प्रदेश सोडून सपाटीवर येऊं लागावें, तों तों गांवांभोंवतीं बांधलेलीं कुसवें, तट, बुरूज यांचे अवशेष दिसूं लागतात. अर्थ असा, कीं शिवकालीं महाराष्ट्रांतील प्रत्येक शिखर एक किल्ला होता. प्रत्येक खेडें एक गढी होती आणि प्रत्येक हत्यारबंद पुरुष एक बुरूज होता.

सपाटीवरील गढ्यांना म्हणावयाचे स्थलदुर्ग. छत्रपतींनीं पाण्यांतहि किल्ले बांधले. कांहीं पूर्वींचेहि होते. संपूर्ण किल्लाच पाण्यानें वेढलेला. कुठें भरतीच्या वेळीं पाण्याचा वेढा पडत असलेला. कुठें एका बाजूनें सरळ जमिनीवरून प्रवेश. तर बाकी तीन दिशांकडून किल्ल्याच्या तटांना जलस्पर्श होत असलेला. यांना म्हणायचें जलदुर्ग.

प्रत्येक प्रकाराचीं कांहीं उदाहरणें देऊन मग त्या त्या किल्ल्याच्या

बांधणीकडे वळावें हें बरें. सिंहगड, राजगड, पुरंदर, प्रचंडगड, रायगड, गाविलगड, देवगिरि हे गिरिदुर्ग. चाकण, अमरावती, अचलपूर, अकोला, अहमदनगर, सोलापूर, इंदुरी हे कांहीं स्थलदुर्ग. वसई, मांहीम, तारापूर, अलिबाग, मुरूडजंजिरा, गोपाळगड, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग हे जलदुर्ग.

पैकीं गिरिदुर्ग महाराष्ट्रांत फार मोठ्या प्रमाणांत. नुसतें प्रमाणच नव्हे, तर ते ज्या शिखरांवर बांधले तीं बेलाग शिखरें, त्या किल्ल्यांचे तट, बुरूज, दरवाजे, जंग्या, माच्या, बालेकिल्ले, दारूचीं कोठारें, अंबरखाने, घोड्यांच्या पागा इत्यादि सगळाच मसाला अपूर्व. पाहिलें कीं छाती फाटते. असें वाटतें कीं, या पांखरांनाही भोंवळ यावी, अशा उंचीवर हे एवढाले बुलंद दगड यांनीं घडवले कसे ? वर चढवले कसे ? नीट दोरींत रचले कसे ? हजार हजार वर्षें व्हायला आलीं अजून हे आपआपल्या जागीं स्थिर राहिले कसे ? यांतला एकही कळपा निखळला नाहीं कसा ?

कांहीं किल्ल्यांच्या जागा अशा नामांकित आहेत, कीं आश्चर्यानें तोंडांत बोटच जावें. औरंगजेब जेव्हां सिंहगडावर उभा राहिला तेव्हां तो पर्वत, त्याची उंची, भोंवतालच्या प्रदेशावर अधिसत्ता गाजवूं शकेल असें त्याचें अद्वितीय स्थान हें सगळें पाहून तो अरसिकांचा शिरोमणीही आश्चर्यानें थक्क झाला. कौतुकानें तो म्हणाला, ‘ जागा तर बुलंद आहे ! ’

मग त्यानें सिंहगडाचें नांव मोठ्या कौतुकानें बक्षीं-दा-बक्ष ’ असें ठेवलें.

तीच गत रायगडाची. पहिला इंग्रज छत्रपतींना भेटण्याच्या मिषानें रायगडांत शिरला, त्या वेळीं त्याचे डोळे अक्षरशः गरगरूं लागले. मुंबईस परतुन त्यानें आपल्या साथीदारांना लिहिलें कीं, ‘ रायगड हा हिंदुस्थानांतला जिब्राल्टर आहे ! ’

स्वतः छत्रपतींनीं रायगडविषयीं म्हटलें होतें कीं, ‘ चखोट जागा. तीन गांव उंच. कड्यांवर कुठें पांखरूं उतरायलासुद्धां जागा नाहीं, असा बेलाग कडा. एकांड्या डोंगर. तेव्हां ही जागा तख्तास बहुत उत्तम. ’

असाच एक बेलाग किल्ला म्हणजे तुंगी. थेट पायथ्याशीं जाईपर्यंत माणूस घामानें वाहूं लागतो. किल्ल्यावर चढायची वाट कुठें आहे तें

कळतच नाहीं. अन् ज्या क्षणीं माणूस ऐन किल्ल्याच्या पायथ्याशीं पोहोंचतो, त्या क्षणा हजार फूट उंचीचा छातीवर चालून येणारा कडा त्याच्यासमोर उभा ठाकतो. वाट अतिदुर्गम. अति सुक्षम. चढतां चढतां तंगड्यांचे टाके ढिले होतात. माणूस बसणीवर येऊं लागतें. पोटांतलें अन्न संपतें पण वेडींवांकडीं वळणें संपत नाहींत.

हीच गत राजगडाची. प्रचंडगडाची. डोणजाकडून चढतांना सिंहगडाची. मासल्यादाखल एवढीं उदाहरणें पुरीं झालीं. विशेषतः राजगड आणि प्रचंडगड या दोन किल्ल्यांकडे पाहिलें म्हणजे मन दुहेरी कौतुकानें भरून येतें. एक कौतुक असतें ईश्वराच्या रचनाकौशल्याविषयींचें. आणि दुसरें महाराष्ट्रिकांच्या निधड्या छातीविषयींचें. अशीं हीं दुर्गम ठिकाणें महाराष्ट्रिकांनीं प्रचंड तट बांधून अति दुर्गम करून टाकलीं! धन्य धन्य त्यांची!

स्थळाच्या दुर्गमत्वाचें हें प्रकरण संपवतांना पुरंदरचा उल्लेख केलाच पाहिजे. अगोदर त्याचें नांवच पुरंदर. पुरंदर म्हणजे आकाशांतले मेघांचे वाडे फोडणारा. पुरंदरच्या पाठीशीं पाठ भिडवून बसला आहे आणिक एक किल्ला. त्याचेंही नांव असें रौद्र–'रुद्रगड'. पुरंदर तर गगनभेदी शिखरांची एक माळच आहे. केदारेश्वराच्या मंदिराजवळ बसावें तर उन्हाळ्यांत देखील दांतांचें तारयंत्र सुरू होतें. किंबहुना महाराष्ट्रांतील सर्व किल्ल्यांत पुरंदर हा बहुत उंच, जवळ जवळ पावणेपांच हजार फूट!

### किल्ल्यांचे प्रवेशमार्ग—

आतां बोलायला हवें किल्ल्यांच्या मार्गाविषयीं. किल्ल्याला जायला फार वाटा असूं नयेत खऱ्या, पण केवळ एकचही असूं नये. आज्ञापत्रांत म्हटलें आहे,

"किल्ल्यास एक दरवाजा थोर अयब (दोष) आहे. याकरितां गड पाहून एक, दोन, तीन दरवाजे तशाच चोरदिंड्या करून ठेवाव्यात. त्यामध्यें हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या."

तेव्हां मग ज्या रायगडसारख्या बेलाग किल्ल्याला एका वाटेपलीकडे दुसरी वाट नव्हती, त्याला एक चोर दरवाजा ठेवला. अमात्यांची आज्ञा

पाळूनच बहुधा तो चिणून टाकला. म्हणजे पाहिजे तेव्हां मोकळा करतां यावा. अगोदर थोरला दरवाजाच कडेकोट बांधणीचा. पण तो जर का फुटला, तर चोर दरवाजा उघडून भराभर दोर लावून माणसें उतरवतां यावींत, हा त्याचा उद्देश. अशा चोरवाटा तर अनेक किल्ल्यांवर आहेत. त्यांतली एक आहे वैराटगडावर. एक आहे समुद्राकडून कोरलईच्या किल्ल्याला.

हें शहाणपण बेलाग किल्ल्यांचे पराभव पाहून मग सुचलें असावें. पूर्वींची कल्पना अशी, कीं किल्ल्याला एकच वाट आणि तीही अति दुर्गम ठेवली कीं पुरता बंदोबस्त झाला. उदाहरण होतें देवगिरीचें.

देवगिरीचा किल्ला हा भारतवर्षांत अद्वितीय. कडा मूळ चहूं बाजूंनीं तासूनच काढलेला. थोडें अतिशयोक्तीनें बोलायचें म्हटलें तर कड्यावरून अत्तराचा थेंब सोडावा, अन् तो कड्याच्या पायथ्याशीं येऊन जसाच्या तसा झेलावा, असा उभा कडा सरळ छिन्नी लावून खोदलेला. भंवतालीं प्रचंड खंदक. आंत जायला द्वार एकच. त्याही मार्गांत अनंत अडचणी. खंदकावरल्या वाटेंत एक प्रचंड तवा बिजागऱ्या लावून उभा केलेला. शत्रु झुंजत तिथपर्यंत आला, तर तो बंद करायचा अन् मागें पेटवायची आग. तापून लालभडक झालेला हा लोखंडी दरवाजा ओलांडून अलिकडे येईल, अशी शामत क्वचितच कुणाच्या अंगीं. पुढें मग एक भुलभुलैया पसरलेली. सरळ दिसणारी वाट एका कडेलोटापर्यंत नेऊन पोहोंचणारी. त्यांतून जगून-वांचून मनुष्य पुढें आलाच, तर अरुंद चिंचोळे मार्ग. दों बाजूंनीं तट. त्यांच्यावर असलेल्या जंग्या. त्यांमधून अक्षरशः आग ओकत असलेली असायची.

तेव्हां एवढ्या भरंवशावर तसें पाहिलें तर माणसानें सुरक्षितता मानायला हरकत नाहीं. पण अल्लाउद्दीन खिलजीचे तांबारल्या डोळ्यांचे उग्र, क्रूर घोडेस्वार जेव्हां पाण्याच्या पखाली घेऊन या लोखंडी दरवाजापर्यंत पोहोंचले, तेव्हां अगतिक होऊन रामदेवरायाला दांतीं तृण धरून शरण यावें लागलें !

तोच जर एखादा चोरदरवाजा असता, तर रामदेवराय सुटून बाहेर जाता, आणि मग त्यानें बाहेरून झुंज दिली असती—जसे छत्रपति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ....................... वि: ...................



पन्हाळ्यावरून त्याला [illegible] पडला असतां उतरून [illegible] पावले !

तेव्हां मग शहाण्यांनीं असा नियम केला कीं, किल्ल्याला केवळ एकच दरवाजा असूं नये. एक दरवाजा म्हणजे एकाच दिशेला असलेला दरवाजा. रामचन्द्रपन्तांचा हेतु हा कीं, किल्ल्याच्या निरनिराळ्या दिशांनाच मुळीं दोन किंवा तीन दरवाजे असावेत.

पैकीं जो मुख्य दरवाजा त्याचे उपदरवाजे एकावर एक, दोन, तीन, चार असले तर बहुत उत्तम. रामचन्द्रपन्तांनीं म्हटलें आहे.

" दरवाजे बांधावे, ते खालील मारा चुकवून, पुढें बुरूज देऊन, येती-जाती मार्ग बुरुजाचे आहारीं पडोन दरवाजे बांधावे. "

या दृष्टीनें मुख्य दरवाजा एकच असूनसुद्धा अजोड बांधणी रायगडची. रायगड हा प्राचीन दुर्ग. किती प्राचीन त्याचा नेमका मागोवा घेतां येत नाहीं. पण अनुमान असें कीं, तो दीड-दोन हजार वर्षांपूर्वींचा निश्चितच असावा. छत्रपतींनीं तो सिद्दीकडून बळकावला. आणि मग जागा त्यांच्या बहुत मनासि येऊन त्यांनीं रायगडावर अक्षरशः सहस्रावधि रुपये ओतले.

आज दरवाजाच्या फळ्या शिल्लक नाहींत. कांहीं वर्षांपूर्वींपर्यंत होत्या. रायगडच्या दरवाजाला दरवाजा म्हणणें हेंही त्याचा अपमान करण्यासारखेंच आहे. वस्तुतः तें आहे महाद्वार. अक्षरशः महाद्वार. दोन्ही अंगांना दोन प्रचंड बुरूज. मोठ्या नितळ सुबक बांधणीचे. निमुळते होत वरपर्यंत पोहोंचलेले. त्या बुरुजांच्यामधें किंचित् मागल्या अंगाला आहे या महाद्वाराची चौकट. काळ्याकुळकुळीत पाषाणाची. वर पाषाणांत खोदलेलीं भारतीय शुभचिन्हें. भला प्रचंड उंबरठा. उंबरठ्याच्या आंत पाऊल घातलें कीं दोन्ही बाजूंना वरखालीं फळ्यांचे कोने अडकवण्यासाठीं तयार केलेलीं दगडी चक्रें दिसतात. या चक्रांमधें दरवाज्यांच्या फळ्या अडकवयाच्या. या फळ्या सुमारें पांच ते सहा इंच जाडीच्या. त्यांना आंतल्या बाजूनें बाहेर हात हात निघून येतील, असे टोंकदार खिळे ठोकलेले. खिळे म्हणजे खिळे नव्हतच ते. त्यांना सुळेच म्हणावें. हे असे अवजड दरवाजे उघडायला आणि बंद करायलाही चार-चार, सहा-सहा माणसें लागावयाचीं. उजव्या फळीला सामान्यपणें खालच्या बाजूला आणिक एक बारकें दार. तें आंतल्या बाजूला उघडायचें. त्याला म्हणायचें दिंडीदरवाजा. असें हें सगळें चळित्र बंद झालें

म्हणजे त्याच्यामागें मधोमध आडवा एक प्रचंड अडसर सरकवून द्यायचा. त्या अडसरासाठीं मागल्या भिंतींत एका बाजूला भली लांब पोकळी असायची.

रायगडच्या या महाद्वारांतून आंत प्रवेश मिळाला कीं, समोर काय दिसतें ?

कांहीं नाहीं. एक आडवी प्रचंड भिंत ! आणि ही भिंत संपते तिथें थोडें अंतर सोडून आहे एक प्रचंड बुरूज. म्हणजे या भिंतीला वळसा घालून आंत शिरायची कांहीं सोय नाहीं. या बुरुजावरल्या भडिमारामुळें शरीराची चाळण व्हायची, आणि खालीं रक्ताचीं थारोळीं सांठायचीं. कसेंबसें भिंतीला वळसा घालून पलीकडे निघावें, तों आणिक एक भिंत ! या जातीचें दुसरें एक सर्वोत्तम उदाहरण आहे लोहगडाचें. तिथें बांधणाराच्या बुद्धिमत्तेचें कौतुक स्पष्टपणें लक्षांत येतें. शेवटचा दरवाजा चढून वर गेल्यावर तिथून पहावें, तर एक अद्भुत आगळी बांधणी दिठीसमोर पसरलेली दिसते. सर्पाची जशी चाल धुळीवर उमटते, तसा तो आडवा-तिडवा मार्ग बांधून काढला आहे. एका दरवाजाच्या नेमका समोर खालच्या अंगाला दुसरा दरवाजा आहे. त्याच्या खालीं बुरुजांनीं वेढलेला आणि जंग्यांच्या माऱ्यांत असलेला असा तिसरा दरवाजा आहे. किंबहुना लोहगडचे दरवाजे म्हणजे भुलभुलैयाच.

आणिक एका दरवाजाचा उल्लेख इथेंच करायला हवा. वस्तुतः तो दरवाजा नव्हेच. ती आहे नवख्या सैनिकांना फसविणारी आणि मृत्यूच्या गर्तेकडे नेणारी एक वाट. चाकणच्या किल्ल्याच्या पूर्वेकडल्या दरवाजावर जाऊन उभें रहावें. तळाशीं आहे प्रवेशद्वार. त्या वाटेनें नवखा माणूस आंत शिरतो. त्याची धारणा अशी कीं, आतां आपला किल्ल्यांत प्रवेश होत आहे ! पण प्रवेश होतच नाहीं. वांकडींतिकडीं वळणें घेत तो बिचारा येऊन पोहोंचतो एका आडव्या प्रचंड भिंतीसमोर अन् तिथें तो सांपडतो वरील जंग्यांच्या माऱ्यांत ! विशेषतः त्या ठिकाणीं मारा साधून वर असंख्य जंग्या एकवटल्या आहेत.

सिंहगडाचाही पुणें दरवाजा आणि त्याचे उपदरवाजे असेच एकावर एक आहेत. एकाच्या माऱ्यांत दुसरा. त्याच्या माऱ्यांत तिसरा. प्राचीन युद्धशास्त्राच्या अभ्यासकाला हे दरवाजे पाहिलेच पाहिजेत. एरवीं युद्धशास्त्रांतलें हें एक कसब त्यांच्या नजरेंतून हुकलें, असें म्हणावें लागेल.

१७८२२८

तट—

तटांच्या रचनेच्या पद्धति सामान्यपणें दोन. एक, जशी विटेवर वीट रचतात, तसें नितळ घडीव दगडावर दगड रचीत जायचें. पण सुरक्षितपणाच्या बाबतींत ही बांधणी अमळ धोक्याचीच. दुसरा प्रकार असा कीं, दगडांच्या तिरकस आणि एकमेकांत गुंतवलेल्या आकृति अगोदरच घडवून घ्यायच्या. म्हणजे त्यांची रचना झाल्यावर एक विषम अनगड बांधणी सहजच तयार व्हायची. अर्थात् दगड मापाबरहुकूम घडविले गेले असल्यामुळें दिसायला विजोड दिसली तरी या बांधणींत दोष राहायचा नाहीं.

किल्ल्याभोंवतीं सर्वत्र तट बांधण्याची आवश्यकता नसे. जो भाग सरळ उभ्या असलेल्या कड्यामुळें वर चढून यायला दुष्कर, त्या भागीं सामान्यपणें तट बांधला जात नसे. कधीं कधीं अशा या दोन कड्यांचा मधला भागच तेवढा तट बांधून सुरक्षित करून घेतला कीं, काम भागलें. तुंगी गडाला तटाची आवश्यकता अगदींच कमी. कारण चहूंबाजूंनीं हजारभर फूट उंचीचा निखळ कडाच. माणूस काय, पण वानरसुद्धां चढायला वाव नाहीं. तेव्हां मग दरवाजा आणि त्याच्याभोंवतालीं बुरूज बांधून वर चढायची तेवढी वाट पक्की केली कीं काम भागलें.

महाराष्ट्राच्या कांहीं किल्ल्यांतील तटांची बांधणी चिलखती पद्धतीची. विशेषतः छत्रपतींनीं जो मुद्दाम बांधवून घेतला, त्या रायगडाच्या तटाची बांधणी या जातीची. चिलखती बांधणी म्हणजे एकाच्या आंत एक, असे दुहेरी तट असायचे. सगळीकडेच नव्हे, पण जिथें जागा कमजोर आहे, विशेषतः तिथें हें असें चिलखती तटबंदीचें काम व्हायचें. दोन्ही चिलखती तटांमधलें अंतर सोयीप्रमाणें कमीजास्त व्हावयाचें.

कुठें कुठें चिलखती बांधणीचे बुरूजहि आढळावेत. बाहेर एक बुरूज अन् त्याच्या आंत त्याहून उंच असा दुसरा बुरूज. या दोन्ही बुरुजांच्या घेऱ्यावरून पहारेकऱ्यांना हिंडण्याएवढी जागा शिल्लक असायची.

तटांची रुंदीही आवश्यकतेप्रमाणें कमीअधिक व्हायची. पण सामान्यपणें अडीच-तीन हातांहून कमी रुंदी कुठल्याच तटाची नाहीं. म्हणजे तटावरून एक माणूस खुशाल पांची हत्यारें घेऊन फिरूं शकावें. पण कांहीं किल्ल्यांचे

तट मात्र वरून दोन-दोन गाड्या सहज हिंडूं शकतील एवढे रुंद. उदाहरणार्थ वसईचे तट. विशेषत: ज्या तटांना शत्रूच्या तोफांच्या भडिमाराचें भय अधिक, ते तट अधिक रुंद. वसई हा जलदुर्ग. एका बाजूनें जमीन मोकळी. तेव्हां समुद्रावर किंवा जमिनीचे बाजूनें तोफा सहजगत्या अगदीं जवळ येऊं शकायच्या. म्हणून त्या तटाची बांधणी रुंद. मात्र गिरिदुर्गांच्या बाबतींत डोंगरावर तोफा चढविणें म्हणजे महा अवघड मामला. तेव्हां या तटांची जाडी तेवढी ठेवायची जरूरी नाहीं.

बुरूज—

बुरूज ही पहाऱ्याची जागा. सामान्यपणें बुरुजाच्या आंत पहारेकऱ्याला राहण्याची जागा असायची. बुरुजाचे उपयोग अनेक. पहिला, तटाच्या भिंतीची मजबुती. दुसरा, बुरूज म्हणजे पहारेकऱ्याचें ठाणें. तिसरा, बुरुजावर जागा पैस. त्यामुळें तोफा बहुधा बुरुजावर ठेवलेल्या असायच्या.

तोफा ठेवण्याचेंहि एक वेगळें तंत्र. तोफेकरितां ठेवलेली जंगी वरून मोकळी आणि तिचा विस्तारही अधिक मोठा म्हणजे वाटेल त्या दिशेला तोफ फिरवितां यायची. अशी ही तोफ अगदीं सहज फिरवतां यावी म्हणून तिच्या खालीं भरीव लांकडी चाकें असलेला एक गाडा असायचा.

आजहि मुरूडचा जांजिरा जाऊन पहावा. त्या किल्ल्याच्या तटांवर आणि बुरुजांवर असंख्य तोफा आजही मांडलेल्या आहेत. मोजतां मोजतां जिभेला घाम येतो. पैकीं कांहीं अतिशय प्रेक्षणीय. रायगड, सिंहगड, गाविलगड, लोहगड, पन्हाळा, प्रतापगड अशा अनेक किल्ल्यांच्या बुरुजांवर आजही तोफा आढळतात. मात्र कांहीं ठिकाणच्या तोफा अक्षरश: तटांवरून खालीं लोटून दिल्या आहेत !

जंगी म्हणजे तटांतून खालीं बंदुकीचा मारा करण्यासाठीं ठेवलेलें छिद्र. हें नेहमींच खालच्या अंगाला तिरकें असायचें. कधीं तटाच्या अलिकडून तीन भोकें तटाच्या पलिकडे एकवटलेलीं. हेतु हा कीं, तिन्ही बंदुकांचा मारा एक्या जागीं व्हावा. याविरुद्ध, आंतल्या बाजूला एकच छिद्र असून बाहेरच्या अंगास त्याचीं टोकें तीन माऱ्यांच्या जागांकडे वळलेलींही

असावयाचीं. म्हणजे आंतून एकाच माणसाला या तिन्ही जागीं मारा करतां यावा.

जंग्यांचें हें तिरकेपण वेगवेगळ्या प्रमाणांत असावयाचें. जिथें शत्रु ऐन तटाशीं पोंचण्याचा संभव तिथें जंगी अधिक तिरकी. मात्र जितकी जंगी अधिक तिरकी, तितका तिच्या माऱ्याचा पल्लाही कमी.

माची—

माची हा गडाच्या बांधणींतील एक अत्यंत महत्त्वाचा भाग. किंबहुना ज्या गडाचा सपाट विस्तार अधिक, त्या गडावर माच्याही अधिक आणि त्याची सुरक्षिताही त्याच प्रमाणांत वाढती.

माची म्हणजे किल्ल्यावरली, तटांनीं सुरक्षित असलेली जागा. राज्य-व्यवहार-कोशांत माची शब्दाचा अर्थ, 'अधित्यका तु माची स्यात्' असा दिलेला. माचीवर बहुधा शिबंदी राहावयाची आणि ती गडाच्या त्या त्या भागाचें संरक्षण करीत असायची.

राजगडावर तीन माच्या—संजीवनी माची, पद्मावती माची आणि सुवेळा माची. या माच्यांमुळें राजगडाच्या तिन्ही टोकांस मजबुती आली. प्रचंडगडावरील बुधला माची तिथें असलेल्या तानाजी सुभेदाराच्या घरामुळें प्रसिद्ध.

टांकीं—

माच्यांवर बहुधा असावयाचीं पाण्याचीं टांकीं. खडकांत खोदलेलीं. पांच-सहा हात लांब. दोन-चार हात रुंद आणि आठ-दहा हात खोल. अशीं हीं टांकीं गडाच्या चहूं अंगाना पसरलेलीं असायचीं. बहुधा सगळीं डोंगराच्या पोटांत असायचीं. त्याच्या गर्भगोळांत लपलेलीं. एखादें अधिक मोठें असेल तर तें मात्र उघडें असायचें. क्वचित् ठिकाणीं हीं टांकीं एकाशेजारीं एक असून आंतल्या बाजूनें एकमेकांस जोडलेलींही असायचीं. कांहीं टांकीं कड्याच्या ऐन पोटाशीं तटाजवळही असायचीं.

पावसाळ्यांत खडकांमधून पाण्याचे झिरपे वहायचे. त्यांनीं हीं टांकीं तुडुंब भरायचीं. स्वच्छ कांचेसारखें आणि मधुर पाणी. मात्र केवळ हें

पिण्याच्याच कामाचें. कांहीं किल्ल्यांवरचें पाणी आजतागाईत फार फार प्रसिद्ध. उदाहरणार्थ सिंहगडचे देवटाकें—तें पाणी तर असें रुचिकर, असें औषधी, असें शीतल आणि अमृततुल्य कीं कांहीं पुसूं नये. वाटेल तेव्हां प्यावें. अनशापोटीं, दुपारीं, रात्रीं. अन् वाटेल तेवढें. त्या अमृततुल्य पाण्यानें बाधिकार कसलाही व्हायचा नाहीं. तसेंच प्रसिद्ध पाणी रायगडावरचें. लोहगडावरचें पाणीही फार रुचकर.

रायगडावर तर छत्रपतींनीं एक प्रचंड तलावच बांधवला. इथें प्रचंड शब्द गडाच्या संदर्भात घ्यावयाचा. गडाच्या मानानें प्रचंड. नांव त्याचें गंगासागर. छत्रपतींना राज्याभिषेक झाला, त्या वेळीं सप्तमहासरितांचें पाणी रायगडावर आणवलें गेलें होतें. तें पाणी या गंगासागरांत टाकलें. असा गंगासागर हीं पवित्र जळें प्याला.

आख्या अशी कीं, इंग्रजांनीं गड घेतल्यावर तळें उपसून आंतली संपत्ति बुचाडावी या हेतूनें तळें उपसण्यासाठीं मशीनचे पंप लावले. मशीनें थकून बंद पडलीं. पण तळ्याचें पाणी आटलें नाहीं !

प्रत्येक किल्ल्यावर मराठ्यांनीं आवर्जून तळीं बांधून काढलीं. कुठेंही कुणी झऱ्याच्या भरंवशावर बसलें नाहीं. किल्ल्यावर झरा आहे, तेव्हां टांकीं बांधायची जरूरी काय ?—असा विश्वास कुणीं मानला नाहीं. कारण तोफांच्या गडगडाटांनीं वेळीं झरे आटून जायचा संभव.

आज्ञापत्रांत रामचन्द्रपंतांनीं केलेल्या सूचना बहुमोलच म्हणाव्यात—

“ गडावर आधीं उदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाहीं आणि तें स्थळ तों आवश्यक बांधणें प्राप्त झालें, तरी आधीं खडक फोडून तळीं, टांकीं पर्जन्यकाळपर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशीं मजबूत बांधावीं. गडावरी झराही आहे, जसें तसें पाणीही पुरतें, म्हणून तितकीयावरीच निश्चिंती न मानावी. उद्योग करावा. किं निमित्य कीं, झुंजामध्यें भांडियांचे आवाजाखालीं झरे स्वल्प होतात आणि पाणीयाचा खर्च विशेष लागतो, तेव्हां संकट पडतें. याकरितां तसे जागीं जखिरीयाचें ( सांठवणीचें ) पाणी म्हणून दोन-चार टांकीं तळीं बांधावीं. त्यांतील पाणी खर्च होऊं न द्यावें. गडाचें पाणी बहुत जतन राखावें.”

## बालेकिल्ला—

बालेकिल्ला म्हणजे गडांतली जास्त सुरक्षित जागा. गड ज्या शिखरावर आहे, त्यांतल्या अधिक उंच जागीं बहुधा हा असावयाचा. तशीच गरज असली तर तटांनीं सुरक्षित करायचा. अगदींच क्वचित् एकाऐवजीं दोन बालेकिल्लेहि असायचे. राजमाची किल्ल्यावर असें झालें आहे या किल्ल्याला दोन उभे सुळके. दोन्ही स्वतंत्र. आवळ्याजावळ्या भावांसारखे. तेव्हां मग हे दोन्ही सुळके मधें घेऊन भंवतालीं जरूर होती तिथें तट घातला. माच्या केल्या. अन् मग या दोन्ही बालेकिल्ल्यांची तटांनीं बंदिस्ती केली.

पण सगळ्यांत मजबूत आणि दुर्गम बालेकिल्ला राजगडावरला. तिथें तर या बालेकिल्ल्यावर चढायचें म्हणजे कसरतच करावी लागते. चहूंबाजूंनीं सलग असा काळाकभिन्न कडा आहे. वाट आहे ती या कड्यांतच खोदलेली. वाट म्हणजेही पायऱ्या नव्हेत. केवळ खोबणी. एका खोबणींत हात देऊन शरीर वर उचलावें, तिथें पाय ठेवावा, अन् मग तो हात काढून वरच्या खोबणीला घालावा! हा असा अवघड चढ चढून गड बांधणारांनीं बाले-किल्ल्यावरच्या इमारती कशा बांधल्या, हें एक काळ्या आईलाच ठावें!

बालेकिल्ल्यावर बहुधा किल्लेदार, हवालदार असे खासे राहायचे. आवश्यकता असेल त्याप्रमाणें एखादें राजमंदिरही असायचें. मात्र राजे मुक्कामाला नसले, म्हणजे तें रिकामें पाडून ठेवायचें नाहीं. रामचन्द्रपन्तांनीं सांगितलें कीं,

"गडकरी यांनीं राजमंदिर म्हणून खाली न ठेवावें. सर्वकाळ वस्ती करून धुरे करून घर शाबूत राही, जीवजंतु न राही, तें करावें. धनी गडावरी येतात असें कळतांच अगोदर दोनचार दिवस मामलेदारानें येऊन खासा उभा राहून, संपूर्ण घर सारवून, रांगोळी आदिकरून घालून धनी गडावरी येईजेपर्यंत त्याच जागा सदर करून बसत जावें."

## पेठा—

गडाची बाजारपेठ बहुधा खालीं असायची. तिला पेठ हें नांवच. वाणी उदमी यांनीं नाना प्रकारचा माल खालीं बाजारांत आणायचा. पैकीं

पावसाळ्याला लागेल इतकें तेल, तूप, मसाला, मीठ, धान्य, कापडचोपड गडावर सांठवून ठेवायचें. अनेक किल्ल्यांवर तेलातुपांचे रांजण आजही आढळायचे. उदाहरणार्थ, पुरंदर किल्ल्यावर. केवळ रांजणच नव्हेत तर काचेच्या बरण्या, प्रचंड भाजीव रांजण, मोठमोठालीं मडकीं यांमधूनही तेलतूप सांठायचें. या सगळ्या भांड्यांभोंवतीं चुनगजी बैसका करायच्या.

गडावर नामांकित बाजार जर कुणीं उभारला असेल तर तो छत्रपति शिवरायांनीं! इतका प्रजाहितदक्ष राजा दुसरा झाला नाहीं! त्यांनीं रायगडांवरल्या सर्व वास्तूंत देखणी अशी भव्य बाजारपेठच उभारली. मधें भला रुंद रस्ता, दो बाजूंना अगदीं मापीव अशीं दुकानें. प्रत्येक दुकानास माल सांठवण्याकरितां मागें दोन खोल्या आणि खालीं तळघर. सारें कसें एका सुतांत. रेषाबद्ध. दुकानांची उंची इतकी कीं, घोड्यावर बसल्या बसल्या सहज माल खरेदी करतां यावा. प्रत्येक बाजूला बावीस-बावीस दुकानांचे दोन गाळे दोन्ही गाळ्यांच्या मधें रस्ता.

ज्या वेळीं राज्याभिषेक झाला त्या वेळचें या बाजाराचें वैभव दृष्ट लागण्याजोगें असे. केवळ वैभव नव्हे तर स्वच्छता देखील. छत्रपतींच्या शिस्तींत वाढलेले रामचन्द्रपन्त लिहितात कीं, बाजारांत केर अजिबात पडूं न द्यावा. तो लगोलग झाडून जाळून टाकावा. राख होईल ती गडाखालीं फेकायची नाहीं. घरोघरीं परसांत टाकायची—

"ती राखहि परसांत टाकून घरोघर होईल ते भाजीपाले करवावे."

केवढा हिशेबीपणा! केवढी शिस्त! केवढी दूरदृष्टि!

इथें छत्रपतींच्या स्वच्छताविषयक चोखंदळपणाचें एक उदाहरण द्यायलाच हवें. न देतां भागायचें नाहीं. रायगडावर राण्यांचे महाल आहेत. पैकीं प्रत्येक महालांत मागिल बाजूस ओळीनें दोन-दोन असे चार-चार शौचकूप! सारा मळ लांब खालीं काढून दिलेला. त्याचा उपसर्ग वर यत्किंचितही होतां उपयोगाचा नाहीं. एक मौजेची गोष्ट अशी कीं, कोट्यवधि रुपये वाहवून दिल्ली-आग्र्यास लाल किल्ले बांधिले. पण एकाही किल्ल्यांत शौचकूप नाहीं! भलीं संगमरवरीं शयनमंदिरें आणि स्नानागारें आहेत. पण एकालाही दरवाजा नाहीं! ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत पाहावें, तर राण्यांच्या महालांत उन्हाचा कवडसासुद्धां यायचा नाहीं. रात्रंदिवस

त्यांनीं दिव्यांच्या प्रकाशांत वावरायचें. अगदीं क्वचित् बाहेरची हवा खाण्याची इच्छा झालीच तर दगडी झरोके अशा खुबीनें आणून सोडलेले, कीं, आंत हवा तेवढी यावी. प्रकाश येऊं नये.

या आलिशान व्यवस्थेपेक्षां छत्रपतींची व्यवस्था सहस्रपट श्रेष्ठ. त्यांनीं राण्यांचे महाल असे बांधले कीं, एकीला उणें नाहीं, दुसरीला दुणें नाहीं. प्रत्येकीचा महाल सारखा. राण्यांच्या कुरबुरीचा मोडच त्यांनीं मोडून टाकला !

दारूचीं कोठारें—

दारूचीं कोठारें नेहमीं तटाच्या अगदीं एका अंगाला असायचीं. त्यांची बांधणी एका विवक्षित पद्धतीची. सबंध इमारतींत कुठें लाकडाचा इवला-देखील उपयोग व्हायचा नाहीं. या दारूच्या कोठारांत दारूनें भरलेलीं— बंदुकीच्या, पिण्याच्या नव्हे—मडकीं ठेवलेलीं. त्यांतच बंदुकीच्या गोळ्या, तोफांचे गोळे, बाण असें सांठवण करायचें. दारूचीं कोठारें वस्तीपासून दूर असायचा हेतु हा कीं, कधीं काळीं भडका झाला, तर वस्तीस उपद्रव न पोंचावा.

धान्यकोठ्या—

धान्याचीं कोठारें गडागडावर असायचीं. जे गड प्राचीन त्यांत मोठ-मोठाल्या गुहा खोदलेल्या असायच्या. त्या गुहांमधून धान्य सांठवून ठेवायचें. पावसाळ्यांत पाणी झरे, तें काढून देण्यासाठीं जागोजाग नाल्या ठेवलेल्या असायच्या. पैकीं एक भली प्रचंड धान्य सांठवायची गुहा सिंह-गडावर आहे. तशाच दोन लोहगडावरही.

अंधारकोठड्या—

महत्त्वाचे गड असतील तिथें अंधारकोठड्या असायच्या. अंधार-कोठड्या म्हणजे कैदी ठेवायची जागा. खोली वीस-पंचवीस हात खोल. केवळ वरून एक झरोका. एखादा मुजोर तापदायक स्वराज्य-शत्रु हातीं लागला, तर या अंधारकोठड्यांतून ठेवायचा. त्याला वरून खालीं दोरानें सोडून द्यायचें, अन् मग तसेंच अन्नपाणी वरून पुरवीत असायचें.

या जातीच्या तीन अंधारकोठड्या रायगडावर आहेत. सध्यां त्या मोडकळीस आल्या आहेत. पण हा कारावास कसा मन खचवणारा असेल, याची अंधुकशी कल्पना या कोठ्या निरखून आजही यावी.

## कडेलोट

शिक्षेच्या आणिक एका साधनाचा उल्लेख इथेंच करायला हवा. तें साधन म्हणजे कडेलोट. सगळ्यांत प्रेक्षणीय आणि डोळे फिरवणारा कडेलोट आहे रायगडावर. टकमक नांवाचें टोक. रायगडाची उंची एकूण समुद्र-सपाटीपासून अठ्ठावीसरों फूट. पैकीं टकमकाच्या अंगावर तळाशीं काय शेंपन्नास फूट उंचवटा असेल तेवढाच. बाकी मग सत्तावीसशें फूट कडा सलग तुटलेला आहे.

वरून सरळ खालीं बघायची सोय नाहीं. डोळे गरगरतात. भोंवळ येते. आडवें पडूनच पाहिलें तर खालचें दर्शन नजर चिरफाडून टाकतें. अठ्ठावीसशें फूट खालीं असलेलीं जनावरें, गुरें आणि माणसें मुंगीएवढालीं दिसतात. तशीं तळचीं गुरें तिळाएवढालीं अनेक पर्वतांवरून दिसतात. पण इथलें वैशिष्ट्य असें कीं, इथें तीं ऐन तळाशीं दिसतात. हा एवढा अठ्ठावीसशें फूट उंच आकाश चिरीत उंच गेलेला कडा पाठीशीं घेऊन तीं बिचारीं अगदीं निश्चित मनानें खालीं वावरत असतात. कधीं त्या खोऱ्यांत वारा भरतो. अन् मग तो तळापासून सरळ वर धांवतो. त्यांमधून घारी उडतात. वाऱ्याचा हा आवेग त्यांनाही सावरत नाहीं. मग त्या अचानक वर फेकल्या जातात. पतंगासारख्या.

आपण वर आडवें पडून पाहात असतों. डोळे गरगरत असतात. पण खालचें सगळें निचळ असतें. न ऐकूं ये खालचा शब्द, न जाणवे खालची धग. अशा या टकमक टोकावरून गुन्हेगाराचा कडेलोट करायचा. स्वराज्यांतली शेवटली शिक्षा. निकराची.

रायगडच्या कडेलोटसारखा भयावह, कल्पनेनेंच दांतखीळ बसवणारा कडेलोट साऱ्या महाराष्ट्रांत अन्यत्र दुसरीकडे कुठेंही नाहीं. मात्र दुसरा एक वैशिष्ट्यपूर्ण कडेलोट आहे ब्रह्मगिरीचा. तिथें आपण किल्ल्याच्या टोकाशीं येतों. मग लाकतो खडकाच्या गर्भांत खोदलेला एक जिना—चाळीस-

पन्नास पायऱ्यांचा. तो उतरून आपण खालीं येतो. तों लागते एक भिंत. भिंत म्हणजे बांधलेली नव्हे, अनगड. शेंदोनशें पावलें त्या भिंतीसारख्या कड्यावरून पावलें टाकीत पुढें गेलें, म्हणजे दुसऱ्या जिन्याचा तळ समोर येतो. या जिन्यानेंही खडकाच्या पोटांतून पुन्हा वर चढायचें कीं, कडेलोटाचा माथा येतो. इथल्या कडेलोटाला नांव आहे दुर्गभंडार.

परिसर—

किल्ल्याभोंवतीं मेटें असत. मेटें म्हणजे किल्ल्याखालचीं पहाऱ्याचीं ठिकाणें. किल्ल्याखालीं उतरलेल्या डोंगराच्या सोंडांवरून हीं मेटें असावयाचीं. मेटकरी बहुधा कोळी, ठाकर, महार असे असायचे. यांचा पहारा रात्रंदिवस जागता.

बहुधा प्रत्येक गिरिदुर्गाभंवतीं झाडी असायची. नसेल तिथें आवर्जून लावली जायची. राखली जायची. हेतु हा, कीं शत्रूचा वेढा पडला तर गडावरून हशम या झाडींत उतरवावेत आणि त्यांनीं वारंवार छापे घालून वेढेकऱ्यांना नको-नकोसें करावें. रामचन्द्रपन्तांनीं म्हटलें आहे कीं,

" गडाची राखण म्हणजे कलारग्याची ( गडाभोंवतालच्या बेचक्यांतली ) झाडी, ते झाडी प्रयत्नें वाढवावी. त्यामध्यें एक काठीही तोडों न द्यावी. बलकुबलीस त्या झाडीमध्यें हशम बंदुके घालावया कारणाजोगे असों द्यावें."

गडावरून एक अत्यंत महत्त्वाचें झुडूप यत्नपूर्वक सांभाळलें जायचें. निर्गुडीचें. निर्गुडीचें पान म्हणजे त्रिदळ. बेलाच्याऐवजीं शंकराला वहायला उपयोगीं पडणारें. कांटे नसलेली फांदोरी, निरुपद्रवी. गडावर निर्गुडाच्या झुडपांचा उपयोग हरघडीं व्हायचा. कुसवें घालायचीं असतील तर. इमारतींच्या लाकडासाठीं झाप उभे करायचे असतील तर. पावसाळ्याचें तोफांवर पांघरूण घालावयाचें असेल तर. गडावर वाहाणाऱ्या भुतासारख्या वाऱ्यापासून इमारतींचें रक्षण करावयाचें असेल तर. आणिक एक निर्गुडीचा महान् उपयोग म्हणजे निर्गुडीसारखें भरंकन् पेटणारें दुसरें जळण नाहीं. निर्गुडीचा हा उपयोग शिवछत्रपतींनीं ओळखला, म्हणूनच कीं काय, इतर कुठल्याही किल्ल्यांपेक्षां रायगडावर निर्गुडी फार लावली गेली—आजही ती विपुल प्रमाणांत आहे.

पागा—

गडावरून घोड्यांच्या पागा असत. अनेक किल्ल्यांवर एक तर त्यांचे अवशेष तरी आहेत. किंवा त्यांच्या जागा तरी दाखवल्या जातात. रायगडावर पीलखानाही होता. पीलखाना म्हणजे हत्ती बांधण्याची जागा. हत्तीसारखें अवजड जनावर—एक लटांबरच म्हणायचें. तें गडावर कसें पोहोंचलें असेल देव जाणे! पण तें रायगडावर होतें ही गोष्ट निरपवाद. ऑक्झेंडननें शिवसाम्राज्याभिषेकाच्या वेळीं गडावर हत्ती पाहिल्याचें नमूद करून ठेवलें आहे.

✤ ✤ ✤

# अठरा कारखाने—

गडावरील कारभार नीट चालावा म्हणून गडावर अठरा कारखाने असले पाहिजेत असा संकेत. हे प्रत्येक गडावर असतच असें नाहीं. कांहीं गडांवर नसत. कारण महाराष्ट्रांतली किल्ल्यांची संख्या जरी अदमासें साडेतीनशें असलीं, तरी त्यांपैकीं अनेक किल्ले म्हणजे निव्वळ पहाऱ्याकरितां बांधलेलीं संरक्षणस्थानें. उदाहरण द्यायचें झालें तर महाड-जवळचा चांभारगड. अर्थात् चांभारगडावर अठरा कारखाने कसे असणार? कांहीं मातबर गडांवर मात्र ते होते. अवश्य होते.

कारखाने म्हणजे खातीं. ज्यासंबंधींचें जें खातें असेल, त्याबाबतची सर्व व्यवस्था कारखान्यानें करायची.

अठरा ही संख्या भारतीयांची आवडती. पुराणें अठरा. गीतेचे अध्याय अठरा. म्हणूनच बहुधा कारखानेही अठरा. पैकीं पहिला, तोफखाना.

हें तर कबूल केलेंच पाहिजे, कीं महाराष्ट्र अगोदर तोफा, बंदुका हें सामान पोर्तुगीज, आरमाणी अशा परकीयांकडून घेत असे. फार काय सांगावें! नामांकित तरवारीदेखील पोर्तुगीजांकडून घ्यायच्या. म्हणूनच त्या शस्त्राला म्हणायचें फिरंग.

पण पुढें मात्र महाराष्ट्रांत तोफा ओतल्या जाऊं लागल्या. पेशव्यांच्या वेळच्या अनेक कारखान्यांचे उल्लेख पेशवे दप्तरांत विपुल आढळतात.

कांहीं तोफा ओतवल्या जात. तर कांहीं कड्यावर कड्या ठोकून केल्या जात. बहुधा तोफेची धातु मिसळीची असायची. हें सगळें शास्त्र महाराष्ट्रिकांनीं अवगत करून घेतलें होतें. मात्र कांहीं दिवसपर्यंत निवळ लोखंडी

तोफाच ओतल्या जात.

पावसाळ्यांत या तोफांची चांगली वज राखली जायची. तोफा असायच्या बुरुजावर. बुरूज म्हणजे उघडी जागा. पावसाळ्यांत तोफांवर जरी निर्गुंडीचें झांकण केलें, तरी महाराष्ट्रांत पर्जन्याचें मान फारच. कोंकणांत तर दगडाला अंकुर फुटावेत ! अशा मुसळझडींत निर्गुंडीच्या झापांचा टिकाव लागणार कसा ? म्हणून मग पावसाळा लागण्यापूर्वी तोफांना तेल देऊन ठेवायचें. तोफांच्या नाजुक जागा असतील, तिथें मेण लावायचें. उदाहरणार्थ, तोफेचा काना. हा तर मेणानें भरूनच ठेवायचा. कारण एकटा काना बिघडला कीं तोफ कामांतून गेली !

हें सगळें काम तोफखान्याकडे असायचें. तोफा आणणें, नेणें, खरेदी करणें, फुटक्या तोफांची विल्हेवाट लावणें, इत्यादि सारींच कामें तोफखान्याचीं.

दुसरा पीलखाना. रायगडावर पीलखान्याची इमारतच आहे. शिवाय तिथें हात्तीतलाव नांवाचें प्रचंड टांकेंही आहे. बहुधा तें हत्तींना पोहण्यासाठीं बांधलें असावें. महाराष्ट्रांतील युद्धांत म्हणजे डोंगरी युद्धांत हत्तींचा जरी फारसा उपयोग नसला, तरी भारतीय संस्कृतींत हत्तीला एक विशिष्ट स्थान. दारीं हत्ती झुलणें हें वैभवाचें लक्षण. लक्ष्मीचें नांवही गजान्तलक्ष्मी. तेव्हां मग वैभवाची खूण म्हणून तरी हत्ती पदरीं असावेत, असा संकेत.

इतर गडांवर पीलखाने होते कीं नाहीं कोण जाणे, पण पन्हाळगडावर होता असें म्हणतात. कदाचित् तो प्रतापगडावरही असावा. प्रतापगड हें जगदंबेचें—लक्ष्मीचें ठाणें. तिथें मायबाईच्या दारीं तरी हत्ती हवाच. या हत्तींचे महात बहुधा सगळे मुसलमान असत. मराठ्यांना कधीं महातगिरी जमली नाहीं !

उष्ट्रखाना म्हणजे उंटशाळा. उंट हें एक बेढब जनावर. विशेषतः मैदानांत त्याचा उपयोग फार. महाराष्ट्रांतल्या डोंगरांतल्या झाड्यांमधून उंट हिंडणें अशक्यच. त्याची मान कुणा झाडीच्या गुंतवळ्यांत अडकून बसली, कीं जाम निघायची नाहीं. यामुळें उष्ट्रखाना ही संस्था महाराष्ट्रांत फार उशीरां निर्माण झाली. जेव्हां मराठ्यांच्या तलवारी उत्तरेकडील मैदानें तळपवूं लागल्या, तेव्हां त्यांना उंटाच्या गतीचें महत्त्व कळलें असावें.

सांडणीस्वार ही संस्थाहि मग त्यांच्या परिचयाची झाली. बहुधा या सांडणीस्वारांकडे थैल्या नेण्या-आणण्याचेंच काम सोंपविलें जायचें. उंटाची गति मोठी विलक्षण. न थकतां, पाण्याची फारशी आवश्यकता न भासतां उंट मैलोगणतीं चालत असायचा. आपल्या लंबाड्या ढांगांनीं जमीन मोजीत.

उंटाचा आणिक एक उपयोग म्हणजे हलक्या तोफा वाहाण्यासाठीं. या तोफांना 'सुतरनाला' असें नांव. नाला म्हणजे बारकी तोफ. सुतर् म्हणजे उंट. जंबुरें, जेज्याला हीं आणिक कांहीं बारीक तोफांचीं नांवें. याही तोफा उंटांवरून वाहिल्या जायच्या. बहुधा उष्ट्रखाना रायगडावर, आणि असलाच, तर तो पन्हाळगडावर असावा.

शिलेखाना म्हणजे चिलखतें आणि शस्त्रास्त्रें ठेवण्याची जागा. ही मात्र बहुधा प्रत्येक किल्ल्यावर असायची. सामान्यपणें स्वारानें पंचहत्यारी असणें हें गौरवाचें लक्षण मानलें जायचें. पंचहत्यारें अशीं—तरवार, भाला, जंबिया, पट्टा आणि धनुष्यबाण. कुणी कुणी यांतलें एखादें गाळून त्यांत बंदुकीचा अन्तर्भाव करायचा.

अशा या शस्त्रांचा संग्रह, त्यांची मोडतोड पाहाणें, नवीं शस्त्रें मागविणें, तीं सांभाळणें, गंज न लागेल अशा बेतानें तीं ठेवणें, त्यांची धार पाहाणें इत्यादि सारीं कामें शिलेखान्याकडे. शिकलगार आणि लोहार हे दोन वतनी गडावरील शिलेखान्यांच्या नोकरीस रुजूं असायचे.

फरासखाना हा कारखाना मुख्यतः वस्त्रविषयक. छत्रपतींचें सिंहासन ते छत्रपति गडावर नसतील त्या वेळीं चादरींनीं झांकून ठेवायचें. दरबारांत ज्या त्या इतमामाच्या सरदाराच्या मानाप्रमाणें त्याला गादी, तक्के, लोड हें सारें पुरवावें लागायचें. हें काम फरासखान्याचें. सगळ्या महत्त्वाच्या गडांवर फरासखाने असायचेच.

कोठी हाही एक स्वतंत्र कारखाना. गड म्हणजे कांहीं बाजारपेठेंतील जागा नव्हे, कीं कांहींही जिन्नस लागतां क्षणीं जाऊन आणला. विशेषतः पावसाळ्याचे चार महिने तर गडावर चढणें-उतरणें प्रायः बंदच असायचें. अशा वेळीं गडावरील वस्तीस लागणारे नाना जिन्नस कोठींत सांठवलेले असायचे. जिन्नस म्हणजे बहुधा सगळे ठोक ठोक. किरकोळ जिनसांसाठीं जिन्नसखाना या नांवाचा आणिक एक कारखाना असायचा. रायगडावरील

कोठींत आणि जिन्नसखान्यांत काय काय होतें, याचा उल्लेख एका ठिकाणीं उपलब्ध आहे. तिथें रेशमी कापडाचे तागे होते. कलाबतूचें कापड, खारका, बदाम, कस्तूरी, छीट, नाना प्रकारचीं तेलें, अशा अनेक वस्तु तिथें नोंदलेल्या आहेत.

पावसाळ्याभराचें जळण सांठवून ठेवणें ही गडाच्या जीवनांतली एक अत्यंत महत्त्वाची बाब कारण जळण सरलें, कीं चुलीच बंद झाल्या म्हणायच्या! म्हणून उन्हाळाभर खालून गडावर मोळ्या यायच्या. मोळकरी माणसें आळसानें जवळूनच मोळी गोळा करायचा प्रयत्न करतील, तर त्यांना ताकीद अशी कीं, 'किल्ल्याभंवतींच्या येका काडीस हात लावायची गरज नाहीं.' कारण किल्ल्याभंवतालचीं झाडें तुटलीं, कीं किल्ल्याचें संरक्षण गेलें. म्हणून मग लांबलांबून मोळ्या यायच्या. त्या सांठवणें आणि त्यांचें वांटप करणें हें काम लकडखान्याकडे असायचें.

गडावर इमारती अनेक. कारखान्यांच्या इमारती. गडकऱ्यांच्या इमारती. राजमंदिरें. पहारेकऱ्यांचे झाप. शिबंदीचीं घरें. या सगळ्या कारखान्यांमधून जितके नोकर त्यांचीं राहायचीं घरें. बाकी मग पोतनीस, कारखानीस, फडणीस इत्यादि निरनिराळ्या अधिकाऱ्यांचीं राहायचीं घरें. तीं बांधणें, दुरुस्त करणें इत्यादि कामें इमारतखान्याकडे.

मराठ्यांना बागांचा षौक. शिवछत्रपतींनीं अनेक गडांवर अनेक मंदिरें स्थापलीं आणि त्या त्या मंदिरांच्या पूजेसाठीं फुलबागांची व्यवस्था करून दिली. कांहीं गडांवर जुनीं मंदिरें होतींच. जशीं सिंहगडावर कौंडिण्येश्वर आणि अमृतेश्वर. पुरंदरावर केदारेश्वर. पण कांहीं मंदिरें मात्र स्वतः छत्रपतींनीं बांधविलीं. प्रतापगडावरील जगदंबेचें मंदिर आणि रायगडावरील जगदीश्वराचें मंदिर. जगदीश्वर हें नांव स्वतः छत्रपतींनीं शोधलेलें. केवढी विचक्षण बुद्धि! जगताचा स्वामी, त्याचें हें मंदिर! एकट्या कोंकणचा, महाराष्ट्राचा, दक्षिणेचा किंवा भरतखंडाचा नव्हे, संपूर्ण जगताचा!

या मंदिरांच्या पूजनासाठीं फुलें लागायचीं. त्या फुलझाडांची व्यवस्था ज्या खात्याकडे त्याचें नांव बागकारखाना. पैकीं प्रतापगडावर काय तो हा कारखाना अजूनही जिवंत असावा. बाकी सगळीकडले मोडले. अज्ञातांत विलीन झाले!

पुढला कारखाना म्हणजे कुरणें. हीं बहुधा गडाखालीं असायचीं. गडाखालचे उतार हे राखीव असायचे. इतरांनीं तिथलें गवत कापायचें नाहीं. गुरांना चारायचें नाहीं. सारें गवत कापून गडावरून पोंचवलें जायचें. तिथें त्यांच्या गंज्या पडायच्या. जेवढें महत्त्व कोठीचें, तेवढेंच कुरण-कारखान्याचें. कारण मराठ्यांचें मुख्य वाहन घोडे! तेंच उपाशीं मरूं लागलें, कीं आटपलेंच सगळें!

रथखाना हा कारखाना केवळ राजधानीच्या गडावरच काय तो असायचा. एरवीं गडावर रथ नेतो कोण, अन् त्यांत बसतो कोण! जिथें माणसें चढायचीं मारामार तिथें रथ कसे चढायचे! पण रथ हेंही वैभवाचें लक्षण म्हणून गडावर जसे हत्ती नेलेले, तसे रथहि.

रायगडावर बाजार आहे, तसा तो पन्हाळ्यावरही असावा. पुरंदरावर देखील. मुरूड-जंजिऱ्यांतही कांहीं दुकानें आहेत. या दुकानांची व्यवस्था पाहणारा जो कारखाना त्याला म्हणायचें पेठ–कारखाना.

थट्टी म्हणजे घोड्यांची पागा. हा कारखाना मात्र अतिशय महत्त्वाचा. मराठ्यांएवढें घोड्यांवर प्रेम क्वचितच कुणीं केलें असेल. घोडा म्हणजे मराठ्याचा प्राण. मराठ्याचें धन. मराठ्याची इभ्रत. मराठ्याच्या जीवीचें कौतुक. किंबहुना घोडा हें त्याचें सारसर्वस्व.

कारण अगदीं उघड होतें. वाटेल तेवढी कठीण चढण असो, घोडें चढून जायचेंच. लढाईत तर घोडें म्हणजे अपर प्राण. पळायच्या कामांत घोडें बहुत उपयोगी. कुण्या एका पत्रांत मराठी सेनेचा उल्लेख थोडा व्यंगानें केलेला. असें म्हटलें कीं, 'मराठी सैनिक जीव खाऊन लढतील. मुंगळ्यासारखे चिकटून पडतील. पण एकदां पळ सुरू झाला कीं मग, झाडाला बांधून घातलें तर झाडें उपटून त्यांच्यासुद्धां पळतील!'

तेव्हां अशा या पळांत–युद्धांत, रात्रीं-बेरात्रीं, अडीअडचणींत जें जनावर मराठ्याची सतत साथ करायचें, त्यावर मराठ्यानें प्राणाधिक प्रेम केलें, तर नवल नाहीं. थट्टी हा कारखाना मुख्यतः घोड्यांसंबंधींचा. घोडीं लहानपणापासून सांभाळणें, त्यांना रिंगणावर धरणें, शिकवून तयार करणें, इत्यादि सगळीं कामें थट्टीकडे सोंपविलेलीं असायचीं. शिवाय गडावर दुधासाठीं जीं जनावरें लागत तीं गाई, म्हशी याच कारखान्याच्या स्वाधीन.

जामदारखाना हें गडाचें वैभव. सिंहगड, रायगड, प्रतापगड, राजगड, पन्हाळा या सगळ्या किल्ल्यांनीं फार मोठमोठे जामदारखाने सांभाळले. रायगडावर शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या वेळीं उपस्थित असलेल्या इंग्रजी वकिलांनीं आणि पर्णालपर्वतग्रहणाख्यानकर्त्यांनीं, तसेंच शिव-भारतकारांनींही रायगडावरील संपत्तीचें मनोहारि वर्णन करून ठेवलें आहे.

छत्रपतींचें सिंहासन—त्याची बैसका औदुंबराच्या लाकडाची होती. वर दो बाजूंस दोन सिंह असलेलें आसन निखळ सोन्याचें. त्याचें मोल हजारों सुवर्णमुद्रा. राज्याभिषेकाच्या वेळींच शिवछत्रपतींनीं होन नामक सोन्याचें नाणें पाडलें. असे लक्षावधि होन जामदारखान्यांत होते. छत्रपतींना हिरा या रत्नाची मोठी आवड. त्यांच्याजवळ कांहीं नामांकित हिरे होते. शिवाय पांच, माणिक, वैडूर्य, मोतीं, पोवळीं इत्यादि नाना प्रकारचीं रत्नेंही जाम-दारखान्यांत होतीं.

शिवछत्रपतींनीं संभाजीस लिहिलेलें पत्र उपलब्ध आहे. त्यांत आपण कांहीं नव्हतें तिथें या मितीस केवढा संग्रह केला आहे, याची एक नोंद आहे. ती एकदां वाचून पाहावी. म्हणचे रायगडावरचा जामदारखाना किती समृद्ध असला पाहिजे, याची कल्पना यावी.

सिंहगडावर तर पेशव्यांचा जामदारखाना अनेकदां वर चढला आणि खालीं उतरला. पुण्यावर परचक्र आलें, कीं पर्वतीच्या देवतांच्या सुवर्ण-मूर्ति आणि जामदारखाना असें सिंहगडावर पोंचवायचें. परचक्राचें उधाण ओसरलें, कीं तें परत पुण्याला हलवायचें. देवगिरीवरहि जो “न्यायानें क्षितीतें पोषीत” होता, त्या राजा रामदेवरायाच्या वेळीं खंडोगणतीं सोनें, मोत्यांनीं भरलेले रांजण, अनेक मूल्यवान् रत्नें असा विपुल जामदार-खाना होता.

मराठ्यांची औषधपद्धति आयुर्वैद्यकावर आधारलेली. या शास्त्रांतले दिग्गज म्हणजे चरक आणि सुश्रुत. आयुर्वेदांतले मोठमोठे प्रवीण वैद्य मराठ्यांच्या दरबारीं असायचे. त्यांच्यासाठीं म्हणून औषधिखाना हा एक स्वतंत्र कारखाना.

हे वैद्य नानाविध भस्में तयार करीत. मोत्यांचीं, हिऱ्यांचीं, सुवर्णाचीं, रुप्याचीं, अभ्रकाचीं, लोखंडाचींसुद्धां. नाना रसायनें शिजवीत. नाना काढे

तयार करीत. नाना चूर्णें कुटीत आणि नाना अवलेह घोटीत असत. अनेक औषधें वाळत पडायचीं. अनेकांवर लेप चढवले जात असायचे. अनेक रसायनें भट्ट्या लावून तयार होत असायचीं. त्यांना नानाविध सामग्री लागायची. नाना वनस्पतींचीं पानें, फुलें, मुळ्या, फळें, हें सगळें जमविणें आणि या वैद्यांना पुरवणें हेंही काम औषधी कारखान्यांचें.

लढाई म्हणजे प्राणांशीं गांठ. तींत काय व्हायचें नाहीं ? सगळें कांहीं. नाना प्रकारच्या जखमा व्हायच्या. हातपाय तुटायचे. छेदले जायचे. मुरगळायचे. लचक भरायची.

तेव्हां, हाडें बसवणारे, मालिश करणारे आणि शस्त्रक्रिया करणारे वैद्य मराठ्यांच्या पदरीं असायचे. पैकीं शस्त्रक्रिया हा भाग बहुधा न्हाव्यांकडे असायचा. शस्त्रांनीं झालेल्या जखमा बांधणें, शिवणें अशीं बारकीसारकीं कामें न्हावी कुशलतेनें करीत असत. शिवाय फांसण्या टाकून किंवा जळवा लावून रक्त काढणें हाही एक उपाय त्या वेळीं सर्वमान्य होता. हीं कामें वैदू करीत. तेव्हां, यांचाही अन्तर्भाव औषधीखान्यांतच व्हायचा.

पुस्तकशाळा हा कारखाना क्वचित् एखाद्या गडावर असायचा. मात्र एखादा किल्लेदार, एखादा सेनापति, एखादा प्रतिनिधि, एखादा सचिव जर विद्याव्यासंगी असला तर मात्र तो जिथें असेल, त्या किल्ल्यांत पुस्तकशाळेची स्थापना आवर्जून व्हायची. त्या काळीं ग्रंथ बहुत दुर्मिळ. कुणाजवळ नकलून घेतलेला एखादा ग्रंथ असणें हें केवढें प्रतिष्ठेचें लक्षण ! त्यामुळें मग मुद्दाम लिहवून घेतलेले हे ग्रंथ म्हणजे जपणुकीची गोष्ट. बहुधा प्रत्येक हस्तलिखित ग्रंथाच्या शेवटीं—

"तैलाद्रक्षेत् जलाद्रक्षेत् रक्षेत् शिथिलबन्धनात् ।"

अशी सूचना लिहिलेली असायची. शिथिलबन्धनापासून वांचवायचें अशासाठीं कीं, हे सगळे ग्रन्थ नीट वजीनें बांधून ठेवलेले असायचे. प्रत्येक पान मोकळें मोकळें. आडवें लिहिलेलें. त्यामुळें नीट जुळवून बांधून ठेवायची गरज भासायचीच. तेव्हां मग त्यासाठीं शेवटली सूचना.

अठरावा कारखाना म्हणजे खाजगी. या सर्व कारखान्यांतील वस्तूंहून वेगळ्या आणि संकीर्ण अशा कितीतरी वस्तूंची गडावर जरूरी असायची. उदाहरणार्थ, पानदानें. पिकदाणी. गंजीफा. सोंगट्यांचे पट. रुद्राक्षाच्या

माळा. अत्तरासारख्या वैयक्तिक आवडीच्या गोष्टी. या सर्व किरकोळ पण प्रत्येकाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या वस्तूंसाठीं खासगी नांवाचें स्वतंत्र खातें असायचें. इतर कुठल्याही कारखान्यांत वस्तु मिळाली नाहीं, तर शेवटीं ती या खासगींत शोधायची. उदाहरणच द्यायचें झालें तर सखारामबापू बोकील चहा पीत असत. हा चहा ते जातील त्या गडावर त्यांच्यासाठीं खासगींत ठेवायचा. पेशवाईत इंग्रजांकडून सुबक दुर्बिणी, घड्याळें, कांचेचे लोलक असे नानाविध नजराणे यायचे. हे नजराणेहि खासगींत जमा व्हायचे.

छत्रपतींची सारीच राज्यव्यवस्था बांधीव. त्यांत अठरा कारखाने या संस्थेनें अधिकच बांधीवपणा आणला. सारें कसें नियमबद्ध. सुटसुटीत. इकडली काडी तिकडे व्हायची नाहीं. या सगळ्या कारखान्यांचा साऱ्याच किल्ल्यांवर वर्तांळा होता असें नाहीं. पण छत्रपतींचें सपाट मैदानापेक्षांही किल्ल्यांवर अधिक प्रेम. इतकें कीं, त्यांनीं आपल्या दोन्ही राजधान्या किल्ल्यांवरच वसविल्या—

"हें राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनीं गडांवरूनच निर्माण केलें. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले तसेंच जलदुर्ग बांधिले."

शिवछत्रतींची सह्याद्रीवर जणुं भक्ति होती. सह्याद्रीचा कुलदेव श्रीमहादेव तें त्यांचें आराध्य दैवत. या आराध्य देवतेप्रमाणेंच त्यांनीं अत्यंत श्रद्धेनें सह्याद्रीचे मस्तकीं दुर्गकोटांची जणुं पूजा बांधली--

"गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बल, गडकोट म्हणजे राजलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपलीं वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण—"

त्यामुळें शिवछत्रपतींनीं किल्ले आणि अठरा कारखाने यांची सांगड घातली. पुढें राजधान्या गडांवरून खालीं उतरल्यावर हे संबंध तुटले, ही गोष्ट अलाहिदा.

✤ ✤ ✤

# प्राचीनत्वाचीं कांहीं गमकें

शिवछत्रपतींची दुर्गांवर ही अशी अनन्य भक्ति असली, तरी महाराष्ट्रांतले यच्चयावत् दुर्ग कांहीं शिवछत्रपतींनीं बांधले नाहींत. कित्येक तर अगोदरचेच होते.

या प्राचीन गडांची खूण काय ?

आमच्या इकडे इतिहास लिहून ठेवायची पद्धत नव्हती. त्यामुळें हवें त्यानें हवें तें म्हणावें, त्याला कांहीं अंतच नाहीं. कौतुक असें, कीं राम-जन्माच्या वेळीं तिथि कोणती ? पक्ष कोणता ? दिवस कीं रात्र ? सूर्योदय झाला होता केव्हां ? आकाशस्थ ग्रह कुठें कुठें होतें ? हें सगळें पुराणांतून तपशीलवार लिहून ठेवलें आहे. मराठीच्या एका श्रेष्ठ विनोदकारांनीं कोटि केली कीं, केवळ रामकृष्णांचा जन्म कोणत्या शतकांत झाला एवढीच एक अगदीं किरकोळ गोष्ट लिहायला आमचे पुराणकार अजिबात विसरले !

अर्थातच कुठला किल्ला केव्हां बांधला गेला, हेंही एक अगम्य कोडेंच आहे. अनुमान बांधणारांनीं आपआपल्या कल्पनांचे घोडे हवे तिकडे धांवडवावेत. कांहीं खुणा मात्र उपलब्ध आहेत. त्यावरून तर्कांचे इमले बांधतां येतात.

पहिला तर्क असा, कीं ज्या दुर्गांजवळ गुहा आणि विहार आहेत, ते दुर्ग प्राचीन. म्हणजे काय झालें, कीं हे विहार आणि हे स्तूप, या गुहा आणि हीं चैत्यें रचायला प्रारंभ झाला खिस्तपूर्व तिसऱ्या-चौथ्या शतका-पासून. अर्थातच हे शिल्पकार राजसत्तेच्या आसऱ्यानेंच आपआपल्या

छिन्न्या चालवीत असले पाहिजेत.

हे विहार आणि हीं चैत्यें कुणीं बांधलीं? तर जनसाधारणांनीं बांधलीं. या चैत्यांकरितां दानें देणारांमध्यें वैश्य होते. हलिक–शेतकरी होते. गोपाल होते. सेनापति होते. राजकुलांतलीं माणसें होतीं. हीं सगळीं माणसें ज्या ज्या राज्यांच्या आसऱ्यानें राहात, त्या राज्यांच्या राजधान्यांच्या आश्रयानें हीं धर्मकृत्यें व्हायचीं.

उदाहरणादाखल वेरूळ आणि अजिंठ्याचीं लेणीं. त्यांच्या शेजारीं आहे देवगिरि. देवगिरि हा दुर्ग अति प्राचीन. त्याच्या बांधणीची पद्धतीच चैत्यकालीन आहे. किंबहुना ज्या काळीं चिखलाचा एखादा गोळा पोखरून काढावा तसे पर्वत पोखरले जात, त्या काळीं देवगिरि घडवला गेला.

दुसरें उदाहरण लोहगडाचें. कार्लें आणि भाजें येथलीं थक्क करून सोडणारी लेणीं लोहगडच्या आश्रयानें बांधलीं गेलीं. लोहगडावर कांहीं गुहा आणि भुयारें आहेत. तीच गंमत शिवनेरीची. शिवनेरीजवळचा लेण्याद्रि हा पर्वत एखाद्या मध्याच्या मोहळागत पोखरतांना शिल्पकारांच्या मनीं शिवनेरीवरील राजसत्तेचाच भरंवसा बळकट असेल. मनमाडजवळचा अंकाईचा किल्ला, त्र्यंबकेश्वरजवळचा ब्रह्मागिरि, रायगड, पुरंदर, सिंहगड या सर्व किल्ल्यांचें प्राचीनत्व त्या किल्ल्यांमधून असलेल्या पाषाणशिल्पांवरून अनुमानतां येतें.

गडाचें नवेंजुनेपण ओळखण्याचें दुसरें चिन्ह म्हणजे दरवाज्यांवरील शुभ चिन्हें. या दरवाज्यांवर नाना प्रकारचीं चिन्हें आढळतात. गंडभेरुंड, कमळ, गणपति, कीर्तिमुख इत्यादींपैकीं उठावदार कमळ हें यादवकालीन चिन्ह. ज्या गडाच्या महाद्वारावर हें उठावदार कमळ असेल, तो कमींत कमी यादवकालीन तर असलाच पाहिजे. दुसरें चिन्ह गंडभेरुंड म्हणजे चारी पावलांच्या नख्यांत चार हत्ती आणि तोंडांत एक अशा पंखयुक्त सिंहाचें चित्र. ज्ञानेश्वरांनीं 'सपांखरे पंचानन' या सिंहाकृतीचा उल्लेख केलेला आहे. तज्ज्ञांच्या मतें हें चिन्ह विजयनगरच्या राजकुलाचें. तेव्हां हें ज्या दुर्गांच्या महाद्वारांवर आढळतें, त्यांचा काळ तितका तरी मागें लोटावा.

आश्चर्य असें, कीं इतकीं वर्षें यावनी राज्यें दक्षिणेंत नांदलीं, पण

त्यांच्यापैकीं कुणी एखादा किल्ला बांधवला, असा उल्लेख कांहीं फारसा कुठें सांपडत नाहीं. केवळ पुरंदरचें बांधकाम करतांना विजापूरच्या पातशहाच्या आज्ञेनें फत्ते बुरुजाखालीं बळी दिलेलीं नागनाकाचीं लहानगीं सून-लेक, असें सबंध महाराष्ट्राच्या दुर्गावलींत दोन-चारच उल्लेख काय ते आढळतात. इतरत्र कुठें किल्ल्यांच्या दरवाज्यांवरसुद्धां यावनी शिल्पें फारशीं आढळत नाहींत.

दुर्गद्वारावर गणपतीची उठावदार मूर्ति असणें ही त्या किल्ल्याची डागडुजी अगदीं अलिकडे झाल्याची खूण आहे. पेशवे हे गाणपत्य. त्यांचा राजदरबारीं प्रवेश झाल्यानंतर गणपति या दैवताला राजप्रतिष्ठा लाभली.

सुतानें स्वर्गाला जायचें म्हटलें, तर किल्ल्यांच्या जुनेपणाविषयीं तर्क बांधायला आणिक एक प्रमाण सांपडतें. जरा चौकस नजर ठेवून किल्ले शोधावेत, अथवा किल्ल्यांचीं टांकीं उपसावींत. त्या टाक्यांमधून किंवा किल्ल्यांच्या माच्यांवर कांहीं जुनीं नाणीं आढळतात. गतवर्षींच सिंहगडावर एक शिशाचें नाणें आढळलें. जरी त्यावरील सगळींच आकृतिचिन्हें प्रायः नष्ट झालेलीं होतीं, तरी एवढें तर खचितच, कीं तें नाणें शिलाहारकालीन होतें. यावरून असा एक तर्क धांवतो, कीं हीं नाणीं ज्या वेळीं वापरांत होतीं, किंवा अजून वापरांतून समूळ निघालीं नव्हतीं अशा काळीं सिंहगड बांधला गेला असावा.

अर्थ असा, कीं महाराष्ट्रांतील किल्ल्यांपैकीं कांहीं अति प्राचीन असले पाहिजेत. म्हणजे सुमारें दोन सव्वादोन हजार वर्षांपूर्वींचे. तिथपासून तों पेशवाई बुडेपर्यंत सतत किल्ल्यांचें बांधणें-पाडणें सुरू होतें. आतां मात्र किल्ले बांधण्याची कला हरपली. तेवढाले अवजड दगड, तशा भयानक ठिकाणीं नेऊन रचणारे गवंडीहि राहिले नाहींत. मजूरही राहिले नाहींत. किल्ले हें केवळ एक जपून ठेवण्यासारखें प्राचीन सांस्कृतिक चिन्ह उरलें आहे.

## छत्रपतींचे आवडते दुर्ग—

छत्रपतींनीं कांहीं दुर्ग मुद्दाम हौशीनें बांधवून घेतले. कांहीं जरूरी होती म्हणून बांधले. सारा सह्याद्रि त्यांच्या परिचयाचा. इथले कडेकपारी, दऱ्याखोरीं सारेंच त्यांनीं अगदीं लहानपणापासून पायीं तुडविलेलें. आंधळे-

पणें नव्हे. सजगपणें. प्रत्येक शिखर कुठें, कसें, त्याचें महत्त्व किती, त्या शिखरावरून भंवतालचा किती प्रदेश नजरेच्या टप्प्यांत येतो, तें शिखर ताब्यांत असतां कुठल्या वाटा रोखल्या जातात, कुठले मार्ग अडवतां येतात, हें सगळें शिवछत्रपतींनीं अगदीं बारकाईनें पाहिलें.

मग त्यांच्या लक्षांत आलें कीं, ऐन मोक्यावरचीं कांहीं ठिकाणें अजून मोकळीं राहिलीं आहेत. किंबहुना एक सलग राज्य या दृष्टीनें सह्याद्रीचा कुणीं विचारच केला नाहीं. आपआपलें भागलें कीं झालें. मग दुसऱ्याच्या राजकारणांत भट पडो ! किंबहुना दुसऱ्याचें हडपतां कसें येईल, इकडेच बहुधा सगळ्यांचें लक्ष. भले भले बलदंड सरदार ! डोंगराएवढी त्यांची हिंमत ! कार्तवीर्यासारखा त्यांचा पराक्रम ! पण आपल्या घराबाहेर त्यांनीं कुठें पाहिलें असेल, तर एकमेकांना पाण्यांतच पाहिलें ! महाराष्ट्र हें एक राज्य, ही दृष्टि कुणाच्याच नशिबीं विधात्यानें लिहिली नाहीं.

तेव्हां मग छत्रपतींनीं कांहीं ठिकाणें हेरलीं, आणि तिथें सारें स्थापत्य-कौशल्य इरेस घालून बुलंद किल्ले बांधले.

त्यांनीं सतत मुरूड-जंजिऱ्यांतून सिद्दीला काढून लावायचा प्रयत्न केला. पण सिद्दी दबलाच काय तो. समूळ नाहींसा झाला नाहीं. तेव्हां मग त्यांनीं सिद्दीच्या छातीवर पाय देऊन समुद्रांत खांदेरीउंदेरी हीं दोन्ही बेटें भंवतालीं तट बांधून मजबूत केलीं. अलिबाग, गोपाळगड, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी असे कित्येक जलदुर्ग—त्यांची छत्रपतींनीं दुरुस्ती तरी केली, पुनर्रचना तरी केली, पण या अवघ्या किल्ल्यांहून छत्रपतींचें अधिक प्रेम त्यांनीं स्वतः बांधिलेल्या मालवणजवळच्या सिंधुदुर्गावर.

त्यांनीं मालवणजवळ समुद्रांत एक खडक पाहिला. वर्षोन् वर्षे सागराच्या लाटांशीं झुंजत असलेला—पण ज्याचा एक कणही हलला नाहीं असा. त्या खडकाभंवतालीं थेट किनाऱ्यापर्यंत आणि मोठ्या समुद्रांतही लहानमोठे खडक लपलेले. कुणी त्या खडकाशीं दोस्ती असलेला तांडेल असेल, तरच नाव सुरक्षितपणें त्या मोठ्या खडकापर्यंत घेऊन जायचा. इतर कुणीं तें साहस केलें तर समुद्रांतले मासे जगायचे !

तो खडक शिवछत्रपतींच्या मनास आला, आणि त्यांनीं त्या तिथें अक्षरशः खंडोगणतीं शिसें ओतवून सिंधुदुर्गाचा पाया खणला. या किल्ल्या-

वर त्यांचें फार प्रेम. त्यांचें स्वतःचें म्हणून दाखवलें जाणारें एक देऊळही मालवणच्या सिंधुदुर्गांत आहे. तिथें चुन्यांत त्यांचा पंजाही उठलेला तिथें दाखवतात.

असेच छत्रपतींचे आवडते दोन किल्ले, म्हणजे प्रतापगड आणि राजगड. प्रतापगड हें तर स्वराज्यावर आलेल्या एका महाप्रचंड संकटाच्या वेळचें युद्धस्थलच. किंबहुना छत्रपतींनीं अफझुल्याचें संकट आपण होऊन प्रतागडीं ससैन्य ओढवून घेतलें, आणि तिथें अफझुल्या सेनेसह उभा कापला !

मात्र 'मरणान्तानि वैराणि' हें सूत्र त्यांना ठाऊक होतें. त्यामुळें जिथें अफझुलखानाचा निःपात केला तिथें छत्रपतींनीं त्याची कबरही बांधलेली. विजयनगरच्या अधिपतीचा वध केल्यावर त्याचें मस्तक वर्षोन्वर्ष भाल्याच्या टोंकावर मिरवून शेवटीं तें मोरीच्या तोंडांत बसविणारांची संस्कृति आणि शिवछत्रपतींची संस्कृति यांची तुलना करून पाहण्याजोगी आहे—सहज जातां जातां !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .......................... नों. दि. ..............

## नगररचना—

प्राचीन नगरें हीं बहुधा तटांनीं सुरक्षित असायचीं. कारण उघड होतें. शेजारच्या राज्यांमधून सारखें वैमनस्यच नांदत असायचें. कोण कधीं घोडे फेंकीत येईल आणि गांव लुटून, फस्त करून, प्रसंगीं जाळून-पोळून आणि वर दक्षिणा म्हणून गांवच्या लेकीसुना हिरावून नेईल, याचा भरंवसाच नसायचा. तेव्हां मग गांवाभोंवतीं कुसूं किंवा तट असला तर अधिक बरें. नगरें अशीं फारशीं नसायचींच. बहुधा सगळीं लहान लहान खेडीं. त्यांना म्हणायचें खेटक.

झालें काय, कीं आदिम संस्कृति ही सगळी नद्यांच्या कांठाकांठानें वसतीस आली. गोदाकांठ, कृष्णाकांठ, प्रवराकांठ हे प्रदेश प्रारंभीं गजबजले. मग जसजशीं शेतें पाडलीं–पिकवलीं जाऊं लागलीं, तसतशी वसति आंत सरत चालली.

अगदीं प्रारंभीं जिथें वस्ती झाली, त्या ठिकाणीं व्यापाराचें वळण पडलें. देशी व्यापार इथल्या इथेंच व्हायचा. तोही थोडा. तात्पुरता. सामान्यपणें आपल्या मुलखांत जें होईल तेवढ्यावरच भागवायची प्रवृत्ति. गरजा कमी. त्यामुळें बाजारपेठाही कमी.

जो परदेशी माल यायचा, तो मोठमोठाल्या सांस्कृतिक केन्द्रांत जाऊन उतरायचा. हा माल बहुधा रोम, अरबस्तान, इराण या देशांतुन समुद्री वाऱ्यांच्या लहरींवर तरंगत येऊन महाराष्ट्रांतल्या बंदरांत लागायचा. हीं बंदरें मुख्यतः तीन. एक चौल, दुसरें कल्याण, अन् तिसरें नालासोपारा किंवा शूर्पारक. या तिन्ही बंदरांचे कांठ हिंवाळ्यांत अन् उन्हाळ्यांत

परदेशी गलबतांनीं गजबजलेले असायचे. चारचार, सहासहा शिडांचीं गलबतें. परोपरींच्या भाषा बोलणारे खलाशी. वेगवेगळ्या रंगांचे, आकारांचे दाढीमिशावाले, दाढीमिशा सफाई काढलेले. या खलाशांच्या आरोळ्यांनीं सारें वातावरण कोंदलेलें. घ्या, द्या, चढवा, उतरवा, न्या, आणा—काय काय अन् काय काय !

असा हा माल या बंदरांत उतरला, म्हणजे तो बैलांच्या पाठीवरून घाट चढून पलिकडे देशांवर पोहोंचायचा. अन् मग तो थेट पैठण, नाशिक, अमरावती, वत्सगुल्म ( वाशीम ) अशा मोठमोठाल्या केन्द्रांतून पोंचायचा. या केन्द्रांच्या बाजारपेठा नाना प्रकारच्या मालांच्या दुकानांनीं नुसत्या गजबजलेल्या असायच्या. मोत्यें, पोवळीं, कस्तूरी, लवंगा, वेलदोडे, छिटें, मद्याचे बुधले, इत्यादि नाना प्रकारचें सामान या पेठांमधून वाटेल तेवढें उपलब्ध असायचें.

पण एकूण हीं केन्द्रें कमीच. खेटकेंच जास्त. तीं देखील तटांनीं किंवा कुसवांनीं वेढलेलीं. सडका कमी. होतां होईतों माणसें पायीं अगर घोड्यां-वरून प्रवास करायचीं. प्रवास तरी असा कुठें लांबचा करायचा ? 'पंचक्रोशी' हें प्रमाण. सारे व्यवहार बहुधा पंचक्रोशींत चालायचे. गाड्यांचे रस्ते असले तरी ते पंचक्रोशीभर. पसरलेल्या बारक्या खेड्यांमधून त्या पंच-क्रोशीचें केन्द्र असलेल्या खेड्याकडे जायचें.

खेड्यांची रचना आडवी तिडवी. जशी मनास आली तशी. कुणीं कुठेंही घर बांधावें. मग तें कुणाच्या नेमकें दारासमोर येवो. कुणाची त्यामुळें पाणवठ्याची वाट अडो. कुणाचा वाहता वारा बंद होवो. कुणी-कडून राहण्याजोगा आसरा झाला म्हणजे झालें.

घरबांधणी—

घरें बहुधा ठेंगणीं. एकमजली. खिडक्या नाहींत म्हटलें तरी चालेल. घराचें दारही अगदीं ठेंगणें. आंत शिरतां नवख्या माणसाच्या कपाळाला नेमकें टेंगूळ यायचें. एखादा झरोका ठेवला, न ठेवला.

अनेक घरें कौलारू. महाराष्ट्राच्या कांहीं भागांतून माकडांचा त्रास असायचाच. आजही तो आहेच. कांहीं गांवीं माकडें, कांहीं गांवीं वानर.

पण उपाय काय ? माकडें किंवा वानरें यांच्यावर काठी देखील उगारायची नाहीं. मग कौलें दरवर्षी फुटायचीं. कुणी कुणी कंटाळून कौलाऐवजीं घरावर झाप घालायचे. हे झाप कडब्याचे, पराट्यांचे, तुराट्यांचे, निर्गुडींचे, गवती असे नाना परींचे असायचे. या झापांना मात्र वानरांपासून धोका कमी. पण जळिताची भीति अधिक. अन् एकदां घर पेटलें कीं गांवच्या गांव बेचिराख व्हायचें. पण त्यालाही कांहीं उपाय नसायचा. राजानें, आगीनें, पावसानें मारलें तर तोंड वाकडें कुणाजवळ करायचें ?

कुठें कुठें पाऊस अगदीं कमी. अशा मुलुखांत माळवदी घरें बांधलीं जायचीं. आढ्यावर चार वासे टाकायचे. त्यावर सागवानी किंवा आंब्याच्या किलच्या ठोकायच्या अन् वर पांढऱ्या मातीचें पेंड. माळवदी घरांतून उष्मा कमी व्हायचा. हिंवाळ्यांत ऊबदार. उन्हाळ्यांत वर झोंपायला जागा मोकळी.

पाणवठे—

बहुधा हीं सगळीं खेडीं पाण्याचा आसरा पाहून वसलेलीं असायचीं. कुण्या ओढ्याच्या अगर नदीच्या कांठीं. मग तिथें पाणवठे पडायचे. पाणवठे एक महत्त्वाचें केन्द्र. बायाबापड्या तिथें धुवायला यायच्या. पाणी भरायला. पुरुष आंघोळींना यायचे. पोरें पाण्यांत हुंदडायला. म्हशी आणि गुरेंढोरें तिथेंच पाणी प्यायला. मात्र स्वच्छतेची जाणीव एकूण कमीच. जिथें संध्येचीं आचमनें टाकलीं जायचीं, तिथेंच स्नान करणारांच्या चुळाही येऊन पडायच्या. घासलेले हंडेही विसळले जायचे; अन् म्हसरेंही तिथूनच पाण्यांत शिरायचीं. असा सगळा कोल्हाळ एक्याच ठिकाणीं सुरू.

ज्या गांवीं ओढा किंवा नदी नसेल, तिथें एखादी विहीर असायची. बहुधा ती पायऱ्यांची असायची. पूर्वींच्या पायऱ्यांच्या कांहीं विहिरी फार देखण्या. तशाच प्रचण्डही. त्यांना बावी म्हणायचें. त्यांच्यावर एके वेळीं आठ-आठ, दहा-दहा मोटा चालायच्या. त्यांची बांधणी सुबक. देखणी. अशा भल्या प्रचंड विहिरी महाराष्ट्रांत कितीतरी जागीं. त्यांतल्या कित्येक अहल्याबाईनें बांधलेल्या.

वऱ्हाडांत विहिरींचें पाणी फार खोल. पन्नास पन्नास हात दोर लागायचा,

तरी बादली बुडतां बुडायची नाहीं. अन् एवढा दोर शेंदून पाणी निघायचें तें सगळें मचूळ. खारें. किती प्यालें तरी पोट भरायचें नाहीं. वऱ्हाड-खानदेशांतल्या या कांहीं आडांची रुंदी अगदीं लहान. माणसानें उडी मारून पलिकडे जावें. जेमतेम पोहरा बुडायचा.

अनेक ठिकाणीं या विहिरींचें पाणी उन्हाळ्यांत पार आटायचें. मग रात्र-भर जितकें सांठेल तितक्या पाण्यावर पहाटपासून सारख्या उड्या पडायच्या. जेमतेम पिण्यापुरतें पाणी मिळायचें. चारचार, सहासहा दिवसांनीं मंडळींनीं स्नानाकरितां कुठें ओढ्या-नदीवर जायचें. या दिवसांत गुरांचे पाणी पिण्याचे फार हाल. जिथें माणसांना धड पाणी प्यायला मिळायचें नाहीं, तिथें बापड्या जनावरांना कोण विचारतो !

पण अशाही ठिकाणीं माणसें राहायचीं. अशाही पाण्याच्या कहरांत आपला गांव, आपलें घर, आपली काळी, आपला गोठा, आपलीं गुरें या सर्वांविषयीं महाराष्ट्रिकांच्या मनांत विलक्षण स्नेह. कांहीं लोक महाराष्ट्रिकांना घरकोंबडे म्हणतात. म्हणोत बापडे ! मातृभूमीविषयीं, आपल्या घरकुला-विषयीं उदासीन असण्यापेक्षां घरकोंबडा म्हणवून घेतलेलें पुरवलें.

कांहीं ठिकाणीं नद्यांचीं पात्रें फार खोल असायचीं. नदीची दरड चढतां चढतां अन् कमरेवरली घागर वागवतां वागवतां बाईच्या अंगांतून तर अर्धी घागर घाम गळायचा. या गांवीं मुली देतांनाही माणसें बिचकायचीं. तरीही वस्ती उघडी पडली नाहीं. ती जशी होती तशीच स्थिर राहिली.

कांहीं गांवीं तळीं असायचीं. बांधून काढलेलीं. कांहीं ठिकाणच्या तळ्यांचें शिल्प फारच प्रेक्षणीय. उदाहरणार्थ, खोपोलीच्या तळ्याचें बांधकाम. काळ्याशार पाषाणाचें. सबंध भांडें लख्ख बेडाग. असेंच एक तळें शिखर शिंगणापूरला भोंसल्यांनीं बांधलें. कांहीं तळ्यांचें पाणी खारें. जसें,वऱ्हाडांतल्या लोणारचें. तिथें तर त्या पाण्याचें मीठहि व्हायचें.

कांहीं तळ्यांना एका बाजूला बांध घालून पाणी अडवलें कीं झालें. कुठें हे बांध नुसते मातीचे असायचे. कांहीं बांध दगडी. कधीं कधीं या दगडी बांधांना खालून निचरा काढून दिलेला असायचा. म्हणजे तलावांतून वाहणाऱ्या पाण्यावर खालच्या अंगाला शेतीहि करतां यावी.

महाराष्ट्रांत जमीन उंचसखल. उतार भरपूर. यामुळें पावसाचें पाणी

या उतारांमधून सारखें वाहात असायचें. तेव्हां त्या वाहत्या पाण्याला कुठेंतरी बांध घातला कीं झालें.

कधीं या असल्या तलावांतून कमळाचे वेल असायचे. कमळाचें पान भलें थोरलें. कुठें कुठें हीं पानें कापून काढून पत्रावळींसारखीं जेवायलाही घ्यायचा प्रघात. या पानाचा विशेष असा कीं,त्यावर पाणी टिकायचें नाहीं. वाहून जायचें. पानें पाण्यावर तरंगत असायचीं खरीं, पण त्या पानांवर पाण्याचा एकही थेंब आढळायचा नाहीं अन् एकटदुकट चुकलामाकला आलाच, तर तो गोळीबंद मोत्यासारखा वर तरंगत असायचा. वाऱ्याच्या झुळुकांबरोबर लोटांगणें घेत असायचा अन् वाऱ्याचा एखादा थपेडा बसला कीं, या नृत्यभूमीवरून उतरून खालीं पाण्यांत मिसळून जायचा. अशीं हीं पानें तलावभर पसरलेलीं असायचीं. मग त्यांमधून वर उमटायचे कळे. सरळ वर. दुरून पाहातां हे कळे एखाद्या ज्वारीच्या कणसासारखे दिसायचे—कमल-नाल नाजूक. त्या नाजूक देठांवर भला टपोरा कळा. मग एके दिवशीं कळा उमलायचा अन् आंतलें देखणें वैभव बाहेर डोकावयाचें. कमळें फुललीं कीं भुंग्यांना आमंत्रण व्हायचें अन् मग भुंग्यांचे थवेच्या थवे तलावाभोंवतीं रुंजी घालूं लागायचे.

कुठें कुठें या तलावांतून शिंगाडे केलेले असायचे. शिंगाडे हें केवळ पाण्यावरलें पीक. त्याचीं मुळें जमिनींत शिरायची गरज नाहीं. शिंगाड्याचे वेल फुलोरणें, त्यांना फुलें धरणें, फळें येणें, तीं पोसणें या साऱ्या क्रिया पाण्यावरच व्हायच्या. शिंगाडे तयार झाले, कीं छोट्या छोट्या नावांमधून माणसें या तळ्यांतून हिंडायचीं अन् अलगद शिंगाडे तेवढे काढून घ्यायचीं.

कधीं कधीं वापर नसला तर हीं तळीं काईनें झांकून जायचीं. कुणी या काईला शेवाळेंही म्हणतात. पण शेवाळें वेगळें. काई वेगळी. बहुधा शेवाळ्याला खालीं आधार लागतो. कांहीं शेवाळीं पाण्यावर तरंगत असतात खरीं; पण तीं जाळीं बांधून. म्हणजे दुधावर साय तरंगावी तसा या शेवाळ्याचा जाळीबंद तुकडा तयार होऊन तो पाण्यावर तरंगत असायचा. ज्या पाण्यावर शेवाळें माजलें, तें पाणी घाणायला लागावें म्हणून समजावें. मात्र काईचें तसें नाहीं.

काई ही एक वनस्पति. प्रत्येक वनस्पति म्हणजे इवलें इवलें पान. हीं

लक्षावधि पानें सुटीं सुटीं एक एकाशेजारीं तरंगत असायचीं. रंग आर्त मोहक. पिवळसर हिरवा. पाहणाराला वाटायचें, कीं पाणी खराब झालें आहे. पण तेवढा तो काईचा थर बाजूला केला—नाजूक थर, कीं आंत निवळ शंख पाणी दिसायचें. अमृतासारखें. ज्ञानेश्वरांनीं काईला म्हटलें बाबुली. ते म्हणतात कीं,—

"जळीं झाली बाबुली। ते जळातेंच झांकोळी।"

म्हणजे पाण्यांतच वाढलेली बाबुली. तिनें पाणी झांकून टाकावें. नवऱ्याच्या मनीं भ्रम व्हावा, कीं हा इथें जणुं हिरवा, मृदु, मुलायम गालिचाच पसरला आहे!

मात्र उन्हाळ्यांत या तळ्यांची दुर्दशा असायची. कुठें कुठें या पाण्यामधून नाना परीचे वेल वाढायचे. कसले कसले. पाणगवतेंहि मोकाट वाढायचीं. त्यांचेहि नाना प्रकार. पाणी उन्हाळ्यांत आटलें कीं आंतलें हें सगळें वैभव उघडें पडायचें. चिखल अन् नाना प्रकारचा गाळ या गवताला अन् वेलाला धरून असायचा. त्याच्यावर उन्हाची क्रिया व्हायची. तो कुजूं लागायचा. मग आंत वायु धरून वर बुडबुडे फुटायचे. नाना प्रकारचे दुर्गंध दरवळायचे. तळ्यांत पाऊल घालूं जावें तर गप्पदिशीं कमरेपर्यंत पाय रुतून बसायचा.

या तळ्यांतलीं अनेक तळीं बांधलीं तेव्हांपासून क्वचितच उपसलीं असतील. दरवर्षीं खोऱ्यांतून आणि ओढ्यांतून अन् पाणलोटांतून तळ्याकडे धांवणाऱ्या पाण्याबरोबर मणोगणतीं माती तळ्यांत एकत्र व्हायची. दर पंधरावीस वर्षांनीं तळीं उपसून काढलीं, तर या मातीचें झालेलें खत शेतांना उपयोगी पडायचें. पण एवढा उद्योग कुणीं केलाच नाहीं. एवढें हें सोनें शेजारीं एकत्र होत असलेलें कुणाच्या ध्यानीं आलेंच नाहीं. सगळे तळ्यांमधून नहात, धूत, स्नानें करीत, आचमनें टाकीत अन् म्हशी पोहवीत राहिले. पण तळाशीं एकत्र होत असलेल्या या बहुमोल खताकडे कुणीं ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं.

परिणाम व्हायचा तोच झाला. सध्यांही बहुधा सगळीं तळीं ओहोरलीं आहेत. जशा खाड्या ओहोरल्या, तशीं. आणखी पांचपन्नास वर्षें जर हा भर असाच सुरू राहिला, तर महाराष्ट्रांतलीं तळीं नामशेष होऊन

जायला फार काळ जायचा नाहीं.

या तळ्यांच्या कांठावर असतात दैवतें. बहुधा या जलदेवताच असायच्या. त्यांना म्हणायचें आसरा. वस्तुतः त्या अप्सरा. अप् म्हणजे पाणी. त्यांत विहार करणाऱ्या त्या अप्सरा. पण त्यांचें मराठमोळें नांव झालें आसरा. त्यांची संख्या सात. मग या तळ्यांविषयीं नाना प्रकारचे प्रवाद पसरले. दरवर्षी हजारों माणसें स्नान करायचीं. कुणीतरी एखादा बुडायचाच. पोहता बुडायचा, बिनपोहता बुडायचा. पण मग याचें कर्तृत्व आसरांकडे द्यायचें.

अनेक तळ्यांना घाट बांधलेले. अन् त्यांच्या बाजूला देवळें. त्या देवळांवर झाडांच्या चवऱ्या झुलत असलेल्या. असें एक बांधीव तळें—त्याच्या वरचा घाट. शेजारीं देऊळ. झाडाच्या छाया—घाटावर संध्या करीत बसलेला एखादा वृद्ध ब्राह्मण—पाण्याच्या कळशा भरत असलेल्या स्त्रिया—हें सगळें दृश्य किती देखणें दिसतें, तें सांगून कळायचें नाहीं. महाराष्ट्रांतल्या एखाद्या खेड्यांत जाऊन प्रत्यक्ष पाहिलेंच पाहिजे—डोळे भरून.

असे हे पाणवठे खेड्यांच्या जीवनांतली एक अत्यंत महत्त्वाची वस्तु. नवख्या माणसाला सुद्धां पाणवठ्याची वाट नीट सांपडायची. कारण त्या वाटेवर राबता असायचा. कांहीं उद्योग नसला—बहुधा अनेकदां हा नसतोच—तर गंमत म्हणून पाणवठ्यावर जाऊन बसावें !

### विश्रांतिस्थानें—

रिकामटेकड्यांनीं गोळा व्हायच्या आणखी कांहीं जागा म्हणजे देवळांचे ओटे, चव्हाट्यावरलीं किंवा तिठ्यावरलीं अंगणें आणि झाडाला बांधलेले पार. खेड्यांत रिवाज असा, कीं बहुधा प्रत्येक गांवीं प्रत्येक खेड्यांतून मारुतीचें देऊळ असायचें. कुठें कुठें मारुतीच्या जोडीला शंकर, विठोबा, डोळसोबा, खेळोबा, अशा दैवतांचींही मंदिरें. यांचा उपयोग दिवसां पोरांना आरडत किंचाळत खेळण्यासाठीं व्हायचा. संध्याकाळीं मायमाउल्या देवदर्शनासाठीं यायच्या. क्वचित् देवळांत दिवा लावण्यासाठीं. रात्र पडायला आली, कीं बायांची आवक थांबायची. मग देवळाचा ताबा पुरुषांकडे जायचा. ज्याला घरीं झोपायला जागा नाहीं, असा एकटदुकट फक्कड घोंगडें घेऊन देवळांत गोळा व्हायचा.

खुंटीला टांगला असायचा पखवाज किंवा मृदुंग. त्याची शाई बहुधा उडालेली असायची. क्वचित् धुमपूड फुटलेलें असायचें. पण भजन्यांना त्याचा विधिनिषेध नाहीं. कुणीकडून ताल बडवायला कांहींतरी वाद्य असलें कीं झालें. दुसऱ्या खुंटाळ्यावर झिजलेले टाळ टांगलेले असायचे.

शनिवारीं, गुरुवारीं बहुधा या रावळांतून भजन व्हायचें. मृदुंग्या लवकर यायचाच नाहीं. तो तर भजनांतला बुवा. मानापानानें यायचा. सर्वांमागून. त्याचें तालसुराचें ज्ञान अकटोपासून विकटोपर्यंत. पण मान मोठा. कारण ज्याला धुमाळी, दादरा असे दोनतीन सोपे सोपे ताल बडवतां येताहेत, असा हा या खेड्यांत एकटाच महापुरुष.

मृदुंग्या येऊन बसल्यावर त्याच्यासमोर मृदुंग आणून ठेवायचा. त्यानें ठाकठोक करून तो लागला असें प्रशस्तिपत्र द्यायचें. कुणातरी पोराला कुण्या घरून कणीक आणायला पिटाळायचें. पोळ्या करण्यासाठीं नव्हे, मृदुंगाच्या धुमपुडाला लावण्यासाठीं. मग मृदुंग धुमधुमूं लागला, कीं पुंडलीक-वरदेचा गजर व्हायचा, अन् रामकृष्णहरि भजन सुरू व्हायचें. महाराष्ट्रांतील कुठल्याच वारकरी भजनांचा प्रारंभ ‘ रूप पाहतां लोचनीं ’ या अभंगाशिवाय होत नाहीं. अभंग मुख्यानें सांगायचा. असें त्यानें आपलें कर्तव्य पार पाडलें, कीं मग इतरांना मोकळीक व्हायची. मग ज्याला ज्याला जो जो फुटका तुटका अभंग येत असेल, तो तो त्यानें त्यानें सुरावर–खरें बोलायचें धारिष्ट करायचें, तर अक्षरशः सुराचा गळा दाबून–म्हणायचा. असें हें भजन चालायचें एक तर कंटाळा येईपर्यंत, किंवा रावळांतल्या पणतींतलें तेल संपेपर्यंत. मग एखादी गवळण म्हटली जायची. बहुधा ही गवळण ‘ कशी मी जाऊं यमुनातीरीं ’ किंवा ‘ राधे तुला बोलावितो ’ हीच असायची. सन्तांनीं याहून अनेक देखण्या गौळणी लिहून ठेवल्या आहेत. पण या भजन्या मंडळींचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं. भजनाच्या शेवटीं घागर घेऊन पाण्याला निघालेली कुणी एक गवळण भजनांत हजरी लावून गेली म्हणजे झालें.

भजनाच्या शेवटीं ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्या आरत्या म्हटल्या जायच्या अन् भजन संपायचें. बहुधा साऱ्या खेड्यांतली भजनाची पद्धति हीच. कुठें भजनाची विशेष व्यवस्था असे. किंवा मंडळी विशेष जाणकार

असतील तिथें या पद्धतींत थोडा बदल व्हायचा.

महाराष्ट्रांत कुठें कुठें आणखीही एका प्रकारचें भजन रूढ आहे. तें दत्त-सांप्रदायिकांचें. बहुधा वारकरी भजनें सगळीं टाळांवर व्हायचीं, तर या भजनामधून झांजा वापरल्या जायच्या. या भजनाचा प्रारंभ 'दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा' या भजनानें व्हायचा आणि समाप्ति 'धन्य धन्य हो प्रदक्षणा श्रीगुरु रायाची' या प्रदक्षणागीतानें व्हायची.

रात्रीं भजन संपल्यावर मंडळी घोंगडींत घुंगशा देऊन तिथेंच लवंडायची. पहांट झाली, कीं देऊळ मोकळें. मग दिवसभर देवळांमधून निरनिराळे अंक सुरू असायचे.

हिंवाळ्याच्या दिवसांत देवळासमोर, पाराजवळ, वडा किंवा पिंपळाखालीं, चौकाच्या जरा एका अंगाला, अशा शेकोट्या पेटायच्या. पहांटे कुणी परोपकारी चार कडब्याचीं ताटें गोळा करून हा यज्ञीय अग्नि एकदां पेटवून द्यायचा. मग या शेकोटीजवळ गांवांतल्या म्हाताऱ्यांपासून तों पोरांपर्यंत सगळे थर जमायचे. आपआपलीं कांबळीं किंवा चादरी नीट पांघरून घेऊन दोन्ही हात अग्नीला दाखवीत हीं सगळीं माणसें शेकत बसायचीं. तोंवर पहिल्या महात्म्याचें पुण्यकृत्य संपायला आलेलें असायचें. मग आपआपल्या सास्वा आणायची पाळी यायची पोरांवर. कुणीतरी गोम्या उशीरां उठून या धुमाळींत शिरायला यायचा.

त्या लबाडानें आपल्या सासूबाईच्या परसांत असलेल्या भोपळ्याच्या वेलीची गोष्ट सांगायला प्रारंभ करावा, अन् मग तो भोपळा केवढा वाढला, हें दाखवतां दाखवतां त्या कोंडवाड्यांत त्याची जागा व्हायची. असें छानदार तापत बसलें असतां नाना प्रकारच्या लफ्फेदार गोष्टी निघायच्या. भुताखेतांच्या—लग्नासाठीं गेलेल्या वऱ्हाडांच्या. नदींत बुडालेल्या माणसांच्या.

तंवर धुक्यांतून वर उठून वडापिंपळाच्या फांद्यांमधून उन्हें या शेकणाऱ्या मंडळींच्या अंगावर उतरायचीं. हळूहळू तापण्याची गरज उणावायची. मग हा जमलेला फड उठायचा.

कधीं हिंवाळ्याचीं माणसें घोंगड्यांत गुरफटून वडांच्या पारांवर आदबशीर बसलेलीं असायचीं—मिश्रीनें दांत घांशीत. हे अड्डे मात्र बराच वेळपर्यंत उठायचे नाहींत. गांवांतल्या नाना प्रकारच्या पंचायती इथेंच उकरल्या

जायच्या. गांवांतलीं भांडणें-भानगडी, भाऊबंदक्या यांचा एक निस्तरा तरी व्हायचा किंवा बीं तरी इथें पडायचें. शेवटीं कांहीं काम निकरावर आलें, तर माणसें उठून यायचीं. एरवीं रिकामटवळे लोक या पारावर किंवा चौकामधून दिवसभर बसूनच असायचे, त्यांचीं बुडें जीं सकाळीं येऊन टेकायचीं, तीं पार रात्र होईपर्यंत. डिंक लावल्यागत तिथेंच चिकटून असायचीं.

गांवांत नाना प्रकारचीं कामें असायचीं—शेतांची नांगरणी, कुळवणी, कापणी, कधीं सटीसामाशीं विहिरी खणणें. बाभळीच्या काट्या तोडणें, त्या कुपाटीला लावणें, कडब्याचें गूड घालणें–उतरणें, पेवें भरणें आणि उकरणें.

पेवें—

कधीं कधीं धान्य इतकें व्हायचें, कीं तें घरांत सांठवून ठेवणें शक्य व्हायचें नाहीं. मग दारासमोर रस्त्यांत विहिरीसारखे मोठमोठे खड्डे काढायचे. ते बांधून काढायचे नाहींत. खोली दहा-दहा, वीस-वीस हात असायची. पाण्याचे झरे खालीं लागायच्या आंतच पेवांचे तळ असायचे. मग हीं पेवें धान्यानें भरून ठेवायचीं. पार गळ्यापर्यंत भरलीं कीं वर कडबा अंथ-रायचा. चार दांडकीं आडवीं टाकायचीं अन् माती लोटून द्यायची. पुन्हां रस्ता पहिल्यासारखा.

कधीं कधीं घराच्या रुंद भिंतींमधून घरें बांधतांनाच हीं अशा प्रकारचीं धान्याचीं सांठवणें ठेवलेलीं असायचीं. त्यांना म्हणायचीं बळदें. हीं मोठ-मोठाल्या घरांमधून असायचीं. त्यांच्या भिंती भल्या रुंद. चार-चार हात. अशा या बळदांमधून खंडी-खंडी, दोन-दोन खंडी धान्य सांठायचें.

पेवांबळदांतलें धान्य उगीच वारंवार काढायचें नाहीं. धान्याचा तसाच तुटवडा भासायला लागला, तरच पेव उपसायचें. कारण पेव काढलें, कीं तें सगळें काढलें पाहिजे. अर्धवट काढतां उपयोगाचें नाहीं. अर्धवट काढलें तर पेवाचा कढ मोडतो. धान्य खराब होतें. म्हणून पेव उपसायचें झालें तर सगळें उपसायचें.

ज्या भागांत पर्जन्याचें मान अधिक, त्या भागांत सहसा पेवें नसायचींच. जिकडे पाऊस उणा अशा विदर्भ, मराठवाडा, बालेघाट या बाजूला पेवांचें

प्रमाण अधिक. दोन-दोन तीन-तीन वर्षें हीं पेवें न उपसतां तशींच राहायचीं. मग त्यांच्या खुणा वाऱ्यावावधुळीनें बुजायच्या. नेमका माहितीचा माणूस असल्याशिवाय पेव कुठें आहे, तें कळायचेंसुद्धां नाहीं.

जागल्या—

मात्र गांवांतल्या या सगळ्या खाणाखुणा गांवांतल्या जागल्याला किंवा महाराला माहीत असायच्या—महार किंवा जागल्या ही जणुं गांवची आईच. त्याच्याभोंवतीं किती कामें? असंख्य!

चावडींत पाटीलबुवा बसलेले असायचे. त्यांच्या जोडीला कुळकर्णी किंवा तलाठी. यालाच कुठें कुठें पांडेबुवा किंवा पटवारीहि म्हणायचें. कुळकर्णी हें गांवाचें डोकें. साऱ्या बऱ्यावाईट भानगडी कुळकर्ण्याच्या मेंदूंत शिजत असायच्या. तो माणूस बरा लाभणें, हें एका अर्थानें गांवाचें भाग्यच. चांगला सज्जन असला, तर गांव उद्धरून न्यायचा. वांकुडवळण्या बुद्धीचा असला, तर गांवाची राखरांगोळी करायला घडी कांहीं लागायची नाहीं.

पण पाटील, तलाठी किंवा कुळकर्णी नुसतीं सहीशिक्क्यांचीं माणसें. हुकुमाचे धनी. त्यांचे हातपाय, म्हणजे महार किंवा जागल्याच.

जागल्यानें चावडी झाडायची. पाटील--तलाठी चावडींत आले, कीं आदबीनें एक्या आंगाला उभें राहायचें. कुणी सरकारी कामगार आला, कीं त्याच्या दिमतीला हजर असायचें. आपल्या पोटीं धोंडा बांधून त्याच्यासाठीं अक्षरशः धांवत असायचें. त्याचा घोडा असला—त्याला खरारा, तोबरा, कडबा घालून चरायला सोडणें, परत आणून ठाणावर तयार ठेवणें, हें सारें जागल्यानें करायचें.

त्याची गाडी, बैलजोडी असली तर तिच्यासाठीं वैरण, दाणा, कूट जमविणें, त्यांची सोडबांध करणें, पाणी पाजविणें या सगळ्यांचा मक्ताही जागल्याकडेच दिलेला.

शिवाय मक्याचे दिवस असले, तर कणसें, हुरड्याच्या दिवसांत हुरडा, ओंब्याच्या घातीं ओंब्या, हुळा या सगळ्याची व्यवस्था सरकारी कामगारां-साठीं जागल्यानेंच करायची. त्याला पाहिजे असतील तीं माणसें जागल्यानें

बोलावून आणायचीं. एकदां दोनदां चारदांही. खेपा घालून. काळी-पांढरींत काम असलें तर शेताच्या खुणा जागल्यानें दाखवायच्या. त्यांचे बांध जागल्याला माहीत असायचे. अरतें परतें एखादें तास एखाद्यानें बळकावलें, तर साक्ष जागल्याची निघायची. बांधावरल्या फळझाडांच्या फळांची वांटणी कशी, हें शपथेवर जागल्यानें सांगायचें. कुणाच्या शेतांत काय पेरलें आहे, कुणाचें शेत पडीत आहे, या सगळ्यांचा पत्ता जागल्याला असायचा.

एवढ्यानेंच भागलें नाहीं. कामगार कुठें गांवीं निघाला—मग तो गांव-कामगार असो कीं बाहेरचा सरकारी, त्याचें ओझें वागवीत जागल्यानें त्याच्या मागें धांवायचें. जिथें जायचें असेल, तिथें पोंचल्यावर जेव्हां कामगार जेवणें झोडीत असेल, तेव्हां तें सामान, घोडा, गाडी हें सगळें सांभाळीत अन्नपाण्याविना उपाशीतापाशीं जागल्यानें बाहेर ताटकळायचें.

गांवच्या साऱ्याचा भरणा जागल्यानें करायचा. एकट्या जागल्याच्या स्वाधीन गांवच्या साऱ्याची सगळी रक्कम देऊन कामगारानें त्याला तालुक्याचे गांवीं एकटें धाडायचें; पण या रकमेंतला पै-पाव आणा उणा करावा, अशी हरामखोरी जागल्याच्या मनीं स्वप्नांत सुद्धां उद्भवायची नाहीं. प्रामाणिक-पणाची जणुं जागल्याला बाळघुटीच पाजलेली.

रात्रीं गांवची राखण जागल्यानें करायची. दरोडेखोर आले, तर त्यांच्याशीं सामना जागल्यानें द्यायचा. थंडीचा कडाका असो—पावसाची मुसळधार सुरू असो, कीं उन्हाळ्यानें जीव जात असो, गांवकऱ्यांनीं जागल्याच्या विश्वासावर निश्चिंत असावें. धनावरल्या नागासारखी जागल्या गांवची राखण करीत असायचा—जागल्या जागतो आहे. आपल्या राखणीची पांखर साऱ्या गांवावर घालून—तेव्हां आतां अवघ्यांनीं निश्चिंत असावें. आई तरी याहून वेगळें काय करते ?

बरें, या सगळ्याबद्दल जागल्याला मिळायचें काय ? तर जेमतेम पोट अर्धवट भागेल, एवढें इनाम अथवा दहावीस रुपड्या पगार. मग जागल्या-येसकराच्या बायलीनें संध्याकाळीं दारोदार उभें राहून भाकर मागायची. कुणीं घालावी, कुणीं न घालावी. कुणीं उरकलें म्हणून सांगावें, कुणीं वेळ आहे म्हणून जबाब द्यावा !

पण अशाही स्थितींत येसकरें गांव धरून राहिलीं. कालपरवांपर्यंत राहिलीं. त्यांनीं गांवांना सोडलें नाहीं. गांव त्यांना दूषणें देत गेलें. छळीत गेलें. उपाशीतापाशीं ठेवीत गेलें. पण बाळपणीं नेकीचा घोट घेतलेला असल्यामुळें येसकर गांवाशीं प्रामाणिक राहिला.

आळ्या आणि गल्ल्या—

येसकरांवरून इतर बलुत्यांवर जाऊन पोंचण्यापूर्वीं हें खेटक-रचना प्रकरण पुरें केलें पाहिजे. येसकरांचीं–महारांचीं घरें गांवाबाहेर असायचीं. पलिकडल्या अंगाला मांगवाडा. ढोरही त्यांच्या शेजारीं. त्या मानानें चांभारांची वस्ती जरा गांवाजवळ.

पडक्या वेशींतून आंत शिरतांक्षणीं एखाद्या निंबापिंपळाखालीं असलेलें ग्रामदेवतेचें राऊळ दिसायचें. शेजारींच असलीं तर जुजबी किराणा विक-णारीं एक-दोन दुकानें. तिथून मग गांवभर फुटायचें. बहुधा साऱ्या जमाती आपापलीं घरें एक्या आळीला बांधून राहायच्या. बामण आळी एक्या बाजूला. शिंपी, कासार, सोनार यांचीं घरें एका बाजूला. त्यांच्या शेजारीं धनगरांचीं.

मराठ्यांचीं घरें गांवभर पसरलेलीं असायचीं. पण ज्या त्या आडनांवाच्या कुळाची जी ती आळी असायची. जशी ढमाल्यांची एक आळी. गराड्यांची एक आळी. शिंद्यांची एक आळी. पवारांची एक आळी.

बहुधा प्रत्येक गांवांत गुरवाचें घर असायचें. तें रावळाशेजारीं. गांवांत मुसलमानांचीं घरें असलीं, तर तींही एका आळीला. मग या लोकांची मशीद गांवाच्या एका अंगाला असायची अन् गांवाबाहेर असायचा निमजगा. मुसलमानांचीं घरें पटकन् ओळखूं यायचीं. बहुधा दारावर टांगलेले जुनाट पडदे, घरांना फासलेला पांढरा रंग, कोंबड्या-बदकांची अनिर्बन्ध येजा, ही मुसलमानांच्या घराची खूण.

पण एकटा मुसलमानच कां, बहुधा प्रत्येकच जमातीचें घर आपआपल्या वेगळेपणानें उठून दिसायचें. दारांसमोर अगर मागें औतें असतील, घरा-जवळ गोठा असेल, अंगणांत जनावरांच्या येण्याजाण्यानें राड झाली असेल, तें घर शेतकऱ्याचें. घरांमागें परसूं असेल, त्यांत तुळशीवृंदावन असेल,

समोरल्या दाराला आंब्याचें एखादें तोरण बांधलें असेल अन् त्याच्या खालीं 'श्रीजगदंबा प्रसन्न' किंवा 'श्रीदारणेश्वर प्रसन्न' असें कांहींतरी लिहिलें असेल, तर बहुधा तें घर ब्राह्मणाचें म्हणून ओळखावें.

अंगणांत घोंगडीचा ताणाबाणा असेल, तर तिथें खुटेकर धनगर राहातो असें समजावें. कसायाच्या घरासमोर मेलेलें बकरूं टांगलेलें असायचें. दारासमोर तुळसीवृंदावन आणि भिंतीवर 'पुंडलीकवरदे' असें कांहीं लिहिलें असेल तर तें घर माळ्याचें तरी, किंवा माळकऱ्याचें तरी. माळीमंडळींत वारकरी फार.

वऱ्हाडांत बहुधा गांवागणिक एखादें मानभावाचें घर असायचें. त्या भागांत मानभावांची वस्ती फारच असली, तर पांच-दहा कोसांत मानभावाचा एखादा मठही आढळायचा. मुंडन केलेले, काळीं वस्त्रें नेसलेले अन् डोईस तांबूस फेटा बांधलेले मानभाव पुणेरी जोड्यांसारखें पायताण पायांत घालून रस्त्यानें चाललेले आढळायचे.

## कांहीं वैशिष्ट्यें—

गांवाच्या मधोमध एखादा पिंपळ असायचा. त्यावर दिवसभर कावळे कावकाव करीत असायचे. चिमण्या, मैना, पारवे असलीं पांखरेंही गांवाभोंवतीं घोटाळायचीं. कुत्रीं तर गांवांत मुबलक. विशेषतः खेड्यांतील कुत्रीं फार तिखट. नवख्या माणसाचें भुंकून भुंकून नुसतें भुसकट पाडायचीं. जशीं कुत्रीं, तशींच मांजरेंही. तीं घरोघर हिंडायचीं अन् न मिळालें, तर चोरून-मारून दहीं-दूध खायचीं. त्याबरोबरच रहेही. मांजराला जीवें मारलें तर काशीस जावें लागतें, असा संकेत. त्यामुळें कुणी मांजरूं ठार मारायचें साहस करायचें नाहीं.

अनेक गांवांतून गांवदेवाच्या नांवानें एखादा बोकड किंवा एखादा पोळ मोकळा सोडलेला आढळायचा. हा पोळ वाटेल त्याच्या शेतांत शिरून हवें तें खायचा. कुणीं हांकायला धांवलें, तर त्याला शिंगावर घ्यायचा. कुठें कुठें गाईही देवाच्या नांवें सोडलेल्या असायच्या.

गांवाभोंवतीं क्षुद्र देवतांचीं देवळेंही आढळायचीं. कुठें एखाद्या झाडाखालीं मरीमाय असायची. कुठें सटवाई. कुठें एखाद्या पिंपळाखालीं भला

थोरला धोंडा शेंदूर फासलेला असायचा. त्याला म्हसोबा म्हणायचें. या साऱ्याच देवतांना अडाणी माणसें नवस करायचीं. अन् मग कधींमधीं एखादें बकरूं कापलें जायचें.

उन्हाळ्यांत खेडीं सडकून तापायचीं. विशेषतः वऱ्हाड-मराठवाड्यांत दुपारच्या वेळीं आकाशांत बारा आदित्य तळपत असायचे. श्वास घ्यावा, तर तो सुद्धां उष्ण. अशा वेळीं पाणी ढोशीत आणि तोंड बाहेरच्या झगझगाटापासून लपवून कशीतरी दुपारची वेळ काढायची. दुपारीं दोन-तीनच्या सुमाराला वारे वाहायला लागायचे. गरम वारे. भगभगीत. या वाऱ्यांच्या आगीनेंच वेळीं पांखरें पटापट प्राण सोडायचीं. धुळीचे लोळ उसळायचे. गरगरत ते आकाशावेरीं जाऊन पोंचायचे. त्या धुळीनें सारीं खेडीं झांकाळून जायचीं.

पावसाळ्यांत हीं खेडीं टोंब पावसाखालीं थुईथुई भिजत असायचीं. काळींतून अन् पांढरींतून ढोपर ढोपर चिखल व्हायचा. अशा या चिखलांतच प्रातर्विधीला जायला लागायचें. एक पाय काढायचा. दुसरा रोवायचा. याच मोसमांत खेड्यांमधून सुरू व्हायचा माशांचा कहार. मुलुखावेगळ्या माशा. कुठें कुठें तर इतक्या माशा, कीं वाढलें ताट दिसायचेंच नाहीं. माशांचाच हलता थर दिसायचा.

मग पावसाळा उणावून डोकावयाचा हिंवाळा. हिंवाळ्यांत सारें खेडें थंडींत गुरफटून असायचें. हातपाय गुंडाळून. खेड्याला धरून आकाशांतून धुक्याचा जाड थर उतरायचा. तो सारें खेडें वेढून बसून रहायचा. आठ-आठ, नऊ-नऊ वाजेपर्यंत जागचा हलायचा नाहीं. त्या धुक्यांतून डोळे फाडफाडून पाहावें तों खेड्यांतलीं माणसें फाटकीं कांबरुणें लेऊन, दांत थडाथडा वाजवीत तशींच कामाशीं झटया घेत असायचीं.

महाराष्ट्राच्या इतिहासाचा जिथपर्यंत मागोवा घेतां येतो, तिथपासून कालपरवांपावेतों सामान्यपणें खेडीं हीं अशीं होतीं. राज्यें आलीं आणि गेलीं. शाह्या उगवल्या, नांदल्या आणि मावळल्या. चक्रवर्ती सामन्तांनीं बिरुदें मिरविलीं आणि धुळीला मिळाले. परचक्रें आलीं—दिसेनाशीं झालीं. अनेकदां देश उद्ध्वस्त झाले, पुन्हा वहिवाटीस लागले. घुबडांनीं वसत्या

केल्या अन् पुन्हा गांवोगांव दिवेलागण झाली. दुर्गादेवीसारखे बारा बारा वर्षांचे दुष्काळ आले, रोग आले, अरिष्टें आलीं, संकटें आलीं—

तरी पण महाराष्ट्रांतलीं खेडीं सामान्यपणें याच रीतीनें जिणें जगलीं. त्यांच्यांत कांहीं अधिकउणें झालेंच नाहीं.

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों. दि ..................

## बारा बलुतेदार—

महाराष्ट्रांत नाना कुळी नांदल्या. नाना पंथ. नाना जाति. उपजाति. स्पृश्यास्पृश्य भेद. बामण-मराठ्यानें म्हारास शिवायचें नाहीं. महारानें मांगाचा विटाळ करायचा नाहीं. मांगानें ढोराच्या हातचें पाणी प्यायचें नाहीं. या सर्वांनींच मिळून भंग्याचा वारासुद्धां अंगावर येऊं द्यावयाचा नाहीं.

कसे निर्माण झाले हे भेदाभेद ? इतरत्र सगळीकडे झाले तसेच. केवळ महाराष्ट्रिकांचे भावनावेग तीव्र. यामुळें या भेदांच्या प्रतिक्रिया तीव्र उमटल्या, एवढेंच.

तसें पाहिलें तर या उपजाति निर्माण केल्या व्यवसायांनीं. सगळीं कामें एकट्याला साधायचीं नाहींत. त्यामुळें एकेकानें एक एक काम वांटून घेतलें. मग त्याच्या घरीं वंशपरंपरा तेंच काम चालू राहिलें. त्या कामांत त्याला कसब लाभलें. कांहीं कुलगत गुण निर्माण झाले. कांहीं वांशिक वैशिष्ट्यें लाभलीं. अन् मग ते ते व्यवसाय त्या त्या जातींनींच करावेत असें ठरलें.

खेड्यांतलें जीवन चालण्यासाठीं यांपैकीं नाना कसब्यांची जरुरी. त्यांच्या त्यांच्याकडून तें तें काम करवून घ्यायचें, अन् रोख पैका द्यायचा नाहीं. खळीं भरलीं, कीं ज्या त्या व्यवसायाप्रमाणें ज्याची त्याची पडशी धान्यानें भरायची. याला म्हणायचें बलुतें पद्धति.

सामान्यपणें हे बलुतेदार बारा असायचे. महार, मांग, सोनार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, जोशी, गुरव, मुलाणी, न्हावी आणि परीट.

पैकीं पहिल्या क्रमांकाचे बलुतेदार म्हणजे महार, लोहार, चांभार,

सुतार, सोनार आणि मांग. कुंभार, न्हावी आणि परीट यांचा क्रम दुसरा. तर जोशी, गुरव आणि मुलाणी हे तिसऱ्या क्रमांकाचे बलुतेदार.

पैकीं महाराचीं कामें वर सांगितलीं. येसकरकी, जागलकी, हे दोन्ही उद्योग महारांनींच करायचे. त्याबद्दल रोजच्या भाकरीवेगळें वर्षाचे शेवटीं त्याला अधली-पायली बलुतें मिळायचें.

शेतीला अवजारें लागायचीं. नांगर, मोघड, फराट, पाभर, कुळव, कोळपें अशीं नाना प्रकारचीं. कधीं नांगराची हळस मोडायची. कधीं रुमणें नवें ठोकायला लागायचें. झालेंच तर शिळवाटी, जूं, अशीं नाना परीचीं साधनें साल दों सालीं बदलावीं लागायचीं. बैलगाडीचें कामहि असायचें. तेव्हां मग सुतार एक अत्यंत आवश्यक बलुतेदार.

सुताराच्या जोडीचाच एक बलुतेदार म्हणजे लोहार. लोहार आणि सुतार हरगांवीं नसायचे. दो-चौ गांवांमिळून कुठेंतरी असायचे. विशेषतः नांगरणीच्या अन् कापणीच्या दिवसांत लोहाराचा भाता सारखा सुरू असायचा. त्यानें नांगराला फाळ घडावा. कुळवाचीं अन् नांगराचीं वसवें घडावींत. कोळप्यांचे फाळ, कुळवांचे, पाभरींचे आणि मोघडांचे फाळहि त्यानेंच घडावेत. खुरपणीच्या दिवसांत खुरपीं, कापणीच्या दिवसांत विळे. एरवींच्या फुरसतीच्या वेळांत कुऱ्हाडी, कुदळी लोहारानें घडायच्या आणि शेवटायच्या प्रसंगीं सुताराची वाकस, किंकरें, पटाशी हीं असलीं हत्यारें सुद्धां लोहारानेंच बनवायचीं. या प्रत्येक अवजारामागें त्याला कमीअधिक बलुतें मिळायचें. वेळीं लोहार न आढळला, तर फिरस्त्या घिसाड्या-कडूनही शेतकऱ्यांनीं हीं कामें करून घ्यावींत.

त्यानंतर क्रम चांभाराचा. शेतकऱ्याला हजार ठिकाणीं चांभाराची जरूर लागायची. पहिली महत्त्वाची गोष्ट पायतण. रात्रंदिवस कांट्याकुट्यांत वावरावें लागायचें. दगडाढेकळांतून चालावें लागायचें. तसे शेतकऱ्याचे पाय मजबूतच असतात. कांट्याकुट्यांची तो फारशी पर्वा करतो, असें नव्हे. कुण्याही शेतकऱ्याचा तळपाय पाहावा, पांचसात कुरुपें आढळायचींच. तरी पण पायांना असें सतत कांट्यांच्या धारेवर धरणें बरें नव्हे. म्हणून पायांत पायतण. गोफणीचा पट्टा, चाबूक, आसूड, मोटेचा नाडा, मोट, असें हरघडीं चांभाराकडे काम लागायचें. चांभारानें कातडें ढोरांकडून

ध्यायचें. वजनावर. ढोरानें मेलीं ढोरें फाडून तें कमवायचें. तरवडाच्या अन् बाभळीच्या साली, चुना अशीं रसायनें घालून. त्यानें ओल्या कातडयाच्या खोळा शिवायच्या. त्यांत हीं रसायनें घालून पाणी भरून ठेवायचें. अशीं त्यानें कातडीं तयार करायचीं अन् तीं चांभाराला विकायचीं. चांभार आणि ढोर हे दोघेही बलुतेदार म्हणायचे. पैकीं चांभाराचा क्रम जरा वरचा. ढोराचा कणभर उणा.

यानंतर गरज पडायची मांगाची. मांगानें केकताडें कापायचीं. त्यांच्या चिरफळ्या करायच्या. मग तीं पाण्यांत भिजूं घालायचीं. कुजलीं म्हणजे आणून बडवायचीं. कुटायचीं. तंतु अन् तंतु मोकळा झाला, म्हणजे त्यांच्या दोऱ्या वळायच्या. त्या दोऱ्या वळण्याचेंही एक तंत्र. एक लांकडी फळी आडवी ठोकायची. तिला चार भोंकें. त्या चार भोंकांच्या अलिकडे रहाटासारखें किंवा सायकलच्या चाकासारखें एक भिरभिरें. त्याला त्या चार भोंकांतून बाहेर निघालेल्या चार दोऱ्यांचीं टोंकें अडकवायचीं. एकानें तें भिरभिरें फिरवीत असायचें. चौघांनीं त्या चार छिद्रांतून वळल्या जाणाऱ्या चार दोऱ्यांना घायपाताचे तंतु अडकवीत असायचें.

अशा बारीक दोऱ्या वळून झाल्या म्हणजे मग त्यांचे नाडे वळायचे. सौंदर, कासरे, म्होरक्या. तात्पर्य, हीं सगळीं कामें मांगानें करायचीं. याबद्दल त्यालाही बलुतें मिळायचें. याशिवाय मांगाकडे कांहीं फालतू आगाऊ कामें. मांगांतले कांहीं जण पोतराजकी करतात. पोतराज हा मरीआईचा भगत. डोईवर केस राखलेले. भल्या भक्कम केरसुणीसारख्या मिशा. कपाळ सारें शेंदरानें माखलेलें—अंगांत कुडतें अन् नेसूच्या परकराला दहाबारा खण तिरके बांधलेले. पायांत एक भला थोरला घुंगुरवाळा. हातीं एक भला सपाटेदार कडाका.

मग कधीं हा पोतराज डोईवर मरीआईचा डोलारा घेऊन भीक मागत हिंडायचा. कधीं त्या कडाक्याचे आसूड आपल्याच पाठीवर उडवीत असायचा. वस्तुतः त्या आसुडाचा आवाजच अधिक मोठा व्हायचा. पण बायाबापडया भयानें किंचाळयच्या. याच वेळीं पोतराज कानांतल्या किडी मरेपर्यंत आरडायचा. मग माया माउल्यांनीं त्याला सूपपसा दाणे आणून घालावेत ! मांगाचें आणिक एक फालतू काम म्हणजे सटींसामासीं गांवांत

पैपैका मागवून मरीआईची पूजा बांधायची. कुण्या एखाद्या बाईच्या अंगांत मरीआई यायची. ती अंगीं भूत घातल्यागत घुमत असायची. तिच्या डोक्यावर निंबाचे टाळे वारीत माणसें तिच्या भोंवतालीं चालायचीं. पोतराज पुढें डफडें वाजवीत चालायचा. अशी ही फक्कडबाज मिरवणूक मरीआईच्या देवळाजवळ जायची. तिथें या सगळ्या दृश्यांनीं भारावलेला एखादा भोळाभाबडा मरीआईला एखादें बकरूं कबूल करायचा; अन् मग पोतराज एखाद्या राक्षसपार्टीसारखें किंचाळून, आतां तुम्हांला मरी-आईचें अभय आहे, असा आशीर्वाद प्रकट करायचा.

सोनार हाही ग्रामसंस्थेंतला एक महत्त्वाचा बलुतेदार. त्यानें देवांचे टाक घडवून द्यावेत. सोन्याचे आणि रुप्याचे. शिवाय वेळा, वांक्या, कडीं, तोडे, ठुशा, गांठलीं, पुतळ्या, नथी, बाळ्या, बुगडया, अंगठ्या, असा सगळा मराठमोळा दागिना या खेडयांतल्या सोनारानें घडवावा.

पण इतिहासकालीं सोनाराकडे आणिक एक जबाबदारीचें काम होतें. अनेक ठिकाणीं टांकसाळी असायच्या. त्यांमधून नाणीं पाडलीं जायचीं. चांदीचीं, तांब्याचीं अन् अगदीं क्वचित् सोन्याचीं. हीं नाणीं पारखण्याचें अन् वजन करण्याचें काम सोनारांकडे असायचें. म्हणून त्यांना पोतदार असें गौरवास्पद नांव मिळालें होतें.

मग क्रम लागतो कुंभाराचा कुंभारानें माती आणावी. ती चाळावी–गाळावी. तींत गाढवाची, घोड्याची लीद मिसळावी. मग ती भिजवून मळावी. हातानें नव्हे, अक्षरशः पायानें तुडवावी. अशा तयार मातीचा लोण्यासारखा गोळा तयार झाला, म्हणजे त्यानें आंसावर आपलें चाक घालावें. त्याच्या मधोमध या तयार मातीचा गोळा ठेवावा, अन् दांडक्यानें तें गरगर फिरवावें. हें चाक भलें जड. अगोदर फिरवायला कठीण जायचें. अन् एकदां गति मिळाली कीं मग लवकर थांबायचें नाहीं. मग त्या गतीचा आश्रय घेऊन मधल्या गोळ्याला कुंभारानें नाना परींचे आकार द्यावेत. लोटकीं करावींत. गाडगीं करावींत. लोटे, परळ, दिवल्या, झांकण्या, अशा नाना परींचीं भांडीं रचून झालीं कीं, मग तीं वाळवावींत. त्यांचे आवे रचावेत. ते भाजून काढावेत अन् मग भांडीं गाढवावर घालून बाजारांत विकायला न्यावींत. मात्र ज्या गांवांत कुंभार राहायचा, त्या गांवांतल्या

वतनदारांना रांजण, परळ, मडकीं, दुधाण्या अशीं हीं वेगवेगळालीं भांडीं लागतील तसतशीं त्यानें पुरवायचीं; अन् मग खळ्यावर बलुतें व्यायचें.

आठ-पंधरा दिवसां का होईना पण शेतकऱ्यांना न्हाव्याची गरज लागायची. बलुतेदार न्हावी प्रत्येक गांवीं असेलच, असा भरंवसा देतां यायचा नाहीं. तो दो-चौ गांवांत मिळून एक असायचा. एखाद्या दिवशीं त्याचा फेरा गांवांत वळला, म्हणजे त्यानें पारावर बैठक मारायची. कळ-कटलेल्या वाटींत थंड पाणी घ्यायचें. शिळेवर गांवठी वस्तरा लावायचा अन् मग जीं डोकीं भादरायला सुरुवात करायची, ती संध्याकाळपर्यंत. कुणी माणूस कावलें म्हणजे त्यानें नुसतें हूंहूं करायचें. त्या वेळीं तोंडांतून जाम शब्द काढायचा नाहीं. कावण्याचीं कारणें दोन. एक त्यानें केलेला उशीर अन् दुसरा करवतीसारखा चालणारा त्याचा वस्तरा. अक्षरशः डोक्यावरून नाका-हनुवटीपर्यंत रक्ताचे ओघळ वहायचे. एखादा फारच भडकला, तर न्हाव्यानें मिशींतल्या मिशींत हंसत त्याचें अंगबिंग दाबून द्यायचें, कीं वतनदार खूष. एरवीं न्हाव्याच्या तोंडाचा पट्टा असा चालायचा, कीं पुसूं नका. तोंड आणि वस्तरा दोन्ही सारख्याच गतीनें. डोई भादरून झाली, कीं मग न्हाव्यानें धोपटींतून आंब्याची कोय काढायची. तिचा अर्धा भाग कापलेला असायचा; अन् मग उरलेल्या अर्धकाला करवतीसारखे दांते पाडलेले. ती कोय डोक्यावर उभी घासून न्हाव्यानें डोक्यांतलें भुसकट सगळें खरवडून काढायचें. निपाण्या गांवांत आठ-आठ दिवस स्नान घडायचें नाहीं. मग डोक्यांत भुसकट न होईल तरच नवल. हजामतीबरोबरच न्हाव्याबरोबर असायची नराणी. तिनें त्यानें पायांतलीं कुरपें काढायचीं अन् नखें.

एकूण सगळ्या बलुत्यांत सगळ्यांत तोंडाळ बलुतेदार न्हावी, हें तर कबूल केलेंच पाहिजे. तोंडाळ, हिकमत्या, चलाख—या बाबतींत न्हाव्याला दुसरी जोड नाहीं.

यानंतर पाळी येते परटाची. परीट हा एक श्रमी बलुत्या. याच्यासारखे कष्ट एक जागल्याच करूं जाणे! रात्र नाहीं, दिवस नाहीं. अवस नाहीं, पुनव नाहीं. असें जर कुणाला श्रमावें लागत असेल, तर एका परटाला. त्यानें घरोघरचीं कापडें गोळा करायचीं. मग ओढ्या अगर नदीकांठीं जाऊन भट्टी लावायची. भट्टी तयार झाली, कीं गुडघाकंबर पाण्यांत उभें राहून तीं

कापडें बडवायचीं. वाळत घालायचीं. इस्त्री करायची. घरोघर नेऊन पोंचवायचीं. पुन्हा सगळ्या बलुत्यांत बदनाम बलुत्या म्हणजे परीट. एवढीं खंडीभर कापडें गोळा व्हायचीं. त्यांत एखाददुसरें हरवलें तर नवल नाहीं. एखादा पिळा लक्ष नसतां पाण्यांत वाहून जातो. एखादें कापड फाटतें. उसवतें. टरकतें. आतां यांत परटाचा काय दोष ?

त्यानें बिचाऱ्यानें घरोघरचीं कापडें नीट मोजून आणायचीं. त्या कपड्यांवर बिब्याच्या तेलानें खुणा करायच्या. या असंख्य खुणा परीट कशा करतो, त्या काय असतात अन् परटाला कशा ओळखूं येतात, हें सारेंच इतरांना गूढ आहे. जसा ब्रह्मविद्येचा उकल पडत नाहीं, तशाच परटाच्या खुणाही सामान्य माणसाच्या डोक्यांत शिरत नाहींत.

पण एवढें सगळें करूनही कधींकाळीं एखादें कापड हरवल्याबद्दल किंवा फाडल्याबद्दल परीट मात्र जन्माचा खोडकरी ठरायचा. कानफाट्या नांव पडलें कीं पडलें. कुठेंही इतरत्र कापड हरवलें असलें तरी परटावर लोटून द्यावें !

परटाच्या गळ्यांत आणिक एक काम बांधलें आहे. वतनदाराचीं नवरानवरी जेव्हां लग्नाच्या वेळीं मिरवतील, तेव्हां त्यांच्या डोक्यावर चादरी धरण्याचें काम परटाकडे. त्यानें विहिणीसमोर पायघड्या घालाव्यात. पायघड्या म्हणजे असें, कीं जेव्हां विहिणी मिरवायला निघतील, त्या वेळीं त्यांच्या रस्त्यावर आळीपाळीनें दोन चादरी अंथराव्यात. दुसरी चादर अंथरून होईपर्यंत पहिल्या चादरीच्या टोकावर सगळ्या विहिणी गर्वानें चहूंकडे पाहात उभ्या राहातात. परटानें बिचाऱ्यानें चादरी घालघालून कंबर मोडून घ्यावी, अन् एखादी चादर पसरण्यास उशीर झाला, तर व्याह्यानें त्याच्यावर डोळे काढावेत. अशा या कष्टकऱ्याला बलुतें देतांना मात्र तें मोकळ्या मनानें दिलें जायचें नाहीं. हजार कारणें सांगितलीं जायचीं.

जोशी म्हणजे ग्रामजोशी. हा बलुत्या महत्त्वाचा नसला, तरी याला प्रतिष्ठा मात्र मोठी. याचें काम काय काय ? तर शेतांत नांगर घालायला, विहीर खणायला, धान्यें उफणायला, इत्यादि कामांना मुहूर्त पाहाणें. लग्नें-मुंजी लावणें. मूल जन्मलें म्हणजे त्याची पत्रिका करणें. त्याचें रासनांव ठरवणें. देवांना अभिषेक करणें. सत्यनारायणाची कथा सांगणें. नव्या

घराची वास्तुशांत करणें. श्राद्ध-पक्ष करणें. एकादशी-पौर्णिमा सांगणें. वटसावित्रीपूजन, आवळीपूजन अशा किरकोळ पूजा उरकणें, इत्यादि.

मात्र सगळ्याच जोशांना वर सांगितलेले विधि सशास्त्र येत असतात, असें नाहीं. किंबहुना अनेकांना येत नसतातच. मग कांहींतरी थातुरमातुर करून वेळ मारून न्यायची. ज्यांच्या घरीं विधि व्हायचे, त्या माणसांचें ज्ञान अगाधच असतें. मग मंत्र म्हणायच्या वेळीं तोंड हललें आणि कांहीं पुटपुट ऐकूं आलें कीं पुरें. प्रश्न उभा राहातो ऐन लग्न लावण्याच्या वेळीं मङ्गलाष्टकांचा.

खेड्यांपाड्यांतून हीं लग्नें नेमक्या वेळेवरच लागतात असें मुळींच नव्हे. भटानें मुहूर्त काढलेला असतो गोरज. म्हणजे कडुसें पडेस्तोंवर एकदां केव्हां तरी टाळी वाजली, अन् नवरानवरीच्या डोक्यावर अक्षता टाकल्या कीं झालें ! जोशीबुवांच्या विद्वत्तेचें बेंड फुटायची वेळ नेमकी हीच असते. पण ज्यांनीं संध्येच्या चोवीस नांवांच्या बळावर एवढा विधि चालवला, ते जोशीबुवा इथेंही कमी पडत नाहींत. ती वेळच अशी असते कीं, नुसता गलगा गलगा सुरू असतो. भटजी अन्तर्पाट काढतो आहे केव्हां, अन् वधूवरांच्या डोक्यांवर अक्षता पडताहेत केव्हां, असें सगळ्यांनाच झालेलें असतें. त्यामुळें जोशी काय म्हणतो याकडे कुणाचेंच लक्ष नसतें. मग त्यानें ' गंगा सिंधू सरस्वति ' म्हटलें काय अन् ' आंबे-पोफळी नारळी ' म्हटलें काय, कुणीकडून त्या मङ्गलाष्टकांतलें शेवटलें स्टेशन, ' शुभ मुहूर्त सावधान ', अगर ' शुभ लग्न सावधान ' असलें म्हणजे झालें.

अजून जनसाधारणांतील श्रद्धा कांहीं पार उडालेली नाहीं. नेटकें पौरोहित्य शिकून प्रत्येक विधि यथासांग अन् निर्लोभ मनानें केला, तर जोशाला खेड्यांतून आजही मरण नाहीं. त्याची प्रतिष्ठा त्याची वाट पाहात बसलीच आहे.

उरले बलुतेदार दोन. पैकीं गुरवानें लग्नकार्यांत वाजंत्रीं वाजवायचीं. कुठें कुठें हें काम न्हावीही करतो. पण अनेक ठिकाणीं हें काम गुरवानें करायचें. त्यानें देवळांतल्या देवांची पूजा करायची. घरोघरीं बेल पोंचवायचा. वडापळसाच्या पत्रावळी करायच्या. लग्नकार्यांत त्या पुरवायच्या. त्याबद्दल रोख दमडा मिळायचा नाहीं. पण वर्षाशेवटीं बलुतें मात्र मिळायचें.

मुलाण्याकडे काम केवळ बकरूं पाडायचें. म्हणजे खळें सुरू करताना, इर्जिकीच्या वेळीं, कुण्या देवाला नवस बोलला असला तर, दसऱ्याच्या वेळीं, असें काम पडेल तेव्हां बकरूं कापायचें काम मुलाण्याकडे. काय गंमत आहे पाहा. मराठा म्हणजे क्षत्रिय. त्यानें मृगया करायची. हरणें, डुकरें मारायचीं. तें मांस पवित्र. बकऱ्याच्या गळ्याला सुरी मात्र मुलाण्याची लागली पाहिजे. एरवीं तें हलाल व्हायचें नाहीं ! त्या मांसाला कुणीं तोंड लावायचें नाहीं ! आतां ह्या अडाणीपणाला काय म्हणावें ?

असेना का ! मुलाणी हाही एक बलुतेदार. त्याची गरज वर्षांतून क्वचितच पडायची. कित्येक मुलाणी तर परागंदा झाले आहेत. पण बारा बलुत्यांतला तो एक बलुतेदार आहे ती गोष्ट खरी.

अशा या बलुतेदारांवर या जगन्नाथाच्या रथाची गति अवलंबून असायची. जर हे बलुतेदार श्रमी आणिक आपआपल्या जागीं पक्के असले, तर गांवगाडा चांगला चालावा. नाहींतर त्याच्या विस्फोट व्हायला वेळ लागायचा नाहीं. विशेषतः सुतार, लोहार, चांभार, महार हे बलुते, कीं ज्यांच्या हातीं साऱ्या बारदान्याची नस आहे, तेच थातुरमातुर काम करणारे, किंवा टाळाटाळी करणारे असले कीं गांवकीचें वाटोळें झालेंच म्हणून समजावें. कारण अजून तरी महाराष्ट्रांतली शेती ऋतूंच्या स्वाधीन आहे. त्यांची घात साधायला दक्ष असलें पाहिजे. ही दक्षता साधणें केवळ या बलुत्यांच्या हातीं. मोडका नांगर किंवा पाभर सुतारानें वेळीं दुरुस्त करून न दिली म्हणजे ? पेरणीची घात तर काय वाटेल तें करून साधायची असते. तुकारामबावांनीं म्हटलें कीं, ‘ मढे झांकोनिया करती पेरणी. ’ घरांत कुणी मेलें असलें, तरी त्याची जाळपोळ मग व्हायची. पेरणीची वाफ हातची सुटूं द्यायची नाहीं. ती हुकली कीं पदरीं धोंडा पडलाच म्हणायचा.

म्हणून हे बारा बलुतेदार म्हणजे गांवगाड्याचें वंगण. गांवगाड्याचीं चाकें. गांवगाड्याच्या धुरा. किंबहुना गांवगाडा चालविणें, अगर त्याच्या मार्गांत खीळ घालणें हें सगळें यांच्याच स्वाधीन. हे दक्ष तर गांवगाडा नीट चालला. हें अयबी तर गांवगाडा पार बुडाला ! आज इतकीं वर्षें महाराष्ट्रांतलीं ग्रामव्यवस्था या कारूनारूंच्या भरंवशावर चालली आहे.

✤ ✤ ✤

# आणखी कांहीं जमाती—

पूर्वीं जीं गांवें वसलीं, तीं वसवलीं शेटे-महाजनांनीं. यांना सरकारांतून कौलपत्रें असायचीं, कीं अमुक हा एक गांव तुम्ही वसवा. त्याबद्दल मग तुम्हांला ग्रामस्थांकडून अमुक अमुक मिळत जाईल. जसें तांबोळ्याकडून पानें. चांभाराकडून पायतणें. तेल्याकडून दर आठवड्यास नवटाक तेल. कोष्टयाकडून वर्षास एक पासोडी.

मग या शेटे-महाजनांनीं ओसाड गांवीं जाऊन राहावें. जवळ असावें सरकारचें अभयपत्र. तेवढ्या भरंवशावर शेतकऱ्यांनीं त्यांचा आसरा घ्यावा. हळूंहळूं तिथें वस्ती व्हावी.

प्रसंगीं एखादा नवा गांव वसायचा असेल, तरी तें काम शेटे-महाजनां-कडेच यायचें, कीं फलाणे जागीं नवी वस्ती वसवायची आहे. हें एवढें काम तुम्हीं करावें. बहुधा शेटे, महाजन ही मंडळी प्रतिष्ठित असायची. प्रतिष्ठित आणिक प्रामाणिक. हीं जाऊन नव्या जागीं वसली कीं मग भरं-वशानें गांव वसलाच म्हणून समजावें.

मराठेशाहींत लुटालुटींत अनेकदां कित्येक गांवें लुटलीं किंवा जाळलीं गेलीं. मग तीं गांवें पुन्हा वसवण्याच्या कामीं शेटे-महाजन या संस्थेचें फार मोठें साहाय्य झालें. खोरींच्या खोरीं यांनीं पुन्हा वसवलीं. पुण्यांतल्या सदाशिव, नारायण, नाना इत्यादि नव्या पेठाही सरकारी कौल घेऊन शेटे-महाजनांनीं वसवल्या. असे शेटे-महाजन गांववसणीच्या कामीं मोठें प्रस्थच म्हणायचें.

आतां उल्लेख केला पाहिजे शिंपी, तेली, तांबोळी, कोष्टी, गवंडी,

कासार, पिंजारी आणि रामोशी या स्थिर जातींचा.

पैकीं शिंप्यानें कोष्टयाकडून कापडें ठोक खरेदी करावींत. कोष्टयाकडे नसतील, तीं नाना पेठांहून आणवावींत. मग कापडाचें दिंड बांधून अन् तें घोड्यावर घालून गांवोगांव बाजार करीत हिंडावें. बाजार आटोपला कीं मुक्कामास परत यावें. जसे मागें माळी बहुधा वारकरी म्हणून सांगितले, तसेंच शिंपीसुद्धां सगळे वारकरी.

तेल्यानें घरीं घाणा चालवायचा. करडई, तीळ, शेंगदाणा, काळे तीळ, जवस अशा गळितांचें तेल त्यानें घरींच काढावें अन् मग तें गांवोगांव नेऊन विकावें. कधीं एरंडी, उंडिणी अशीं इतर तेलेंही तेल्यानें गाळून द्यावींत. तीळ, शेंगदाणा, जवस यांची पेंड तेल्यानें शेतकऱ्यांना गुरांना घालण्यासाठीं विकावी.

कासारानें घोड्यावर बांगड्या घालून गांवोगांव हिंडावें. पायली पसा धान्य घेऊन त्यानें सगळ्या घरांतल्या पोरीबाळींच्या हातीं बांगड्या भराव्यात. मग त्यांत अरतेंपरतें करूं नये. बांगड्या भरणारे तेही कासार अन् भांडीं घडणारे तेही कासार. यांनीं तांब्यापितळेचीं भांडीं घडावीं—दुरुस्त करावीं.

कोष्टयानें सूत काढावें तरी किंवा गोळा करावें. अन् मग ताणाबाणा तयार करून खळ देऊन त्यांचीं कापडें विणावीं. बहुधा कोष्टयांचीं घरें प्रत्येक गांवीं नसायचीं. कांहीं नगरांतून मात्र कोष्टयांची वस्ती बहुत होती. तीं तीं सणगें त्या त्या गांवाच्या नांवानें प्रसिद्ध. जसें—पैठणची पैठणी. धारवाडी खण. नागपुरी धोतरजोडी. नगरचीं लुगडीं. हीं लुगडीं म्हणजे साधीं बांडें असायचीं. यांत कलाकुसरीचें किंवा रेशमी काम कमी.

तांबोळ्यानें खायचीं पानें पुरवायचीं. अनेक गांवीं तांबोळी हा वतनदार असायचा. कांहीं गांवीं उपऱ्या. पानें म्हणजे न टिकणारा—लवकर खराब होणारा माल. पण तीं सांभाळावींत कशीं, बहुत दिवस टिकवावींत कशीं, कुजायला लागलीं तर डेखें आणि टोंकें कापावींत कशीं, हें सारें तंत्र तांबोळ्याला माहीत. तांबोळी हे बहुधा मुसलमान असायचे.

गवंड्यानें घरें बांधावींत. खरें पाहिलें तर गवंडी हे आजच्या मोठमोठ्या कंत्राटदारांचे पूर्वज. मोठमोठालीं बहुत नामी बांधकामें केवळ आपल्या हिमतीवर या गवंड्यांनीं केलीं. किल्ले, कोट, मोठमोठाले वाडे,

देवळें, घाट, मशिदी, कबरी इत्यादि आश्चर्यकारक बांधकामें यांच्या हातून झालीं.

आज ती सगळी विद्या हरपली आहे. खेडोपाडींचे गवंडी तर ताकापुरतें रामायणवाले. कशीतरी माती थापून विटेवर वीट चढवली कीं झालें मग भिंतीचा कल कुणीकडे झुलतो आहे, तिला कितपत पोट येतें आहे—दोन विटांच्या रचनेंत मागेंपुढें कुठें होतें आहे, इकडे कोण लक्ष देतो ! इतकी कळा कुणाच्या अंगीं ! कशीतरी वेडींवांकडीं घरें बांधायचीं. खेडुतांना कांहीं याहून अधिक नखरेल घरांची आवश्यकता नसते.

पिंजाऱ्यानें कापूस पिंजायचा. गाद्या भरायच्या. उशा आणि तक्के भरायचे. पिंजाऱ्याचें घरही दहा-वीस गांवांत मिळून एखादें असायचें. त्यानें तीं दहा-वीस गांवें करीत हिंडत असावें. मात्र या खेड्यांमधून शेतकऱ्यांच्या घरीं गादी क्वचितच आढळायची. ढेकळांत झोंपायची संवय. मग करायची काय गादी ! पण बहुशः कारूनारूंच्या घरीं गाद्या, उशा, तक्के हें आढळायचें. त्या गाद्यांतल्या कापसाचे पुंजके वर तरंगायला लागले, गाद्यांना भोकें पडलीं, त्यांची मच्छरदाणी झाली आणि उशा दगडाएवढ्या कठीण बनल्या, म्हणजे मग पिंजाऱ्याची आठवण व्हायची.

आणिक एक अशीच गांव धरून राहिलेली जमात म्हणजे रामोशाची. रामोशीही प्रत्येक गांवीं नसायचा. असायचीं तिथेंही चार-दोन घरें. मोठी बेडर जमात. पिकांच्या राखणीचें काम रामोशाकडे असायचें. रात्रीं-बेरात्रीं, जीवघेण्या काळोखांतून, कांट्याकुट्यांतून यानें पिकांची राखण करीत हिंडावें. डुकरांपासून, कोल्ह्यांपासून, सशांपासून, चोरांचिलटांपासून. जर यदाकदाचित् चोरी झालीच, तर चोरांचा माग काढण्याचें कामही रामोशाकडेच. हजार जणांच्या पावलांचे हजार ठसे उमटलेले असायचे. त्या ठशांतून नेमका चोरांच्या पावलांचा ठसा हुडकून काढणें हें काम अतर्क्य तर खरेंच. पण कसबी रामोशी तें बरोबर करायचे. नुसत्या माणसाच्याच पावलांचे ठसे नव्हेत तर, एखादा बैल किंवा गुरू चोरून नेलें, तर त्याच्याही खुरांच्या खुणांचा मागोवा घेणें, रामोशाला तसें अशक्य नसायचें.

रामोशी जात दरिद्री. पण ते स्वतःला रामवंशी म्हणवतात. ताठा आणि पीळ इतका, कीं सांगतां पुरवत नाहीं. जेव्हां पोट उपाशीं राहूं

लागतें, तेव्हां मग निरुपायानें रामोशी दरवडे घालूं लागतो. त्यांच्या जोडीला येऊन मिळतात मांग. मांगारामोशाचा दरोडा येणें म्हणजे मृत्यूच दारांत येऊन उभा राहाणें. वेळ आली तर माणसाला कापायला कमी करायचे नाहींत; आणि फांशीं जातांनाही डगमगायचे नाहींत. हंसतखेळत, निरोप देत आणि घेत फांशीच्या तख्तावर चढतील.

नदी असेल, तिथें कोळ्यानें मासे धरावेच, पण शिवाय वतनदारांच्या घरीं पाणीही भरावें. गांवीं मुसलमानांची वस्ती असली तर त्यांचा एक मुजावर असायचा. त्यानें निमाजाची बांग घालायची. इतरही मुसलमानांचीं धर्मकृत्यें यानेंच करायचीं. मुजावरापेक्षां काजी हा अधिक श्रेष्ठ, पण काजी बहुधा खेड्यांतून आढळायचा नाहीं. शिकलगारानें चाकू, सुऱ्या, कात्र्या यांना धार लावायची. मराठेशाहींत शिकलगाराला फार मोठा भाव. तरवारी, कट्यारी, भाले, पट्टे, खंजीर यांना धार लावायचें काम शिकलगाराकडे असायचें. जें गांव एखाद्या सरदाराचें अशा गांवीं शिकलगाराला त्या गांवीं वतनच दिलेलें असायचें.

✤ ✤ ✤

# वासुदेव आणि पांगुळ—

महाराष्ट्रांत एका गांवीं स्थिर न राहणाऱ्या जमाती बहुत. किंबहुना स्थिरपद जमातींपेक्षांही त्यांची संख्या अधिक भरावी. पैकीं गोसावी, जोगी, भुत्या, बैरागी, उदासी, कानफाटे ही मंडळी केवळ भीक मागायची. कांहीं ओ कीं ठो कळायचें नाहीं. विचारलें तर म्हणायचें कीं, हा आमचा पिढीजात धंदा आहे. कांहीं थातुरमातुर दहा-वीस दैवतांचीं नांवें माहीत असायचीं. आणि तेवढ्यावर त्या दैवतांची आण वाहून हे भीक मागत असायचे. उदाहरणार्थ, गोसाव्याच्या तुंब्याचा मंत्र.

जल् पबित्तर सथल् पबित्तर और पबित्तर कुआ
महादेव कहे सुन पारबती मेरा तुंबा पबित्तर हुआ !

या अगाध मंत्रानें यांनीं आपला तुंबा पवित्र करायचा. आहे कीं नाहीं पांडित्य !

जी गत या मंडळींची, तीच गत फकिराची.

फकिरानें पहाटेच्या प्रहरीं किनरें वाजवून गांव जागवीत हिंडावें. हा प्रकार कांहींतरी बरा. सकाळच्या पक्ष्यांच्या कूजनांत हा आवाज मिसळून तरी जातो. पण दिवसभर आपल्या भसाड्या अन् रेकलेल्या स्वरांत निर-निराळ्या पीरांच्या नांवानें जे फकीर भीक मागत हिंडतात, त्यांच्या ओरडण्यापासून काय श्रवणसुख लाभतें हें त्यांचें ते जाणोत !

कानफाटे हे वस्तुतः नाथपंथी. ज्या पंथांत मत्स्येन्द्र आणि गोरखनाथा-सारखे दिग्गज होऊन गेले—ज्या कुलांत ज्ञानेश्वरांसारखा बालयोगी, भक्तोत्तम आणि कविकुल शिरोमणि होऊन गेला, त्या कुळांतले हे जोगी

निव्वळ कान फाडून, आंत स्फटिकाचीं वलयें अडकवून गांवोगांव केवळ भीक मागत हिंडतात !

याहून सांस्कृतिक दृष्ट्या ज्यांचें किंचित् मोल आहे, असे भिक्षेकरी म्हणजे वासुदेव,पांगुळ, वाघे, भराडी, गोंधळी, नंदीबैलवाले, डोंबारी इत्यादि.

पैकीं सगळ्यांत निरुपद्रवी आणि वेष मजेदार अशी जात म्हणजे वासुदेव. डोईवर एक मोरपिसाची टोपी. उभी. अंगांत भला लांब अंगरखा. पायांत इजार. कमरेभोंवतीं उपरणें गुंडाळलेलें. एक्या हातीं चिपळ्या आणि दुसऱ्या हातीं टाळ असे हे वासुदेव मुख्यतः आढळायचे क्षेत्रांच्या जागीं. तिथें स्नान करणाऱ्या मंडळींना नाना क्षेत्रांची आणि तिथल्या देवतांचीं नांवें ऐकवीत हे टाळ वाजवीत उभे असायचे. क्षेत्रांचीं नांवें तर यांना किती माहीत ! फार. तितकीं तर महाराष्ट्रांतल्या जाणकार इतिहास-कारालाही माहीत असायचीं नाहींत. म्हणजे एका अर्थानें हा महाराष्ट्रांतल्या तीर्थांचा कोशच म्हणायचा. याला कुणीं पै-पैसा दिला कीं मग हा सगळ्या दैवतांच्या नांवानें पावती द्यायचा. आपणहून कुणाजवळ पैसा मागायचा नाहीं. अन् अशा या दान पावल्याच्या पावतीवर शेवटीं सही व्हायची गळ्यांत बांधलेल्या अलगूजाच्या स्वरांनीं.

वासुदेव ही संस्था संतमंडळीची फार आवडती. त्यांनीं वासुदेव या नांवाचे कांहीं फारच देखणे अभंग लिहिले आहेत. ज्ञानोबांनीं, नामदेवानें, एकनाथानें, तुकारामानें. सगळ्यांनींच या वासुदेवाचें काम जनसामान्यांना जागें करीत राहायचें. पैकीं एका वासुदेवाचा प्रथम चरण असा—

गातों वासुदेव मी ऐका । चित्त ठायीं ठेवोनि ऐका ।
डोळे झांकून रात्र करूं नका । काळ करीत बैसला असे लेखा गा ॥
राम राम स्मरा आधीं ॥

वासुदेवाच्याच जातीचा, तसाच निरुपद्रवी, पण अधिक लाघवी आणि लबाड भिक्षेकरी म्हणजे जोशी. हा जोशी म्हणजे ग्रामजोशी नव्हे. गळ्यांत उपरणें घालून, डोईस रुमाल बांधून, कपाळावर नीट गंध लावून हा वर्ष-भविष्य सांगत गांवोगांव हिंडायचा.

कोल्हाटी आणि डोंबारी याही जाती एका अर्थानें निरुपद्रवीच म्हणा-यच्या. यांनीं रस्तोरस्तीं कसरतीचे खेळ करावेत. लंगोट लावून आडव्या-

तिडव्या अवघड उड्या माराव्यात, यांच्या बायकांनीं अवजड धोंडे केसांनीं उचलावेत, पोरांनीं वाटेल तशीं अंगें वळवावींत, त्यांच्या घड्या कराव्यात. दो बाजूंना दोन खांब उभे करून मधल्या दोरीवरून डोंबाऱ्यानें चालून दाखवावें, किंवा त्या दोरीवर एक थाळी ठेवून तिच्यावरून घसरत या बाजूचें त्या बाजूस जावें. बांबूच्या टोकावर पोराला आडवें ठेवून ते बांबू उंच आकाशांत उचलावे. असे कसरतीचे खेळ करून पैका मागावा.

कोल्हाटी मात्र एका अर्थानें त्रासदायक. कोल्हाट्यांच्या बायकांनीं लावण्या म्हणाव्यात, शृंगारिक हावभाव करावेत, गांवचीं तरणींताठीं पोरें नादीं लावावींत.

बहुरूप्यानें रोज एक एक वेष करून, एक एक सोंग करून यावें. कधीं इंग्रजासारखी टोपी घालून, कमरेला पट्टा घालून, तोंडाला पिवडी फासून पाठ करून ठेवलेले इंग्रजी चार-पांच शब्द फाडफाड बोलावेत. कधीं नारद बनून यावें. कधीं जख्ख म्हातारा. तर कधीं एखाद्या गर्भार बाईचें सोंग काढावें. शेवटल्या दिवशीं यानें पै-पैसा मागावा.

नंदीबैलवालाही पोरांसोरांच्या करमणुकीची गोष्ट. या नंदीबैलांना पढवून ठेवलेलें असतें. घरधन्याला अनुकूल प्रश्न विचारले म्हणजे त्यानें होकारार्थीं मान डोलवावी. प्रतिकूल विचारले म्हणजे मान हलवून नकार द्यावा. पाऊस पडेल का म्हटलें, तर हो म्हणावें. शेती पिकेल का, हो म्हणावें. रोगराई येईल का, नाहीं म्हणावें. कधीं नंदीबैलवाल्यानें रस्त्यावर झोपावें. त्याच्या जोडीदारानें ढोलकें बडवीत असावें; मग नंदीबैलानें आपले चारी पाय एकत्र जुळवून धन्याच्या पोटावर उभें रहावें. कधीं नंदीबैलवाल्यानें आपलें लेकरूं रस्त्यांत झोंपवावें आणि नंदीबैलानें लांबून धांवत येऊन तें पोर चुकवीत पलीकडे निघून जावें. अशी गंमत दाखवल्यावर नंदीबैलवाल्यानें शंकराच्या नंदीच्या नांवानें पै-पैका मागावा, अन् फाटके जुनेपाने कपडे.

गांवांत गारुडी आला म्हणजेही पोरांबाळांची मोठी मजा. पोरांना जाऊं नका म्हणून रागें भरत त्यांच्या मागोमाग थोरांनींही गारुड्याच्या भोंवतीं एकत्र जमावें. तोंपर्यंत गारुडी ढोल पिटीत असायचा. दोन-चार पेटारे पुढें ठेवून द्यायचा. असलाच तर एखादा अजगर रस्त्यावर मोकळा सोडून

द्यायचा. त्या जनावरानें बिचाऱ्यानें कंटाळून मुसकूट शरीरांत लपवून पडून असावें. गारुड्याचा एक पोर असायचा. त्याचें नांव हंडीबाग. एकीकडे ढोलकें बडवीत, एकीकडे त्या हंडीबागाची थट्टा करीत गारुड्याची नजर भंवतालीं जमलेल्या गर्दीकडे भिरभिरत असावी. अशासाठीं, कीं यांतले फुकटे किती,. पै-पैका देणारे किती.

मंडळी जमली, कीं त्यानें खेळ सुरू करावा. एका वाटींत पाणी घालून त्यांत एक चिमणी ठेवावी अन् हात न लावतां ती नाचवून दाखवावी. रुपया गुत करावा. पुन्हा काढून दाखवावा. तोंडांतून बक्राबका शिशाच्या गोळ्या काढून दाखवाव्यात. हंडीबागला रस्त्यांत झोपवून त्याचें तोंड चादरीनें झांकावें. अन् कोणच्या खिशांत काय आहे, कोण काय घेऊन उभा आहे, हें त्याच्याकडून वदवावें. कधीं त्या हंडीबागाची मान कापून टाकल्याचा आव आणावा.

शेवटला खेळ म्हणजे साप-मुंगसाची लढाई. तींत साप आणि मुंगूस बिचारी वारंवार लढाई करून कंटाळलीं असतात. तीं होतां होईतों तोंड चुकवितातच. गारुड्यानें फारच छळलें, तर दोन डासे इकडून तिकडून मारून पुन्हा तीं आपआपल्या जागीं जाऊन बसतात. झालें. आटोपला खेळ. मग गारुडी कटोरा घेऊन भीक मागायला जातो. या वेळीं बहुधा सगळे बघे एकेक एकेक करून हळूंहळूं पाय काढतात.

कांहीं का असेना. पण गारुड्याचा खेळ ही एक खेड्यांतली खाशी करमणूक आहे, यांत वाद नाहीं. तीच गत माकडवाल्याची. त्याच्या माकडांचीं नांवें अनुक्रमें देवजी धसाड्या आणि भागाबाई अशींच असायचीं. आजपर्यंत कुण्याही माकडवाल्यानें आपल्या माकडाचें नांव वेगळें ठेवल्याचें आढळांत नाहीं. त्यांचें लुटुपुटीचें एकमेकांवर रागावणें, भागाबाईला मारायला धांवणें, मग तिची समजूत काढणें, तिला लुगडें-चोळी घेऊन देणें, या सगळ्याच गोष्टी खेड्यांतल्या बायाबाड्यांचें मनोरंजन करणाऱ्या. मग खेड्यांतून परततांना गारुड्याबरोबरच माकडवाल्याचीही झोळी भरलेली असायची.

कधींमधीं यांच्या जोडीला यायचा दरवेशी. त्याच्याजवळ असायचें अस्वल. अन् अग्रदीं क्वचित् एखाद्या गाड्यावर चहूंकडून बांधून घातलेला

चित्ता. पैकीं अस्वलाला त्यानें नाचवावें, त्याच्याशीं कुस्ती करावी, त्याच्याकडून होय-नाहीं म्हणून प्रश्नांचीं उत्तरें काढावींत अन् शेवटीं त्याचे केस पोरांच्या गळ्यांत दृष्टमण्यांबरोबर बांधण्यासाठीं आयाबायांना विकावेत.

वाघे अन् मुरळ्या खंडोबाचीं गाणीं म्हणत भीक मागायचे. खेडुतांच्या कपाळाला भंडारा फाशींत अन् त्यांना जेजुरीच्या खंडेरायाची आण वाहून यांनीं पै-पैसा काढावा. गोंधळी मात्र बिनबोलवितां यायचे नाहींत. ते मानापानानें यायचे. अनेकांच्या इथें पूर्वापार चालत आलेला नियम असा, कीं लगीन झाल्यावर गोंधळ घालावा. हा कुळाचार पाळलाच पाहिजे. म्हणून मग त्यांनीं गोंधळ्याला आवंतण द्यावें. त्यानें आपली संबळ, दिवट्या, यांसह यावें अन् रात्रीं मशालींच्या प्रकाशांत सुरू व्हावा गोंधळ.

अगोदर महाराष्ट्रांतल्या यच्चयावत् देवतांना निमन्त्रण. जसें जेजुरीच्या खंडोबा गोंधळा याहो, पंढरीच्या विठोबा गोंधळा याहो, पालीच्या गणपती गोंधळा याहो, जाखाईजोखाई गोंधळा याहो !—इत्यादि. अन् मग एखादी गमतीदार उपकथा चालू व्हायची. गोंधळ्याचा विनोदाचा विषय म्हणजे त्याचा दिवट्या त्याचें अद्‌भुत पागोटें, त्याच्या विरळ मिशा, त्याचें लांब अगर बसकें नाक, या सर्वांवर गोंधळ्यानें टीका करावी. पोरांबाळांनीं गद्‌गदून हंसावें. असें उपकथानक संपलें, म्हणजे मग महिषासुरवधाची कथा, शुंभ-निशुंभांची कथा असें एखादें पौराणिक आख्यानही गोंधळ्यानें आपल्या पद्धतीनें सांगावें. असा पहांट फुटेस्तोंवर जागर करावा. मग सकाळीं सूपभर जोंधळे, ठरलेली बिदागी, असें सगळें घेऊन गोंधळ्यानें गांवीं परतावें.

त्याशिवाय देवीच्या नांवानें भीक मागणारे भुत्ये, हिजडे,जोगतिणी, भराडी, बाळसंतोष अशीं कांहीं आणखी भिक्षेकरी मंडळी देशभर भटकत असायची, अन् खेडोपाड्यांना वारंवार भेटी देऊन जायची. यांपैकीं कांहींकडून कधीं कधीं शेतांना उपसर्गहि पोंचायचा. जसें कणसें खुडून नेणें, हरभरा उपटणें, ओंब्यांची झांबडझुंबड करणें.

पण या जातींहून वेगळ्या अशा कांहीं जमाती खेडूत जीवनाच्या उपयोगीही पडत असायच्या. वडारी, कैकाडी, वंजारी, लमाण, वैदू, मांगगारुडी, फांसेपारधी, बुरूड, काथोडी या सगळ्या जमातींचा ग्रामीण जीवनाला अल्पस्वल्प उपयोग होत असायचा.

वडाऱ्यांनीं व त्यांच्याबरोबरच बेलदारांनीं मातकाम करावें. त्यांचीं फावडीं भलीं झपाटेबंद. बांध घालायला भिडले, तर पाहतां पाहतां मातीचा डोंगर उभा करायचे. शिवाय वऱ्हाडाकडे शेतांतला कुंदा खणणें, तण माजलेलीं शेतें लागवडीस काढणें, हीं कामेंही बेलदारांनीं करायचीं. विहिरी खणायच्या असतील, सुरुंग लावून दगड फोडायचे असतील, दगडाच्या खाणी पाडायच्या असतील, तर तें काम वडारांकडे सोंपवावें. त्यांच्या सुत्कीचा घाव खाऊन फुटणार नाहीं असा दगड विरळा.

कैकाड्यांनीं करंजाच्या बारक्या फांदोऱ्या, तरवडें, अशा ओल्या काटक्या काढून त्यांच्या पाट्या आणि झाप विणावे. मोठमोठालीं डालगींहि तयार करावींत. धान्य सांठवायच्या कणग्याहि क्वचित् त्यांनीं करून विकाव्यात.

हें विणकाम तर बुरूडहि करतात. पण ते बांबूशिवाय दुसऱ्या कसल्या, कामाला हात लावायचे नाहींत. बांबू मात्र त्यांनीं हवा तसा वांकवला आहे. त्याच्या कामट्या केल्या आहेत. अगदीं पातळ पट्ट्या चिरून तट्टे बनवले आहेत. उदबत्त्यांना लागणाऱ्या सुक्षम काड्या तयार केल्या आहेत. इवलीं इवलीं बुरकुलीं, दुरड्या, टोपलीं हें सगळें काम बुरुडांच्या कसबाचें.

लमाणांनीं अन् वंजाऱ्यांनीं बैलांवरून सामानाची ने-आण करावी. शें-दीडशें वर्षांपूर्वींपर्यंत महाराष्ट्रांत खेडोपाडीं मोटारगाड्या धांवूं लागल्या नव्हत्या. तेव्हां मग सारी वाहतूक लमाणांनीं करायची. इतिहासकालीं तर लमाण हें एक अत्यंत गरजेचें आणि भरंवशाचें साधन. कुठला कुठला, नाहीं नाहीं तो माल त्यांनीं सुरक्षितपणें मुक्कामावर पोंचवावा. वाटेंत लूटमार न झाली, दरोडा न पडला, तर लमाणांच्या स्वाधीन केलेला माल सुरक्षित मुक्कामावर पोंचेल, एवढा विश्वास त्यांनीं निर्माण केला होता.

अलिकडे लमाणांचा हा धंदा बसला. त्यांचे बैल म्हातारे होऊन कसायांना विकले गेले. आतां ते जनावरें राखोळीस घेण्याचा धंदा करतात. राखोळीस व्यायचीं अन् कष्टाजोगीं झालीं किंवा दुधारलीं, म्हणजे ज्याचीं त्यास परत करायचीं.

जिथें वैद्य किंवा हकीम पोंचत नसत, तिथला धन्वन्तरी म्हणजे वैदू. याच्याजवळ सालममिश्री, सफेदमिश्री, नाना प्रकारच्या मुळ्या, धातुपुष्टि-कारक औषधें, ‘ वाईचा औशीद ’, ‘ वाताचा औशीद ’, असें नाना

प्रकारचें औषधी भांडार असायचें. प्रत्येक रोगावर त्याच्याजवळ कांहीं ना कांहीं मुळी हट्कून मिळायचीच. तिचा उपयोग काय होईल, तो पुढला प्रश्न. पण औषधी निदानाच्या बाबतींत वैदूनें कधीं माघार घेतली नाहीं. शिवाय याच्याजवळ जळवा असायच्या. तुंबड्या असायच्या. साप धरायचा इलम असायचा. प्रसंगीं वैदू नदींतल्या मगरीही धरायचे.

मांगगारुडी म्हशी भादरायचे. फांसेपारधी डुकरें, ससे, हरणें, पांखरें हे शेतीस तापदायक होणारे जीव फांसे लावून धरायचे. काथोडी वानर धरायचे. एरवीं घरांवरल्या कौलांचा, वेलांवरल्या पडवळांचा, घोसाळ्यांचा, दोडक्यांचा, आंब्यावरल्या कैऱ्यांचा नासाडा करीत हिंडणारे वानर आणि माकडें काथोड्याचा शब्द ऐकतांक्षणीं, मांत्रिकाचा शब्द ऐकून भूत पळतें तशीं, अदृश्य व्हायचीं.

अशा या बहुविध भटक्या जमाती. यांच्यामुळें सामाजिक जीवन मागें गेलें कीं पुढें गेलें, तो प्रश्न अलाहिदा. मात्र तें बहुरंगी झालें, विविधतेनें नटलें, एवढें तर मान्य केलेंच पाहिजे.

✤ ✤ ✤

# गिरिजन—

महाराष्ट्राच्या गिरिगव्हरांत शिरावें. तिथें कुण्या उंचवट्यावर, कुण्या महावृक्षाचा आश्रय करून, कुण्या नदी-ओढ्याच्या तटीं कैंबळांनीं झांकलेलीं झोंपडीं दिसतात. एक इथें तर एक तिथें. भंवतालीं कोंबड्या उकीरवाकीर करीत हिंडत असतात. नागवीं पोरें एकमेकांच्या छात्यांवर बसत असतात. मधेंच एखाद्या कोपटांतून एखादी मायमावशी बाहेर येते. केसांचा गुंतवळा, छातीवर एक फाटकी चोळी, कमरेला एक जुनें गुंडाळलेलें. ती तावातावानें येते, आणि मग बोंबलणाऱ्या पोराच्या पाठींत दणादणा दहा-वीस दणके घालते. पोर अधिकच रडूं भेकूं लागतें. त्याला तसेंच कोकलत ठेवून ती मायबाई झोपडींतून पाण्याची फुटकी घागर घेऊन पाणी आणायला जाते. या पाळीला एक बारकें पोर तिच्या कमरेवर असतें, आणि एक तिचा हात धरून चालतें.

संध्याकाळीं घरीं येतो पोरांचा बाप. तो येतांच मार खाल्लेलें पोर त्याला बित्तंबातमी देतें. मग तो घरांत शिरून बायलीच्या पाठींत चार दणके घालतो. पण थोड्याच वेळांत हें सगळें विझतें. जी काय ओलीकोरडी मक्याची किंवा साव्याची भाकर असेल, ती हीं सगळीं मिळून खातात. आणि मग कुणी मंत्र घातल्यासारखीं निचळ झोपीं जातात.

दिवसभर नाना परींचे श्रम केलेले असतात. सगळ्यांनींच. पुरुषांनीं, बायकांनीं. लांकडें तोडलेलीं असतात, फाटीं काढलेलीं असतात, सारा झाडझाडोरा हिंडून मधमाशांचीं पोळीं हुडकलेलीं असतात. कुठून कुठून भुई खणून कंद आणलेले असतात. कचकचीत कडू कंद. कुठें चार-आठ

आणे रोजानें कंत्राटदाराचीं झाडें पाडलेलीं असतात. कोळशांसाठीं त्यांच्या भट्ट्या रचलेल्या असतात. आणि यांतला एकही धंदा हातीं न लागला, तर गेला बाजार पांखरें मारण्यासाठीं मैलोन् मैल पायपीट तरी केलेली असते. म्हणून त्यांना शांत झोप लागते.

आभाळांतला देव सकाळीं वर चढला कीं, पुन्हा नवऱ्यानें खांद्यावर कुऱ्हाड घेऊन रानांत जायचें असतें. बाईनें विळा घेऊन फाटीं तोडायला निघायचें असतें. इथें रिकामें बसून कुणाला खायला मिळायचें नाहीं. प्रत्येकानें काम हें केलेंच पाहिजे.

अशीं आंगें आंबून जातात. अगदीं कसमसल्यासारखें होतें. आणि मग अचानक कुणी एक उठतो. खुंटीवरला ढोल काढतो. वळचणीस टांगलेलें तारपें हातीं घेतों. बाहेर अंगणांत येतो. उघड्यावर. मोकळ्या आकाशाखालीं. मग ढोलावर थाप मारतो. तारप्यांत फुंक मारतो.

तो तारप्या-ढोलाचा आवाज कानीं येतांच सगळीं भारल्यासारखीं होऊन त्याच्याभोंवतीं गोळा होतात. मग सहजच सगळ्यांचेच पाय हलूं लागतात. त्यांत भरते एक लय. येते एक गति. मग तीं एकमेकांच्या खांद्यांवर हात ठेवून नाचूं लागतात. होतां होतां ही लय वाढते. सगळींच धुंद होतात. बेहोष होतात. मग नाचतां नाचतां रात्रीला डोळे फुटतात. पहाट होते. तारपें थांबतें. ढोलच्या विसांवतो. मग पुनः शुद्धीवर येऊन सगळीं आपापल्या कामाला जातात.

हे आहेत महाराष्ट्रांतले आदिवासी. किंवा यांना गिरिजन म्हणावें. यांच्यांतल्या कितीतरी परी. वारली, ठाकर, कातकरी, महादेवकोळी, डोंगरकोळी, काथोडी, असे नाना प्रकार.

पैकीं वारली बहुधा सगळे ठाणें जिल्ह्यांत एकवटलेले. ठाकर घाटांत, अन् डोंगरपठारावर, महादेवकोळी नाशिक जिल्ह्याच्या उत्तर भागांत. काथोडी चहूंकडे भटकत असलेले.

हे सगळे कधींपासून महाराष्ट्रांत वसति करून आहेत, कोण जाणे ! कांहीं माग लागत नाहीं. पैकीं ठाकर शेतीची आवड असलेले. वारली कोळसे पाडण्याच्या शास्त्रांत प्रवीण. महादेवकोळ्यांचें तर जव्हारला राज्यच आहे. कातकरी कात काढणारे. काथोडी धनुष्यबाण घेऊन शिकार करीत भटकणारे.

पैकीं काथोडी महा उनाड. एखाद्या खारकुंडीच्या मागें चार-चार सहा-सहा तास दहा-बारा जण धांवत राहतील. ती प्राणभयानें झाडांझाडांवरून पळत हिंडेल. हे तिला भिववीत, किंचाळत, हळ्या मारीत, असे धोंडे फेंकीत तिचा पाठलाग करतील. ती शेवटीं थकून, धोंडा लागून टप्पादिशीं खालीं पडली, कीं केवढा आनंद ! जणूं दिवस सार्थकीं लागला.

कधीं बाप्पे अन् बायका अशीं सगळीं कुण्या डबक्यांतलें पाणी उपशीत बसतील. बाई अर्धें चिंधूक नेसेल. अर्धें झोळी करून डबक्याबाहेर पसरील. मग सगळीं पाणी उपसायला भिडतील. असें दिवसभर डबकें उपसल्यावर सायंकाळीं सताठ चिंगळ्या हातीं लागतील. तेवढ्यानेंही अपार अपार समाधान !

माणूस मेलें, तर त्याला पुरतील. पुरतांना गाणीं म्हणतील—

बामण होशील, तर लिखूं लिखूं मरशील
वाणी होशील, तर विकूं विकूं मरशील
काथोडी होशील, तर जंगलचा राजा होशील !

अशीं हीं रानचीं उनाड पांखरें ! एक्या जागीं बसायचीं नाहींत. सुखाचा घांस खायचीं नाहींत. सदैव यांच्या पायांना चाक बांधलेलें असायचें.

महादेवकोळी मात्र स्थिरावलेले. शेतीपोती करायचे. गुरेंढोरें पाळायचे. लिखणें पढणें मात्र त्यांच्या मनास यायचें नाहीं. फार प्रामाणिक जात. यांच्या गांवांमधून घरांना एक तर दारें नसतात ! असलीं, तर त्यांना कुलुपें नसतात ! चोरी हें महापाप. शिंदळकीचें नांव नको.

ठाकरांच्या मुलुखांत आणखी एक विशेषता. ठाकरांनीं भातें पेरतांना काकडीचें बीं टोंचलेलें. त्याला येतील त्या काकड्या शेतांतल्या शेतांत तोडून कुणींही खाव्यात. विचारायची गरज नाहीं. घरीं मात्र न्यायच्या नाहींत !

ठाकरांची देवी कळसूबाई. शिवाय भगतगिरी या सगळ्याच गिरिजनांच्या हाडींमासीं खिळलेली. भगताला फार मोठा मान. मग तो सांगेल तसें वागायचें. कुणी आजारी पडला, तर भगताच्या तंत्रानें चालायचें. तो मागेल तें द्यायचें. कोंबडें मागितलें, तर कोंबडें. बकरें मागितलें तर काय वाटेल तें करून बकरेंही ! आणिक या गिरिजनांचा विश्वास चेटकांवर. हीं करणाऱ्या विशेषतः स्त्रिया. त्यांना सारें गांव भ्यायचें. आपली प्रत्येक

चांगली वस्तु चेटकिणीच्या दृष्टीपासून लपवून ठेवायची. चांगली गाय. चांगली बकरी. चांगली बायको देखील !

वारल्यांत दारू पिणें हें धर्मकृत्य. ती प्रत्येकानें प्यायलीच पाहिजे. लहान-थोर, सगळ्यांनीं. लग्नप्रसंगांत ताडीचे रांजणचे रांजण रिते व्हायचे. पोरें-टोरें सगळीं ताडीच्या बाटल्या अन् आलमीनच्या वाटक्या घेऊन पीत बसलेलीं दिसायचीं. ज्याच्या लग्नांत दारू पाण्यासारखी वाहिली, त्याचें लग्न फार चांगलें !

वारली अन् ठाकरांना कांहींच अभक्ष्य नाहीं. अगदीं कावळे--चिमण्या सुद्धां ! करतील काय ? वर्षभर खपावें, तेव्हां जेमतेम दोन-तीन महिन्यांची जोगवणी व्हायची. तेव्हां मग बाकीचा काळ शिकारींत जायचा.

त्यांचीं पांखरें धरायचीं हत्यारेंही नामांकितच. कांहीं असायचे फांसे. पारध्यांसारखे. पण त्या फांशावेगळ्या कांहीं काड्या तयार करून ठेवलेल्या. तयार करायच्या म्हणजे त्याच्यावर रुईचा चीक, वडाउंबरांचा चीक, असे लेप द्यायचे. हे लेप हडकले, कीं त्या झाडांच्या फांद्यांना दुबेळक्यांच्या मधें आडव्या बांधून ठेवायच्या. पांखरें यायचीं. नाना परींचीं. मग तीं या काड्यांवर बसायचीं. बसलीं कीं, त्यांचे पंजे काड्यांना घट्ट चिकटायचे. जाम सुटायचे नाहींत. मग तीं आरडायचीं. तो आरडा ऐकून ठाकर धावायचे, अन् सावकाश गलोलीनें पांखरूं मारायचे.

पावसाळ्यांत खेकड्यांचीही अशीच शिकार व्हायची. तागाच्या सन्-काड्या पेटवून बापये रानांत जायचे. खेकड्याचें बीं दिसलें, कीं आंत घालायची दोरी. चिडून खेकडा आपल्या आंकड्यांनीं दोरीला घट्ट धरायचा. लगेच बाहेर ओढायचा, अन् एका तडाक्यांत पैलथडीला पोंचवायचा !

याशिवाय मग हुडकून काढायचे कंद. कसले कसले अन् कशाकशाचे. इतके कडू, कीं नुसतें जिभेचें टोक टेकलें, तरी आठ-आठ दिवस जिभेचें कडूपण मोडायचें नाहीं. असे ते कडू जहर कंद आणायचे अन् मीठ घालून सगळेच्या सगळे शिजवायचे. कधीं कापून निथळत ठेवायचे. कधीं राखेंत भाजूं घालायचे. मग त्यांचा कडवटपणा कांकणभर उणावायचा. असा उणावला म्हणजे मग ते खाऊन जठराची आग शांत करायची !

या गिरिजनांसारखींच त्यांचीं भांडींही नामांकित. चूलही अपूर्वाईची. तीन धोंडे मांडले, कीं चुलाण झालें. त्यावर गाडग्यांमधून कण्या शिजायच्या. असलेंच तर एखादें अलमीनचें पातेलें. एखादी लोखंडी पळी. तिखटमीठ सांठवायला बांबूची नळकांडी.

घरांत संपन्नता किती असेल त्याची कल्पनाच करावी. आपट्याचीं पानें मात्र भरपूर असायचीं. अन् एका गाडग्यांत तंबाकू. आपट्याच्या पानांच्या विड्या वळायच्या. अन् त्या ओढीत दिवसभराचा शिणभाग हलका करायचा.

ठाकर अन् वारल्यांच्या बायकांना झेंडूच्या फुलांचा मात्र अतोनात छंद. प्रत्येक झोपड्यामागें पावसाळ्यांत दोडक्या-घोसाळ्यांचें बीं टोचायचें अन् झेंडूचीं रोपीं लावायचीं. दोडक्या-घोसाळ्यांचे वेल खोपीवर चढायचे. त्यांना पिवळीं फुलें धुमारायचीं, अन् तोंवर झेंडू फुलारायचा. मग हीं झेंडूचीं फुलें कानांच्या भोकांत, डोक्यांत, गळ्यांत, पाहिजे तिथें माळायचीं.

तसाच या बायांना गळ्यांत पोतीं घालायचा मोठा सोस. काळ्या, निळ्या, तांबड्या अशा पोतींनीं या बायांचे गळे अगदीं भरलेले असायचे. तसेच कथलाचे दागिने. त्यांनीं दंड अन् मनगटें मढलेलीं.

वारल्यांचे देव म्हणजे ढग्येसर, विजेसर, पावस्यादेव, नारनृदेव, अन्-बरहमादेव. यांच्या नृत्यामधूनही याच देवता आळवलेल्या असायच्या. जसें—

वारा गं वाजं ऽ पिपल खलालं
पानी गं येतो ऽ कोन्हाये देवाला
पानी गं येतो ऽ नारनृदेवाला

यांचीं नृत्यगीतें मोठ्या बहारीचीं. लालित्यपूर्ण—

वाट ग चिखलाची रं, माझ्या पावसाल्या दिवसाची रं,
बांध शेताचं ओले रं, तथं कुलवी जातो भोला रं
माझं पावसं दादा रं, माझे भर शेताचे ओहोला रं
माझं पावसं दादा भोला रं, भर शेताचे ओहोला रं.

भोपळ्याचीं केलेलीं तारपीं वाजत राहायचीं, अन् त्या नादानें धुंद होऊन हे जंगलचे राजे तारप्यांभोंवतीं नाचत रहायचे. ठाकरांच्या नृत्य-गीताचा एक नमुना असा—

कारवावर पाय दिला कारवा तडाडिला
कारवा तडाडिला बुंधांत मोडीला
घाटाच्या तोंडाले वाऱ्याची वाधूळ
तेही वाधुळीनं पाचोळा गोळा केला

ढोलक्याच्या भोंवतीं ठाकर नाचत असायचे. असा नाच असा नाच, कीं अवध्यांच्या अंगीं अक्षरशः वारें भरायचें. त्या नाचांत नाना प्रकारच्या गती. कधीं अवध्यांनीं वाकायचे. कधीं एकमेकांना खेटून अत्यंत जल्द गतीनें मागें सरायचें. कधीं एक हात अन् एक पाय उचलून बगळ्या-सारखें उड्या मारीत चलायचें. नाचाचें हें कळित्र ढोलक्याच्या हातीं. त्यानें गत बदलली, कीं नाच्यांची गत बदलायची. खायला नाहीं, प्यायला नाहीं. तरी पण असा उल्हास अन्यत्र दुर्लभच !

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों दि ..................

# चैत्यें आणि गुहा

आर्थिक दृष्ट्या कदाचित् महाराष्ट्र दरिद्री असेल. नव्हे, तो आहेही. उगीच छातीला माती लावण्यांत अर्थ नाहीं. इतर कित्येक प्रांत महाराष्ट्राच्या मानानें फारच सुपीक आहेत, संपन्न आहेत. तिकडील पिकें भरदार, उंच. तिकडल्या गाई-म्हशींना घागर घागर दूध. तिकडील माणसेंही अदबशीर स्वभावाचीं. संपन्नतेची झळाळी सर्वांच्या मुद्रांवरून झळकत असलेली.

पण कमींत कमी एका बाबतींत तरी या सर्व प्रांतांनीं महाराष्ट्रापुढें मस्तक नम्र करायला हवें. इतर प्रांतांतून भव्य इमारती आहेत. मशिदी आहेत, कबरी आहेत, मंदिरें आहेत. ताजमहाल आहेत, कुतुबमिनार आहेत, लाल किल्ले आहेत. असें परोपरीचें आहे.

पण महाराष्ट्रासारखीं चैत्यें, महाराष्ट्रासारखीं पाषाणशिल्पें, महाराष्ट्रासारखे विहार आणि गुहा, महाराष्ट्रासारखीं काळ्या कभिन्न खडकांत खोदलेलीं लेणीं एकट्या भारतांतच काय, पण साऱ्या जगांत इतरत्र कुठेंही नाहींत. या बाबतींत तरी मानाचा टिळा अगोदर महाराष्ट्राच्या मस्तकीं लावला पाहिजे.

महाराष्ट्राची परोपरींनीं उपेक्षा होत गेली. ब्रिटिश राजवटींत तर ती फारच झाली. कारण उघड होतें. इंग्रज दिल्लीचे सम्राट् झाले खरे, पण त्यासाठीं शेवटचें झुंज मात्र त्यांना मराठ्यांशीं झुंजावें लागलें. शेवटले रक्ताचे ओघळ मराठ्यांच्या तरवारींवरून खालीं उतरले. शेवटलीं रणक्षेत्रावरलीं कबंधें भुईवर कोसळलीं तीं मराठ्यांचीं. जोंपर्यंत मराठी शक्ति जिंकली

नव्हती, तोंपर्यंत इंग्रजांना सुखानें दारूचा पेला उचलतां आला नाहीं.

म्हणून साहजिकच त्यांनीं भारतांत आबादी आबाद झाल्यावर भव्य इमारतींविषयीं डांगोरा पिटला, तो उत्तरेकडल्या. वारंवार व्हॉइसरायांना आणि गव्हर्नरांना दाखवीत गेले, तें उत्तरेंतलें शिल्प. ताजमहालचें कौतुक झालें. फार फार झालें. आतां तर ताजमहाललादेखील घुमटावरील दगडांच्या भारापेक्षां या स्तुतीचेंच ओझें अधिक झालें असावें.

ताजमहालशीं शत्रुत्व करायचें कारण नाहीं. पौर्णिमेच्या चांदण्यांत सायं-काळच्या गूढ निळ्या प्रकाशांत, अगदीं सूर्योदय होत असतां ताजमहाल चांगला दिसतो. दुरून चांगला दिसतो.

पण वेरूळचें कैलास लेणें ताजमहालपेक्षांही अधिक देखणें आहे, असें जर कुणीं म्हटलें तर ताजमहालनें रागावूं नये. ताजमहाल हें पांढऱ्या दगडाचें सौंदर्य आहे. बाहेरून रचलेलें सौंदर्य आहे. बिघडलें तर मोडून पुन्हा रचतां यावें, असें सौंदर्य आहे. मात्र कैलास हें काळें सौंदर्य आहे. काळेंपण म्हणजे गूढपण. तर्क जिथें थबकतो असें. तें महाराष्ट्राच्या वर्णाचें आहे. श्री-कृष्णाच्या आणि श्रीरामाच्या वर्णाचें आहे. इतर रचलेल्या शिल्पांपेक्षां या लेण्यांचा विशेष असा कीं, एकदां छिनी मारली कीं ती वज्रलेप झाली. तिनें झालेला घाव कांहीं पुन्हा भरून काढतां यायचा नाहीं.

हीं चैत्यें निर्मीत असतां, हीं लेणीं घडत असतां त्या शिल्पज्ञांना कसें अवधान राखावें लागलें असेल ! छिन्नीचें वजन कसें प्राणांहूनहि अधिक जपावें लागलें असेल, हातोड्यांत कसा प्राण ओतावा लागला असेल, हें एक देवच जाणे ! देवच जाणे अशासाठीं म्हटलें, कीं या शिल्पज्ञांचीं नांवेंहि ठाऊक नाहींत.

हें कैलास लेणें पाहिल्यावर भल्या भल्या अतिरथी महारथी तंत्रज्ञांचे डोळे विस्फारतात, मन आदरानें भरून येतें, बुद्धि विस्मयानें थक्कित होते. हें अद्‌भुत देवदुर्लभ शिल्प त्या शिल्पज्ञांनीं कसें रचलें असेल, याविषयीं अनुमानही करवत नाहीं. त्या शिल्पज्ञांनीं आपलीं नांवेंही कुठें कोरून न ठेवतां अज्ञाताच्या आड मिसळून जावें हें केवढें आश्चर्य !

तसें पाहिलें तर काळा पाषाणही कांहीं मोठी देखणी वस्तु नव्हे. भाव-प्रकटीकरणाच्या बाबतींत तर नव्हेच नव्हे. तशांत या लेण्यांचा पाषाण

लख्ख काळाही नव्हे. किंचित् धुरकट. म्हणजे थोडासा ऐदीच म्हणायचा. पण हाच पाषाण फोडून शिल्पकारांनीं मूर्तींच्या मुद्रांमधून कसकसे भाव उमटवले आहेत !

घारापुरीच्या त्रिमूर्तींतील शिवाच्या मुद्रेवरलें गांभीर्य कसें ! किंचित् उग्र भाव कसा ! किंचित् अत्यल्प दर्प कसा ! ब्रह्मदेवाच्या मुद्रेवरील विश्व-रचनेच्या जबाबदारीची जाणीव कशी ! श्रीविष्णूच्या मुद्रेवरील भावरेखा कशी ! सौम्यत्व कसें ! किंचित् हास्य कसें !

तिथल्या पार्वती-परिणयाच्या शिल्पांतील पार्वतीच्या मुद्रेवरील सलज्ज भाव कसा ! आपल्या प्रियकराला भेटण्याविषयींची किंचित् आतुरता कशी ! तिची उभी राहाण्याची ढब कशी ! सगळे आवरून धरलेले यौवनभाव तर तिच्या अंगप्रत्यंगांतून प्रकट होत आहेत—फुटून बाहेर येऊं पाहताहेत.

वेरूळच्या अनेकानेक बुद्ध आणि जिनमूर्तींच्या मुद्रांवरील कारुण्य, शान्ति, तृप्ति, वात्सल्य, विरक्ति, या एकेका छटेचें वर्णन करतां पुरवत नाहीं.

अन् केवढाल्या त्या मूर्ति ! कशी त्यांच्या अवयवांची प्रमाणबद्धता ! त्या शिल्पकारांनीं एवढाल्या मूर्ति रचीत असतां समोर प्रमाणचित्रें तरी केवढालीं ठेवलीं असतील ! त्यांची बसण्याची पद्धत, उभें राहाण्याची पद्धत, त्यांचें लवंडणें, डोक्याखालीं हाताचा टेका घेणें, सारें सारेंच अतर्क्य आहे. असें वाटतें, कीं आतां ही मूर्ति उठेल अन् कुठें तरी चालूं लागेल. कांहीं-तरी करील. हंसेल. बोलेल. आशीर्वाद देईल. कुशल विचारील—असें सारखें सारखें वाटत राहातें.

अन् अजण्ठ्याच्या लेण्यांतील चित्रें ! त्यांच्या प्रतिकृति तर साऱ्या जगांतल्या चित्रकारांनीं येऊन करून नेल्या. दीड-दोन हजार वर्षांपूर्वीचे रंग, पण अजून अगदीं ताजे ताजे आहेत. फुलांमधल्या नितळाईएवढे ताजे. त्यांच्यांत एवढासाही मलिनपणा निर्माण झाला नाहीं. अन् त्यांची अवयव-रेखनाची समज, भावदर्शनांतलें कौशल्य हें तर केवळ अलौकिकच आहे. बुद्धाला घातलेली भिक्षा, आरशांत आपलें रूप न्याहाळत असलेली एक कृष्णा, तिचे—बहुधा सगळ्याच चित्रांतील आकृतींच्या शरीरावरले वेचक अलंकार, केशरचना, सारें सारें अगदीं दृष्ट लावणारें आहे.

जरी या शिल्पांचा क्रम लावणें कांहींसें कठीण असलें तरी कांहीं एक

योजना ठरवलीच पाहिजे. शिल्प, भव्यता, संख्या, वैशिष्ट्य साऱ्याच दृष्टींनीं पहिला क्रमांक वेरूळचा. त्यानंतर अजिंठा. लेणीं कमी खरीं पण अलौकिक मूर्तिविज्ञान प्रकटलें आहे घारापुरीला. नंतर बहुधा कार्ल्याचा क्रम लागावा. नाशिकच्या पांडवलेण्यांनंतर भाजें आणि बेडसें येथील लेणींही दुर्लक्ष करण्याजोगीं नाहींत. कान्हेरी, जुन्नर यांचा क्रम या ठिकाणीं यावा.

तशीं तर महाराष्ट्रभर लेणीं पसरलीं आहेत. तीं कराडजवळ आहेत. महाडजवळ आहेत. कोंकणांत आहेत. आंद्रेच्या खोऱ्यांत आहेत. भामचन्द्र डोंगरांत आहेत. भंडाऱ्यावर आहेत. घोटाड्यांवर आहेत. पुण्याजवळ पाताळेश्वरीं आहेत. शिवनेरीच्या किल्ल्यावर आहेत. खंडाळ्याच्या घाटांत आहेत. नाणेघाटांत आहेत. घारापुरी, मंडपेश्वर, अंकाईटंकाई, औरंगाबाद, पितळखोरें, कुंडल, पन्हाळा, चौल, खेड अशा नाना ठिकाणीं आहेत.

महाराष्ट्रांतल्या त्या काळ्या—खरें बोलायचें तर किंचित् धुरकट काळ्या पाषाणासारखा बुलंद पाषाण भारतांत अन्यत्र दुर्लभ. हा ज्वालामुखीच्या रसापासून बनलेला. म्हणून मग शिल्पकार मनाला येईल तिथें आपल्या छिन्न्या नि हातोडे चालवीत राहिले. त्यांच्या साहाय्याला धांवून आले बौद्ध भिक्षु. त्यांना नगरापासून दूर कुठें तरी राहाण्यासाठीं आराम आणि चैत्यें पाहिजेच होतीं. गौतम बुद्धाच्या शारीर अवशेषांचीं रक्षणस्थानें म्हणून स्तूपही रचायला पाहिजेत. उत्तरेंत हें सगळें बाहेरून विटा रचून आणून रचावें लागलें. जसा सारनाथचा स्तूप.

पण महाराष्ट्रांत उतरतांक्षणीं त्यांना हा काळा कुळकुळीत पाषाण दिसला अन् सांपडले कुशल शिल्पज्ञ. त्यांनीं एकमेकांस साहाय्य करून महाराष्ट्राच्या शरीरांवर हीं जीं लेणीं चढवलीं, त्यांचें मोल पृथ्वीमोलाहून आगळें आहे.

वेरूळ आणि अजिंठ्याबद्दल मराठवाड्यानें गर्व मानावा. तशा तर मराठवाड्यानें गर्व मानावा अशा अनेक गोष्टी आहेत. सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान मराठवाड्यांत. यादवांची राजधानी देवगिरि मराठवाड्यांत. मंदिरांची वैशिष्ट्यपूर्ण रचना करणारा, मोडी लिपी शोधून काढणारा, धर्मग्रंथाचा निर्माता हेमाद्रि मराठवाड्यांत. शिलाहार कुलाचें आदिमस्थान मराठवाड्यांत. बोपदेवासारखा धर्मपण्डित मराठवाड्यांत जन्मला.

ज्ञानेश्वरांचें आजोळ आपेगांव मराठवाड्यांत. नाथांचें पैठण मराठवाड्यांत. समर्थांचें जांब मराठवाड्यांत. दासोपंतांचें जोगाई आंबें मराठवाड्यांत. महाराष्ट्रांतल्या पांच ज्योतिर्लिंगांपैकीं औंढ्या नागनाथ, परळी वैजनाथ आणि घृष्णेश्वर अशीं तिन्ही मराठवाड्यांत. असें बहुत बहुत आहे. किंबहुना मराठवाडा हें मायबोली मराठीचें माहेरघर म्हटलें तरी चालेल.

तरी पण वेरूळ आणि अजिंठ्याचीं लेणीं या दोन्ही गोष्टी मराठवाड्याच्या आभूषणांमधील शिरपेंचाच्या जागीं आहेत, यांत शंकाच नाहीं.

वेरूळला तिन्ही प्रकारचीं लेणीं आहेत. ब्राह्मणी, जैन आणि बौद्ध. या लेण्यांविषयीं एक दंतकथा आहे. अशीच ती अजिंठ्याच्या लेण्याविषयींही आहे.

एकदां देवांना वाटलें, एक रात्र धरामण्डलावर घालवावी. म्हणून ते आपआपलीं विमानें सज्ज करून आकाशमार्गानें या लेण्यांजवळ उतरले. रात्रभर त्यांनीं धरामण्डलाचें सुख उपभोगलें. हास्यविलास, आमोद-प्रमोद यांत काळ कसा गेला कळलेंच नाहीं. अन् पूर्वा उजळली. सूर्यबिंब उदयाचलीं आलें. मग इंद्राच्या शापामुळें ते सगळे देव पाषाणरूप होऊन या लेण्यांतच राहिले! दंतकथा असली तरी तिचा गर्भितार्थ मोठा देखणा आहे.

पण या अद्वितीय लेण्यांकडे वळण्यापूर्वीं इतर किरकोळ लेण्यांचा मागोवा घ्यावा आणि मग पायऱ्या चढत चढत या लेण्यांकडे पोंचावें तें अधिक सोयीचें.

लेणीं म्हणजे काय? महाराष्ट्राला अशी संवय आहे कीं, जें काय डोंगरांत खोदकाम आढळेल त्याला त्याला म्हणून लेणें म्हणायचें. हें तर खरेंच आहे. शिल्पज्ञांनीं वर्षोन् वर्षे परिश्रम करून ज्याची रचना केली, तें सह्याद्रीचें लेणें अगर अलंकारच म्हटला पाहिजे. पण या लेण्यांतही नाना प्रकार आहेत. कांहीं आहेत चैत्य. कांहीं आहेत विहार. कांहीं आहेत सभागृहें. कांहीं आहेत भिक्षूंसाठीं बांधलेल्या केवळ खोल्या. कांहीं आहेत देवतांचीं मंदिरें.

पैकीं भिक्षूंच्या खोल्या, हा प्रकार महाराष्ट्रांत जवळ जवळ सर्वत्र पसरलेला आहे. कड्याचा दर्शनी भाग तासून काढायचा. आंतल्या बाजूला एक चौकोनी पोकळी करायची. एक माणूस राहूं शकेल एवढ्या आकाराची.

तिच्यांत झोपण्यासाठीं साधारण उंचीचा एक ओटा काढायचा. महाराष्ट्रांतले बहुधा सारे डोंगर या अशा भिक्षूंच्या निवासांनीं पोखरून निघाले आहेत.

मात्र जिथें हीं भिक्षूंचीं निवासगृहें आढळायचीं, तिथेंच असायची एखादी गुहा. हें असायचें सभागृह. जिथें सारे भिक्षु एकत्र जमून प्रार्थना करूं शकतील असें. याच्या दोन्ही बाजवांना असायचे ओटे आणि समोर मध्यभागीं मुख्य भिक्षूकरितां असलेली खोली. तिचें प्रवेशद्वार कमानींनीं अलंकृत असायचें. घोराडीच्या डोंगरावर याच जातीचीं निवासगृहें आहेत.

कुठें कुठें या मधल्या सभागृहांमधून एखादा स्तूप आढळायचा. स्तूप म्हणजे उपड्या नगाऱ्याच्या आकाराचा एक प्रचण्ड स्तम्भ. बहुधा याचा शिरोभाग छताशीं चिकटलेला असायचा. प्रत्येक स्तूपांत बुद्धाचा अवशेष असेच, असें नाहीं. किंबहुना अनेकानेक स्तूपांतून तो नसेच. हे स्तूप म्हणजे बुद्धाचीं स्मृतिचिन्हें असलेल्या स्तूपांच्या केवळ प्रतिकृतीच.

कराडजवळचीं लेणीं या जातीचीं. महाडजवळचीं पाल्याचीं लेणीं, तींही याच जातीचीं. हीं सर्व एका ओळींत खणलेलीं नसायचीं. जसजसा खडक उपलब्ध होत राहील, तसतशीं कमीअधिक उंचीवर हीं खोदायचीं.

जुन्नरचा लेण्याद्रि हें तर अशा जातीच्या असंख्य लेण्यांचें एक पोळेंच आहे. इथें एका लेण्यांत श्रीगजाननाची मूर्ति आहे, हें खरें. मात्र ती उत्तरकालीन आहे. मूळ लेणीं पोखरलीं गेलीं तीं भिक्षूंसाठीं. किंबहुना अनेक ठिकाणच्या लेण्यांमधून उत्तरकालीं अशी अनेक देवतांची स्थापना झाल्याचें आढळतें. घोराडी आणि भामचन्द्र या दोन्ही ठिकाणीं असलेलीं शिवलिंगें उत्तरकालीन आहेत हें निर्विवाद.

एक विशेष सांगावयाचा राहिला, तो असा, कीं बहुधा या प्रत्येक लेण्याजवळ अथवा पांच-सात लेणीं मिळून एखादें पाण्याचें टाकें खडकांत खोदलेलें आढळायचें. खडकांतून थेंब थेंब झिरपत पावसाळाभर पाणी सांठायचें आणि मग तें वर्षभर पुरायचें. किल्ल्यावरल्या टाक्यांची आणि यांची पाणी सांठवायची युक्ति एकच.

स्तूप रचणें हेंही एक धर्मकृत्य मानलें जाऊं लागलें होतें. हा याच्या नांवानें, तो त्याच्या नांवानें. असा एकटाच एक स्तूप भंडारा डोंगर आहे. आणि दहा-पंधरा स्तूपांचा एक संघच जणूं भाज्याच्या लेण्यांमध्यें

खोदून काढला आहे. तिथले हे स्तूप अगदीं एकाशीं एक खेटून असे उभे आहेत. त्यांच्या रचनेंतही समानता आढळत नाहीं, फारसें कौशल्य नाहीं. बहुधा कोण्या थातुरमातुर शिल्पज्ञानें दाम पुरेसा न मिळाल्यामुळें ही कशी-बशी वेठ मारली असावी.

कांहीं ठिकाणीं सभागृहांपुढें बुद्धाच्या मूर्ति आहेत. कांहीं ठिकाणीं बसल्या, आसनस्थ, तर कांहीं ठिकाणीं उभ्या. दोन्ही मूर्ति अभयपाणि. चिनी बुद्धमूर्तीप्रमाणें बुद्धाची भयावह मूर्ति संबंध भारतांत कोठेंच नाहीं. प्रत्येक बुद्धमूर्तीच्या मुद्रेवरील भाव सौम्यच असायचा.

कान्हेरीच्या मुख्य सभागृहापुढें दो बाजूंस बुद्धाच्या दोन मूर्ति जवळ जवळ पंचवीस फूट उंचीच्या अतिसुबक आहेत. दोन्ही उभ्या. कान्हेरीला इतरत्रही अनेक मूर्ति आहेत. पण त्या सुमार उंचीच्या आहेत. या लेण्यां-मधून कांहीं ठिकाणीं निवासगृहांसमोर कठडे आहेत. सुरेख कोरीव काम केलेले.

ही कान्हेरीच्या लेण्याची जागा ज्यानें शोधून काढली असेल, तो निसर्गाचा मोठा मर्मज्ञ असला पाहिजे. या लेण्यांच्या माथ्यांवर जाऊन उभें राहावें, तर भंवतालच्या निसर्गसौंदर्यानें मन केवळ भरून येतें. समोरच पश्चिमेकडे लाटा आंदोलत असलेला पश्चिम समुद्र दृष्टीस पडतो. त्याच्याशीं अगदीं सलगी करणारीं नारळींचीं बनें. तीं बनें जिथें संपतात, तिथून सुरू होते वनसृष्टि. सह्याद्रीचा हा जरी अगदीं समुद्राशीं मिळणारा भाग असला, तरी वनसृष्टि मात्र अपूर्व आहे. पुढें, मागें, डावी, उजवीकडे. असा सारा आसमंत वृक्षावळीनें नुसता कोंदून निघाला आहे. आज जर तिथें इतकें गहन वन आहे, तर पूर्वीं याहून अधिक असलें पाहिजे.

हीच गत भाजें आणि बेडसें या दोन्ही लेण्यांची. पैकीं बेडसें हें लेणें जनसामान्यांच्या वर्दळीपासून बरेंच दूर वसलेलें. कामशेत स्टेशनवर उतरावें आणि एक डोंगराची खिंड ओलांडून पलिकडे चार-पांच मैल चालत जावें, तेव्हां हीं लेणीं लक्षांत येतात. जशी एखादी वानरी आपल्या इवल्याशा पिलाला पोटाशीं घेऊन बसावी, तशीं हीं लेणीं पर्वताच्या अगदीं कुशींत खोदलीं आहेत. पैकीं मुख्य चैत्यगृह मोठें देखणें. त्याच्या कमानी, आंतले खांब, स्तूप सारेंच लखलखलख आहे. खांब जिथें वरच्या छताला जाऊन

भिडतात, तिथें मिळणीच्या जागीं कांहीं पशू खोदलेले आहेत. ते इतके जिवन्त आहेत, कीं क्षणभर टक लावून पाहूं लागलों, तर आपल्याला वाटतें, कीं आतां हे तिथून खालीं उतरतील आणि चरायला डोंगरांत जातील !

या लेण्यांमधेंही दीड-दोन हजार वर्षांपूर्वीं काढलेलीं अत्यंत सुदर्शन चित्रें होतीं. पण विध्वंस व्हायचा असला म्हणजे कसा होतो याचें एक उदाहरण—

कुण्या एका साहेबाच्या मनांत हीं चित्रें पाहावींत असें आलें. झालें. हाताखालच्या लोकांना हुकूम सुटले कीं, साहेब येताहेत. लेणीं स्वच्छ करा. कामगार लेण्यांत आले. त्यांनीं पाहिलें कीं, सगळ्या भिंती कांहीं अंश उडालेल्या चित्रांनीं चिथाडलेल्या आहेत. मग त्यांनीं त्या भिंती खरवडून साफ केल्या आणि आंत झक्क रंगसफेदी केली ! कर्म अन् दुसरें काय !

बेडशाचीं लेणीं ख्रिस्तपूर्व दुसऱ्या-तिसऱ्या शतकांतलीं, तर भाज्याचींही त्याच सुमाराचीं. भाज्याच्या लेण्यांसमोर उभें राहावें. लेणीं मागें टाकून. तों समोर दिसतो लोहगड. डाव्या हाताला विसापूर. दोन्ही किल्ले जणुं आवळे-जुवळे भाऊच. अन् मग त्या किल्ल्यापासून जी वनसृष्टि सुरू होते, ती थेट भाज्याच्या लेण्यांपर्यंत.

भाज्याच्या लेण्यांतलें मुख्य चैत्य सुदर्शन आहे. चैत्याच्या बाहेर सध्यां बरीच पडझड झाली आहे; पण खोदकाम केलेली पिंपळपानी कमान आणि दोन बाजूंची नक्षी यांचें अनुमान तर आजही करतां येतें. आंत शिरावें तों दो बाजूंनीं खांबांची ओळ आणि मधोमध असलेला प्रचण्ड स्तूप, अशी गंभीर रचना दृष्टीस पडते. चैत्याची उंची सुमारें पंचेचाळीस फूट. एक विशेष असा कीं, दो बाजूंच्या भिंतींना खोवणी ठेवून त्या खोवणीं-मधून सागवानी कड्या दो बाजूंनीं उभ्या केल्या आहेत; आणि त्या मधोमध नेऊन भिडविल्या आहेत. आजही त्या अस्तित्वांत आहेत. त्यांतल्या कांहीं जरी कालपरवां नवीन करून बसविलेल्या असल्या, तरी जवळ जवळ निम्म्या मात्र लेण्यांची रचना झाली तेव्हांपासूनच्या आहेत. म्हणजे दोन हजार वर्षांपूर्वींच्या. कोणतें रसायन लावल्यामुळें हें लांकूड इतकीं वर्षें टिकलें, तें शिल्पकारच जाणोत !

हा मुख्य चैत्य आणि त्याच्या शेजारचीं भिक्षूंचीं निवासस्थानें न्याहाळीत पुढें निघावें तर मागें वर्णिलेले दहा-बारा-पंधरा थातुरमातुर स्तूप एकत्र थवा करून उभे राहिलेले दिसतात, आणि मग पलिकडे येतें दुसरें एक लेणें.

अनेकांच्या मतें हें लेणें बुद्धपूर्वकालीन आहे. हें केवळ एक सभागृह आहे. बाहेर भिंतीवर उठावदार मूर्ति आहेत. पैकीं एक मूर्ति आहे इंद्राची आणि दुसरी अश्ववाहन सूर्याची. सभागृह मोठें देखणें आणि आटोपशीर आहे.

पण भाज्याच्या लेण्यांहून अधिक देखणें लेणें, अधिक भव्य सुबक चैत्यगृह आहे कार्ल्याला. या चैत्याच्या भोंवतीं अनेक निवासांची दाटी आहे, पण तिकडे लक्ष जातच नाहीं. तें केंद्रित होतें वैजयंतीचा भूतपाल सेठी यानें निर्माण केलेल्या जंबुद्वीपांतील अद्वितीय चैत्याकडे. तात सह्याद्रीच्या लाडक्या पुत्रानें म्हटलें आहे—

" कार्लें येथील चैत्य सर्व बुद्धचैत्यांत विस्तीर्ण, उत्तुंग आणि उत्कृष्ट आहेत. प्रसन्न, गंभीर आणि उदार आहेत. हीनयान सातकर्णी शिल्पकरणीचा हा चूडामणि. येथें ऐश्वर्य आहे, डामडौल नाहीं. येथें अभिजात कला आहे. ओसंडती कृत्रिमता नाहीं. कौशल्याचें प्रदर्शन नाहीं. मूर्तींची गर्दी नाहीं. धर्मप्रवर्तकांची आग्रही टोंचणी नाहीं. स्वसंतुष्टतेचा बडिवार नाहीं ! वस्तुतः स्तूप हें मृत्यूचें प्रतीक. पण येथें तें जीवनाची प्रेरणा देतें. वैजयंतीचा भूतपाल सेठी हा या लेण्याचा निर्माता. हें लेणें जंबुद्वीपांत अद्वितीय आहे, असें त्यानें येथील आपल्या लेखांत नमूद केलें आहे. तेंच खरें आहे. यापूर्वीं शिल्पकारांनीं अनेक लेणीं खोदलीं व यानंतरही. पण यासारखें हेंच. त्याला जोड नाहीं. त्याला तोड नाहीं ! "

हे उद्गार किती खरे आहेत. याचा प्रत्यय येण्यासाठीं एकदां तरी हें लेणें पाहिलेंच पाहिजे. भव्य सरळसोट स्तम्भ, आंत पुरेसा प्रसन्न प्रकाश, लांबी, रुंदी आणि उंची यांचें प्रमाण समधात साधलेलें. अत्यंत देखणा आकृतिबद्ध असा स्तूप. बाहेरील बैठकीवर सातकर्णी वेशभूषा केलेल्या स्त्रीपुरुषांच्या जोड्या, समोरचा अशोक स्तंभ—असें सारें सारेंच अत्यंत रेखीव, सुटसुटीत आणि प्रमाणबद्ध आहे. प्रमाणाचा तोल कुठेंही ढळलेला नाहीं.

लेण्याच्या बाहेर येऊन उभें राहावें, तर समोर दिसतें इंद्रायणीचें खोरें आणि पलिकडे पोटाशीं भाज्याचीं लेणीं घेऊन उभे असलेले ते जोडकिल्ले. विशेषतः पावसाळा उलटून गेल्यावर लोंबत्या भातांनीं भरलेला हा प्रदेश पाहतांना मन असें प्रसन्न होतें, कीं सांगतां पुरवत नाहीं.

अशीच अवस्था होते नाशिकला पांडवलेण्यांच्या टेकडीवर उभें राहिल्यावर. त्या टेकडीला म्हणायचें त्रिरश्मि पर्वत. समोर पसरलेला दिसतो प्रचंड भंवताल—जो डोंगरदऱ्यांनीं वेढलेला आहे. जवळच आहे नाशिक. नाशिक हें क्षेत्र अधिक प्राचीन. श्रीरामरायांच्या पदरजांनीं पवित्र झालेलें. नाशकाच्या वाड्यांना अन् तटांना अंग घाशीत वाहते पावनपुलिना गोदामाई. हा साराच प्रदेश आजही रायांनीं झांकलेला आहे. नाना तऱ्हेच्या वृक्षवल्लींनीं भंवतालीं दाटी केलेली आहे.

या लेण्यांच्या गटांत बरेचसे चैत्य आहेत. स्तम्भ आहेत. मूर्ति आहेत. पशु आहेत. अलंकार आहेत. पण या सर्वांहून अधिक महत्त्वाचे असे लेख आहेत. सातवाहन कुलांतला कृष्णराजा. तो राज्य करीत असतां कुणा श्रमण महात्म्यानें त्यांतलें एक लेणें खोदलें आहे. एका लेण्यांत गौतमीपुत्र सातकर्णीचीं पराक्रमकृत्यें नोंदणारा लेख आहे. तो आहे त्याची माता महादेवी गौतमी बालश्रीचा. आभीरांचा नेता ईश्वरसेन याचाही एक शिलालेख आहे.

भिंतींवर कोरलेल्या उठावदार चित्रांत कांहीं प्रसंगचित्रें आहेत. कांहीं द्वारपाल आहेत. द्वारपालिका आहेत. क्रमांक वीसच्या लेण्यांत गौतमीपुत्र श्रीयज्ञ सातकर्णीचा लेख आहे. या लेण्यांतला विशेष असा, कीं यांतील स्तम्भांवर कोरलेल्या आकृति मोठ्या नाजुक आहेत. त्यांत पर्णें आहेत. पुष्पें आहेत. नाजुक वळणदार वेली आहेत. कमळें आहेत. असें मोठें सुबक नक्षीकाम केकेलें आहे.

शेवटीं अजिंठा आणि वेरूळकडे वळण्यापूर्वीं एका गोष्टीचा उल्लेख इथें करायला हवा. बौद्धांत दोन पंथ. हीनयान आणि महायान. या दोन्ही पंथांचीं लेणीं महाराष्ट्रांत सर्वत्र आहेत. पैकीं हीनयानांचीं लेणीं साधीं, भव्य आणि मूर्ति नसलेलीं. महायानांनीं मात्र वैदिकांचें अनुकरण करून आपलीं लेणीं, बुद्धमूर्ति, स्तम्भ-चित्रें, प्रसंग-चित्रें, द्वारपाल, नाजुक नक्षी यांनीं नुसतीं मोहरून टाकलीं.

महाराष्ट्रांतील लेण्यांचा आणिक एक विशेष असा, कीं इथें तीन प्रकारचीं लेणीं आहेत. वैदिक, जैन आणि बौद्ध. जैन लेणीं नाशिकजवळ आहेत. तशींच तीं वेरूळच्या लेण्यांतही आहेत. मात्र अजिंठ्याचीं लेणीं केवळ बौद्ध लेणीं आहेत.

## अजिंठा आणि वेरूळ—

अजिंठ्याचीं लेणीं सगळीं मिळून एकोणतीस. पैकीं कांहीं आहेत चैत्य. कांहीं विहार. दोन्ही पंथांचे. हीनयान आणि महायान. या लेण्यांच्या अगदीं जवळून सातकुण्ड नांवाचा एक सात मजली धबधबा खालीं कोसळतो. ज्या डोंगराच्या पोटाशीं हीं लेणीं आहेत, त्याच्या तळापासून वाहते वाघरा नदी. भंवतालीं आहेत उंच उंच पर्वतशिखरें आणि वनराई. असा हा परिसर. मोठा दृष्टिरम्य.

लेण्यांत कांहीं प्रसंगशिल्पें आहेत. कांहीं मुख्य मूर्ति. या मूर्तींतल्या कांहीं अतिशय सुबक आहेत. उदाहरणार्थ, एकोणीस क्रमांकाच्या चैत्याच्या समोरच्या अंगाला उजव्या हातास एका राजाची मूर्ति आहे. त्याच्या मस्तकावर सात फड्यांच्या नागाचें छत्र, डाव्या बाजूला हातांत कमल घेतलेली त्याची पत्नी बसलेली आहे. शेजारीं चवऱ्या घेऊन एक दासी उभी आहे. त्यांच्या मुद्रेवरील भाव असा कांहीं विलक्षण साधला आहे कीं, जणुं तीं सगळीं चैत्यांतील प्रार्थनाच ऐकत असावींत !

मात्र या लेण्यांतील रंगकाम पाहिलें, कीं बुद्धि विस्मयानें थक्क होऊन जाते. या चित्रकारांनीं केलें काय, कीं भिंतींचा खडबडीतपणा बुजविण्यासाठीं तांबडी माती, गवत, शेण आणि भाताचें तूस या सगळ्या गोष्टींचा कालवून लगदा केला. या लगद्यानें सगळ्या भिंती मढवून एका पातळींत आणल्या. कचित् असें वाटतें, कीं त्यावर त्यांनीं नाजुक हातानें चोपकामही केलें असावें. एरवीं हा लगदा दगडाच्या खोबणींतून असा घट्ट बसायचा नाहीं. मग त्यावर शिंपांच्या चुन्याचा पातळ थर देऊन वर असंख्य चित्रें काढलीं आहेत. काळा रंग त्यांनीं काजळाचा वापरला आणि बाकी सगळे मातीचे. त्या काळांत ज्या तूलिका [ब्रश] उपलब्ध झाल्या, त्या वापरून त्यांनीं चित्रकारीची केवळ कमालच केली आहे.

कोणतें चित्र काढायचें, तें ठरल्यावर अगोदर अत्यन्त सूक्ष्म अशी बाह्य रेखा काढून घ्यायची आणि मग आंत रंग भरायचे, अशी या चित्रकारांची पद्धति. यांच्या बाह्य रेषा अचूक. यांचें शरीरसौष्ठव अप्रतिम. यांची रंग-संगति आजही तिचें अनुकरण करावें अशी. त्यांचें भावदर्शन तर अपूर्वच.

इथें किती प्रकारचीं चित्रें आहेत म्हणून सांगावें! आणि तीं कशा-कशाचीं? तर व्यक्ति आहेत, पशु आहेत, पक्षी आहेत, अलंकार आहेत, खाद्यपदार्थ आहेत. मूर्तींच्या मुद्रांवर हास्य आहे, अधिक्षेप आहे, दीनता आहे, माङ्गल्य आहे, तृप्ति आहे, करुणा आहे, क्वचित् उपहासही आहे. वात्सल्य आहे.

इथें हत्ती आहेत. टक्कर घेत असलेले बैल आहेत. हरिण आहेत. स्त्रिया तर असंख्य आहेत.

कांहीं श्यामा आहेत. कांहीं गौरा आहेत. कांहीं तन्वंगी आहेत. कांहीं सिंहकटि आहेत. कांहींचे केश बांधलेले आहेत—वेगवेगळाल्या रचना करून. कांहींचे मुक्त आहेत. कांहीं अंगुलिविक्षेप करीत आहेत. कांहीं वाता-यनांतून बाहेर पाहात आहेत. कांहीं झोपाळ्यांवर झोके घेत आहेत. मात्र आश्चर्य असें, कीं यांपैकीं एकीसारखी एक नाहीं.

इथें कांहीं नर्तिका आहेत. कांहीं कामोन्मत्ता आहेत. कांहीं मद्य पीत आहेत. कांहीं स्वैरिणी आहेत. कांहीं प्रसाधन करीत आहेत.

इथले बहुधा सारे पुरुष स्मश्रु केलेले आहेत. दाढी-मिशा दिसतात त्या केवळ परदेशीयांच्या चित्रांना. अशीं नाना प्रसंगांचीं, नाना दृश्यांचीं, नाना भावांचीं आणि अनुभवांचीं चित्रें काढून चित्रकारांची लेखणी धन्य झाली आहे. एका पाश्चात्य टीकाकारानें म्हटलें आहे, कीं सर्व तत्कालीन चित्रांत हीं चित्रें अजोड आहेत—केवळ अजोड आहेत.

अजिंठ्याच्या या चित्रकलेनें भारावून जाऊन आपण वेरूळला यावें. वाटेंत औरंगाबादच्या लेण्यांवरही एक नजर टाकावी. येतां येतां दुर्ग देवगिरीही बघावा. औरंगजेबाची कबर वाटेंत आहे. तिथेंही क्षणभर थांबावें. कबर अगदीं साधी आहे. सबंध भारत पादाक्रांत करण्याच्या ईर्ष्येनें तळमळत असलेल्या मोगल सम्राटाला शेवटीं स्वतःसाठीं केवळ साडेतीन हात जागाच पुरेशी झाली!

अन् मग आपण येऊन पोंचतों वेरुळजवळ. समोर आहे घृष्णेश्वर. देऊळ अगदीं साधें आहे. किंचित् औदासीन्यही भंवतीं दाटलें आहे. वेरूळ हें भोसल्यांच्या पाटीलकीचें गांव. असा कांहीं ऐतिहासिक तंतुही इथें जोडला गेला आहे.

लेणीं आहेत डोंगराच्या पोटाशीं. एकूण सगळीं मिळून तेहतीस. पैकीं कांहींचीं नांवें अगदींच गयाळ आहेत. बहुधा हे सारे अपभ्रंश असावेत. जसें एका लेण्याचें नांव होतें थेरवाडा. त्याचें नंतर झालें धेडवाडा. मग धेडवाड्याच्या शेजारीं महारवाडा आलाच पाहिजे. एकाचें नांव आहे इंद्रसभा. वस्तुतः इन्द्राचा या लेण्याशीं तसा प्रत्यक्ष संबंध कांहींच नाहीं. एकाचें नांव कुंभारवाडा.

एकाचें नांव सीतान्हाणी. सीता ही कधीं या लेण्यांकडे फिरकली नव्हती. पण नांव मिळालें झालें. एकाचें नांव सुतारझोपडी. एकाचें नांव तीनताळ.

इथल्या लेण्यांचा आणिक एक विशेष. तो असा, कीं इथल्या लेण्यांना मजले आहेत. तीन तीन मजले. केवढें आश्चर्य ! डोंगर जणुं भल्या थोरल्या चिखलाच्या गोळ्यासारखा आडवा उभा वाटेल तसा कापलेला आहे. एकेका लेण्याचें काम शंभर शंभर वर्षें चाललें होतें. इथल्या आकृति भव्य. मूर्ति भव्य. बुद्ध भव्य. तीर्थंकर भव्य. विष्णु आणि शंकरही भव्य. सारेंच भव्य. भव्य आणि उदात्त. हीनपणाचा कुठें स्पर्श सुद्धां नाहीं. या लेण्यांचें वर्णन किती करावें ! एवढेंच म्हटलें कीं पुरे, कीं हीं अद्वितीय आहेत. साऱ्याच लेण्यांचें वर्णन करूं गेल्यास महाग्रंथाचा आकारही पुरा पडायचा नाहीं.

बडोदें इथें एक राष्ट्रकूटांचा ताम्रपट सांपडला. त्यांत या साऱ्याच लेण्यांत अतिभव्य असें जें कैलास त्याविषयींचा उल्लेख आहे. तो असा—

" एलापुर येथील पर्वतावर कृष्णराज यानें एक आश्चर्यजनक आकाराचें देवालय बांधविलें. वायुरूप यानांतून फिरत असतांना देवांनीं तें पाहिलें; तेव्हां विस्मय वाटून ते थक्क झाले. ते आपल्याशींच म्हणत, कीं हें शिवालय स्वयंभू असावें. कारण कलेनें बांधलेल्या कामांत इतकें सौंदर्य दिसण्यांत येत नाहीं. ज्या कारागिरानें तें देवालय बांधलें तोही स्वतः विस्मयानें थक्क

झाला—तो म्हणाला, हें परम अद्‌भुत आहे, हें माझ्यानें कसें बांधवलें हेंच माझें मला कळत नाहीं. त्या देवालयांत शंभूची स्थापना केली होती. कृष्णराज ह्यानें सुवर्ण, माणकें व इतर मौल्यवान् रत्नें ह्यांच्या अलंकारांनीं स्वहस्तें त्या शंभूला आणखी भूषित केलें." [' दख्खनचा प्राचीन इतिहास— ' मराठी भाषांतर : श्री. बापट. ]

खरोखरीच कैलास अद्वितीय आहे. कैलासाभंवतीं भलें थोरलें प्रांगण आहे. याची मांडणी मंदिरासारखी आहे. तें सुमारें वीस फूट उंचीच्या चौथऱ्यावर तयार केलें आहे. प्रवेशद्वाराजवळ अगदीं वेगळा असा चौकोनी नंदीमंडप आहे. तिथून सभामंडपापर्यंत जिना आहे. सभामंडपाच्या पलिकडे गाभारा आहे. सभामंडपाच्या छतावर शिवताण्डवाचें दृश्य उठावदार पद्धतीनें कोरलें आहे. गाभाऱ्याच्या बाहेर गंगा आणि यमुना यांच्या मूर्ति आहेत. गाभाऱ्यांत शिवलिंग आहे. मंदिराच्या पिछाडीस प्रदक्षिणेच्या मार्गाला खेटून पांच गोमंदिरें आहेत. पैकीं एकांतही आतां मूर्ति शिल्लक नाहीं. मंदिरांतलें लिंगही नंतरचें असावें.

एकूण मंदिरांत अनेक अलङ्कृत खांब आहेत. असे खांब, कीं पहातां-क्षणीं म्हणावें, हां याला म्हणावें स्तम्भ! अनेक दृश्यें खोदलीं आहेत. शिवाच्या नानाविध लीलांचीं. एवढें भव्य लेणें पण सगळीकडे उजेड खेळतो आहे. कोंदटपणा धुमसटपणा कुठेंही नाहीं. नजर फेकावी तिकडे एखादा द्वारपाल दिसतो. एखादी देवतामूर्ति दिसते. एखादें भिंतींतूनंच उचलेलें पाषाणाशिल्प दिसतें. एखादें पशुशिल्प दिसतें.

दुःख एवढेंच, कीं यांतल्या बहुधा प्रत्येक मूर्तीला अपाय केला गेला आहे. हत्तींच्या सोंडा तोडल्या--मूर्तींचीं मस्तकें विच्छिन्न केलीं. म्हणतात, कीं हें औरंगजेबाच्या सैन्यानें केलें. औरंगजेब तर गेला. त्याची तीन मुठी माती सुद्धां झाली. अगदीं धुळीला मिळाला. मात्र वेरूळ अजूनही उभें आहे. कैलास अजूनही अभङ्ग आहे.

शेवटीं सदुभाऊ जोगळेकरांचा एक परिच्छेद उद्‌धृत केल्याशिवाय राहवत नाहीं. इतकें चांगलें कैलासचें वर्णन क्वचितच कुणीं केलें असेल—

" कैलास! कैलास हें महाराष्ट्राच्या मध्ययुगीन धर्मभावनेचें दृश्य स्वरूप आहे : सुंदर, सहिष्णु व समर्थ. कैलास हें महाराष्ट्राच्या मध्ययुगीन धर्म-

भावनेचें महाकाव्य आहे : मधुर, गंभीर व सालंकृत. कैलास हा महाराष्ट्राच्या मध्ययुगीन शिल्पकौशल्याचा उत्कर्षबिंदु आहे : अचल, उत्तुंग व सतेज. कैलास हें महाराष्ट्राच्या वैभवाचें स्मारक. कणखर अन्तरात्म्यावर झालेल्या संस्कारांचें द्योतक. श्रमसातत्याचें प्रतीक. संकल्पाची अपूर्वता व विशालता आणि सिद्धीची अतुल्यता व चारुता यांचें मूर्त स्वरूप. कैलासांत पहिला पदक्षेप केला कीं मन उचंबळून येतें, मान नत होते, नाम मुखीं येतें. वाटतें कीं, आज जीवन जणुं सफल झालें. जणुं यदृच्छेनें विश्वरूपदर्शन झालें. आणि हेंच वेरूळच्या निर्मात्यांचें सार्थक ! ”

✤ ✤ ✤

# कांहीं मंदिरांच्या मूर्ति—

महाराष्ट्रांत मंदिरें बहुत. नाना दैवतांचीं. त्यांत विठ्ठलासारखें परमसात्त्विक. गणपतीसारखें राजस. महादेवासारखें भोळें. जगदंबेसारखें लालनशील. महाकालीसारखें उग्र. भैरवासारखें संहारक. मारुतीसारखें सेवाधारी. अशीं कितीतरी दैवतें. क्षुद्र दैवतें तर अगणित. मानाई, सातमाई, झोलाई, यमाई, देवकाई, मरीआई, सटवाई अशा अनेक देवी. तर म्हसोबा, बिरोबा, वेताळ, मुंजा, रोकडोबा, डोळसोबा असे अनेक देव. शिवाय नागासारखीं अति क्षुद्र दैवतें. पीरासारखीं परधर्मी दैवतें, हींही भरीला आहेतच. किंबहुना असें म्हणावें, कीं महाराष्ट्रांतल्या प्रत्येक चौरस मैलागणिक, कुणा ओढ्याकांठीं, वृक्षाच्या तळीं बसलेलें एक एक क्षुद्र दैवत आहे. तर प्रत्येक पंचक्रोशींत एक एक मोठें मंदिर आहे. सोठें म्हणजे महाराष्ट्राच्या वैभवास साजेसें.

कुण्याही डोंगराच्या माळेकडे लक्ष द्यावें, तर दोन-चार टेकड्या मिळून एखाद्या शिखरावर एखादें देऊळ शिखराची अंगुलि आकाशांत उभावून बसलेलें दिसतेंच. प्रत्येक नदीचा उगम हें तीर्थस्नान आहे. दोन नद्यांचा संगम हें क्षेत्र आहे. प्रत्येक मोठा कडा अगर कपार यांच्या पोटाशीं एक एक दैवत विराजतें आहेच आहे. इतर प्रांतांतून सामान्यपणें मंदिरें गांवागांवांतून आढळतात. पण महाराष्ट्र हा वनांचा आणि दुर्गांचा देश. शिखरांचा आणि कडेकपारींचा देश. म्हणून महाराष्ट्रांतलीं हीं दैवतें अशीं दऱ्याखोऱ्यांतून, गिरिगव्हरांतून, महावृक्षांच्या तळीं आणि नद्यांच्या कांठावर विस्तारलीं आहेत.

सह्याद्रि आणि सातपुड्याचा स्वामी शंभु महादेव. जागजागीं पर्वत-शिखरांवरून तो विसांवला आहे.

एकूण भारतांत ज्योतिर्लिंगें बारा. पैकीं पांच तर एका महाराष्ट्रांत आहेत !

भीमाशंकरीं महादेव भीमा नदीच्या उगमस्थानावर विसांवला आहे. त्र्यंबकेश्वरीं त्यानें ब्रह्मगिरीच्या पायथ्याशीं ठाण मांडलें आहे. परळीस तो एका टेकडीवर टेकला आहे. घृष्णेश्वरीं त्यानें वेरूळच्या डोंगराच्या पायथ्याशीं ध्यान मांडलें आहे. केवळ नागनाथ हें एक ज्योतिर्लिंग काय तें सपाटीवर. पण इथेंही भंवतालीं निबिड वनाची दाटी आहे.

महाबळेश्वरीं श्रीमहाबळेश्वराच्या चरणांपासून महाराष्ट्राच्या पांच प्राण-हिता—कृष्णा, कोयना, वेण्या, गायत्री अन् सावित्री निघतात. वाई-सातारा रस्त्यावर मेरुलिंग हेंही एक अत्यंत देखणें ठिकाण. डोंगर चढ-तांना येथें कसरतच करावी लागते खरी, पण पठारावर जाऊन पोहोंचलें कीं मन आनंदानें हरिखतें.

शिखर शिंगणापूर तर भोसल्यांचें कुलदैवत. स्वतः भोसल्यांनीं बांध-लेलें. एक भला प्रचंड तलाव भोसले कुलाची कीर्ति गात आहे. रायगडा-वरील जगदीश्वराचें मंदिर स्वतः छत्रपतींनीं उभविलें आहे.

प्रसादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोनुज्ञया ।
श्रीमच्छत्रपते शिवस्य नृपते सिंहासने तिष्ठतः ॥

असा प्रारंभ झालेला एक शिलालेख तिथें 'हें मंदिर हिरोजी इटळ-करानें छत्रपतींच्या आज्ञेवरून बांधलें,' अशी साक्ष देतो. रायरेश्वरीं श्रीमहादेवाला साक्षी ठेवून कांहीं कोंवळ्या, नुकती मिसरूड फुटूं पहाणाऱ्या कुमारांनीं स्वराज्याची शपथ घेतली आणि मग पुढें—

'बुडाला औरंग्या पापी म्लेंच्छसंहार जाहला.'

अशी ग्वाही दशदिशांत फिरली.

सिंहगडावर आहे कौंडिण्येश्वर. पुरंदरीं केदारेश्वर. लोहगडावरही महादेव ध्यान मांडून बसला आहे.

मोरशीजवळ सालबर्डीस त्यानें एका गुहेंत ठाण मांडलें आहे. तिथें त्याचें दर्शनही सहज सुलभ नाहीं. एक्या बाजूनें रांगत रांगत गडचिप

अंधारांत चांचपडत अदमासानें जावें लागतें; आणि मिणामिणत्या प्रकाशांत महादेवाचें दर्शन घेऊन दुसऱ्या वाटेनें तशीच कसरत करीत वर निघावें लागतें. तरी सहस्रावधि भक्त गाड्या जोडून महादेवाचीं गाणीं गात सालबर्डीला धांवतच असतात. चौऱ्याचा डोंगर हें शिखरच महादेवाचें लिंग आहे. उन्हातान्हाची पर्वा न करतां, कांट्याकुट्यांची तमा न बाळगतां, रात्र-दिवस न पाहतां जेव्हां तरुणेताठे, बुढ्याबाढ्या अशीं सगळीं पोहा घेऊन महादेवाला निघतात, तेव्हां नास्तिकाचेंही मन क्षणभर भक्तीनें गहिंवरतें.

पैकीं कांहीं महादेवाचीं मंदिरें अतिशय देखणीं आहेत. उदाहरणार्थ, त्र्यंबकेश्वर. इतक्या सुबक, नीटस बांधणीचें देऊळ महाराष्ट्रांत विरळा. महाराष्ट्रांत मंदिरबांधणीच्याही नाना परी आहेत. केवळ पाषाणाचीं अशीं जीं मंदिरें आहेत त्यांपैकीं त्र्यंबकेश्वर हें अत्यंत सुबद्ध मंदिर. गोमंतकांत पशुपति लोटली गांवीं रामनाथ हें नांव धारण करून आहे, तर मंगेशीस त्यानें मंगेश ही बिरुदावळी शोभविली आहे.

महादेव हा शिखरांचा स्वामी. तर प्रतागड, वणा आणि औंधजवळचें मूळपीठ वगळतां सगळीं महालक्ष्मीचीं आणि महिषासुरमर्दिनीचीं मंदिरें मैदानावर आहेत. महाराष्ट्रांत महादेवामागोमाग मान तुळजापूरच्या अंबाबाईचा. शिवछत्रपतींनीं गडावर स्थापना केली तीही जगदंबेचीच. इथें कौतुक म्हणून एक गोष्ट सांगायला हवी. जगदंबेचें प्रसादचिन्ह म्हणून एक कवड्यांचीच माळ छत्रपति शिवाजी राजे सदैव गळ्यांत घालीत असत.

कोल्हापूरची जगदम्बा ही तर जगन्माता. तिचेंही मंदिर अतिप्राचीन. कदाचित् तें हजार दोन हजार वर्षांपूर्वींचेंही असावें. आंबे जोगाईची पार्वती कुमारी आहे. भुवनेश्वरीची मूर्ति अति सुबक. इतकी सुबक, कीं कुण्याही दर्शनेच्छूचें मन मोहून जावें. अशाच मोहक मूर्ति गोमंतकांतल्या नागेशी अन् कवळेंच्या. पैकीं पहिली महालक्ष्मी, तर दुसरी शांतादुर्गा. वणीस देवी ऐन शिखरावर विसांवली आहे. तीच कथा तुंगीच्या भवानीची. भद्रकाली आहे गोदातटीं नाशकांत विसांवलेली, तर जोगेश्वरी आहे पुण्यांत. दाभोळेस चाण्डिका एका गुहेंत विसांवली आहे, तर गुहागरास तिचें मंदिर ऐन समुद्रतटाकीं आहे. मुरूडलाही तिचें देवालय ऐन माडांच्या सावलीखालीं आहे.

महाराष्ट्रांत विठ्ठलाची उपासना फार मोठी. श्रीपांडुरंगाचें मुख्य राऊळ आहे पंढरपुरीं. तिथें भीमा चन्द्राकार वाहाते; म्हणून तिला चन्द्रभागा म्हणायचें. अशा या भीमरथीच्या तटीं—

‘ पुण्डलिकाचे भेटीं परब्रह्म आलें गा । ’

अन् युगें अठ्ठावीसापासून तो श्रीहरि कर कटावरी ठेवोनियां तिथेंच उभा राहिला आहे. तो राजस सुकुमार आहे. मदनाचा पुतळा आहे. त्याच्यापुढें रवि आणि शशींच्या कळाही लोपतात. भाळीं कस्तुरीचा मळवट आहे. सर्वांगीं चन्दनाची उटी आहे. कंठांत वैजयंती माळ रुळते आहे. तो कटीस सोनसळें वस्त्र नेसला आहे. अशा त्या गोमट्या श्रीहरीच्या चरणीं आपआपलीं मस्तकें नम्र करून ज्ञानदेवापासून बहिणाबाईपर्यंत सारेच संत धन्य धन्य होऊन गेले आहेत.

भीवरेच्या वाळवंटांत लक्ष लक्ष सन्तकुलें नाचलीं आहेत. त्यांनीं अहंकार पायदळीं घातला आहे. परस्परांच्या पायीं मस्तकें नम्र केलीं आहेत. हरि-रंगणीं नाचतां नाचतां त्यांचीं चित्तें पावन झालीं आहेत. मळ कसा तो उरला नाहीं. त्यांना अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचें झालें आहे. नेहमींकरितां उजाडलें आहे. तमाचा कुठें लवलेश उरला नाहीं. गेलीं सातशें वर्षें ही परंपरा अविच्छिन्नपणें चाललेली आहे. अजूनही आषाढी-कार्तिकीचा सोहळा उणावला नाहीं. मग पांडुरंगाचीं मंदिरें महाराष्ट्रभर पसरलीं. बहुधा प्रत्येक नगरांत एखादें तरी विठ्ठलमंदिर असायचेंच. श्रीविठ्ठलाच्या भक्त-मंडळांत साऱ्यांनाच वाव आहे. फार काय सांगावें ! कांहीं मुसलमानही दरवर्षी पंढरीची वारी नियमानें करतात !

श्रीरामराय महाराष्ट्रांत प्रथम प्रवेशले, त्या वेळीं इथें दण्डकारण्य होतें. त्यांनीं दण्डकारण्यांतील पहिली कुटी बांधली ती पंचवटींत. अनेक सुखाचे दिवस त्यांनीं पंचवटींतच व्यतीत केले. वनवासांत इतका स्वास्थ्याचा काळ श्रीरामरायांना अन्यत्र क्वचितच लाभला असेल. सुवर्णमृगाचा प्रसंग पंचवटींतलाच. जनककन्येचा अपहार रावणानें पंचवटींतच केला. अत्यन्त शोकाकुल होऊन श्रीरामरायांनीं ज्या वृक्षलतांना मिठ्या मारीत ‘ तुम्हीं सीता पाहिलीत का ? ’ असें विचारलें, त्या लता पंचवटीच्याच. असा श्रीरामचरित्राशीं पंचवटीचा फारच संबंध.

जातां जातां इथेंच कौतुक म्हणून सांगायचें तें असें, कीं श्रीराम आणि श्रीकृष्ण या दोन पुरुषोत्तम भारतीय विभूति. पैकीं श्रीरामरायाचा संबंध पंचवटीशीं किती घनिष्ठ आहे, तें वर सांगितलेंच. आणि श्रीकृष्णासंबंधींचें असें, कीं श्रीकृष्ण हा विदर्भाचा म्हणजे पर्यायानें महाराष्ट्राचा जांवई. रुक्मिणीचें माहेर कौंडिण्यपूर विदर्भांत आहे !

तर नाशकांत श्रीरामाच्या मंदिराचें वैभव मोठें. तिथली मूर्ति वालुकामय आहे, असें सांगितलें जातें. असें श्रीरामाचें दुसरें प्रसिद्ध देऊळ म्हणजे रामटेकचें. श्रीराम इथें क्षणभर विसांवले होते, ते दण्डकारण्यांत प्रवेश करते वेळीं. सज्जनगडावरलें श्रीरामाचें मन्दिरही असेंच प्रसिद्ध. विशेषतः तिथली चापधारी श्रीरामाची मूर्ति अत्यंत देखणी आहे.

श्रीविष्णूच्या मंदिराविषयीं थोडें तपशीलवार सांगितलें पाहिजे. मूर्तिशास्त्रांतला संकेत असा, कीं हातांतील शंख, चक्र, गदा, पद्म या चारी आयुधांच्या अदलाबदलीनें श्रीविष्णूंचीं नाना रूपें मूर्तिबद्ध केलीं जाऊं शकतात. पुण्याशेजारीं पर्वतीवर मूर्ति आहे माधव विष्णूची. पर्वतीवरील देवदेवेश्वराभोंवतीं जें पंचायतन आहे त्यांतील श्रीविष्णूची मूर्ति जनार्दन विष्णु आहे. पारनेर येथील मूर्ति केशव विष्णूची आहे. तर मंगळवेढ्याच्या दोन मूर्तींपैकीं पहिली आहे श्रीहरीची आणि दुसरी केशवाची. लातूरच्या मंदिरांत नारायणाशेजारीं लक्ष्मी विराजते आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतल्या बिवलीला श्रीलक्ष्मी-केशवाची जोडमूर्ति आहे, तर दापोलीशेजारीं असूदला एका अति नयनरम्य ठिकाणीं नारळी-पोफळींच्या बागांत उभ्या असलेल्या, श्रीविष्णूला केशवराज म्हणावें.

यानंतर विचार केला पाहिजे हनुमंतांच्या राउळांचा. श्रीहनुमंत हें तर सर्व महाराष्ट्राचें आराध्य दैवत. तुकोबासारखे विठ्ठलावांचून दुसऱ्या कुण्याही दैवतापुढें मान न वाकवणारे भक्तही म्हणतात—

शरण शरण हनुमंता । तुम्हां आलों रामदूता ॥
काय भक्तीच्या त्या वाटा । मज दावाव्या सुभटा ॥

असा सगळ्यांच्या मनीं श्रीमारुतिरायांविषयीं लोभ. अगदीं क्वचित् शैव आणि वैष्णवांमध्यें थोडेंसें द्वैत आढळायचें. पण हनुमंत मात्र या सर्वांचेंच श्रद्धास्थान.

हनुमंताची उपासना महाराष्ट्रांत पूर्वींपासून होतीच; पण तिचा विस्तार केला समर्थांनीं.

कृष्णाबाईच्या भंवतालीं त्यांनीं अकरा मारुतींची स्थापना केली. हनुमंताचें श्रीसमर्थांनीं कल्पिलेलें ध्यान मोठें उत्कट आणि भव्य आहे. रामदासांची मांडणीही मोठी खणखणीत आहे—

ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळ।
चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी।
कोटिच्या कोटि उड्डाणें झेपावे उत्तरेकडे।
मंदाद्रीसारखा द्रोणु क्रोधें उत्पाटिला बळें॥

अशा या निष्ठावन्त, ब्रह्मचारी, एकान्तभक्त, परमसामर्थ्यशील श्रीहनुमंताचीं राउळें गांवोगांवीं असायचीं. महाराष्ट्रांत तरी अगदीं क्वचितच एखादें गांव असें आढळायचें, कीं जिथें चपेट उगारून उभ्या असलेल्या मारुतिरायाची मूर्ति नाहीं.

गणपतीची उपासना फार जुनी. 'गणानां त्वा गणपतिं हवामहे' असा गणपतीचें स्तवन करणारा मंत्र अति प्राचीन वैदिक वाङ्मयांतही आढळतो. या देवतेला आजचें रुधिररिक्त रूप केव्हां आलें, तो कांहीं इथें चर्चेचा विषय नव्हे. गणपतीची उपासना महाराष्ट्रांत गाथासप्तशतीकालीं देखील सुरू होती. गाथासप्तशतींत गणपति देवतेचे चार-दोन उल्लेख सांपडतात. गणपति हें दैवत सर्व मंगलकार्यांच्या प्रारंभीं पूजायचें. त्यामुळें घरोघर या देवतेचा आदर व्हायचाच व्हायचा.

पण गणपतिपूजनाला खरा राजाश्रय लाभला, तो पेशवे अधिकारपदावर आल्यानंतर. पेशवे हे गाणपत्य असल्यामुळें त्यांनीं आणि त्यांच्या सरदारांनीं गांवोगांव असलेल्या गणपतींच्या मंदिरांचें वैभव वृद्धिंगत केलें. अष्टविनायकांच्या स्थानांस प्रतिष्ठा लाभली. चिंचवड, थेऊर, धुळें, मढ, पाली इत्यादि ठिकाणीं भले प्रचंड गणेशोत्सव होऊं लागले.

पण महाराष्ट्रांत सर्वांत लक्षणीय गणपतीचें देऊळ कुठें असेल, तर तें वाईला. त्या गणपतीचें नांवच ढोल्या गणपति. मूर्तीच्या मस्तकावर गंधलेपन करण्यासाठीं अक्षरशः शिडी लावावी लागते!

दत्तोपासना खास महाराष्ट्राचीच. जसा श्रीदत्त वैदिकांमध्यें पूज्य, तसाच तो महानुभावांचेंही आराध्य दैवत. गाणगापूर, नरसोबाची वाडी आणि औदुम्बर हीं तीन दत्तात्रेयाचीं प्रमुख स्थानें. या तिन्ही स्थानांमध्यें प्रसन्न कृष्णातट, निवांत एकान्त, वटवृक्ष आणि औदुंबराची घनदाट छाया या सगळ्या गुणांमुळें औदुंबर हें क्षेत्र विशेष प्रसन्न आहे. महाराष्ट्रांत दत्तोपासनेला बल लाभलें, तें नरसिंह सरस्वतींमुळें. हीं तिन्ही ठिकाणें त्यांचींच तपश्चर्यास्थलें म्हणून प्रसिद्ध आहेत. ज्या काळीं महाराष्ट्र प्रदेश यवनाक्रांत होता, त्या काळीं ज्यांनीं महाराष्ट्राला अभय दिलें, अशा महापुरुषांत नृसिंह सरस्वतींची गणना केली पाहिजे. त्यांनीं कुणा एका पातशहाचा गर्व हरण करून त्याला आपल्या भजनीं लावल्याची कथा प्रसिद्धच आहे.

महानुभावांचीं सुप्रसिद्ध क्षेत्रें म्हणजे माहूर आणि रिद्धपूर. हीं दोन्ही विदर्भांत आणि त्याच्या आसमंतांत आहेत. महानुभावांचीं दैवतें दोन. दत्त आणि कृष्ण. वैदिकांच्या दत्त आणि श्रीकृष्णांशीं या दोन्ही दैवतांचा संबंध फार कमी आहे.

महानुभावपंथ महाराष्ट्रांतच परिपुष्ट झाला. चक्रधरांना सहस्र सहस्र अनुयायी लाभले, तेहीं महाराष्ट्रांतच. या दत्तोपासकांचें महाराष्ट्रावर निरतिशय प्रेम. एका महानुभाव ग्रंथकारानें महाराष्ट्राविषयीं अत्यंत श्रद्धेनें म्हटलें आहे—

" महन्त राष्ट्र म्हणौनि महाराष्ट्र. राष्ट्र भणिजे देश, परी सुखरूप आणि इष्टकारक. महन्त भणिजे थोर. महाराष्ट्र सात्त्विक. तेथचे जडचेतन पदार्थ तेहि सात्त्विक. तेथ असतां शारीर, मानसिक उपद्रव कव्हणीचि नुपजती. आणिकें देशीं शारीर, मानसिक, उपद्रव उपनला असे, तो महाराष्ट्रीं असतां शमे. तेथचा अन्नोदकीं शमे. तेथचा औषधीं शमे. तेथचा वारा, झडि, पाऊस तोहि सात्त्विक. तेणें सकळ उपद्रव शमेति. महन्त भणिजे निर्दोष. महाराष्ट्र निर्दोष आणि सगुण. अनिष्ट न निफजे म्हणौनि निर्दोष. इष्ट निफजे म्हणौनि सगुण. तेथ असतां अनाचार करावेयाची बुद्धि नुपजे आणि उपनली तर करून ल्हाइजे. आपण अनाचारु न करी, आणिकांसी करूं नेदी तें महाराष्ट्र. धर्म सिद्धी जाए, तें महाराष्ट्र. "

दत्तभक्त महानुभावांचा महाराष्ट्रविषयक प्रेमा किती उत्कट, दत्त-

भक्तीचा विस्तार महाराष्ट्रदेशींच कसा एकवटलेला, तें कळावें म्हणून हा एवढा विस्तार केला.

खंडोबाचें मुख्य ठाणें जेजुरीला. महाराष्ट्रांतील अनेकानेक कुळांचें हें कुळदैवत. तसें पाहिलें तर खंडोबा म्हणजे स्कंद. कार्तिकेय. देवांचा सेनापति. तेव्हां त्याच्या हातीं खड्ग असायचेंच. जेजुरीला खंडोबाच्या खांड्याचें महत्त्व फार मोठें. एक कथा अशी, कीं औरंगजेबानें एकदां जेजुरीचें देवस्थान लुटायचें मनांत आणलें; पण त्याच्या सैनिकांनीं खंडे-रायाच्या टेकडीवर पाऊल घालतांच मंदिरांतून लक्ष लक्ष काळे भुंगे निघून त्यांनीं सैनिकांस नको नको करून टाकलें. तेव्हां मग औरंगजेबानें मनीं फजीत पावून सैन्य मागें घेतलें आणि काळ्या भुंग्याएवढा एक काळाच हिरा खंडेरायाच्या चरणीं वाहिला.

नारसिंह हें उग्र दैवत. त्याचीं मंदिरें महाराष्ट्रांत तुरळकच. कृष्णाकांठीं धोम आणि नरसिंगपूर या दोन्ही ठिकाणच्या मूर्ति उग्र, रौद्र पण अतिशय सुबकपणें घडलेल्या. गोमंतकांतली वेलिंगची नृसिंहमूर्ति तशी उग्रच, पण नारळी-पोफळींच्या मखरामुळें ती सौम्य असावी. वेरूळची नारसिंहाची मूर्ति भंगलेली आहे.

भगवान् परशुरामाचें ठाणें चिपळुणाजवळ परशुराम क्षेत्रीं. दारुण संगर करून हा उग्र तपस्वी त्या तिथें नारळी-पोफळींच्या तळीं विसांवला आहे. स्थान अतिशय देखणें आहे. मंदिरासमोर उभें राहावें तर चहूं दिशांना विस्तार पावलेली वासिष्ठेची खाडी पायतळीं पसरलेली दिसते.

बालाजीचीं प्रसिद्ध ठिकाणें दोन. विदर्भांत देऊळगांव राजा इथें, आणि दुसरें नाशकास. बालाजी हें दैवत राजस म्हणायचें. दोन्ही ठिकाणीं मूर्तीचे अष्टभोग करण्यांत सेवेकरी रात्रंदिवस गुंतलेले असायचे. मोहिनीची मूर्ति नेवासें येथें. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या शेवटीं नेवासें या त्रिभुवनैक-पवित्र तीर्थाचा उल्लेख करून असें म्हटलें, कीं इथें जगन्माता महालसा निवास करीत आहे. महालसा म्हणजेच मोहिनी.

कार्तिकेयाचें मंदिर पर्वतीवर. संकेत असा, कीं त्या मंदिरांत कुणी स्त्रियांनीं प्रवेश करायचा नाहीं. श्रीशंकराचा दुसरा गण म्हणजे भैरव. याचीं मंदिरेंही गांवोगांवीं. सिंहगडावरील अमृतेश्वर, या भैरवाच्या मूर्तींच्या

एका हातीं खड्ग आणि पाश असून दुसऱ्या हातीं नररुंड आहे. एक कुत्रा खालीं त्या नररुंडांतून गळणारें रक्त चाटीत उभा आहे. अमरावती जिल्ह्यांतील बहिरमबोवा हाही भैरवच असला पाहिजे.

महाराष्ट्रांत जैनांचीं मंदिरें अनेक ठिकाणीं. पैकीं मुक्तागिरीच्या ठिकाणाचें महत्त्व जैनांमध्यें फार मोठें. हें स्थान सातपुड्याच्या एका डोंगर-घळींत आहे. इथें बहुत मंदिरें. सारींच रचनेंत श्रीमंत आणि नयनरम्य. फलटणलाही जैनांचें एक प्रसिद्ध देऊळ. किंबहुना जिथें जिथें जैन व्यापारी पसरले आहेत, तिथें तिथें जैनांचीं श्रीमंत मंदिरें आणि श्वेताम्बर आणि दिगम्बर अशा दोन्ही पंथांचे देरासर आहेत.

मिरजचा मिरासाहेब हा मुसलमानांचा अति प्रसिद्ध दर्गा. पुण्याच्या शेखसल्लयाचेंहि महत्त्व कांहीं कमी नाहीं. हाजीमलंग या स्थानाचें कौतुक असें, कीं एका उंच कड्यावरील या ठाण्याचे मुजावर आहेत केतकर नामें कोंकणस्थ ब्राह्मण ! असें म्हणतात, कीं हें ठिकाण एका नाथाची समाधि. पुढें मग महाराष्ट्र यवनाक्रान्त झाल्यावर या समाधीवर हिरवा गलेफ केव्हां चढला तें देव जाणे !

याशिवाय गांवोगांव पिरांचीं अनेक ठाणीं आहेतच. अन् त्या ठिकाणीं वर्षांतून एकदां उरूसहि भरतात. प्रतापगडीं छत्रपतींनीं अफझुलखानास मारलें; अन् मागून त्याची कबर बांधली गेली. वस्तुतः अफझुलखान हा कांहीं पुण्यपुरुष नव्हे, पण त्याचाही भला मोठा उरूस भरतो. अन् त्याला नवस केले जातात. असें म्हणतात कीं, तो नवसाला पावतोही. कसा पावतो तें त्याचा तो जाणे !

खिश्चनांची बरीच वस्ती आहे वसईच्या बाजूला. पोर्तुगीजांनीं कधीं-काळीं जी बाटवाबाटवी केली, तिचे ते अवशेष आहेत. अजूनही तसेच आहेत. त्यांना कुणीं ढका लावला नाहीं. केवळ खिश्चन आहेत म्हणून त्यांना ढका लावावा, हें मराठ्यांच्या रक्तांत नाहीं. तेव्हां मग त्यांचे धर्मविधि, आचारविचार, लग्नसमारम्भ, बाप्तिस्मे हें सगळेंच अविच्छिन्नपणें सुरू आहे.

त्यांचीं मोठमोठालीं प्रार्थनामंदिरें या बाजूला आहेत. कांहीं खुद्द वसईच्या किल्ल्यांत आहेत. त्यांच्या या प्रार्थनामंदिरांचा एक विशेष असा, कीं तीं भलीं भव्य असायचीं. त्यामुळें कांहींशीं गंभीर आणि उदास

वाटायचीं. त्यांत बांधणी जुनी. मग तर कांहीं बोलायला नको. मात्र रंगसफेती आणि रंगरंगोटी केलेलें चर्च पाहून बरी मौज वाटते. मुंबईलाही कांहीं चर्चेस खूप मोठमोठालीं आहेत.

ख्रिश्चनांमधें दोन भाग. एक कॅथॉलिक आणि दुसरे प्रॉटेस्टंट. दोघांचींही चर्चेस महाराष्ट्रभर विखुरलेलीं आहेत. बहुधा हीं चर्चेस कोण्या संतांच्या नांवें असायचीं. जसें सेंट पॉलचें चर्च. सेंट माथ्यूचें चर्च, असें.

महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं ख्रिश्चन जोगिणींचे मठही आहेत. एकदां एखाद्या स्त्रीनें जोगिणीची वृत्ति स्वीकारली, कीं तिनें या मठांत राहायला यायचें. अत्यन्त कठोर नियम पाळायचे. व्रतें, बंधनें. अन् मग शेवटीं ती कसोटीला उतरली, म्हणजे मग तिला जोगीण म्हणायचें. मात्र या जोगिणीचा उपयोग व्हायचा तो मुख्यतः अडाण्यांना अन् भोळ्याभाबड्यांना शुभवर्तमान ऐकवून त्यांना आपल्या कळपांत आणण्यासाठीं !

महाराष्ट्र परमतसहिष्णु हें तर खरेंच ! जो जो इथें आला त्याला महाराष्ट्रिकांनीं सुखानें राहूं दिलें. आपआपलीं धर्ममतें पाळायची अनुमति दिली. कुणावर अन्याय किंवा जबरदस्ती महाराष्ट्रिकाकडून घडल्याचें उदाहरण अपवाद म्हणूनच एखाद वेळ घडायचें. याचें प्रमाण बेने इस्राइल ज्यूही देतील. आज किती वर्षें हे महाराष्ट्रिकांबरोबर नांदत आहेत, तें त्यांचें त्यांना ठाऊक ! पण अजूनही ते आपआपले आचार पाळतात. आपआपल्या प्रार्थनामंदिरांतून जमतात. आपआपले सण साजरे करतात. आजपर्यंत कोणी त्यांच्याकडे डोळे वटारूनसुद्धां पाहिलें नाहीं.

याच गोष्टीचें आणिक एक खणखणीत उदाहरण म्हणजे पारशांचें. त्यांना बिचाऱ्यांना मुसलमानी आक्रमणांमुळें देश सोडून परागंदा व्हावें लागलें. अक्षरशः घेऊं शकले तें तें घेऊन अन् आपलें यज्ञकुंड सांभाळून ते इराणांतून पळाले.

उतरले संजाण बंदरीं. तिथल्या राजानें आपआपले धर्मनियम पाळून इथें राहायची त्यांना अनुमति दिली. आले तेव्हांपासून इतकीं वर्षें ते सुखानें नांदत आहेत. मुंबईस त्यांचीं मोठमोठालीं धर्ममंदिरें आहेत. त्यांना म्हणायचें आग्यारी. या आग्याऱ्यांमधून अग्नीची उपासना व्हायची. जिथें जिथें पारशी गेले, तिथें तिथें त्यांनीं आग्यारी बांधली. नागपूर, लोणावळें,

पुणें इत्यादि ठिकाणीं. त्यांची उपासना आजही निर्वेधपणें चालू आहे.

कांहीं थोडा विचार वन्यांच्या देवतांविषयींही करायला हवा. हे सारेच वन्य धर्मानें हिंदु. यांचीं दैवतें मात्र निरनिराळीं. उदाहरणार्थ, ठाकरांचें दैवत कळसूबाई. वारल्यांचें नारन् देव. या देवतांचीं ठिकाणें रानांत असायचीं. झाडांखालीं.

काथोडी, वडार, बेलदार अशा या भटक्या जमाती तर आपआपले देव बरोबर घेऊनच भटकतात. कुठें गांवाबाहेर या भटक्या जमातींचीं पालें पडलेलीं असायचीं; अन् जवळच पांच-पंचवीस पांढऱ्या झेंड्या रोवलेल्या असायच्या. हीं यांचीं दैवतें.

महाराष्ट्रांत अमुक एक वस्तु दैवत नाहीं असें नाहीं. खेडोपाडीं हिंडावें तर मजा मजा आढळते. रानांतून झाडें देवरूप पावलेलीं असतात. वडा-पिंपळांचीं नव्हेत, कांट्याकुट्यांचीं सुद्धां. येत्याजात्यानें त्यांच्यावर एक चिंधी वाहात असायचें. दाभोळला बंदरावर एक भला प्रचंड जहाजाचा नांगर देवत्व पावला आहे. कुठें कुठें वस्त्या उठल्या, त्या ठिकाणीं रोवून ठेवलेले जुने रांजण, घरांचीं पडकीं दारें, किल्ल्यांचे दरवाजे अशा कशांतही देवतेचा अवसर घुमूं लागतो, अन् मग तिथें शेंदूर फासला जातो.

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .......................... वि: ....................
क्रमांक .......................... नों दि: ....................

## कांहीं देवताविषयक कल्पना—

वर सांगितलें तीं सारीं दैवतें प्रतिष्ठित. राजरोसपणें पूजानैवेद्य घेत आपआपल्या जागीं बसलेलीं असायचीं. पण यावेगळीं कांहीं दैवतें फिरस्तींही असतात. तीं कुठें तरी, कोणाच्या तरी अंगांत येतात. मग तें झाड घुमूं लागतें. आरोळ्या फोडूं लागतें. वेडेवांकडे अंगविक्षेप करूं लागतें. किंचाळूं लागतें. मग त्यापुढें धूप जाळायचा. त्याच्या हातापायां पडायचें. म्हणजे मग तें जरासें शांत होऊन बोलतें होतें. बरींवाईट भविष्येंही वर्तवितें. खरींखोटीं.

हीं दैवतें बहुधा अडाणी स्त्रीपुरुषांच्या अंगीं भरायचीं. कधीं हीं यात्रेच्या विशिष्ट प्रसंगीं यायचीं, तर कधीं निरनिराळ्या सणांच्या वेळीं. जसें महा-लक्ष्मीच्या उत्सवांत स्त्रिया घागरी फुंकायला लागल्या, म्हणजे कुण्या बाईच्या अंगांत येतें. मग ती घागरीमधून मुठीच्या मुठी कुंकूं काढून दाखवते. क्वचित् खडीसाखरही.

पण दैवत सात्त्विक. तसें फारसें कुणाला त्रास द्यायचें नाहीं. मात्र कांहीं दैवतें आरोळ्या फोडीतच अवतरायचीं. कटकटां दांत खात. वेडेविद्रे हातवारे करीत. हीं दैवतें अमुक एक असतील असें नाहीं. मरीआई, बिरोबा, म्हसोबा, वेताळ हीं बहुधा शेंदरीं हेंदरीं दैवतें असायचीं. यांची भूकही प्रचंड. चवताळलीं म्हणजे मग एखादें बकरूं, एखादा रेडा, दारूची बाटली, अशाशिवाय हीं शांत व्हायचीं नाहींत. मात्र हे पशु त्या त्या दैवतांच्या नांवानें सोडून देऊन भागत नाहीं. यांच्या कंदुऱ्या होऊन पंक्ती पडल्या पाहिजेत. बैरबटें भराभर ओरपलीं गेलीं पाहिजेत. हीं दैवतें कमी

पडलीं कीं काय, म्हणून मग पीरही अंगांत येतात. तेही झाडांना घुसळीत बसतात.

हीं झालीं दैवतें. याशिवाय भुतेंखेतें आहेतच. बहुधा पिंपळावर नेहमीं मुंजा असायचा. चिंचांवर जखीण आणि हडळ. वेताळ कुठेंही आढळायचा. गिरोबाचें ठाणें आंब्याचीं झाडें. आसरा नदीच्या कांठानें असायच्या. आसरा हीं कांहीं भुतें नव्हेत. पण माणसें पळवण्याच्या आणि बुडवण्याच्या बाबतींत वाकबगार. एरवीं मग पाणवठे, तिठे, चव्हाटे, जुनीं ओसाड घरें, फार मोठमोठीं वडाचीं झाडें, नद्यांच्या दरडी, पर्वतांचे कडे हीं सर्व ठिकाणें बहुधा भुतांनीं व्यापलेलीं, असा समज. हीं भुतें अमावास्या आणि पौर्णिमांना प्रकट व्हायचीं. कुठें कुठें असा बैल दिसायचा. कुठें दिवट्या. कुठें रात्रीचें कांहींतरी काळें-पांढरें अंगांवरून गेल्यासारखें वाटायचें. कुठें किंकाळ्या ऐकूं यायच्या. कुणाच्या घरावर दगड पडायचे. खुंटावरले कपडे जळायचे. अन्नामधून विष्ठा पडायची. बोलतां बोलतां कुणाच्या दांतखिळ्या बसायच्या. कुणीं नागवीं हिंडायला जायचीं. खुळे चाळे करायचीं. अशा नाना परी.

मात्र हीं भुतें काढायच्याही अनेक जागा. गांवोगांव मांत्रिक असायचे. ते धूप, उडीद, मंत्र आणि शेवटीं वेताची छडी, अशा नाना उपचारांचा प्रयोग करून या भुतांना बोलके करायचे. गाणगापूर, वाडी, औदुंबर अशीं जीं दत्ताचीं स्थानें, तिथें हीं भुतें निघायचीं.

एक गोष्ट निश्चित. रामदासांनीं म्हटलें, 'वाजें पाउल आपुलें। म्हणे मागें कोण आलें!' ज्याचें मन अधिक दुर्बळ, त्याला या भूतचारांपासून अधिक भय. समर्थ मनाचा निर्भय माणूस त्याला कधीं हा उपद्रव व्हायचा नाहीं. शुद्धाचरणीं माणसाच्या वाटेस कधीं हीं भुतेंबितें जायचीं नाहींत.

खेड्यांमधून ही भूतसंस्था अनिर्बंधपणें आधिपत्य गाजवते. चौकांमधून, तिठ्यांवर असे कणकेचे दिवे, त्यांत तांबडी मिरची खोवलेली, वर गुलाल वाहिलेला, अशीं भदें उतरून ठेवलेलीं आढळायचीं. त्यांना ओलांडायचें नाहा, शिवायचें नाहीं, असा संकेत. कुत्र्यांची मात्र भली मेजवानी होते. त्यांना भुतेंखेतें कांहीं करीत नाहींत. तीं दत्तात्रेयाबरोबर असतात ना? म्हणून !

जातां जातां आणिक एका कल्पनेचा उल्लेख करायला हवा. तो म्हणजे

जारणमारणासंबंधींचा. तसें पाहिलें तर या कल्पनेचें मूळ अतिप्राचीन. अथर्ववेदाइतकें जुनें.

अथर्ववेदांतले अनेक मंत्र हे नाना औषधींना जारण-मारणासंबंधीं प्रेरणा देणारे आहेत. तेव्हांपासून अविचाराची ही पद्धति रूढ झाली, तें तिनें बाळसें धरलें तंत्रशास्त्राच्या रूपानें. तांत्रिकांचा विशेष भरंवसा जारण-मारणावर. अमावास्येच्या काळ्याकुट्ट रात्रीं स्मशानें जागवावींत, नुकत्या मेलेल्यांचीं प्रेतें सरणांतून उपसून काढून त्यांच्या छातीवर बसून मंत्रोच्चार करावेत, कवट्या जवळ बाळगाव्यात, असे अनेक किळसवाणे विधि तंत्र-शास्त्रांत राजमान्य होते.

पैकीं क्षय होत होत सध्यां महाराष्ट्रांत उरला आहे भानामतीचा खेळ ! तांत्रिकांनीं लिंबू घ्यायचें आणि देवतांचें पूजन केल्यावर त्यांत सुया खोचून ज्याच्यावर जारणमारण करायचें असेल, त्याच्या दिशेनें आकाशांत भिरकावून द्यायचें. तें म्हणे अवकाशांतून भिरभिरत येतें ! ज्याच्यावर तें अभिमंत्रित केलें असेल, त्याच्या पाठींत त्याचा सपाटा बसतो. आणि मग त्या क्षणा-पासून त्याचें वेदनापर्व सुरू होतें. नाना परी होतात. हातपाय लुळे पडतात, ओकाऱ्या येतात, फेफरें भरतें, दांतखिळ्या बसतात, प्रसंगीं प्राणही जाण्याची पाळी येते.

या क्रियेला म्हणायचें मूठ मारणें ! जशी ही क्रिया कुणावर अभिप्रेत करतां येते, तशी ती परतही घेतां येते. अर्थात् यासाठीं मांत्रिकाची मूठ दाबावी लागते, तो भाग वेगळा !

पण वर भूतचाराच्या बाबतींत जो एक नियम सांगितला, तो याही बाबतींत तंतोतंत खरा उतरतो. भानामती, जादूटोणा, तंत्रप्रयोग हें सगळें दुर्बळ मनाच्या माणसावर फार लवकर परिणाम करून जातें. कांहीं असलें तरी आणि नसलें तरी ! निर्भय मनुष्य मात्र या सगळ्या पीडांपासून लांब उभा असतो. तुकारामबावांनीं म्हणून ठेवलें आहे—

" चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ॥

✤ ✤ ✤

# कांहीं दिव्यें—

इथेंच दिव्यांविषयीं सांगून टाकलें पाहिजे. अलिकडे क्वचितच दिव्यें केलीं जातात. मात्र इतिहासकाळीं महाराष्ट्रांत हा प्रकार सरसहा रूढ होता. केवळ रूढच नव्हे, तर राजमान्यही ! याला तर स्मृतींत-सुद्धां आधार ! मनु, याज्ञवल्क्य, अंगिरा, वसिष्ठ, वृद्धहारीत इत्यादि स्मृति-कारांनीं नाना दिव्यें सांगितलीं आहेत. चाणक्यानेंही अनेक दिव्यांचा उल्लेख केलेला आहे. तेव्हां मग मराठी राजवटींत दिव्यांना राजाश्रय मिळावा, यांत कांहींच नवल नाहीं !

दिव्यें म्हणजे काय ? तर पवित्र वस्तूंना साक्षी ठेवून एखादी गोष्ट त्रिवार उच्चारायची ! हें त्या मानानें सोपें दिव्य ! जसा कुण्या एका गांवाच्या खोतीविषयीं वाद निर्माण झाला, तर दोन्ही वादींनीं न्याया-सनासमोर यायचें. मग न्यायाधीश आणि दोन्ही वाद्यांनीं कुण्या पवित्र क्षेत्रीं अथवा नदीतीरीं जायचें. दोघांनींही शुचिर्भूत होऊन, व्रतस्थ राहून नदीच्या पाण्यांत उभें राहायचें अन् आपला पक्ष खरा आहे, असें त्रिवार म्हणायचें.

माणसें त्या काळीं पापभीरु होतीं. धर्मकल्पनांचा पगडाही होताच म्हणा-यचा. तेव्हां व्रतस्थ स्थितींत शुचिर्भूत झाल्यावर पवित्र नदीच्या पाण्यांत उभें राहून इतकें खोटें बोलायचें साहस क्वचितच कोणी करायचा ! जर कोणीं केलेंच, तर त्याच्यासाठीं याहूनही अधिक उग्र दिव्यें असायचींच. जसें ओलें कातडें अंगावर घेऊन शपथ करणें, उकळत्या तेलांत पैसा टाकून तो काढणें. याहूनही अधिक तीव्र अशा एका दिव्याचा जुन्या कागदपत्रांत उल्लेख आहे.

झालें काय, कीं पानसे आणि खंडेराव या दोघांत कांहीं तंटा पडला. मग दोघांनींहि दिव्य करायचें ठरलें. एका शनिवारीं त्यांच्या उजव्या हाताचीं नखें काढलीं, ते स्वच्छ धुतले. त्यावरच्या खुणा नोंदल्या, मग त्या हातांभोंवतीं कागदी पिशव्या घालून त्या मोहोरबंद केल्या.

दुसरा दिवस रविवार ! त्या दिवशीं जिथें दिव्य व्हायचें त्या दैवताच्या मंदिरासमोर जमिनीवर सात मंडळें काढलीं. शेवटीं एका कुंडांत अग्नि प्रज्वलित केला. अलिकडल्या बाजूस मांडली एक गवताची रास.

त्या अग्निकुंडांत अच्छेर वजनाचा लोखंडी गोळा लाल खंगार तापविला. मग दिव्यकर्त्याच्या उजव्या हातची पिशवी काढली. तीवर सात पिंपळपानें ठेवलीं. त्याला अग्निकुंडाजवळ उभें करून त्याच्या हातावर तो लाल बंबाळ गोळा ठेवला. हीं सातहि मंडलें चालत जाऊन त्यानें तो गोळा पलिकडील गवताच्या राशीवर टाकायचा ! ताबडतोब गवताचा भडका उडाला पाहिजे !

अन् जर दिव्यकर्ता खरा असेल, तर त्याच्या हातांवर बारीक पुटकुळी-सुद्धां उठायची नाहीं, अशी श्रद्धा ! या दिव्यांत ज्याचा हात भाजला, तो इहलोकीं तर बदनाम झालाच, पण झुरून झुरून मरायचा देखील !

तळहातावर फोड न यावा, ही गोष्ट तशी अशक्यप्राय वाटावी, पण आजही महाराष्ट्रांतील अनेक देवळांसमोरून आगीचीं भलीं थोरलीं जगरें पेटवितात. बाभळी, खैराची आग—तांबडी रसरसीत. अशी उष्णता, कीं वर डोलणाऱ्या झाडांचीं पानें कोमावून जावींत. पण असें इंगळ रसरसलें, म्हणजे देवाचें नांव घेऊन त्या निखाऱ्यांच्या ढिगावरून देवाचा भक्त निःशंकपणें चालतो आणि त्याच्या मागोमाग सश्रद्धांचा समुदाय ! ही तर देखली परखली गोष्ट आहे. तेव्हां दिव्यें खोटीं असें मानायचें कांहींच कारण नाहीं ! कोर्ट, कचेऱ्या, जज्ज, वकील, पक्षकार, साक्षीदार, अपिलें या सगळ्या भानगडींची त्या वेळीं कांहींच जरूरी नव्हती. दिव्याचें नांव काढलें, कीं खरा तो खरा व्हायचा अन् खोटा तो ताबडतोब माघार घ्यायचा !

हीं दिव्यें व्हायचीं कुठें ? बहुधा सगळ्या तीर्थक्षेत्रांत. पैठण, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पंढरपूर, आळंदी, देहू...अशीं सर्वत्र. या ठिकाणांवेगळीं आणखी कांहीं ठिकाणें दिव्यांकरितां प्रसिद्ध. जसें राजगड खोऱ्यांत गुंज-

वणीच्या कांठीं अमृतेश्वराचें देऊळ. पुण्याजवळ पाषाणला सोमेश्वराचें देऊळ. सिंहगडावर अमरीबुवाचें देऊळ...इत्यादि.

हीं दिव्यें महत्त्वाचीं. मोठ्या मोठ्या वादांत वापरलीं जायचीं. पण यावेगळीं कांहीं किरकोळ दिव्येंही असायचीं. जसें गाईच्या शेपटीला हात लावणें, धर्मग्रंथाला स्पर्श करणें, बेलभंडार उचलणें, कुण्या मान्य व्यक्तीच्या पायाला स्पर्श करणें. हेंही साहस कुणाच्यानें करवत नसे. खोटा माणूस पट्दिशीं लटका पडायचा. त्याचें तोंड उतरायचें. काळेंनिळें व्हायचें.

दिव्यांत खोट्या उतरलेल्या व्यक्तीला अथवा गुन्हेगाराला शिक्षाही तचाच जबर व्हायच्या ! दिव्याचें नांव काढतांच मागें सरला, तर तो खोटा पडायचा, हें तर खरेंच. पण मग त्याची तेवढ्यावरच सुटका व्हायची. मात्र निधडेपणें दिव्य करून खोटा पडला, आपला पक्ष खोटा असूनही दिव्य करण्याजोगें साहस त्याच्या अंगीं असलें, तर मात्र त्याला क्षमा व्हायची नाहीं ! त्याचा हातपाय तोडला जायचा. बोटें छाटलीं जायचीं.

या शिक्षा दिव्यांत खोटे पडणाऱ्यांना. पण इतर गुन्हेगारांना अशाच कडक शिक्षा असायच्या. सामान्यपणें गुन्हे करण्याची प्रवृत्ति कमी ! राजदंडाचें भय असायचेंच ! तेंही असल्या कठोर दंडाचें. पण तें भयही झुगारून देऊन बेलागपणें जर कुणीं गुन्हा केलाच, तर त्याला शिक्षा कडक असायच्या. तो स्वतः न सांपडला, फरारी झाला, तर त्याच्या बायकामुलांना पकडून कैदेंत टाकायचें. गांवावर दंड बसवायचा. घर जप्त करायचें अन् अशी तोशीस लावल्यावर तो हातीं लागला, तर मग त्याला किल्ल्यांवरून अंधारकोठड्यांत ठेवायचा. पायीं मणामणाच्या बेड्या अडकवायच्या. त्याचे डोळे काढायचे अन् त्याचा अपराध फारच मोठा असला तर त्याला भिंतींत चिणून मारायचें, हत्तीच्या पायदळीं द्यायचें किंवा कडेलोट करायचा. मात्र ही शिक्षा अगदीं क्वचितच केली जायची. दहा-वीस वर्षांतून एखादी !

एक उदाहरण मात्र पेशवाईत आढळतें—

घाशीराम कोतवाल ! त्याचा अपराधही नामांकित. दहावीस बापड्या ब्राह्मणांना खोलींत कोंडून त्यानें जीवें मारलें. तेव्हां मग हात मागें बांधून त्याला उंटावर बसवलें. मागें चालला प्रक्षुब्ध जमाव. पर्वतीजवळ

त्याला उंटावरून उतरवून जमावाच्या स्वाधीन केलें. जमावानें धोंडेमार करून त्यास ठार केलें !

ही झाली मराठ्यांच्या शिक्षांची यादी. पण मोंगलांच्या शिक्षा याहून भयंकर ! केवळ महाराष्ट्रांतलेंच एक उदाहरण दिलें कीं पुरें—छत्रपति संभाजी राजांचें !

जेव्हां राजे कैद झाले, तेव्हां डोईवर विदूषकासारखी टोपी घालून हात मागें सांखळ्यांनीं बांधून त्यांची धिंड काढण्यांत आली ! आणि शेवटीं ज्या पद्धतीनें त्यांना ठार मारलें, ती पद्धत वाचून वा ऐकून आजही अंगें शहारावींत ! त्यांचे डोळे तांबड्या लाल झालेल्या सळया भोसकून काढले. मग जीभ छाटली, अंगाचें कातडें काढलें, हातपाय तोडले आणि शेवटीं कंठच्छेद केला. भयंकर !

✦ ✦ ✦

## इतिहासकालीन शस्त्रें—

महाराष्ट्र हा तर लढाऊ प्रदेश. प्रत्येकाचें जणूं शस्त्राशीं लग्नच लागलेलें. हत्यारांवेगळा असा माणूस आढळायचाच नाहीं. मग तो कुणीही असो; ब्राह्मण, मराठा, महार, मांग, एवढेंच काय पण स्त्रिया-सुद्धां. स्त्रियांचा उल्लेख कांहीं गौरवादाखल केलेला नाहीं. राणी लक्ष्मीबाईचें उदाहरण तर प्रसिद्धच आहे. अहल्याबाईचीं स्त्री-सैनिकांचीं पथकेंच होतीं. जिला औरंगजेबानें ' रायबागन ' असा किताब दिला होता—केवळ तिच्या पराक्रमामुळें, ती रणरागिणी सावित्रीबाई पांची हत्यारें चालविण्यांत तरबेज होती. यशवंतराव होळकरांची कन्या भीमाबाई घोडा उत्तम चालवी, अन् भालाफेकींत तिनें चांगल्याचांगल्यांस दांतीं तृण धरावयास लावलें. जशी स्त्रियांची पलटण अहल्याबाईची, तशींच बायजाबाई शिंदे हिनें स्त्रियांचीं पलटणें उभारलीं होतीं. पेशव्यांच्या बहुधा सगळ्या स्त्रिया अश्वारोहणांत पटाईत होत्या. पेशवे दप्तरांत तर कुस्ती करणाऱ्या कांहीं स्त्रियांचा उल्लेख आहे.

तो साराच काळ धामधुमीचा. पेटत असलेली चूल आकस्मिक छापा पडून कधीं विझेल, याचा भरंवसा नसायचा. सारेंच वातावरण अस्थिर. तेव्हां मग प्रत्येकाला कमींत कमी प्राणरक्षणापुरतें तरी शस्त्रें चालविण्याचें शिक्षण घेणें भाग पडायचें.

घोडीं महाराष्ट्रांत विपुल. तीं आवर्जून पाळलीं जायचीं. महाराष्ट्रिकाचें आपल्या घोड्यांवर फार प्रेम. आपल्या स्वतःच्या प्राणांपलिकडे. चौसहा कोसांत एखादें घोडें नामांकित असायचेंच. दसऱ्याच्या दिवशीं आपलें लाडकें

घोडें नाना परींनीं सजवायचें. आश्चर्य असें कीं, घोड्याचें नांव खंडोबा म्हणजे देवतेचें नांव ! त्या खंडोबाला फुलांतोरणांनीं शृंगारित करायचें. कपाळावर चांदीच्या माथोट्या. मग कपाळापासून तों पाठीवेरीं चांदीचीं गुल्बशीदार घुंगरें. पाठीवर उत्तम जीन. त्यावर खोगीर. खोगिरावर एखादा नामांकित नक्षी काढलेला किनखाबी तुकडा. मग हें खोगीर पट्ट्यानें नीट आवळायचें. शेपटांतून नीट पाठीवेरीं काढलेल्या लेंडीवरही रुपेरी साज घालायचा. मग घरच्या कारभारणीनें निरांजनानें घोड्यास ओवाळायचें. त्याच्या मुखीं घांस द्यायचा. त्यानंतर घोडेस्वारानें या साऱ्या लवाजाम्यास हात लावून त्या हातानें मस्तकस्पर्श करायचा आणि मग शिलंगणाला निघायचें. बहुधा हीं सारीं शिलंगणें फुरफुरत्या घोड्यांच्या शर्यतींनीं साजरीं व्हायचीं.

असें घोड्यावर साऱ्यांचें प्राणाधिक प्रेम. मग त्या घोड्यानेंही घरानें टाकलेला विश्वास प्रसंगीं प्राणाचेंही मोल देऊन सांभाळावा. त्या घोड्यावर घरचें मूलही बसलें, तरी घोड्यानें त्यास ढका न लावतां मुक्कामावर पोंचवावें.

सकाळ-संध्याकाळ घोड्यांवरून हरएकाचीं रिंगणें चालू असायचीं. घोड्यांच्या नाना गती. कधीं तो चौखूर उधळत चालायचा, कधीं दुडकी चाल. कधीं असा सरपट गतीनें चालायचा, कीं पाठीवर ठेवलेल्या पाणी भरल्या कळशींतला एक थेंब कांहीं इकडल्या तिकडे व्हायचा नाहीं.

मग घोडेस्वारांनीं घोड्यांवर बसल्या बसल्या भाले चालवावेत. म्हणजे असें, कीं जमिनीवर लगोऱ्यांची रास मांडावी. घोडेस्वारानें घोडें दौडवीत तिच्याजवळून जावें आणि भाल्याचें अग्र लावून लगोऱ्यांची रास मातींत मिळवावी. कधीं दोन घोडेस्वारांनीं घोड्यांवर बसल्या बसल्या छडी खेळावी. छडी आणि चामडी ढालीस म्हणायचें 'फरीगदगा.' हा फरीगदगा ढाल-तलवारीऐवजीं वापरला जायचा.

पण युद्धांत मात्र मुख्यतः तरवारींचाच उपयोग व्हायचा. मराठी तरवार किंचित् आखूड आणि कांहींशी बांकदार. तिच्या पाठीच्या अंगाला इथून तिथवर दोन्हीं अंगांनीं एक नाळ असायची. हेतु हा कीं, तरवार छातींत खुपसतां क्षणींच त्या नाळेवाटे रक्ताचा झरा बाहेर फुटावा.

तरवारीचे दोन भाग. पातें आणि मूठ. पैकीं पातें हें कणकणीत पोलादाचें असायचें. पोलाद जितकें अधिक शुद्ध, तितकी पात्यांवर निळी झिलई चढायची. विशेषतः तरवारीस धार देऊन पाणी पाजलें कीं, तरवार अशी तळपायची ! तिच्यावरून सहज बोट चालविण्याचाही धीर व्हायचा नाहीं. तरवारीस पाणी पाजण्यासाठीं निरनिराळ्या गांवच्या विहिरी प्रसिद्ध असायच्या. त्या विहिरींचें पाणी पाजलें, म्हणजे तरवार लवकर उतरायची नाहीं. पाणी पाजणें म्हणजे तरवार तापवून लाल झाली कीं, पात्याची वहाती धार क्षणभर पाण्यांत बुडविणें. दोन क्षण बाहेर काढून पाणी चरचरां जळून गेलें कीं, मग सारेंच पातें पाण्यांत बुडवून थंड करायचें. भाला, पेषकब्ज, जंबिया, कट्यार, पट्टा, खंजिर, बरचा, बिचवा, बाणांचीं टोंकें, हीं सारीं शस्त्रें अशीं पाणी पाजून काढावीं लागायचीं. यांच्या धारांना पाणी दिलें, कीं मग सहसा त्या जायबंदी व्हायच्या नाहींत.

वर तरवारीचे दोन भाग सांगितले. पैकीं मूठ बहुधा लोखंडी असायची. अनेक मुठींना वरल्या अंगांस आच्छादन असायचें. हा मुठीचा सगळा भाग नक्षीनें चितारलेला असायचा. कांहीं नामांकित तरवारींच्या मुठी तर सोनेरी नक्षीनें आणि रत्नांनींही मढलेल्या असायच्या.

मुठींत पातें बसवायचें तें चपडी लाखेंत. ती लाख गरम करायची आणि मुठींत ओतायची. सामान्यपणें थंड झालीं, कीं मग पात्याचा थर तींत बसवायचा.

लाख आळून थंड झाली कीं पातें गच्च बसायचें. मूठ जड, पातें कणखर, हलकें. अशी तरवार फिरवतांना कष्ट व्हायचे नाहींत. हाताला जाणवायचें नाहीं.

भाल्याचा फाळ ज्या बांबूंत—मराठी लष्कर या बांबूला ‘ बांसडा ’ म्हणत असे—रोविलेला असे, त्या बांबूची नाना प्रकारें मशागत करायची. महाराष्ट्रांत वेळूचीं बेटें पुष्कळ. त्यांत कांहीं भरीव बांबू. हा भरीव बांबू पिकून पिवळसर झाला, कीं तो पुरुषभर उंचीचा तोडून आणायचा. मग तो आरडबोरड भाजायचा. म्हणजे बांबूच्या लांबीचा पाचोळा एकत्र करून त्यांत बांबू खुपसून ठेवायचा. पाचोळा पेटवून द्यायचा. थोड्या वेळानें बांबूच्या बाहेरच्या अंगाला अगदीं काचित् भाजल्याच डाग उठले,

कीं तो बाहेर काढायचा. या वेळीं बांबू अगदीं सुतासारखा मऊ असतो. कुठें बांक असेल तर तो याच वेळीं काढायचा. म्हणजे बांकाच्या ठिकाणीं दगडांचें वजन ठेवायचें, अन् बांबू एका रेषेंत आणायचा. तो थंड झाला कीं मग त्याचा आकार कायम टिकायचा. त्यांत कांहीं बदल व्हायचा नाहीं.

मग बांबूचा वरचा भाग तासूनतुसून साफ करायचा. मग त्याला पाजायचें तेल. म्हणजे असें, कीं बांबूच्या वरल्या टोकाला एक शेंबीदार नळी बसवायची. मग ती नळी तेलानें भरायची, आणि बांबू चुलीवर, रात्रंदिवस धूर लागेल अशा ठिकाणीं टांगून ठेवायचा. नळींतलें तेल बांबूंत उतरत राहातें. सरलें कीं पुन्हा घालायचें. असा अगदीं तळावेरीं बांबू तेल प्याला कीं तो पक्का झाला. मग वरचा भाग तासूनतुसून वर भाल्याचें फाळ बसवायचें. तेल पिऊन पक्का झालेला हा बांबू वेतासारखा वांकेल पण तुटायचा नाहीं. दोन्हीं हातांनीं उचलून, दांत खाऊन, या भाल्याचा एक तडाखा माजलेल्या रेड्याच्याही पाठींत ठेवून दिला तर तो रप्पदिशी खालीं वांकायचा !

पट्टा हें शस्त्र वापरायला अवघड. पट्ट्याची मूठ म्हणजे हाताच्या मुठीवर असलेलें चिलखती आवरण. त्याच्या आंतल्या बाजूला बोटांची पकड बसण्यासाठीं आडवी कडी असायची. अन् मनगट निसटूं नये म्हणून असायची एक सांखळी. पट्ट्याचें पातें वारीपेक्षां बरेंच लांब. जवळजवळ तीन हात. प्रसंगीं त्याहूनही अधिक. हें पातें पोलादी, पातळ आणि लवचिक. लवचिक म्हणजे इतकें, कीं त्याची गुंडाळीसुद्धां व्हायची. टोंकाच्या अंगाला हातभर अशी दोन्ही बाजूंनीं तीक्ष्ण धार. असा हा पट्टा मनगट-मुठींत अडकवून शरीराभोंवतीं फिरवीत असायचें. चांगला पट्टा फिरविणाराच्या भोंवतीं दहा हातपर्यंत सारें निर्मनुष्य व्हायचें. कारण चक्राच्या गतीनें लवलवत, आकाश चिरीत, पट्ट्याचें पातें लढवय्याच्या भोंवतीं गरगरा फिरत असायचें. चपळ लढवय्याचे पवित्र्यावर पवित्रे चालू असायचे. क्षणांत या दिशेला, क्षणांत त्या दिशेला. पहातां पहातां समोरची सगळी गर्दी मोकळी व्हायची. पट्टेवाल्याचा नेम असा पक्का, कीं जमिनीवर ठेवलेलें लिंबू—तो पहातां पहातां त्याच्या दोन खापा करायचा.

शिवछत्रपतींच्या पट्टा हें शस्त्र अतिशय आवडतें. त्यांचें जें एक जुनें

चित्र उपलब्ध आहे, त्यांत त्यांनीं हातावर पट्टा चढविला आहे.

कट्यार, जंबिया, खंजीर हीं शस्त्रें लहान. ऐन हातघाईच्या वेळीं वापरायचीं. प्रतिस्पर्धी अंगाशीं भिडला, तरच यांचा उपयोग करायचा. यांना तरवारीसारखी एकाच बाजूनें धार. मात्र ‘ पेषकब्ज ’ आणि ‘ बिचवा ’ हीं दोन्ही शस्त्रें भाल्यासारखीं उभीं, दो बाजूंनीं धार असलेलीं. आणि याची धरायची पद्धतही वेगळी.

नीमचा हें एक आंखूड शस्त्र. तरवारीसारखें. विटा हा भाल्याचाच एक प्रकार. मात्र याचा फाळ भाल्यासारखा पसरट नसून लांब आणि टोंकदार असायचा. बुंध्याशीं एक मजबूत दोरी बांधलेली; आणि त्या दोरीचें दुसरें टोंक विटेकऱ्याच्या हातीं अडकविलेलें. विटा फेकायचा आणि माणूस जायबंदी झाला कीं, हातीं बांधल्या दोरीनें खच्‌दिशीं तो ओढून वापस घ्यायचा. मराठी लष्करांत विटेकऱ्यांचें एक पथकच असे.

खांडा म्हणजे लांब, पल्लेदार, सरळ आणि अवजड तरवार. खांड्याचा उपयोग कुणी बलदंड माणूसच करायचा. तें येरूनारूचें काम नोहे. गुरगुझ हें एक गदेसारखें शस्त्र. लांकडी मुठीचें. टोंकाशीं असलेल्या पोलादी फाळाला कांटे असायचे.

धनुष्य-बाण हेंहि मराठ्यांचें एक आवडतें शस्त्र. हें शस्त्र पौराणिक. रामानें भंगलेलें ‘ शिवधनुष्य ’, आणि अर्जुनाचें ‘ गांडीव ’ हीं दोन्ही सुप्रसिद्ध. धनुष्याची पाठ बहुधा बांबूची असायची. आणि तांत कोल्ह्याच्या आंतड्याची. त्याला पीळ देऊन केलेली. धनुष्य नेहमीं चढवून ठेवायचें नाहीं. उपयोगाचे वेळींच वांकवून तांत चढवायची. बाण नाना परींचे. सूचिमुख म्हणजे सुईसारखीं टोंकें असलेले. भल्लमुख म्हणजे भाल्याच्या फाळांसारखीं टोंकें असलेले. चंद्राकृति म्हणजे धारदार अर्ध-वर्तुळांसारखीं टोंकें असलेले. ‘ नाराच ’ म्हणजे किंचित् पसरट टोंकांचे. मराठ्यांच्या भात्यांत हे नाना प्रकारचे बाण. महाराष्ट्रांतला वनप्रदेश धनुष्य-बाणांच्या लढाईसाठीं अधिक सोयीचा. झाडावर लपून बसावें आणि माणसें टिपावींत. आजही काथोडी, वारली आणि ठाकर या जमातींजवळ धनुष्य-बाण हें शस्त्र जीव धरून राहिलें आहे.

शिवछत्रपतींचें एक अत्यंत आवडतें, अत्यंत प्रसिद्ध, आणि छुपें शस्त्र

म्हणजे वाघनखें. वाघनखें हीं अत्यंत तीक्ष्ण पोलादाचीं आणि बांकदार असायचीं. आकार नेमका वाघनखांएवढा. तर्जनी आणि कनिष्ठिका या दोन बोटांत त्यांच्या कड्या अडकवायच्या आणि हातांत लपवून तीं वागवायचीं. अंगाशीं अंग भिडलें कीं मग, विशेषतः पोट फाडण्यासाठीं यांचा उपयोग मोठा मातबर व्हायचा. अफझुल्ल्याचा कोथळा बाहेर काढल्यामुळें या वाघनखांभोंवतीं सहजच एक तेजोवलय निर्माण झालें आहे.

उरलें शस्त्र तोड्याची बंदूक. हें शस्त्र भारतांत बऱ्याच उशीरां आलें आणि मराठी सेनाहि त्याचा वापर बऱ्याच उशीरां करूं लागली. या बंदुकीचें काम मोठें अवजड असावयाचें. अगोदर बंदुकीच्या कान्यात वात घालून ठेवायची. मग नळीच्या तोंडाकडून आंत भरायची दारू. ती गजानें ठांसठांसून पक्की करायची. नंतर बंदुकींत शिरवायची शिशाची गोळी. वेळीं या गोळीऐवजीं नदीच्या वाळूंतले गोल दगडहि चालायचे.

नंतर वर भरायचा काथ्या, शेणकूट किंवा ताग. हा मसालाही गजानें ठोकठोकून पक्का करायचा. असा सगळा सरंजाम भरून तयार झाला, कीं मग हाताशीं असलेल्या पेटत्या सुंभानें काकडा पेटवून द्यायचा. तेव्हां कुठें गोळी जाऊन कशीबशी निशाणावर लागायची. असा या शस्त्रांत मोठा आयब असे. मात्र याचा मारा मागें सांगितल्या सर्व शस्त्रांहून लांब, दोन-दोन तीन-तीनशें गजसुद्धां. पण पूर्वींचीं सर्वच युद्धें वेळाचे दृष्टीनें जरा ऐसपैसच. त्यामुळें या कडाबिनी किंवा तोड्याच्या बंदुकी भरायला अन् झाडायला थोडका उशीर झाला, तरी कांहीं बिघडत नसे. तोफांचे गोळे तर दिवसभरांतून दहाबारा फेंकले तर अगदीं धार मारली !

म्हणजे काय, कीं तोफेंत गोळा भरायचा. मग एकदां तंबाकू ओढायची. मग नाकास हात लावून शकुन पाहायचा. तो बरा नसला, तर थोडा वेळ थांबायचें; अन् मग बरा शकुन आल्यावर तोफेचा गोळा डागायचा. एक गोळा मारला, कीं माणूस कृतकृत्य झाला. मग सावकाश गप्पा मारीत, पानबीन खात, असा दुसरा गोळा. असें सगळें अदबशीर काम चालायचें.

तोफ फार लांब पल्ल्याचें शस्त्र. दहावीस माणसांना ठार मारणारें. सोटा हें शस्त्र केवळ माणसाला जायबंदी करणारें. चिव्याचा चांगला मजबूत सोटा. एक सोटा टाळक्यांत बसतांच डोकें फुटायचें. अशा सोटे-

बाजांचींही मराठी लष्करांत पलटणें असायचीं. सोट्यांच्या जोडीला त्यांच्या कमरांना बांधलेल्या असायच्या गोफणी. माळावर धोंडे रगड. ते कांहीं कुठें शोधायला लागायचे नाहींत. एकदां शेंपन्नास गोफणी सुरू झाल्या, कीं समोरच्या सैन्यापैकीं कुणाचें टाळकें सडकून निघेल, याचा अगदीं भरंवसा देतां यायचा नाहीं.

अशीं हीं मराठ्यांचीं शस्त्रें. त्यांचीं अत्यंत लाडकीं. इतकीं, कीं दसऱ्याला या शस्त्रांची पूजा करायची. शस्त्रांविषयींचे नियमही तसेच कडक. तीं वाटेल तिथें पडायचीं नाहींत. भलत्या वेळीं म्यानांतून निघायचीं नाहींत. तरवार तर म्यानांतून काढली, कीं तिला रक्त पाजल्याशिवाय परत म्यान चढवायचेंच नाहीं. हल्लीं शिवछत्रपतींच्या पुतळ्यांत उघडी तरवार दाखवतात; पण विनाकारण असें शस्त्र सज्ज करण्याचा मराठ्यांचा रिवाज नव्हता.

✤ ✤ ✤

# प्रवास : कांहीं साधनें—

प्रवासाचें मुख्य साधन घोडा, हें तर सांगितलेंच. याशिवाय घोडा नसे तीं माणसें खुशाल पायीं चालत. पाय हें वाट काटायचें एक मजबूत साधन देवानें जन्मतांक्षणीं देऊन ठेवलेलें. बरें, प्रवास करायचा तरी किती? फार झालें तर दहावीस कोस. एवढ्याशा नासुकल्या अंतरासाठीं पायावेगळें साधन वापरतों कोण? घाटावर अन् कोंकणांत तर आजही रोजीं तीस-चाळीस मैल प्रवास बोलबोल म्हणतां क्षणीं करणारीं माणसें विद्यमान आहेत. कुठें गेलतात म्हणून विचारावें तर उत्तर देतात, 'कुठें नाहीं रे! या हितें कापास जाऊन आलों!' अन् काप असतें मुक्कामापासून फक्त वीस मैल. केवळ चार डोंगर चढायचे असतात अन् पांच उतरायचे असतात. अशी ही पायांची प्रतिष्ठा अजून महाराष्ट्रिकांनीं गमावली नाहीं. त्यांचें मोल महाराष्ट्रिकांना अजून चांगलें माहीत आहे.

एक गंमत सहज जातां जातां. विनोबा पदयात्रा करतात. कारण ते महाराष्ट्रिक आहेत!

त्यानंतर दुसरें जरा विशेष कौतुकाचें प्राचीन साधन म्हणजे मेणा. मेणा म्हणजे एक चौकोनी लहानशी लांकडी खोली. आंत एक माणूस पैस बसायजोगी. मागें-पुढें भलीं मजबूत दांडकीं जोडलेलीं.

बहुधा मेणा हें स्त्रियांचें वाहन. सासुरवासिनी, माहेरवासिनी सासरीं-माहेरीं जायच्या-यायच्या त्या मेण्यांत बसून. मेणे अजूनही मोडले नाहींत. अगदीं क्वचित् ते आजही दृष्टीस पडतात. मात्र डोंगराळ भागांतून. मेणा वाहायला आठ माणसें लागायचीं. चार पुढें चार मागें. बहुधा हे भोई असायचे.

पैस पैस असें म्हणत अन् हुंकार टाकीत रपारपा चालले असायचे.

मेण्याहून प्रशस्त अन् वैभवाचें चिन्ह असें साधन म्हणजे पालखी. पालखीपदस्थ असणें हा मोठा मान होता. स्वतः छत्रपति अनेकदां पालखी वापरीत. रायगडाच्या बालेकिल्ल्याला पालखी दरवाजा आणि मेणा दरवाजा असे दोन दरवाजेच आहेत. मेणा बंद असायचा, तर पालखीवर केवळ एक छत असायचें. त्याला गोंडेबिंडे लावून सुशोभित केलेलें. पालखींत बसायला जागाही बरीच म्हणायची. आंत एखादा तक्क्या, लोडही ठेवतां यायचा. पालखींत बसलेला माणूस वरचा गोंडा धरून बसायचा. पालखीस भोई मेण्याहून जास्त लागायचे.

सध्यां पालख्या आहेत, पण त्या केवळ देवांच्या वांट्यास आल्या आहेत. माणूस लबाड हें तर खरेंच. तो स्वतः चक्रावर चढला अन् पालखीसारखें मंद गतीचें साधन त्यानें देवांच्या हवालीं केलें.

हीं झालीं खुष्कीचीं साधनें. पाण्यांतलीं साधनें म्हणजे नावा. महाराष्ट्रांत एक समुद्र आणि खाड्या सोडल्या, तर इतरत्र नावांमधून प्रवास फार कमी व्हायचा. कारण नद्यांना जेमतेम पाणी. खाड्यांमधूनच सायंकाळच्या मतलई वाऱ्यावर शिडें उभारून गलबतें पाणी कापीत असलेलीं दिसायचीं.

मात्र नद्या अन् खाड्या उतरण्यासाठीं अलिकडे पलीकडे करायला नावांचा वापर व्हायचा. पूर्वीं या उतारासाठीं अगदीं नाममात्र भाडें घेतलें जायचें. पै-पैसा इतकेंच. कोंकणांत या उतारांचे दर वाढले असले, तरी नांवें मात्र पूर्वींचींच आहेत जसें ‘ पैची तर ! ’

खानदेशांत तापी अन् मराठवाड्यांत गोदा या मात्र बरें पाणी असणाऱ्या नद्या. तेव्हां मनांत आलेंच तर या नद्यांमधून दहावीस मैल प्रवास नावांमधून करतां यायचा. या नावांचे नाना आकार. तापींतल्या नावा आकारानें जरा मोठ्या अन् बहुधा सपाट तळाच्या. प्रत्येक नावेला शोभा म्हणून एक घोड्याचें तोंड असायचें. नद्यांतल्या नावांना अगदीं क्वचित् डोलकाठी असायची अन् तीवरतीं शीड. याहून लहान नावा मात्र तळाशीं निमुळत्या होत गेलेल्या.

मराठवाड्यांत गोदामाई आरपार व्हायचें आणिक एक साधन. त्याला म्हणायचें काहील. ही काहील लोखंडी असायची. भली प्रचंड कढईच

म्हणाना ! अन् मग ही वल्ह्यांनीं चालायची.

जिथें नदी उतरण्यासाठीं नाव अगर काहील, कसलेंच साधन उपलब्ध नाहीं, तिथें गेला बाजार सांगडी किंवा पेटे असायचे. सांगडी किंवा पेटे म्हणजे जाळ्यांत अडकवलेले भोपळे. भोई एका सांगडीवर स्वतः बसायचे; अन् दुसरीवर माणूस घालून पोहत पोहत त्याला ऐलपैल नेऊन पोंचवायचे.

✢ ✢ ✢

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों दि: ............

# नद्या : त्यांचे घाट—

प्रत्येक पवित्र क्षेत्रीं नदीला घाट बांधलेला असायचा. घाट बांधणें हें एक पुण्यकृत्यच. जशीं झाडें लावणें, विहीर बांधणें, पाणपोई घालणें, सडक बांधणें, तसेंच हेंही. नद्यांच्या कांठीं जिथें मळई असेल, तिथें घाटांचा पाया भला मजबूत, खोलवर घ्यावा लागायचा. मात्र जिथें नदी खडकांतून वाहात असेल तिथें पायाचा फारसा प्रश्न नसायचा.

नदीस घाट बांधणें म्हणजे नदीची शोभा शतपट वृद्धिंगत करणें. किंबहुना घाट म्हणजे नदीचा अलंकारच. हें म्हणणें किती खरें तें पडताळून पाहायचें असेल, तर नरसोबाच्या वाडीस जाऊन पाहावें. तिथें कृष्णाबाईचें सौंदर्य घाटामुळें पहिल्यापेक्षां शतपटीनें वाढलें आहे. काळ्या पाषाणांचा प्रशस्त लांबलचक घाट. उतरत्या पायऱ्यांचा.

कृष्णाबाईस अनेक ठिकाणीं घाट आहेत. मेणवली, वाई, कऱ्हाड, सांगली, वाडी, औदुंबर, भिलवडी, पाटकळ-बोरकळ हे त्यांतले कांहीं.

तीच गत गोदामाईची. गोदामाई मुळीं प्रकटतेच घाटांच्या अलंकारांमधून. तसा तिचा उगम आहे ब्रह्मगिरीवर झालेला. पण तो बिंदुमात्र. ती सळसळून प्रकट झाली त्र्यंबकेश्वरीं. तिथें जवळजवळ गांवभर तिचें पात्र घाटांनीं बांधून काढलें आहे. किती शोभा ती सांगतां पुरवत नाहीं.

नाशकाचे घाट साऱ्या महाराष्ट्रांत अपूर्व आहेत. उंच, सखल, चिंचोळे, पैस अशा भल्या प्रशस्त घाटांनीं त्र्यंबकेश्वराप्रमाणेंच नाशिकलाही गोदामाईचें पात्र बांधून काढलें आहे.

तिच्यावर असेच कांहीं घाट आहेत. कायगांव टोक्याला, मराठवाड्यांत

नांदेडला, आणि किती किती जागीं.

आणखी कांहीं घाटांचा उल्लेख आवर्जून करायलाच हवा. न केला तर अपराध होईल. पैकीं एक ठिकाण आहे पंढरपूर. तिथले चंद्रभागेचे घाट वारीच्या वेळीं तर पताकांनीं केवळ गजबजून जातात. जणुं ते विरक्त संन्यासीच झाले आहेत. पंढरीच्या घाटांची लांबी अधिक. कारण चंद्रभागेचें वाळवंट फार मोठें आहे. तिची धारा पलीकडून वाहाते. त्या मानानें देहू आणि आळंदी या दोन्ही ठिकाणांचे इन्द्रायणीचे घाट नेटके. फार लांब नाहींत, फार रुंद नाहींत. जशी या दोन्ही क्षेत्रीं इंद्रायणीही लहान, तसेच तिचे घाटही. वऱ्हाडांत ऋणमोचनला अगदीं अलिकडे कांहीं घाट बांधले आहेत. असेच कांहीं घाट नागपूरच्या नाग नदीला, वर्धेला आणि कांटेपूर्णेला.

या घाटांविषयींचा एक विशेष इथें सांगायला हवा. महाराष्ट्रांतल्या या पवित्र नद्यांवरील अनेक घाट अहल्याबाईनें बांधले आहेत. ती साध्वी जरी शरीरानें माळव्यांत वावरत होती, तरी तिचें मन मात्र या दगडांच्या देशांत त्याच्या त्या हात हात नद्यांभोंवतींच घोटाळत होतें !

कुण्या एका देशाच्या संस्कृतीचें वैभव तपासायचें असेल तर त्या देशाचे घाट पाहावेत. त्या घाटांवरचीं निसुळतीं होत जाणारीं लहान आणि मोठीं मंदिरें पाहावींत. सकाळ-संध्याकाळ या घाटांवरून होत असणारी गर्दी पाहावी. निःसंकोच आणि निर्भयपणें घाटांवर स्नान करणाऱ्या आणि नदीच्या पाणवठ्यानें पाण्याच्या कळशा भरणाऱ्या स्त्रिया पहाव्यात. या घाटांवरून पूजापाठ करीत बसलेले वृद्ध आणि तापसी पाहावेत. घाटांवरल्या मंदिरांमधून चालणारीं कथा-कीर्तनें पाहावींत. प्रवचनें ऐकावींत.

छेः ! छेः ! तिथें संस्कृतीचें प्रकट दर्शन जितक्या प्रकर्षानें घडतें, तितकें तें अन्यत्र कुठेंच घडत नाहीं.

⚘ ⚘ ⚘

# वेशभूषा

महाराष्ट्रांत कापसाची पेर खूप जुनी. गाथासप्तशती-कालीं तर ती निश्चितच होत होती. एका गाथेंत कुण्या मदनिकेचें हास्य–बहुधा दंतपंक्तींचें प्रदर्शन झाल्यामुळेंच–कापसाच्या बोंडाप्रमाणें आहे असा उल्लेख आहे. तर दुसऱ्या एका गाथेंत पांढऱ्या मेघांच्या आकाशावेरीं उंचावत गेलेल्या समूहाला कापसाच्या ढिगाची उपमा दिली आहे. तात्पर्य, त्या काळीं कापूस होता, कापसाची वस्त्रेंही होतीं.

धनगर तर महाराष्ट्रांतले फार जुने रहिवासी. मेंढरें होतीं. त्यांची लोंकर निघत होती. घोंगड्या विणल्या जात होत्या. किंबहुना घोंगडी हें महाराष्ट्राचें महावस्त्र म्हणावें.

महाराष्ट्र देशीं पाऊस बहुत. डोंगरमाथ्यावर आणि त्याच्या आसमंतांत तर तो फारच. तेव्हां मग त्या पावसापासून संरक्षण करण्याकरितां घोंगडें लागायचें. हिंवाळ्यांत त्याचा उपयोग अंग गुरफटून घ्यायला. उन्हाळ्यांत तें खालीं अंथरायच्या कामीं यायचें. लढाईच्या वेळीं अंगाभोंवतीं गुंडाळून घेतां यायचें, म्हणजे तरवारींचा वार लागण्याची शक्यता तेवढीच उणावली. शिवाय गोफणबाजांना घोंगडीचा उपयोग फारच व्हायचा. तिच्यांत धोंडे गोळा करून घेतले, अन् ती खांद्यावर लटकविली, कीं झाला भराटा सुरू !

वर कापसाचा उल्लेख केला. तसा महाराष्ट्र प्रदेश उष्णच. त्यामुळें वस्त्रें कमी लागायचीं. लेण्यांमधून कांहीं स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या आकृति आहेत. त्यांचीं वस्त्रें नीट न्याहाळून पहावींत. पुरुषाच्या मस्तकावर फेटा. त्यावर एक तुरा. कंबरेला गुडघ्यांपर्यंतच लपेटलेलें एक 'वस्त्र. बाकी मग

शरीर उघडें. आंत बहुधा कच्छ किंवा लंगोटी असावी. कच्छ म्हणजे काचा. आजही पहिलवान कुस्ती करतांना नेसतात तो. हें एक लंगोटी-एवढें रुंद चिंधुक. लांबी-मात्र जवळजवळ दीड वार. अगोदर कमरेभोंवतीं बांधून व्यायचें. मग गांठ मागें व्यायची, अन् तिचा पदर समोर फिरवून पुन्हा मागें नेऊन खोचायचा. हे कच्छ गाथा सप्तशतीकालीं बहुधा सारे पुरुष वापरीत असावेत. एखाद्याच अधिकाऱ्याच्या किंवा राजपुरुषाच्या अंगांत कापसाची तलम बंडी असायची. बंडी किंवा अंगरखा. त्याला बंद असायचे. याचीच इतिहासकालीं झाली बाराबंदी. पायांत असायचा बहुधा जोडा. मागच्या बाजूनें मोकळा. पुढील बोटांस मात्र चांगलें संरक्षण. तें असें, कीं सगळा पुढील भाग वर वळविलेला. आजचा पुणेरी जोडा हा याचाच अवशेष. कॉंग्रेस अधिवेशन गाजविल्यापासून याला फारच प्रसिद्धि मिळाली हें खरें. मात्र अलिकडे बहुधा तो नामशेष होत चालला आहे.

आतां कांहीं स्त्रियांच्या वस्त्रांसंबंधानें. गाथासप्तशतीकालीं, म्हणजे लेणीं खोदलीं गेलीं त्या कालीं स्त्रियांचीं लुगडींही अरुंद आणि आंखूड असायचीं. तीं जेमतेम गुडघ्यांपर्यंत पुरायचीं. कांहीं स्त्रिया–बहुधा उच्च कुळांतल्या–कासोटा घालीत नसाव्यात. लुगड्याच्या आंत कदाचित् त्या 'नीवीबंधन' वापरीत असाव्यात. अजिंठ्याच्या चित्रांमधून कांहीं चित्रें सकच्छ वस्त्रें नेसलेल्या स्त्रियांचीं आहेत. या कालीं स्त्रिया छातीवर बांधण्यासाठीं एखादें वस्त्र वापरीत. त्याची गांठ मागें. अनेकदां त्या हें वस्त्र वापरीत नसतही. अजिंठ्यांतील चित्रांत स्त्रियांचीं उत्तमांगें अनावृतच आहेत. डोक्यांवरून अगर खांद्यावरून मात्र ओढणीसारखें कांहींतरी घ्यायचें-वरिष्ठ कुळांतल्या स्त्रियांनीं.

पुढें मग वस्त्रांची लांबीरुंदी वाढत चालली. लुगडें गुडघ्यांपर्यंत होतें तें घोट्यांपर्यंत आलें. ओढणी जाऊन तिच्या जागीं लुगड्याचाच पदर आला. मागील गांठीच्या कांचोळीऐवजीं पुढील गांठीची चोळी वापरली जाऊं लागली.

पुरुषांच्या वेषांतही विदेशीयांचा संबंध आल्यापासून एक महत्त्वाचा बदल झाला. तो असा कीं, कमरेच्या नेसत्या वस्त्राऐवजीं मांडचोळण आला. खालीं जरी• हा मांडचोळणा घातला असला–विशेषतः सैनिकांनीं

तरी अंगांत कुडतें हवेंच, असा कांहीं आग्रह नसे. अनेकदां तें नसलें तरी भागे. त्याऐवजीं घोंगडीच खांद्यावरून उतरती जानव्यासारखी टाकली, आणि कमरेला उपरण्यानें मजबूत बांधलें कीं झालें. उपरणें हें उत्तरीय वस्त्राचें मराठेशाही रूप.

मात्र डोईवरल्या फेट्यानें आपलें स्थान सोडलें नाहीं. खालीं नुसती लंगोटी लावली असली, तरी डोईला फेटा किंवा मुंडासें असलेंच पाहिजे. या मुंडाशांचे नाना प्रकार. पागोटें, मुंडासें, बत्ती, तिवट, पटका, मंदिल, फेटा अशीं यांचीं नाना नांवें. बहुधा सारीं लांबीवरून पडलेलीं. मुंडाशाची रुंदी अजिबात कमी. लांबी मात्र पन्नास पन्नास हातसुद्धां. पेशवेकालीं याच पागोट्याची सुधारलेली प्रत म्हणजे गाडीच्या चाकाएवढालीं बांधीव पागोटीं. तीं लहान होत होत सध्यांच्या पुणेरी पगडीएवढीं झालीं. आतां कांहीं दिवसांनीं पुणेरी पगडीही लोकमान्यांच्या फोटोंत काय ती दिसायची !

पुढें पुढें पुरुषांच्या अंगांत बंड्या अन् अंगरखे चढले. म्हातारे बाराबंद्या वापरूं लागले. अंगरख्यांची लांबी भली पैस, गुडघ्यांपर्यंत असायची. हातांचीही लांबी खूपच. म्हणजे चांगली चारपांच हात तरी. मग त्या हातांच्या चुण्या घालायच्या. या जातीचे कांहीं इतिहासकालीन अंगरखे कुठें कुठें जपून ठेवले आहेत. पुण्याच्या इतिहास संशोधक मंडळांत एक अंगरखा आहे. नाना फडणविसाचा. तिथेंच शाहू छत्रपतींचा जोडाही आहे.

थोडें दरबारी वस्त्रांसंबंधीं. दरबारांतून कुणाला वस्त्रें द्यायचीं, म्हणजे किती, तर घोंगडी, पासोडी अन् अंगरखा. याशिवाय पेशवेकालीं उत्तरेच्या संसर्गानें पांघरुणांत भर पडली, रजई अन् दुलईची. चादर तर होतीच. शालजोड्याही होत्या. या विशेषतः शास्त्र्यांनीं व विद्वानांनीं वापरायच्या. कंबरेस उपरण्याऐवजीं आला शेला. रेशमी, भर्जरी. डोईस बांधायच्या वस्त्रांमध्यें पटका, फेट्याचा उल्लेख केला. पण ही दोन्ही वस्त्रें त्या काळीं छचोरपणाचें लक्षण मानलें जाई.

या काळांत युद्धाचा पोषाख म्हणजे चिलखताऐवजीं डोईस बुरणुसाचा कान झांकतील असा टोप, आणि अंगांत गोधडीचें अंगडें. खालीं विजार अगर चोळणा. कमरेस उपरणें, तरवार, जंबिया, कट्यार, पेषकब्ज हीं कमरेला टांगायचीं हत्यारें या उपरण्याच्या बंधांत खोचून ठेवतां यायचीं.

या काळच्या स्त्रियांच्या पोषाखांविषयीं कांहीं थोडें. गरीबांचीं वस्त्रें म्हणजें सुतडें, चिरड्या अन् साड्या. श्रीमंतांचीं पातळें, शालू, पैठण्या, लुगडीं.

या साऱ्याच वस्त्रांच्या विणाईबद्दल बहुत पेठा प्रसिद्धीस आल्या. नागपूरचे रेशमी धोतरजोडे अन् उपरणीं, पैठणच्या पैठण्या, महेश्वरचीं रेशमी लुगडीं, सोलापुरी सुतडे, नगरच्या चिरड्या. मग इतर धोतरें, उपरणीं अष्टी, चांदवड, चौल, राजापूर, जालना अशीं जागजागीं विणलीं जायचीं. कोंकणचें वस्त्र पंचे. त्यांच्याबद्दल राजापूरची फार प्रसिद्धि. हें पंचे तोकडे अन् आंखूड. पण एक जोडी सामान्यपणें वर्षभर पुरायची.

अर्थ असा, कीं महाराष्ट्रांत मराठ्यांची जी स्वतःची राजवट नांदून गेली, तिनें आपला पोषाख सुधारला आणि इथेंच, महाराष्ट्रांतच तो विणला जाईल, अशी दक्षता घेतली. आजही मुंबईच्या गिरण्या केवळ स्वदेशीच नव्हे तर परदेशीं देखील वस्त्रें पुरवीत आहेत !

✤ ✤ ✤

# कांहीं अलंकार—

स्त्रियांची दागिन्यांची आवड तर प्रसिद्धच आहे. अनेकदां असें व्हायचें, कीं दागिन्यांनीं मढलेली स्त्री समोर आली, कीं दागिनेच दिसायचे. स्त्री दिसायचीच नाहीं ! ही आवड आजची नव्हे. फार पूर्वीपासूनची. ज्या काळीं लेणीं खोदलीं गेलीं, आणि सप्तशतींतील गाथा लिहिल्या गेल्या, त्या काळींही स्त्रियांचा स्वभाव असाच होता. त्यांत कसलाही बदल नव्हता.

शरीराचा जो जो म्हणून दर्शनी भाग असेल, तो तो दागिन्यांनीं मढवून काढायचा. केसांत फुलांचे गजरे, कपाळावर बिंदल्या, नाकांत नथ, चमकी, कानांत बाळ्या, बुगड्या, कुड्या, लोंबतीं कर्णभूषणें. गळा ही तर नाना प्रकारचे अलंकार अडकवून ठेवायची खुंटीच. तीच गोष्ट दंडांची आणि मनगटांची. हातांचीं बोटेंदेखील रितीं राहून द्यायचीं नाहींत. मग कमरेवर करदोटा, मेखला. शेवटीं उरले पाय. पायांत तोडें, नूपुरें—नाना परींचीं. अन् पायांच्या बोटांत पुन्हा वेढीं, जोडवीं.

गाथाकालीं यांपैकीं अनेक अलंकार वापरले जात. कांहींचे उपयोग आज प्रचारांतूनहीं गेले आहेत. उदाहरणार्थ, केसांत मोरपीस खोवलेलें असायचें. आज मोरपीस कुणी वापरीत नाहींत. तशीच कानांवर मंजिरीही कुणी ठेवीत नाहीं. अवमालिकी म्हणजे काय तें कोण जाणे ! कर्णपूरोत्पल हा बहुधा कानांतला दागिना असावा. कर्णावतंस--हाही कानांत घालायचा, कमलिनीच्या आकाराचा सोन्याचा दागिना असावा. कर्णाभरण, कुंडल, नूपूर, मेखला, मेखलिका, वलय, हार, असे दागिन्यांचे नानाविध प्रकार.

पैकीं कट्दोरा, कुंडल आणि हार हीं अलंकरणें सोन्याचीं असायचीं. त्यांतलीं कांहीं रत्नजडितही. नूपुर बहुधा रुप्याचें. मेखला कृष्णमण्यांची.

वेणी घातल्यावर केशसंभारांत जसें मोराचें पीस खोवीत, तसेंच शीर्षावतंस आणि धम्मिल्ल, हीं दोन आभूषणें डोक्यांत घालायचीं. लेण्यांतील चित्रांत मेखला, नूपुर, वलय, अंबाड्यावर गजरा, दंडावर बाजुबंद, असे नाना अलंकार आढळतात. हीं वलयें घुंगुरवाळे जडवलेलीं असायचीं.

कानांना वेध घेतलेले असायचे. त्यांत अडकवायचीं कर्णभूषणें. त्यांत रत्नें जडवलेलीं. क्वचितच तीं मोत्यांचींही असावींत.

कंकणें नाना प्रकारचीं. कांहीं पोकळ. कांहीं नक्षी काढलेलीं. कांहीं काचेचीं. रंगीबेरंगी. जालवलय नांवाचें सोन्याचें जाळीदार कांकणही वापरलें जायचें. क्वचित् हें वलय रत्नजडितही असायचें.

स्त्रियांच्या कटीवर अनेक पदरांची मेखला असायची. कधीं ती सोन्याची. कधीं चांदीची. कधीं रत्नजडित. पायांतलीं नूपुरें तर असंख्य प्रकारचीं. पोकळ, भरीव घुंगरांचीं.

नंतर उल्लेख आढळतात, ते शिवशाहींतील अलंकारांचे. पुरुषाच्या दंडांत एखादें कडें असलें तर असायचें. हाताच्या बोटांत अंगठ्या आणि क्वचित् पायांत तोडा. कानांत भिकबाळीही असायची, अन् बाळ्या. इतिहासकालीं जसा पुरुष वस्त्रांनीं नटला, तशीच अलंकारांच्या संख्येंतही भरती झाली. डोईवर कलगी, तुरा अन् शिरपेंच आला. हे तिन्ही अलंकार पागोट्यांत खोवायचे. कानांत भिकबाळीच्या जोडीला चौकडा आला. गळ्यांत आले कंठी अन् गोफ. कमरेला चांदीचा भला बलदंड करदोटा.

स्त्रियांच्याही आभूषणांत कांहीं बदल झालेच म्हणायचे. कानांत साध्या बाळ्या होत्या. त्यांच्या जागीं घोसाच्या बाळ्या आल्या. पोची आली. कंगण्या आल्या. पाटल्या आल्या. गळ्यांत आल्या पुतळ्या. बोटांत नाग आले. मुद्या आल्या. क्वचित् वळींही आलीं. पायांत आले तोडे.

इतिहासकालीं नाना रत्नांचा वापर असायचा. हिरा, पाच, नील,

पुष्कराज, लसन्या, गोमेद, माणिक, मोतीं, पोवळें, स्फटिक अशा नाना परी. हीं रत्नें बहुधा सोन्यांत मढवून अंगावर वापरलीं जायचीं. क्वचित् यांचे हार करून गळ्यांत घातले जायचे. क्वचित् हीं दंडांतल्या सोन्याच्या वेळा–वाकींवरही बसवलीं जायचीं.

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# कांहीं नाणीं : कांहीं मापें—

इतिहासकाळीं स्वस्ताई बहुत होती. फार कशाला, ती तर सुमारें पन्नास वर्षांपूर्वींपर्यंत होती. वस्तु विपुल होत्या. गरजा कमी असल्यामुळें घेणारे कमी होते.

ज्ञानेश्वरांच्या कालीं सोनें काय भाव होतें ? तर एका तोळ्याला साडे-पंधरा रौप्यमुद्रा द्याव्या लागायच्या. ज्ञानेश्वरांनीं अति शुद्ध, चोखट सोन्याचा उल्लेख साडेपंधरा असा केला आहे.

दूध, दहीं विपुल होतें. बहुधा हें कुणी विकत नसे. भाज्यापाल्यांनाही त्या वेळीं मोल नव्हतें. अगदीं इतिहासकालीं देखील स्वस्ताई किती ?

तर सोनें चौदा रुपये तोळा—हे भाव अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांतले आहेत. विड्याचीं पानें एका पैशाला पंचवीस. ज्वारी रुपयाला चौदा पायली. बाजरी दहा पायली. हरभरे सहा पायली. तांदूळ साडेचार पायली. मीठ चार पायली. अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी, कीं तूप जें शुद्ध स्वरूपांत हल्लीं देवदुर्लभ झालें आहे, तें त्या काळीं रुपयाला साडेतीन शेर मिळायचें. साखर रुपयाला चार शेर. तेल चार शेर. दूध रुपयाला बारा शेर ! पेढे रुपयाला पावणेदोन शेर आणि नोंदून ठेवण्याजोगी गोष्ट आहे, कीं पायतणें केवळ आठ आण्याला मिळायचीं !

घरभाडीं तर त्या काळीं बहुधा नसायचींच. कारण फारसे भाडेकरूच नसायचे. ज्या माणसाला स्वतःचें घर नाहीं, त्याच्याकडे लोक आश्चर्यानें आणि कांहींसे दयापूर्ण दृष्टीनें पाहायचे. क्वचित् सरकारी कामाच्या निमित्तानें अथवा व्यापाराच्या निमित्तानें कुणाला परदेशीं जावें लागलेंच

तर मोकळीं घरें उपलब्ध होऊं शकायचीं. त्या भल्या माणसानें झाडलोट करावी. घर स्वच्छ ठेवावें कीं पुरे.

नाणीं त्या काळीं नाना प्रकारचीं. कऱ्हाड, नेवासें, पैठण अशा कांहीं ठिकाणीं उत्खननें होत आहेत. त्यांत जुन्या संस्कृतींचे अवशेष मिळत आहेत. अन् त्याबरोबर नाणींही. हीं नाणीं नाना धातूंचीं. इतरही अनेक प्रकारचीं होतीं. ज्ञानेश्वरकालीं चामडयाचे तुकडे शिक्के मारून नाणीं म्हणून वापरले जात असावेत. कवडया तर नाणीं म्हणून अगदीं कालपरवांपर्यंत वापरल्या जात होत्या.

कांहीं नाणीं तांब्याचीं, कांहीं सोन्याचीं अन् कांहीं रुप्याचीं. पैकीं सोन्याचीं नाणीं कमी. त्या मानानें रुप्याचीं थोडीं अधिक. उत्खननामधून किंवा नद्यांमधून कांहीं जुनीं नाणीं सांपडलीं आहेत–सातवाहनांचीं, राष्ट्रकूटांचीं, चालुक्यांचीं, शिलाहारांचीं, यादवांचीं.

नाण्यांचा आकार ओबडधोबडच सामान्यपणें गोल. विशेषतः तांब्याच्या नाण्यांचा आकार तर फारच ओबडधोबड असायचा. महाराष्ट्रांत आज जीं प्राचीन नाणीं आढळतात, त्यांपैकीं कांहींवर जुने शिक्के असूनसुद्धां त्यांवर नवीन मुद्रा उठवलेल्या आढळायच्या. याचे अर्थ दोन. पहिला, जरी तें नाणें झिजलें असेल तरी व्यवहारांत चालू राहील, अशी खूण दाखवणारा, त्याच राजकुलाचा शिक्का उठवला जायचा; अन् दुसरें कारण, एखाद्या राजाला दुसऱ्या कुणीं युद्धांत पराभूत केलें, तर पहिल्या राजांच्या सर्व मुद्रांवर या दुसऱ्याच्या नांवाच्या मुद्रा उमटवल्या जायच्या. अर्थ असा, कीं अशीं नवीन मुद्रा उमटवलेलीं नाणीं हीं एका युद्धाची आणि पराभवाची खूणही असूं शकेल.

महाराष्ट्रांत बहुधा सर्वत्र आढळणारीं अनेक नाणीं हीं आरबी आणि फारसी अक्षरें असलेलीं. हीं विजापूर, गोवळकोंडा, बेदर, एलिचपूर इथल्या पातशहींचीं. क्वचित् कांहीं नाणीं बाहेरील टांकसाळींचींही आढळायचीं. कांहीं रुपये दिल्लीच्या पातशहाचा शिक्का असलेले. कांहीं अहमदाबाद टांकसाळींत पाडलेले.

मात्र या नाण्यांच्या प्रांतांतही अद्‌भुत आणि स्फूर्तिकारक क्रांति केली शिवछत्रपतींनीं. त्यांनीं नागरी अक्षरें असलेलीं नाणीं पाडलीं. होन, पुतळ्या

आणि शिवराई या सर्व नाण्यांवर ‘ राजा श्रीशिवछत्रपति ’ अशीं अक्षरें असायचीं.

छत्रपतींचें सगळेंच आगळें. जुन्या मुद्रा फारसी किंवा आरबी. छत्रपतींनीं स्वतःची राजमुद्रा नागरी लिपींत तयार केली, शुद्ध संस्कृत भाषेंत—

प्रतिपच्चन्द्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

शिवछत्रपतींचीं शिवराई नाणीं महाराष्ट्रांत बहुत सांपडतात. कांहीं खुद्द छत्रपतींनीं पाडलेलीं, कांहीं नंतर पाडलेलीं. शिक्का मात्र तोच. छत्रपतिकालीन नाणीं अधिक सुघड, सुदर्शन—मात्र उत्तरकालीन नाणीं कांहींशीं ओबडधोबड. हीं निरनिराळ्या किल्ल्यांवरून, तत्कालीन पेठांच्या गांवीं, अशीं सांपडतात.

जातां जातां उल्लेख केला पाहिजे तो पेशवेकालीन एका रौप्यमुद्रेचा. ही मुद्रा आडवी, चिंचोळी आणि चौकोनी असायची. मात्र हीं नाणीं अगदीं क्वचित् सांपडतात.

महाराष्ट्रांतलीं प्राचीन नाणीं जमवणें, शोधणें हा एक अत्यंत जिव्हाळ्याचा छंद होऊं शकतो. वेडें करणारा. हें वेड लावून घेण्याजोगें आहे !

मापें हीं निरनिराळ्या वस्तूंचीं निरनिराळीं. म्हणजे साखर, गूळ, शेंगदाणे, असले पदार्थ तागडीनें तोलायचे. दूध, तेल असल्या पातळ पदार्थांचीं मापें निराळीं. धान्य वेगळ्या मापांनीं मिळायचें. कापडाचें माप निराळें. जमिनीचेंही निराळें. असेंच आंब्यासारख्या वस्तूही मोजायचें माप निराळें.

सोनें अन् चांदी हीं गुंज, वाल, मासा, तोळा या मापांनीं मोजलीं जायचीं. क्वचित् पावलीभार, अधेलीभार अशी भाषाही वापरली जायची. पावलीभार म्हणजे पाव तोळा. अधेली म्हणजे अर्धा तोळा.

इतर तराजूंत तोलल्या जाणाऱ्या वस्तु—त्यांचें लहानांत लहान माप म्हणजे छटाक. यालाच नवटाक असेंही म्हणायचें. छटाक म्हणजे पांच तोळे. सोळा छटाकांचा शेर. अडीच शेरांची पांसरी. चाळीस शेरांचा मण. वीस मणांची खंडी.

हीं मापें जुन्या काळीं सारीं एकाच वजनाचीं आढळायचीं, असेंही

नाहीं. तोळा दोन तोळे फरक आढळायचाच. खेड्यांमधून तर या मापांच्या वजनांचे दगडच एकदां कधींकाळीं मोजून ठेवले असायचे. मग पिढ्यान् पिढ्या त्यांचाच वापर व्हायचा. सामान्यपणें वाणीउदमी भरंवशाचे. यामुळें फारशी फसगत व्हायची नाहीं.

दूध-तेल हे पदार्थ मोजायचीं मापें म्हणजे निरनिराळ्या आकारांचीं भांडीं असायचीं. तींही कमीजास्त आकाराचीं. सामान्यपणें तेलासाठीं छटाक हें प्रमाण वापरलें जाई. हा छटाकही शेराचा सोळावा हिस्सा. दूध पावशेरानें मोजलें जायचें.

धान्याच्या बाबतींत निरनिराळ्या भागांत निरनिराळीं मापें. प्रतच लावायची झाली तर चिपटें हें सगळ्यांत लहान माप. मापटें त्याहून दुप्पट. पुढें मग अधोली, पायली, आठकी, कुडव, मण, खंडी असें धान्यांचें माप व्हायचें. कुडव हें संस्कृत नांव. एका मापाचें संस्कृत नांव प्रस्थ. एक चतुर्थांश प्रस्थ म्हणजे कुडव. संस्कृत कुडव म्हणजे बारा मुठी. एक प्रस्थ म्हणजे बत्तीस पळें. मात्र कुडवाचा मराठी अर्थ विस्तार पावून तो मोठा झाला आहे. निळवें अन् कोळवें अशींही कुठें कुठें मापांचीं दोन नांवें रूढ. अधोलींतही निरनिराळ्या भागांत फरक आढळायचा.

कापडाचीं मापें अंगुळ, तसू, वीत, हात आणि गज. कापडें या मापांनीं मापलीं अन् ओळखलीं जायचीं. जसें नवगजी नांवाचें एक पागोटें. तें नऊ गज असायचें लुगडीं अठरा हात. पंचाची लांबी बहुधा तीन ते चार हात. आणि धोतरें नऊ हात असायचीं.

जमिनीचें सगळ्यांत लहान माप म्हणजे काठी. ही पुरुषभर उंच असायची. काठीहून मोठा ' पांड '. वीस चौरस काठ्या आकाराचा. पांडाहून मोठा एकर. अन् दीड एकराचा बिघा. भागांबरहुकूम हें माप थोडें अरतेंपरतें व्हायचें व कुठें कुठें बिघ्यांतल्या एकरांची संख्या दोन-अडीचही व्हायची.

आंबे शेंकड्यांनीं मोजले जायचे. हा शेंकडा फाड्यांचा असायचा. एका फाड्यांत सहा आंबे. एका शेंकड्यांत एकशें छत्तीस आंबे. जसजशी आंब्यांची सुबत्ता, तसतशी शेंकड्यांतली आंब्यांची संख्याही वाढायची.

लांकडें मण आणि खंडीनें मोजलीं जायचीं, तर कडबा पाचुंद्यानें. एक

पाचुंदा म्हणजे पांच पेंढ्या.

नाणीं बरोबर वागविण्यासाठीं ‘ कसे ’ असायचे. हे ‘ कसे ’ कमरेला बांधायचे. वेळीं नाणीं भरलेला ‘ कसा ’ हा शस्त्र म्हणूनहि उपयोगी पडायचा. त्याचा एक तडाखा खाऊन तयार बैलसुद्धां वांकायचा. अशीं हीं नाणीं. हीं घरांत ठेवायचीं. गाडग्यांमधून किंवा तांब्यांमधून. बरींच असलीं म्हणजे घागरींत सांठवायचीं. आजही कुण्या भाग्यवंताला पडिक जमिनी लागवडीस आणीत असतां नांगराच्या फाळांस अडखळून एखादी नाण्यांनीं भरलेली घागर सांपडते. फार जुनीं घरें पाडीत असतांही क्वचित् कुठें नाण्यांची घागर किंवा हंडा सांपडतो.

जातां जातां इथेंच सांगून टाकावयास हवें, कीं तेलें बहुधा बुधल्यांतून सांठवायचीं. अत्तरेंही. हे लहानमोठे बुधले चामड्याचें केलेले असायचे.

✤ ✤ ✤

# आहार आणि आरोग्य—

महाराष्ट्र देश विषम प्रकृतीचा. नाना भागांत नाना धान्यें. नाना ठिकाणीं नाना प्रकारचीं हवामानें. तेव्हां मग खाण्यांतही बदल व्हायचे.

कोंकणांत तांदूळ हें मुख्य अन्न. भात तांदळाचा, भाकरीही तांदळाची. क्वचित् जोडीला नागलीची भाकरी. भातांत तांदळाच्या जोडीला वरी आणि सावा वापरला जायचा. कालवणादाखल तुरीच्या डाळीची, वालाच्या डाळिंब्यांची अशी आमटी. परसांत पिकणाऱ्या पालेभाज्या. कोकमीचें सार. ओल्या नारळाचें दूध घातलेलें. तसेंच नामांकित गोमंतकीय खतखतें. शेतकऱ्यांच्या खाण्यांत मासळी, बोंबील, सुकट. क्वचित् कोंबडीचीं अंडीं.

पक्वान्नें म्हणजे मुख्यतः मोदक. कारण तांदूळ आणि नारळ भरपूर. ओल्या नारळाचे उकडीचे मोदक म्हणजे त्यांतल्या त्यांत विशेष. क्वचित् उंडेऱ्यांची खीर. फणसांचीं सांदणेंही व्हायचीं. क्वचित् पुरणपोळ्याही. मात्र त्या नारळाच्या दुधाबरोबर खाल्ल्या जायच्या. तांदळाची खीर, तीही नारळाच्या दुधांत. कारण गाई-म्हशींचें दूध जेमतेम अच्छेर-पावशेर निघायचें.

घाटांवर ज्वारीची गरम भाकरी, अन् कांद्याचें बेसन म्हणजे मेजवानी. कांदा हा तर जणूं शेतकऱ्याचा सखा जिवलग. चविष्ट, किंचित् तिखट आणि थोडासा वातूळ. कांद्याच्या जोडीला असायचा आरोग्यवर्धक, उष्ण आणि वातनाशक लसूण. घाटावर पुरणाच्या पोळीचा फार प्रघात. बरोबर गुळवणी असायचें. लग्नांत तेलच्या व्हायच्या. जोडीला गुळवणी. वांग्याची तिखटजाळ भाजी.

घाटावरला आवडता मांसाहार म्हणजे बकऱ्याचें मांस. क्वचित् मेंढरूंहि कापलें जायचें. त्याचें 'बरबट' म्हणजे अपूर्व योग. हें तिखटजाळ असायचें. भुरक्यागणिक पाण्याचा घोट घ्यावा लागायचा. बरबटांत असायच्या तोडलेल्या नळ्या. त्या चोखायच्या. आंतला मांसल भाग ओढून घ्यायचा आणि नळ्या टाकून द्यायच्या. हा मांसल भाग अत्यंत पुष्टिवर्धक अशी समजूत. एक नळी = शंभर पुरणपोळ्या असा हिशेब !

ज्वारीच्या जोडीला अगदीं कधींमधीं भात असायचा. सणाला कणकीच्या पोळ्या. भर्जी, मुळावांग्याची भाजी, शेंगदाण्याचें पिठलें. याला कचित् 'म्हाद्या' म्हणायचें, क्वचित् 'झुणझुणें' !

फलटण आणि माणदेश यांची ख्याति अशी, कीं हे ढाल-तरवारीचे मुलूख. ढाल म्हणजे खोल तव्यांतली कसदार ज्वारीची भाकरी अन् तरवार म्हणजे भली सपाटी तांबडी मिरची. कुण्याही ओढ्याच्या कांठाला बसलें, पाठीवरलें गठुळें सोडलें, मिरचीचे तुकडे तोंडीत असल्या दोन-तीन भाकऱ्या हाणल्या, पार घशाशीं येईस्तोंवर ओढ्याचें पाणी प्यालें, भली रुंद पल्लेदार ढेकर दिली, कीं झाला गडी तयार. जोडीला एखादा कांदा असला तर बहुत उत्तम. बुक्कीनं फोडायचा अन् दोन-तीन घासांत पार करायचा. कांदाही चांगला सणसणीत हवा. उगीच चिंगळ्या उपयोगाच्या नाहींत. त्या कुणीकडे खबदाडींत जाऊन बसतील, कळायचेंसुद्धां नाहीं.

नगर जिल्ह्यांतून वर सरावें तर काळी कृष्णा बाजरी भेटते. बाजरीची शिळी भाकरी फारच खुसखुशीत. दूधगूळ घालून खावी. एक अपूर्व मेजवानी. बरोबर तिळाचें किंवा लसणीचें तिखट असलें, तर अधिकस्य अधिक फलम् !

खानदेशांत उतरावें तर पुन्हा ज्वारीशीं गांठ पडते. भरीला तुरीचें वरण--दाट, चवदार. तापीकांठच्या काळ्याशार वांग्यांचें भरीत. भाकरीवर तुपाचा थर. असें हें श्रीमंत खाणें.

कधीं उत्सवांयात्रांमधून भलीं मोठीं शेणकुटांचीं जगरीं रचायचीं. कणीक नामाङ्किंत घट्ट मळून तिचे भले थोरलाले रोडगे करायचे. तंवर जगरावर एका डेगचींत तुरीची डाळ शिजूं लावायची. तिच्या वाफेवर हे रोडगे उकडून घ्यायचे; अन् मग शेणकुटाच्या उगीर चेपून धेऊन त्यावर अरतून परतून भाजायचे. असे चांगले चेंडूसारखे फुगले म्हणजे ते उलतात.

सगळे भाजून होईतोंवर उगीर विझायला येतो. उरते केवळ दमदार उष्णता. मग सगळा उगीर एका बाजूला काढायचा. त्या जागीं रोडगे नीट रचायचे; अन् ते उगीराच्या वाफेनें भाजून काढायचे. मग वर ठेवायचा भला थोरला वाडगा. त्यांत चांगलें साजुक कणीदार तूप.

तंवर एखादी वांग्याबिंग्याची भाजी करायची. आपली उगीच शपथ घ्यायला. मग रोडगे बाहेर काढायचे. फुंकायचे. झाडायचे. अन् तुपांत चुपचुपीत बुडवायचे. डाळ घोटून घ्यायची. मग उघड्या आकाशाखालीं पडायच्या पत्रावळी. दोन-दोन रोडगे. घट्ट दाट वरण. भाजीचा ठिपका, कीं पुंडलीकवरदे !

वऱ्हाडांत या रोडग्यांचा आकार थोडा बारीक व्हायचा. बाकी सगळी पद्धत हीच. मात्र इकडे तेल वापरलें जायचें जवसाचें. पांढरी शुभ्र मोगरी चमेलीच्या फुलाइतकी शुभ्र ज्वारीची भाकरी. घनदाट वरण. वर हिरोती–तांबड्या मिरचीचा भुरका अन् जवसाचें तेल. जमला बेत.

नागपूरकडे पुन्हा तांदळाच्या प्रांतांत प्रवेश. मग इकडे भाज्याभात किंवा वडाभाताचें महत्त्व. पांढऱ्या भातावर दळदार वडे घ्यायचे. उडदाचे, मुगाचे, हरभऱ्याच्या डाळीचे. ते कुसकरायचे; अन् वर ओतायचें कडकडीत तेल !

मराठवाड्यांत फार मोठ्या जेवणावळींत व्हायची खीर. खीर म्हणजे एक गहूं दोन जागीं करायचा. असा हा भरडा भल्या थोरल्या काहिलींत उकडायचा. मग आंत घालायचा गूळ. मोठमोठ्या डेगऱ्यांमधून करायची कढी. ताक मिळालें तर त्याची. न मिळालें तर हरभऱ्याच्या पिठाची. चिंच लावून. मग पंक्ति उठायच्या.

एक कोंकण सोडून गव्हाचा वापर सर्वत्र. पण तो सर्टी सहामासींच. सणांउत्सवांपुरताच. रोज गव्हाची पोळी शेतकऱ्याला परवडायची नाहीं. असा हा महाराष्ट्राचा आहार ठोकळमानानें. समाजांतल्या थरांपरत्वें जसजसें वर चढावें तसतसे चवणे वाढत जायचे. पण आहाराची बैठक मात्र हीच.

एकूण महाराष्ट्राचा आहार निरोगी. त्यामुळें आरोग्यही बरेंच म्हणायचें. महाराष्ट्रिक माणूस हा चणीनें ठेंगणा, रूपानेंही साधारणच.

एकूण रंगरूप तसें फार वाईट नव्हे, पण अपूर्वही नव्हे. एकदां झालें काय, कीं छत्रपति शाहूंनीं कुण्या एका सरदाराला 'दोन बटकिणी' बाया, चांगल्या, देखण्या, नाचावयाजोग्या पाठवून देण्यास सांगितलें. तो सरदार लिहितो, 'इकडील माणूस काळेंरीस, खुबसुरत बटकिणी मिळत नाहींत!'

मात्र याला अपवाद कोंकणच्या दक्षिण भागाचा, विशेषतः गोमंतकाचा. तो देश सौंदर्यासाठीं प्रसिद्ध म्हणायचा. तिकडील माणूस गोरें, घारें, देखणें. तर सातारा जिल्ह्यांत कृष्णा-वेरळांच्या खोऱ्यांत माणसाची उंची थोडी अधिक. नाकीं-डोळीं थोडा नीटसपणा. पण रंग काळ्या आईचाच.

असें महाराष्ट्रिक माणूस चणीनें लहान असलें, तरी श्रमांना मागें सरायचें नाहीं. हवा सामान्यपणें निरोगी. बंगालसारखा हिंवताप या जमिनींत मुरलेला नाहीं. केरळसारखा हत्तीपाय नाहीं. उष्ण प्रदेशांत महारोगाचें प्रमाण मात्र थोडें अधिक.

खेड्यापाड्यांतून व्यायामशाळा, आखाडे, तालमी हें बहुधा असायचें मारुतीच्या राउळाशेजारीं. खोल हौद्यांत कधींकाळींची तांबडमाती पडलेली असायची. तेल अन् ताक प्यालेली. त्या मातींत गांवचीं पोरेंटोरें आणि जवान एकमेकांशीं लोंबीझोंबी करीत असायचे. झट्या घ्यायचे. धोबीपछाड अन् हरिणफास करायचे. डावाला प्रतिडाव. पेचाला तोड. अशी माती या झट्या घेणारांच्या पायांनीं दणादणा कुटली जायची. मग ती फावड्यानें खणायची. मोकळी करायची. एकदां वर्षांतून केव्हां तरी, कुठून तरी तांबडी माती मिळवायची. गाड्या वाजत गाजत यायच्या. बरोबर शिंगें, कर्णे, तुताऱ्या, डफळीं, कडीं असा धुमाकूळ धुमाकूळ चालायचा.

या हौद्याच्या बाहेर जोर काढायचे. लांकडी हत्तीवर पैलवानें घुमत असायचीं. तो घुमत्कार साऱ्या तालमींत कोंदाटायचा. शेजारीं असायचा मलखांब. त्याशीं पोरें झट्या घेत असायचीं. अंग वांकवीत असायचीं. वेतासारखीं. शरीर उलटें तिलटें फेकीत वर जायचीं. मलखांब दोन्ही पटांत धरून चुंई आवाज करीत पांखरासारखीं खालीं यायचीं. उलटीं. वानरासारखी उडी मारून पाय पट्टदिशीं जमिनीवर टेकायचीं. शेजारीं असायचीं करेलें किंवा मुद्गलें. रुंदट छात्यांचे पैलवान मारे श्वास टाकीत तीं करेलें

पल्याभोंवतीं पेलीत असायचे. शेजारीं दहा-पांच पोरें एका ओळीनें

बैठका मारीत असायचीं. लोहाराच्या भात्यासारखे फसाफसा आवाज टाकीत, दोन्ही हात नीट लयींत आगेंमागें फिरवीत.

बहुधा प्रत्येक तालमीसमोर दगडी गोळ्या पडलेल्या असायच्या. भल्या थोरल्या. वेंगेंत मावतील एवढ्या आकाराच्या. रिशीचे पैलवान हे गोळे उचलायचे, खांद्यावर घ्यायचे. अन् मागें सोडून द्यायचे. त्या गोळ्यांच्या पडण्यानें जमीन दण्ण दण्ण चेपली जायची.

गांवोगांव यात्रा भरायच्या. उरूस भरायचे. मग त्या उरुसांत व्हायच्या कुस्त्या. भला मोठा फड पडायचा कर्डी वाजत असायचीं, शिंगेंही. अगोदर रेवड्यावारी पोराटोरांच्या कुस्त्या व्हायच्या. मग चार-आठ आण्यांवर जरा थोराड पोरें उठायचीं. तंवर भिंतीएवढाल्या छातीचे पैलवान आखाड्याचा अंदाज घेत गपगार बसलेले असायचे. हळूंहळूं बक्षिसांची संख्या वाढत जायची. रिंगणभर कुस्त्या सुरू असायच्या. कुणी एखादा शेलाटा गडी, विजेच्या चपळाईनें समोरच्या गड्याला टांगेवर चीत करायचा. आखाडाभर या तांबूस विजा लखलखत असायच्या. एखादी जोडी मात्र म्हशीसारखी शिंगांत शिंगं अडकवल्यासारखी पडून असायची.

तंवर नारायण खालीं जायचा.हवेंत गारठा सुटायचा. मग उठायचे तालेवार पैलवान. इनाम वांटणाऱ्याच्या बासनांतून बाहेर निघायचीं भलीं थोरलालीं कलाबूत विणलेलीं पागोटीं. मोठमोठालीं इनामें जाहीर व्हायचीं. उगा हत्तीसारखें अवसान दाखवीत हे पैलवान आखाडाभर हिंडायचे. बहुधा यांना जोड मिळायची नाहींच. मग दाटूनसुटून कोणाला तरी पैलवानाचे चार डाव पहाण्यासाठीं उठवलें जायचें. धोतरें लपेटून. पैलवान लंगोट कसायचे. जांघे चढवायचे. चार-सहा बैठका मारून हीं वस्त्रें अंगासरशीं करून घ्यायचे. अन् मग सारा भंवताल आपल्या शड्डूनें दणाणून टाकीत अन् माजल्या बैलांसारखे एकमेकांच्या अंगावर माती उडवीत एकमेकांशीं भिडायचे. चार-दोन लखलखीत डाव व्हायचे. तोंवर पंचमंडळी अन् म्हातारे ‘ उस्ताज ’ धांवायचे. कुस्ती बरोबरीनें सुटायची. मग डोईस कोरीं करकरीत, खळीचा वास येणारीं पागोटीं गुंडाळून पैलवान नुसत्याच लुंग्या गुंडाळून घरोघरीं परतायचे.

कुस्ती हा महाराष्ट्राचा राष्ट्रीय खेळ. तो त्यानें वर्षोन् वर्षे जोपासला आहे. या खेळाचा त्याला अभिमान आहे.

दुसरा महाराष्ट्राचा खेळ 'हुतूतू'. बहुधा खेड्यागणिक गांवाबाहेर पाट्या पडलेल्या असायच्या. अन् पोरें हुतूतू घालीत पाट्यांमधून शिरायचीं. एकमेकांच्या पाठींत कणके घालायचीं, मरायचीं, बाद व्हायचीं, अन् पुन्हा जिवंत व्हायचीं. अशी रात्र संपायची, पण खेळ संपायचा नाहीं.

आटापाट्यांवर महाराष्ट्राचा फार लोभ. पाट्यांमधून लोणकरी चित्त्या-सारखें चकरा मारीत असायचें. पोरें पाट्यांत घुसत असायचीं. पाटी धरणाऱ्याला चुकवून, चकमे देऊन पलीकडल्या पाटींत शिरत असायचीं. एकमेकांवर लोणें चढवीत असायचीं.

असाच विटीदांडू गांवोगांव खेळला जायचा. विटीदांडूच्या 'वकट, लेंड, मूंड, नाल' या कर्नाटकी नांवांवरून असें अनुमान निघालें, कीं हा खेळ महाराष्ट्रानें कर्नाटकापासून उचलला.

शिवाय मग खोखो, हमामा, हुंबरी, लगोऱ्या, सुरपारंबी, पतंग, गोट्या, यांचेंही महाराष्ट्राला वेड आहे. कुठें कुठें—गोदातटीं एका गांवीं अन् पंढरपूरला गांवच्या दोन पक्षांत दारूच्या बाणांची अन् कवठांची मारामारी-सुद्धां व्हायची. असे सारेच खेळ मैदानी, वीरश्रीनें रसरसलेले. ज्यायोगें शरीर हट्टकट्टें बनेल असे.

हे झाले पुरुषांचे खेळ. स्त्रिया लहानपणीं अगदीं पारांपर्यंत जाऊन खेळत असायच्या. भल्या भल्या बाप्यांवर डाफरत असायच्या. तशा महाराष्ट्राच्या मुली इतर प्रांतांपरीस निर्भय आणि थोडक्या आडदांडच.

कडुसें पडेतोंवेरी त्यांचे काय काय खेळ सुरू असायचे. आंधळी कोशिंबीर, शिवाशिवी, लपाछुपी, लंगडी, ठिकऱ्या, ताकातुंबा, फुगड्या, झिम्मा, बस फुगडी, दंड फुगडी, कोंबडा अशा नाना परी. लग्नें होऊन त्या सासुरवाशिणी झाल्या, कीं मग मंगळागौरीच्या निमित्तानें एकत्र जमायच्या. तिथें हे नाना परीचे खेळ चालायचे. अशा रात्रीं उजडवायच्या.

खेड्यांतून नागपंचमीचा सण आला कीं अगोदर महिना पंधरा दिवस गल्ल्या अन् आळ्या पोरींच्या फेरांनीं अन् पकव्यांनीं दणाणायच्या. नाग-

पंचमीच्या दिवशीं या साऱ्या वारुळें पुजायला जायच्या, अन् मग हा खेळ संपायचा.

अर्थ असा, कीं सारें वर्ष असें हंसतां खेळतां जायचें. शेतांत कष्टतां अन् दमतां जायचें. सौंगणी करतां अन् गवतांचीं ओझीं वाहतां जायचें. आजारी पडण्यापुरता वेळ कुणाजवळ असायचाच नाहीं.

अन् बारके सारके आजार झाले, तर घरोघरीं आजीबाईचे बटवे असायचे. झालें तर सुंठ, गवती चहाचा काढा. ताप आला तर प्राजक्ताच्या कोंवळ्या पानांचा किंवा खारकेच्या गंधाचा विडा. हगवण लागली, तर बिब्याचीं शेवतें द्यायचीं, आलें लिंबू द्यायचें. आंव झाली, तर कुड्याचें पाळ. अपचनावर शेंदेलोण--पादेलोणाची चिमटी. अवरोध झाला, तर त्रिफळाचूर्ण किंवा सोनामुखीचा काढा. गळवांवर गुलबशीचें पान किंवा रुईचा चीक. भाजल्यावर शाई किंवा चुन्याची निवळ अन् तेल. उष्णतेवर निंबाचा पाला रामबाण. खोकल्यावर अडुळसा. लचकलें मुरडलें, तर त्यावर शेक-भाज. बिब्याच्या फुल्या. सांबरशिंग आणि आंबेहळद किंवा रक्त-चंदन यांचा लेप. खरजेवर उंडिणी, निंबोळ्यांचें कडु तेल. डोकेंदुखीवर सुंठीचा ओढा.

अशीं नाना रोगांवर नाना गांवठी औषधें. या औषधांनीं गुण नच आला, तर मग देवदेवस्कीकडे तरी वळायचें किंवा वैद्याकडे तरी पळायचें. वैद्याचेही उपाय हरले, तर मग शेवटीं —

‘ औषधं जान्हवीतोयं वैद्यो नारायणो हरिः । ’

✦ ✦ ✦

## दिनचर्या—

तशी दिनचर्या तर भारतभर सामान्यपणें सारखीच, पण प्रत्येक प्रांताची आपापली एक निराळी छाप तिच्यावर उमटलेली असायची. तसेंच महाराष्ट्राचें. महाराष्ट्रांतील खेडीं—तीं जागीं व्हायचीं जात्यांच्या घरघराटांनीं. अलिकडे हा घरघराट लोपत चालला. पिठाच्या चक्क्यांनीं त्याचा ग्रास केला. पण महाराष्ट्राच्या अंतर्भागांत अजूनही हा घरघराट कुठें कुठें जीव धरून बसला आहे. त्याच्या ध्वनींत मिसळायची कोंबड्यांचीं आरवणीं, अन् भरीला दळणाऱ्या बायांच्या ओव्या. या ओव्या दळतां दळतांच रचल्या जायच्या. त्यासाठीं फारसें पांडित्य करायचें काय! बिचाऱ्यांचीं धडुतें फाटकीं असायचीं. घरांच्या छपरांना अठरा भोकें. पण एकदां त्या बाया जात्यावर बसल्या अन् त्यांच्या मनाचा ताबा जात्यांच्या घरघरीनें घेतला, कीं मग त्या वास्तवांतुन उठायच्या. स्वप्नभूमींत पोंचायच्या, मग त्या म्हणायच्या—

वाटऽच्या वाटसरा काय पाहतोसी खेड्याला ?
सोन्याचीं कऊलं माज्या बंदूच्या वाड्याला !

या नशेंत मग पायलीच्या पायली दाणे संपायचे. पांढरें, मऊसूत पीठ जात्यांमधून भुरूभुरू गळायचें.

त्या खेड्यांत मशीद असली तर मग या स्वरांत मिसळायची मुजावराची बांग. मग पांखरें उठायचीं. तीं किलकिलायला लागायचीं.

तंवर कुण्या पांडुरंगाच्या राउळांत भूपाळ्या सुरू असायच्या—

उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां,
झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा !

कुणी निष्ठावान् वारकरी असला, तर तो एकटाच वीणा नि चिपळ्या घेऊन बसायचा. श्रद्धेनें ओला होऊन तो त्याच्या विठुरायाला आळवीत असायचा—

जोडोनिया कर चरणीं ठेविला माथा
परिसावी विनंती माझी पंढरिनाथा
असो नसो भाव आलों तुझिया ठाया
कृपादृष्टीं पाहें मजकडे पंढरिराया

कुणी म्हातारी आजीबाई पहाटेस काखेंत लुगडें अन् हातीं तांब्याचा तांब्या, असें घेऊन स्नानाला निघायची. नदी असली, तर नदीवर. ओढ्यावर. गांवांतल्या सार्वजनिक विहिरीवर. तिचें सुरू असायचें—

उठोनिया प्रातःकाळीं वदनीं वदा चन्द्रमौळी
बिन्दुमाधवाजवळीं स्नान करा गंगेचें

आंघोळ झाल्यावर म्हातारी परतायची. कुणाच्या दारींचा पारिजात बहरलेला असायचा. पहाटच्या सुगंधी वेळीं एकेक एकेक फूल टपटपत असायचें. कुणाच्या दारींच्या मोगरीवर कळ्या फुललेल्या असायच्या. मग म्हातारी घरीं परततां वेळीं त्यांतलीं फुलें वेंचायचीं.

हिंवाळ्याचे दिवस असले, तर हा वेळपर्यंत रस्त्यांरस्त्यांवर शेकोट्या पेटलेल्या असायच्या. एरवीं घरोघरचीं गुरें सुटून रस्त्यांवर उभीं राहायचीं. पाठी लववून आळस द्यायचीं. एकमेकांना ढुसत असायचीं.

तंवर गांवढें जागें व्हायचें. नारायण हातभर वर येतो, तंवर घरीं कुणी सांपडायचें नाहीं. जो तो आपापल्या कामीं लागायचा. औतकरी औतांवर जायचे. गुराखी गुरें घेऊन. धनगर मेंढरांचे कळप घेऊन रानभर पसरायचे. कारूनारू आपापल्या कामीं लागायचे. घरोघरीं न्याहारीसाठीं भाकरी बडवल्या जायच्या.

कोंकणांत कांहीं गांवें किरिस्तावांचीं. तिथें पहाटेस इगर्जींत—गिरिजा-घरांत घण्टा घणघणायला लागायच्या. एरवींचें असो, पण रविवारीं मात्र

पहाटपासून सगळ्या इगर्ज्या नटूनथटून आलेल्या आल्फ्रेड्स्नीं अन् ॲन्स्नीं गजबजून जायच्या. सगळीं कशीं शांत. गंभीर.

दिवसभर खेडीं बहुधा मोकळीं असायचीं. कुणी बापया घरीं आढळायचा नाहीं. उन्हांत तापत, पावसांत भिजत, हिंवानें कांकडत अशीं हीं खेडीं माणसांची वाट बघत असायचीं.

संध्याकाळ व्हायची–हळूं हळूं उन्हें उतरायचीं. मग खेडें पुनः गजबजायचें. धूळ उधळवीत गुरें घरीं परतायचीं. दुधें निघायचीं. जरा मोकळेंचाकळें, ऐसपैस आवाजांत बोलत जेवणें उराकायचीं. या खेडुतांच्या आवाजांच्या पट्टया जरा चढ्याच लागलेल्या असायच्या. खर्जांत बोलणें यांना जमायचेंच नाहीं. मग तें कौतुकाचें असो, रागाचें असो.

घरोघरीं दिवे लागायचे. शाळेंत जाणारीं पोरें परवाचे म्हणायला लागायचीं. त्यांतच भर पडायची 'शुभं करोति कल्याणम्'ची. असा कोल्हाळ कोल्हाळ व्हायचा. कुठें कुठें त्यांतच मिसळायचे रामरक्षांचे अन् 'प्रणम्य शिरसा देवं'चे स्वर.

कुठें कुठें घरोघर व्हायच्या आरत्या. 'सुखकर्ता दुखहर्ता' पासून जें आरत्यांचें कळित्र सुरू व्हायचें, तें थांबायचें 'घालीन लोटांगण' झाल्यावर. अगदीं क्वचित् 'यज्ञेन यज्ञमजयन्त देवा'चे स्वरही घुमायचे. अशी ही सांस्कृतिक संध्याकाळ संपायची.

मग उजाडायची रात्र. अक्षरशः उजाडायची. रावळांमधून सुरू व्हायचे टाळमृदुंगांचे घोष. आणि तक्क्ये अन् पार जागायचे ढोलकीं-तुणतुण्यांच्या आवाजांनीं. उंच, धारदार स्वरांत लावण्या म्हटल्या जायच्या—

चन्द्र गणपतीसी हंसला
शनी विक्रमासी आला
भगें पडलीं त्या इन्द्राला
थट्टेच्या मुळें
असली थट्टा काय कामाची
लेक नव्हे मी तुझ्या मामाची
कवि पठ्ठे बापुरावाची
आगगाडी पळे

मध्यरात्र उलटून जायची, अन् मग हें संपायचें. ढोलकीं अन् मृदुंग उतरायचे. वीणे खोळीमध्यें जाऊन बसायचे. हळूं हळूं नीज सगळ्यांना आपल्या कुशींत घ्यायची. मग रात्रीं खेडें जायचें जागल्या अन् कुत्र्यांच्या ताब्यांत. जागल्याच्या हळ्या. अन् कुत्र्यांचें भुंकणें.

अलीकडे खेड्यांतली व्यवस्था मोडूं पाहात आहे. सारींच खेडीं रिकामीं होऊन शहरांकडे पळूं लागलीं आहेत. या दिनचर्येंतही बदल होऊं लागला आहे. मात्र अजून तो बदल नेटका जम धरून बसला नाहीं.

✤ ✤ ✤

# कांहीं उत्सव : कांहीं सण—

उत्सवांचे प्रकार दोन. व्यक्तिविषयक आणि सामूहिक. पैकीं अगोदर व्यक्तिविषयक उत्सवांकडे वळावें.

ब्राह्मणांत, सोनारांत, पांचकळश्यांत, परभांत आणि क्वचित् क्षत्रियांत मुंजी व्हायच्या. त्या दिवशीं होमहवनें व्हायचीं, पोरांचीं डोकीं भादरलीं जायचीं. गाईच्या खुराएवढ्या शेंड्या ठेवायच्या. पोरांना लंगोट्या लावायच्या. अन् जानवीं घालायचीं. या दिवसापासून पोरांनीं गायत्री मंत्राचा जप करायचा. तेजाची उपासना करायची. संध्या करायचा अधिकार त्यांना या दिवसापासून प्राप्त व्हायचा.

व्यक्तीच्या जीवनांतला दुसरा मोठा उत्सव म्हणजे लग्नाचा. पूर्वीं लग्नांची बयाद फार मोठी असायची. सामान्य घरीं देखील पांचपंचवीस गाड्या वऱ्हाड जमायचें. बहुधा लग्न मुलीच्या घरीं व्हायचें. मग या बैलांची वैरणकाडी, पेंड, भूस पाहतां पाहतां वधूपिता टेकीस यायचा. एवढ्यानें भागलें नाहीं. मुलीबरोबर हुंडा द्यावा लागायचा. अगदीं क्वचित् कुण्या जमातींत मुलीचा पैका घरीं यायचा.

अन् मग वऱ्हाड्यांची रुसणींफुगणीं, मानमरातब, तोंडधुणीं, पायधुणीं, करवल्यांचे मानपान, वरमाईचे, वराच्या बहिणींचे, काक्यांचे, माम्यांचे, असें सगळें होतां होतां चार दिवस धुमाकूळ संपून एकदांची वरात गांव सोडून गेली, म्हणजे आठ दिवस वधूपिता अगदीं दुखणें येऊन पडायचाच. हे चारी दिवस लग्नघरीं अगदीं अन्नकोट असायचा. शेवटीं एक गांवजेवण व्हायचें. बोलावण्यावरून भांडणें निघायचीं. रुसणींफुगणीं. असें लग्न म्हणजे एक छोटेंसें महाभारतच !

जसा आनंद लग्नाचा, तसाच विषाद मृत्यूचा. मृत्यूनंतर बहुधा सगळीं महाराष्ट्रिकांचीं प्रेतें जाळलीं जायचीं. अगदीं क्वचित् तीं पुरायचीं. जळालेल्यांच्या अस्थि नाशिक, आळंदी अशा पुण्यक्षेत्रीं पवित्र नद्यांतून विसर्जित केल्या जायच्या. मग सुरू व्हायचें दिवसवारें. शेतकऱ्यांत या दिवसां-श्राद्धांचेंही मोठें प्रस्थ. आधींच माणूस गमावल्यामुळें घरधणी हैराण असायचा. त्यांत हा दिवसवाऱ्याचा खर्च. या दिवसवाऱ्यापायीं कर्जें होऊन कुटुंबेंच्या कुटुंबें अक्षरशः धुळीस मिळालीं. शेतें गेलीं, पोतें गेलीं, घरें गेलीं, वाडे गेले, आणि शेवटीं हातीं आली तीन भोकांची करंटी.

आणिक एक वैयक्तिक उत्सव म्हणजे मावंदीं. माणसें यात्रांना जायचीं. नाना यात्रांना. त्यांत महाराष्ट्राबाहेरच्या यात्रा म्हटल्या, कीं त्यांना विशेष महत्त्व. पूर्वीं आगगाड्या नव्हत्या. मोटारी नव्हत्या. धड प्रशस्त मार्गही नव्हते. होते त्या ओबडधोबड मार्गांवर नाना प्रकारचे अडथळे. कुठें मैलो-मैल पाणी मिळायचें नाहीं. कुठें वाट एवढी अवघड असायची, कीं संडें माणूस जातां जातांच दम कंठाशीं घोटाळायचा. मग त्यांतून सामानसुमान अन् लबेदा कसा जायचा ? कुठें दरोडेखोराचें भय, कुठें परचक्राचें. भरीला भर म्हणून रोगराईही वाट अडवून उभी असायची. औषधांची व्यवस्था जेमतेमच.

मग अशा स्थितींत कुणीं काशी-प्रयागची यात्रा करून आलें, तर त्यानें मोठी धारच मारली म्हणायची ! गणपति पाण्यांत घालून ठेवलेले असायचे. घरीं राहिल्या माणसांनीं यात्रेकरू सुरक्षित यावा, म्हणून नाना व्रतें करायचीं, वैकल्यें करायचीं. अन् तो सुरक्षित परतला, कीं केवढा आनंद ! केवढा उत्साह ! साऱ्या दशक्रोशींतले नातलग भेटायला यायचे. चहूं अंगांनीं आलिंगन द्यायचे. तो यात्रेकरू कधीं कधीं एक एक बात सव्वा सव्वा हात करून सांगायचा. त्या गोष्टी आश्चर्यभरानें तोंडें विस्फारून सगळे जण ऐकत रहायचे. म्हणायचे, असें कुणी झालें नाहीं ! एवढें कुणीं केलें नाहीं !

मग सत्यनारायणाच्या पूजा व्हायच्या. तोही एक मोठा सोहळाच. साधु वाण्याची नौका बुडायची. सत्यनारायणाचा प्रसाद भक्षण केल्यावर ती वर यायची. एक संकेत असा, कीं सत्यनारायणाच्या पूजेचें निमंत्रण मिळालेंच पाहिजे, असा आग्रह नसावा. तें न मिळालें तरी प्रसादाला जावें !

कुणी सत्यनारायणाच्या जोडीला सत्यविनायक करायचे. त्याचाही सोहळाच. कुणी सोळा सोमवारचें व्रत करायचे. शेवटीं गांवजेवणें घालायचीं. असे हे नाना प्रकारचे सोहाळे अन् व्रतें व्यक्तींपुरतीं मर्यादित असायचीं.

अन् सामूहिक उत्सवांना तर वाणच नाहीं. ते जे वर्षप्रतिपदेपासून सुरू व्हायचे, ते फाल्गुन उलटून जाईपर्यंत. नाना भागांत नाना सणांना महत्त्व. जसें कोंकणांत गौरी-गणपतीचा अन् होळीचा सण म्हणजे अपूर्वाई.

तंवर भातें आकाराला आलेलीं असायचीं. चोंढ्यामधून चालावें, तर मांड्यांना लोंबटें घासायचीं. चहूंकडे असें हिरवें वैभव पसरलें असायचें अन् त्याच दिवसांत यायचे गौरी-गणपति !

मग काय ! कोंकण्यांच्या अंगीं उत्साहाचा अवसर भरायचा ! फुलांच्या वेण्या माळून लेकीबाळी सजायच्या. ढोलगीं बडवून बडवून अन् चाळ बांधलेले पाय धरतीवर आपटून आपटून बापये सारे कडे जिवंत करायचे. या दिवसांत कोंकणांत कुणाला जाग्रणांचा त्रास होतच नाहीं कीं काय कोण जाणे ! कुठेंही, अगदीं बंबाळ रानांत गेलें, तरी ढोलाच्या आवाजांच्या अन् चाळांच्या छुमछुमीच्या लहरी वाऱ्यावर तरंगत यायच्या.

जी गत गौरी-गणपतींची, तीच होळीची. या दिवसांत सामान्यपणें माणसें मोकळीं असायचीं. औतकाठीचा उद्योग मागें फारसा असायचा नाहीं. मग पोरेंटोरें घरोघर लांकडें अन् गवऱ्या गोळा करीत हिंडायचीं. साऱ्या गांवची होळी एका जागीं. खोतानें शंख करून होळी पेटवली, कीं सारा गांव तिच्याभोंवतीं नाचत असायचा. सातमायची पालखी निघायची. होळीभोंवतीं तिच्या प्रदक्षिणा व्हायच्या. सामान्यपणें शुद्धीवर कुणी नसायचाच. मग कुणी कुणाच्या नांवानें ‘अल्याड गंगा पल्याड गंगा’ म्हणून शंख केला, तर कुणीं फारसें मनावर घ्यायचें नाहीं. हा कोल्हाळ रंग-पंचमीपर्यंत सुरू असायचा.

गोमंतकांत तर उत्सवांना पारावार नाहीं. प्रत्येक देवळाचा उत्सव गाजायचा. अन् नाटकाचा शोक गोमंतकासारखा कुणीं केलाच नाहीं. सारा देशच जणूं एक देखणी रंगभूमि !

जें महत्त्व कोंकणांत या सणांना, तेंच घाटांवर गुढीपाडव्याला, दसऱ्याला

अन् दिवाळीला. पाडव्याच्या दिवशीं घरोघरीं तोरणें उभारायचीं. त्यांच्यावर हलवायाकडल्या साखरी गाठ्या टांगायच्या. वर घरीं असलेंच तर एखादें रुप्याचें भांडें चढवायचें.

लिंबाला या दिवशीं फार महत्त्व. या झाडाला नुकती पालवी फुटून गेलेली असायची. कोवळीं लुसलुशीत, किंचित् तांबूस पानें वसंताच्या वाऱ्याबरोबर झुलत असायचीं. मग तीं काढून आणायचीं. क्वचित् त्यांच्या-बरोबर मिरीं, साखर, असें वांटायचें. अन् मग थोरापोरांनीं या दिवशीं निंब भक्षण करायचा. या रूपानें जणूं वर्षभराच्या रोगराईला शपथच घालायची.

प्रत्येक माणूस ग्रामदेवतेच्या दर्शनाला जाऊन यायचा. एखादें ग्राम-दैवत जागृत म्हणून पंचक्रोशींत प्रसिद्ध. कुणाला साप चावला, अन् तें माणूस या देवळांत आणून जागें ठेवलें, कीं सहसा गमवायचें नाहीं. मग पाडव्याच्या दिवशीं या देवतांच्या जत्रा भरायच्या. त्यांत कुस्त्यांचे हमामे व्हायचे. पोरेंटोरें पाळण्यावर बसायचीं. भिरभिरीं घ्यायचीं. मातीचीं खेळणीं घ्यायचीं. सुनालेकी नटूनथटून त्या बाजारांतून गळ्यांतले मणी अन् आरसे खरेदी करीत हिंडायच्या. बैलांच्या टकरी व्हायच्या, अन् मनस्वी धूळ उधळायची.

दसरा हा तर अत्यंत महत्त्वाचा सण. तंवर पावसाळा उलगायला यायचा. चहूंकडले पितें पाणी निवळायला यायचें. चिखल हडकायचे. बारा वाटा वाहूं लागायच्या.

मग मराठ्यांचीं तट्टें फुरफुरूं लागायचीं. शेतकामेंही उरकलेलीं असायचीं. आतां राहिली ती कापणी-सवंगणी घरच्या माणसांनीं करावी. मराठे आपापल्या तट्टांवर जिनें कसायचे. खोगिरें घालायचे. तरवारी पाजवायचे. अन् मग त्यांच्या तुकड्या आपापल्या सरदारांच्या गांवीं गोळा व्हायच्या. हे सरदार तीं फुरफुरतीं पलटणें घेऊन पुणें-साताऱ्यास जाऊन मुजरे करायचे. तंवर खलबतें शिजलेलीं असायचीं. बेत तयार झालेले असायचे. मग गहाजणें झडायचीं अन् दसऱ्याच्या मुहूर्तावर मराठी फौजेनें प्रस्थान ठेवायचें !

सध्यां ही मोहिमांची मौज गेली. उरला आहे त्या प्रस्थानाचा अवशेष. दसऱ्याच्या दिवशीं नवीं कांबरुणें घालून अन् थाटमाट करून गांवाबाहेर

जायचें. तिथें शमी, आपटा, ज्वारी-बाजरीचीं पिवळीं धमक ताटें, यांपैकीं जें हातीं लागेल तें लुटायचें अन् गांवांत येऊन घरोघरीं जाऊन तें सोनें वांटायचें.

दिवाळी महाराष्ट्रभर साजरी व्हायची. तसा तर हा उत्सव सुरू व्हायचा वसूबारशीपासून अन् चालायचा भाऊबिजेपर्यंत. इतका मोठा अन् प्रत्येक दिवसाचें आपापल्या परीनें महत्त्व असलेला सण हा एवढाच. वसूबारस, धनत्रयोदशी, नर्कचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा अन् यमद्वितीया— प्रत्येक दिवसाची एकेक कथा. आपापल्या परीनें अपूर्व. निरनिराळ्या पौराणिक संदर्भांशीं संबंध असलेली. कुठें कशाचें महत्त्व—कुठें कशाचें.

तेव्हां मग या सणांत महाराष्ट्राचा उत्साह आपल्या साऱ्या वैभवानिशीं उचंबळून आला तर नवल नाहीं.

विदर्भांत पोळ्याचें फार मोठें महत्त्व. बैल म्हणजे वऱ्हाडी शेतकऱ्याचा जीव कीं प्राण. बैलाला खाऊं घालावें वऱ्हाडी शेतकऱ्यानेंच. अन् मग पटांतून धावडवितांना त्याच्या पाठींतून रक्ताच्या वाव वाव चिळकांड्याही उडवाव्यात वऱ्हाडी शेतकऱ्यानेंच. टोंकदार खिळा असलेली आरी, हा जणूं वऱ्हाडाला मिळालेला एक शापच आहे.

तर या पोळ्याच्या दिवशीं वऱ्हाडी शेतकऱ्याचें बैलाविषयींचें हें प्रेम जणूं उतास जातें. त्याला नाना परींनीं नटवायचें, सजवायचें, त्याच्या शिंगांना शेंब्या, त्यावर रेशमी गोंडे. कपाळावर माथोटया. गळ्यांत घुंगरें, पायांत तोडे. पाठीवर रंगीबेरंगी, देखण्या, कलाबतूचें अन् रेशमी काम केलेल्या झुली. त्या दिवशीं त्यांना पुरणाची पोळी. संध्याकाळीं शिंगें अन् तुताऱ्या लावून, डफडीं वाजवीत, मशालींनिशीं त्यांच्या मिरवणुका, असा थाट थाट व्हायचा.

मराठवाड्यांत आषाढी-कार्तिकी एकादश्यांचें महत्त्व फार मोठें. बहुधा साराच मराठवाडा कोण्या कोण्या संप्रदायाचा अनुयायी. तेव्हां मग व्रतें, वैकल्यें, अनुष्ठानें, हरिनामसत्ते, भजनें, कीर्तनें असें सारखें सतत सुरू असायचें. तीच गत शिवरात्रीची. मराठवाड्यांत तीन ज्योतिर्लिंगें. तेव्हां मग शिवरात्रीचें व्रतही मराठवाड्यांत बळिवंतच !

संक्रांतिचा सण महाराष्ट्रांत सगळीकडे साजरा व्हायचा. संक्रांतीच्या

भोगीस तीळ लावून केलेली बाजरीची भाकरी, खिचडी, तीवर लोणकढें तूप, असा धुंधुरमासाचा बेत बहुधा महाराष्ट्रभर गाजायचा.

याशिवाय रामजन्म, हनुमानजन्म, गोकुळाष्टमी, ज्ञानेश्वरजयंती, दासनवमी, तुकारामबीज अन् नाथषष्ठी हेही सण महाराष्ट्रांत कमीअधिक प्रमाणांत सगळीकडेच गाजत असायचे.

गणेशोत्सवाला तर महाराष्ट्रकरांत प्रतिष्ठा लाभली. तो सुरू केला बाळ गंगाधरांनीं. कांहीं राजकीय हेतु मनीं धरून. आतां त्याचें स्वरूप बदललें, पण उत्साह मात्र पूर्वींचाच. तोच थाटमाट. तोच दिमाख. सगळें तेंच.

भरीला नवरात्र, वटपौर्णिमा, चैत्रगौरी अशा स्त्रियांच्या कांहीं सणांचा उल्लेख केला, कीं महाराष्ट्रांतल्या उत्सवांची ही यादी पुरी झालीच म्हणायची. एरव्हीं तर सारा महाराष्ट्रच उत्सवप्रिय. प्रत्येक उगवला दिवस हा आपआपल्या परीनें एक उत्सवच !

✤ ✤ ✤

## संत आणि संप्रदाय—

महाराष्ट्रांत तीर्थें, क्षेत्रें तर बहुतच. इथला प्रत्येक ओढा म्हणजे गंगा. प्रत्येक धोंडा हें दैवत. तेव्हां अशीं ठायीं ठायीं क्षेत्रें निर्माण झालेलीं. त्यांत भर पडली धारातीर्थांचीं.

महाराष्ट्रांतला प्रत्येक धोंडा एकेका रोमहर्षक समरप्रसंगाचा साक्षी. त्याला जर कधीं काळीं जिभा फुटल्या, तर तो जें सांगेल, तें ऐकून प्रेतें उठतील. कबंधें जिवंत होतील. षंढांच्या अंगीं वारें भरेल ! असा सांस्कृतिक आणि समरतीर्थांचा महाराष्ट्रांत अपूर्व योग घडून आला आहे.

तीर्थें किती म्हणून सांगावींत !

नाशिकचे रामराय. त्र्यंबकचे शंभु महादेव. पंढरीचा पांडुरंग. कोल्हापूरची अंबाबाई. तुळजापूर अन् प्रतापगडाचीही. औंधची यमाई. डोंगरावरला ज्योतिबा. वाडी अन् औदुंबरचे श्रीगुरु. चिंचवडचे मोरया गोसावी. पुळ्याचे गणपति. जेजुरीचे खंडेराय—

पण या अवघ्या दैवतांहून आगळा महिमा प्राप्त झाला संतांनीं आणि महंतांनीं पुनीत केलेल्या क्षेत्रांस ! तो देश पवित्र. तें कुळ पुण्यवंत. तेथींचें जल, वृक्ष, वल्ली, वनचरें, सारें सारेंच पवित्र !

महाराष्ट्र ही पुण्यभूमि. पंडितांची आणि शास्त्र्यांची, विद्वानांची आणि धर्माचार्यांची. पैठण हें फार मोठें धर्मपीठ. पांडित्यानें त्रैलोक्य ढवळून टाकीत असलेलें. असेंच एक धर्मपीठ कऱ्हाड. कोल्हापूर, नाशिक, त्र्यंबक.

पण इथें केवळ शास्त्रचर्चा होत होती. धर्मवचनांचे कीस पाडले जात होते. श्रुतिवचनांवर वाद झडत होते. प्रातर्विधीसाठीं पश्चिमेकडे जावें कीं

उत्तरेकडे, असे वाद होत होते. हा धर्म सामान्यांपासून दूर दूर सरत होता. त्यांना वाळीत टाकीत होता. स्त्रीशूद्रांस अस्पृश्य मानीत होता. बाह्य धर्माचारांचा बडेजाव माजवीत होता. दंभाला आश्रय देत होता. असा तो विटत चालला होता. त्याचा रंग कळकट होत होता. वरच्या खपल्या उडूं पहात होत्या. व्रतें आणि वैकल्यें करून शास्त्री-पंडित हीं छकलें जुळवायचा प्रयत्न करीत होते, पण अशा प्रयत्नांनीं तो सांधणार नव्हता.

मग या देशांत प्रवेशला एक चक्रधर. त्यानें या कर्मठ आचारांविरुद्ध बंडाचें पहिलें निशाण रोवलें. मात्र त्याच्यामागें त्याच्या कार्याचें महत्त्व कुणीं जोखलेंच नाहीं. त्याचें अभयाचें तत्त्वज्ञान काळ्या वस्त्रांत गुंडाळलें गेलें. आणि ‘ सकळा ’ लिपींत गुरफटून त्याचीही दुर्दशा दुर्दशाच झाली. पुन्हा हें किलकिलें झालेलें महाद्वार साध्याभोळ्यांसाठीं बंद झालें.

अन् मग उजाडलें शकाचें तेरावें शतक. हें शतक पुन्हा सोन्याचें होऊन आलें. त्यानें एका संन्याशाच्या पोटीं एक बाळ जन्मलेलें पाहिलें. एक नव्हे, चार.

या बाळांनीं काय नाहीं सोसलें ? सर्व कांहीं सोसलें. अपवाद, छळ, निंदा, उपहास, कुचाळकी. पण हें सर्व विष पचवून ज्ञानोबा पुन्हा देवाचिये द्वारीं जाऊन उभा राहिला. आपल्या नम्र, पण निश्चयी व्रतसाधनेनें त्यानें देवाचें दार पुन्हा एकदां सर्वांसाठीं खुलें केलें. आंत कल्लोळत असलेला, भिंतीवर धडका देत असलेला, कुचंबत असलेला तत्त्वज्ञानाचा प्रवाह त्यानें बाहेर आणला. मग त्याचे पाट त्यानें शेतकऱ्यांच्या शेतांशेतांमधून झुळझुळूं दिले. अवघ्या अवघ्यांना दिलासा लाभला.

नाना वर्णांचे, नाना जातींचे, नाना वयांचे स्त्री आणि पुरुष त्याच्या-भंवतीं गोळा झाले. कुणीं कुणास जात विचारली नाहीं. गोत विचारलें नाहीं. अवघे त्या हरिरंगणीं पायीं चाळ बांधून नाचूं लागले. ज्ञानोबानें लिहिलेली ज्ञानेश्वरी अवघ्यांच्या मनीं-मुखीं वागूं लागली. दहापर्यंत अंक एक वेळ मोजतां येत नसतील. स्वतःचें नांव एक वेळ लिहितां येत नसेल. सरकारी कागूद आला, तर त्यांतलें एक अक्षर कांहीं कळत नसेल. पण ज्ञानेश्वरींतल्या चार ओव्या येत नाहींत अगर तुकारामबावांचे चार अभंग पाठ नाहींत, असा माणूस कांहीं गेल्या पिढीपर्यंत महाराष्ट्रांत सांपडला

नसता. महाराष्ट्राच्या लेखीं ज्ञानेश्वरी आणि गाथेचें प्राकृतपण हरपलें. त्या झाल्या वेद आणि श्रुती !

ज्ञानेश्वरांच्या भोंवतीं गोळा झाले शिंपीयाचा नामा, नामयाची जनी, तेरढोकीचा गोरा कुंभार, अरणभेंडीचा सावता माळी, मंगळवेढ्याचा चोखा महार, पंढरीचा नरहरी सोनार. असे हे एक एकाहून अतुर्बळी वैष्णव वीर पंढरीच्या वाळवंटांत एकत्र झाले. त्यांनीं कलिकाळाशीं झुंज घेतली. सारें महाराष्ट्रमंडळ परकीय सत्तांच्या चपेट्यांनीं डळमळत होतें. तें त्यांनीं स्थिर केलें. साऱ्यांच्या मनीं असा विश्वास उदेजला कीं, छे छे ! चिंता करायचें कांहींच कारण नाहीं. अजूनही ईश्वर जागा आहे !

हाच ध्वज हातीं घेऊन धावत पुढें चालला पैठणचा एका. त्यानें तर पार लांबपर्यंत पल्ला गांठला. रूपकें रचून त्यानें संतांचें वैष्णवी तत्त्वज्ञान पार शूद्र-निषादांपर्यंत पोंचविलें. कोल्हाटी, डोंबारी, भुत्या, वाघ्या, गोपाळ, अडबंग, वेसकर, मांग, जागल्या, गारुडी, हबशी, फकीर, दरवेशी, नानक संप्रदायी अशा अवघ्या अवघ्यांच्या भाषांत जनार्दनाच्या एक्यानें भागवतधर्म गायिला.

ज्ञानोबाच्या काळापेक्षां एकनाथाचा काळ अधिक डळमळीत होता. लोकांच्या मनींचा धीर अधिकच सुटला होता. बायाबापड्यांना त्राय उरली नव्हती. साऱ्या महाराष्ट्राचें तुरकाण होणार कीं काय, असें भय वाटूं लागलें होतें.

अशा वेळीं उभा राहिला एकनाथ. त्यानें भर चौकांत उभें राहून तुर्कांना सांगितलें—

थिजलें विघुरलें तूप एक । तैसें सगुण निर्गुण एकत्र देख । तुम्ही प्रतिमेचा करितां द्वेष । परम मूर्ख अविवेकी ॥ पांच वख्त खुदाचे झाले । बाकी वख्त काय चोरीं नेलें । तुमचें शास्त्र तुम्ही भुलले । देवासि केलें एकदेशीं ॥ आम्हासी म्हणतां पूजितां फत्तरें । तुम्ही का मुड्द्यावर ठेवितां चिरे । दगडाचे पूजितां हाजी रे । पीर खरे ते माना ॥ केवळ जें कां मेले मढें । त्याचीं जतन करितां हाडें । फूल गलेफ फत्तरावरी चढे । ऊद पुढें तुम्ही जाळा ॥

एवढा निर्भय; एवढा स्पष्टवक्ता संत एखादाच झाला असेल. यावनी

राजवटीचा अगदीं भर सुरू असतां जनार्दनाचा एका भर चौकांत उभें राहून असें बोलला ! धन्य त्याची. त्यानें हें निर्भयपण ज्ञानेश्वरांपासून उचललें. ती माऊली ' अभयं सत्त्वसंशुद्धिः ' असें प्रवचन करीत होती. नामा गर्जून गर्जून सांगत होता, कीं ज्ञानदेवी श्रेष्ठ ग्रंथ आहे, ' एक तरी ओवी अनुभवावी ! ' नाथांनीं तें खरें करून दाखविलें.

नंतर महाराष्ट्राच्या चिद्गगनांत तुकारूप चंद्र उगवला ! त्याच वेळीं शिवनेरीच्या उदयाचलावर एक तान्हेलें सूर्यबिंब उदयास येत होतें. एक लहानगा सावधान म्हणतांक्षणीं लग्नाच्या बोहोल्यावरून विश्वाची चिंता करण्यासाठीं पळाला होता. असें हें त्रिदळ एकवटलें.

जशी तुकारामबावांची भक्ति सोन्याच्या कसाची, त्यांचें वैराग्य यज्ञाग्नी-सारखें, तशी त्यांची वाणी तळपत्या तरवारीसारखी. श्रीहरीला आर्तस्वरांत आळविणारे तुकोबा. लोकांच्या दुःखानें दुःखी होणारे तुकोबा. त्यांच्या हितासाठीं झुरणारे तुकोबा. मेणाहून मऊ मन असलेले तुकोबा. सकळ जीवांचे कृपाळू असलेले तुकोबा—

असे हे तुकोबा जेव्हां कठोर होत, तेव्हां त्यांच्या शब्दांच्या आघातांनीं वज्र फुटूं पाहे ! अत्यंत तीक्ष्ण शब्दांत ते अनाचाराची, दौर्बल्याची, कृपणपणाची, ढोंगाची निंदा करीत. कधीं कधीं चिडून ते म्हणत,—

" काय करूं देवा सत्ता नाहीं हातीं । दंडोनी पुढती वाटे लावूं ॥"

कधीं कधीं चिडून ते दुर्जनांना चरचरीत डागण्या द्यायलासुद्धां तयार होत. म्हणत—

' तुका म्हणे लासूं फासूं देऊं डाव । सुखाचा उपाव पुढें आहे ॥ '

असा चहूं बाजूंनीं बावांनीं परमार्थाचा डंका पिटला. उदो गाजविला. ज्ञानोबापासून चालत आलेलें भागवतधर्माचें निशाण अधिकच उंच केलें. साधी सोपी भाषा. किंचित् रांगडी, पण जाऊन अंतःकरणाला भिडणारी. कधीं कधीं त्याला घरें पाडणारी. प्रत्येक शब्द अनुभूतीचा-रसानें थबथबलेला. असे हे बावांचे अभंग वाऱ्याच्या लहरींबरोबर देशभर पसरले.

ज्ञानोबा-नामदेवांनीं पंढरीच्या वाळवंटांत वैष्णवांची मांदी मेळविली होती वारकरी संप्रदायाची गंगा वाहविली होती. ज्ञानोबांनीं वारकरी पंथाला दिली होती अमृतसंजीवनी. त्यामुळें तो वटवृक्ष चहूं दिशांस

पृथ्वीपासून आकाशावेरीं असा उभावतच चालला.

'निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई । एकनाथ नामदेव तुकाराम !'

हे त्या संप्रदायाचे ऋषि. यांचे अभंग, या श्रुतिस्मृति. असा बळिवंत संप्रदाय महाराष्ट्रांत दुसरा झाला नाहीं.

वारकरी मंडळींनीं चालविली विठ्ठलाची भक्ति आणि प्रेमाची उपासना. समर्थांनीं प्राण ओतला श्रीरामाच्या उपासनेंत. चापधारी रामाची उपासना त्यांनीं जोपासली—

'धीर्धरा धीर्धरा तकवा, हडबडूं गडबडूं नका ।'

अशी आरोळी या ब्रह्मपिशानें घातली. कुबडींतही तरवार वागवितां येते, हें यांनीं पुन्हा एकदां सिद्ध केलें. हनुमन्ताची उपासना जागविली. सारें महाराष्ट्रमंडळ हनुमंताच्या मूर्तींनीं सुशोभित केलें. असा हा लंगोटी-बहादूर—

'समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ॥'

असा आल्हख जागवीत देशभर फिरला. महाराष्ट्रमंडळाची नीज त्यानें नाहींशी केली. वृक्षवल्लींत चैतन्य ओतलें. धारकऱ्यांचा संप्रदाय निर्माण केला. शिवरायांचें गुरुपद शोभविलें आणि चहूंकडे स्नानसंध्या करायास उदंड पाणी झालें, असा समाधानाचा निःश्वास टाकला !

इकडे चिंचवडीं मोरया गोसाव्यांनीं विघ्नहर्त्याची उपासना चालविली होती. गणराज हा विघ्नांचा स्वामी, सारीं अतुर्बळी विघ्नें त्यांच्या सोंडेच्या संकेताबरहुकूम लवत असलेलीं. अशा विनायकाची उपासना त्यांनीं चालविली होती. पाटगांवचे मौनी बावा श्रीहरीच्या उपासनेंत मग्न होते. इकडे श्रीगोंद्यास शेख महंमद नामा अविंध गोविंदाच्या स्मरणानें गदगदून जात होता. तो म्हणत होता,

'शेख महंमद अविंध असला म्हणून काय झालें ? त्याच्या हृदयीं तरीं गोविंदच नांदतो आहे ना ? नारळ वरुता कठिण असतो, पण अंतरा जीवन कल्लोळत असतें. फणस वरून दिसायला खडबडीत. पण त्याच्या उदरांत अमृताचे पेटे असतात. तसें शेख महंमदाचें झालें !'

समर्थांच्या भोंवतीं जयरामस्वामी, आनंदस्वामी, असें स्वामिचतुष्टय

गोळा झालें होतें. हें चतुष्टय आपापल्या परीनें गदळें निवारून भक्तीचा उदो गाजवीत होतें.

अशी कुठें श्रीरामाची उपासना. कुठें महादेवाची. कुठें श्रीविठ्ठलाची. कुठें विघ्नहर्त्या गजाननाची. कुठें आदिमाया जगदंबेची. कुठें रामवरदायिनीची. कुठें महिषासुरमर्दिनीची. अशीं अवघीं दैवतें भक्तमंडळींनीं चहूं दिशांस जागविलीं होतीं.

तुकारामबावांचे शिष्य निळोबा, बहिणाबाई. बावांचे टाळकरी रामेश्वरभट, संताजी जगनाडे, शिवजी कासार, मवाळ, महाजन. समर्थांचे शिष्य कल्याण, दिवाकर गोसावी, अक्का, वेणूबाई. अशी बहुत बहुत मंडळी संप्रदाय जागवीत होती. त्याला उधाण। आणीत होती. ज्ञानेश्वरांपासून लागलेली भक्तीची तार सूतभरदेखील उतरली नव्हती.

ज्ञानेश्वरी व नाथांचें भागवत, तुकोबाची गाथा, समर्थांचा दासबोध हे चारी महाराष्ट्राचे वेद. हे महाराष्ट्राचे धर्मग्रंथ. केव्हां कुठें कसें वागावें, हें पाहण्यासाठीं महाराष्ट्र या ग्रंथांचीं पानें चाळूं लागला. हे वेद अवघ्यांच्या मुखीं झाले—स्त्री-शूद्रांच्या देखील !

✤ ✤ ✤

## महाराष्ट्राचें साहित्य—

प्राकृत साहित्य हें महाराष्ट्राचें साहित्य. संस्कृत साहित्य हें देशाचें. त्यावर अवघ्या भारताचें स्वामित्व. पण खास महाराष्ट्राच्या अशा कांहीं रीतींपैकीं वैदर्भी रीतीचा आदर तर कालिदासानेंही केला. कविकुलतन्मणि भवभूति आणि राजशेखर महाराष्ट्राच्या गगनमंडळीं चमकून गेले. विज्ञानेश्वराचा धर्मशास्त्रांत केवढा अधिकार! त्यानें याज्ञवल्क्य-स्मृतीवर मिताक्षरा टीका लिहिली. बोपदेवानें लिहिलें भागवत—ज्यावर तिकडे वंगभूमींतील भागवत संप्रदायाची रचना झाली. अपरार्क, हेमाद्रि, कमलाकरभट्ट यांसारख्या दिग्गजांनीं धर्मशास्त्राचा प्रांत उजाळून टाकला. असें हें संस्कृत भाषेचें वैभव या पंडितांनीं दिगंतास नेलें.

तरी महाराष्ट्राला कौतुक या धर्मग्रंथांपेक्षांही गाथासप्तशतीचें अधिक. प्राकृतांतला तो ग्रंथराज म्हणजे साहित्याकाशांतला एक अत्यंत तेजस्वी ताराच आहे. आहे तर कांहींसा सूचक, शृंगारिक, पण इतर विषय किती नाना परींचे. नद्या, पर्वत, वनें-उपवनें, पशु, पक्षी, प्राणी, देव, देवता, देवालयें, दिव्यें, व्रतें, विवाह, धर्मपंथ, ग्रामीण आणि नागरी जीवन, आहार, विहार, मद्यपान, खेळ, सण, उत्सव, वेशभूषा, अलंकार, आरोग्य, शिकार, शेती, महाराष्ट्राचें आर्थिक जीवन—

छे छे! असे उल्लेख किती किती म्हणून करावेत! सहज जातां जातां गाथाकारांनीं ज्या विषयांचा उल्लेख केला, त्या विषयांची संख्या अगणित आहे. तत्कालीन महाराष्ट्राची इतकी सुसंबद्ध सांस्कृतिक माहिती देणारा ग्रंथ दुसरा झालाच नाहीं. आणि ही माहितीही अशी सहज जातां जातां!

यत्किंचितही कृत्रिमपणा नाहीं.

आतां काकबलीचें हें उदाहरण पहा—

पासासंकी काओ णेच्छदि दिण्णं पि पहिअघरणीए ।
ओअन्तकरअलोगलिअवलअमज्झठिअं पिण्डम् ॥

पति प्रवासाला गेल्यामुळें कृश झालेली गृहिणी काकबलि ठेवण्यासाठीं खालीं वाकली, तेव्हां तिच्या हातांतली बांगडी गळून पिंडाभोंवतीं पडली. हा फांस असावा, अशा शंकेनें कावळा पिंडाला स्पर्श करीत नाहीं !

कसें देखणें लालित्य पदांपदांतून डोकावतें आहे !

यानंतर मात्र प्राकृतचा ओघ मायबोली मराठीच्या दिशेनें वळूं लागला. पहिला उपलब्ध मराठी शिलालेख श्रवणबेळगोल्याचा. तिथें एका टेकडीवर बाहुबली गोमटेश्वराची सत्तावन फूट उंच भली सुबक मूर्ति. मुद्रेवरून बाल्याचें तेज निथळत असलेलें. तिच्या डाव्या पायाच्या बाजूला आदिम मराठी शिलालेख खोदला गेला—

श्रीचावुंडरायें करवीयलें
श्रीगंगराजें सुत्तालें करवीयलें

शुद्ध नागरींत खोदलेला शिलालेख इ. सन ९८३ च्या सुमाराचा हा सर्वप्रथम शिलालेख. तिथपासून मग मराठी साहित्याची गंगोत्री पावसाळ्यांतल्या नदीप्रमाणें वाहूं लागली.

बहुधा मराठींतली सगळी प्राचीन रचना छंदोबद्ध. एक तर ती ओवीरूपांत किंवा अभंगरूपांत. कांहीं रचना वृत्तबद्ध आणि आर्याबद्ध. पण त्या अलिकडल्या.

त्या प्रवाहाचे प्रवर्तक नाथपंथी श्रीगोरक्ष. 'अमरनाथसंवाद' आणि 'गोरक्षगीता' हे त्यांचे दोन उपलब्ध ग्रंथ. योगाचें तत्त्वज्ञान सांगणारे.

पण मराठी साहित्याला खरा बहर आला मुकुंदराजाच्या विवेकसिंधूच्या रूपानें. पल्लव फुटले ते महानुभावांच्या नाना ग्रंथांच्या मिषानें. 'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिस्थळ'. पैकीं लीळाचरित्र लिहिलें महींद्रव्यासांनीं. भास्कर कवीश्वराचार्यांची उद्धवगीता. हयग्रीवव्यासाचें गद्यराजस्तोत्र. महदाइसेचे धवळे ही पहिल्या मराठी स्त्री कवयित्रीची रचना. भावनोत्कट आणि रसमयी मराठी भाषेचें तें एक अपूर्व लेणें. असाच एक रसाळ ग्रंथ म्हणजे

नरेंद्र अयाचिताचा 'रुक्मिणीस्वयंवर' रुक्मिणीचा विरह, तिच्यावर सख्यांनीं चालवलेले उपचार, वसंताचीं वर्णनें, द्वारकेचें वैभव–सारें सारें कवीनें कसें लख्ख वर्णिलें आहे. आणिक एक रसोत्कट काव्य म्हणजे भास्करभट्ट बोरीकरांचें 'शिशुपालवध.'

मात्र मराठी साहित्याची ही गंगा अगदीं दुथडी भरून वाहूं लागली ज्ञानेश्वरीपासून. असा अलौकिक ग्रंथ तर दुसरा झालाच नाहीं. आज सातशें वर्षें झालीं तरी त्या ग्रंथाशेजारीं फटकेल, जवळीक करील, असाही ग्रंथ मराठींत लिहिला गेला नाहीं. ज्ञानेश्वरीचें सारेंच अद्वितीय. भाषा कशी ? तर साच आणि सवाळ. शब्दलाघव कसें ? तर मितुलें आणि रसाळ. आणि शब्दकला तर अमृताच्या कल्लोळासारखी. अर्थ बोलाची वाट पहात असलेला. एका अभिप्रायांतून दुसरा अभिप्राय सहजच अवतरत असलेला. बुद्धीवर भावपुष्पांची पखरण होत असलेली. किंबहुना ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ ज्ञानेश्वरीच, असें म्हणावें आणि उगा बसावें !

ज्ञानेश्वरींत रसोत्कटतेची अशी परिसीमा गांठलेली, तर 'अनुभवामृत' हा वेदान्तदेवतेच्या गळ्यांतला तन्मणि ! तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें असा सार-धर्मग्रंथ, असें अपूर्व लेणें मराठीनें तर पाहिलें नाहींच, पण देववाणी संस्कृतनेंही पाहिलें असेल कीं नाहीं, याविषयीं शंकाच आहे !

जशी ज्ञानेश्वरांची 'चांगदेवपासष्टी' श्रीमंत, तसेच त्यांचे अभंगही गर्भ-श्रीमंत. विशेषतः त्यांच्या विरहिणी—

घनु वाजे घुणघुणा वारा वाहे रुणझुणा
भवतारकु हा कान्हा वेगीं भेटवा कीं ॥
चांदु वो चांदणें चापे वो चंदने
देवकीनंदनेंवीण नावडे वो ॥
चंदनाची चोळी माझें सर्व अंग पोळी
कान्हो वनमाळी वेगीं भेटवा का ॥

अशी रसमयी आणि कोमलकान्तपदावलीमय भाषा ज्ञानेश्वरांनींच लिहावी !

ज्ञानदेवांच्याच काळीं शिंपीयाचा नामा एकान्तभक्त होऊन गेला. ज्ञानेश्वरांचा हा अभिन्न मित्र. यानें बहुत बहुत अभंग लिहिले. विशेष म्हणजे

शीखांच्या गुरुग्रंथसाहेबांतही या नामयाचे कांहीं अभंग लिपिबद्ध केले गेले !

नामयाची जनी, मुक्ताबाई, निवृत्ति, सोपान, चांगदेव, चोखामेळा, सावंता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी अशा अवघ्या संत-मंडळींनीं जी ग्रंथरचना केली, तीं या मोगरीच्या वेलाचीं दुग्धधवल फुलेंच म्हणायचीं.

मध्यंतरीं नृसिंह सरस्वतींच्या काळीं महाराष्ट्रसंस्कृतीस हात दिला दत्त-संप्रदायानें. 'गुरुचरित्र' हा सरस्वती गंगाधरांचा त्रेपन्न अध्यायी ग्रंथ याच काळांत लिहिला गेला. गीतार्णवकार दासोपंत हे याच काळांतले. 'गीतार्णव' हा अक्षरशः अर्णवच—साहित्याचा समुद्रच आहे. एवढा मोठा ग्रंथ मराठींत दुसरा नाहीं.

यानंतर मराठीच्या आकाशांत उगवला आणिक एक चंद्र. पैठणचा एकनाथ. एकनाथांचे अभंग प्रसिद्ध. 'एकनाथी भागवत' प्रसिद्ध. मात्र त्यांच्या 'भावार्थ रामायणा'कडे सामान्यपणें दुर्लक्षच झालें. कौतुकाची गोष्ट अशी कीं, ज्या काळांत एकनाथांनीं हें रामायण लिहिलें, त्याच काळांत बंगाल, द्रविड देश आणि उत्तराखंड या तिन्ही देशांत तीन रामायणें लिहिलीं गेलीं. नाथांच्या रामायणांतील राक्षसांना दाढी-मिशा आहेत ! याचें मर्म काय तें जाणत्यांनीं ओळखावें !

कां कोण जाणे, पण रुक्मिणीस्वयंवरावर या कवींचें फार प्रेम. एकनाथांनींही ' रुक्मिणीस्वयंवर ' लिहिलें.

मध्यंतरीं दोन ख्रिश्चन ग्रंथांचा उल्लेख इथेंच करायला हवा. पैकीं पहिलें फादर स्टीफन्स यांचें 'ख्रिस्तपुराण' आणि फादर क्रुवा यांचें 'पीटरपुराण.'

नंतर ज्याचा ठसठशीत उल्लेख करायला हवा, असा कवि म्हणजे एकनाथांचा नातू मुक्तेश्वर. काव्याचे पाठ याला खुद्द आजोबांच्या मांडीवर बसूनच मिळाले. मुक्तेश्वरांचा मुख्य आणि रसगर्भ ग्रंथ म्हणजे त्याचें भारत. रसाची उत्कटता, कल्पनांचें चातुर्य, भाषेचा ओलावा, नाना प्रसंगांचीं उत्कट वर्णनें, हें सर्व पहातां मराठी आख्यानकाव्यांत मुक्तेश्वरांचें भारत केवळ अजोडच आहे !

देहूच्या तुकोबाचें वर्णन काय करावें ! या ' शूद्र ' कवीची गाथा केवळ हिंदूंतच नव्हे तर किरिस्तावांतसुद्धां परम मान्यता पावली. तुकोबांचा

एकेक स्फुट अभंग म्हणजे जणुं एकेक रत्नच. प्रसंगीं मेणाहून मऊ होणारी बावांची भाषा वेळ येतां क्षणीं तिखट तरवारीसारखी तीक्ष्ण बनते.

बावांना कवित्वाची स्फूर्ति मिळाली नामदेवापासून. त्यानें स्वप्नांत येऊन बावांना जागें केलें. सवें पांडुरंग होते. या दोघांकडून अभंग-लेखनाची स्फूर्ति मिळाल्यावर बावांची वाणी अमृत स्रवूं लागली. मध्यें कांहीं निषेधाचा आघात पडला. बावांचे हे अमृततुल्य अभंग इंद्रायणींत बुडवावेत, अशी आज्ञा सुटली. पण तुकोबांचा सखा पांडुरंग होता. बावांचे अभंग बुडालेच नाहींत. ते अभंगच राहिले. त्यांची संख्या जवळजवळ सव्वाचार हजार. प्रत्येक अभंग हें मराठी भाषेचें लेणें आहे.

बावांचे शिष्य निळोबा पिंपळनेरकर आणि बहिणाबाई. दोघांनींही अभंगरचना केली. पैकीं निळोबांची रचना, भाषा, सौंदर्य, सरसता या दृष्टींनीं अपूर्वच म्हणावी.

समर्थ रामदास हाही मराठी साहित्याच्या प्रांतांतला एक दिग्गजच म्हणायचा. 'दासबोध' ही त्यांची मुख्य रचना. मुख्यतः परमार्थपर. रामदासांसारखा परखड शब्दांत बोलणारा माणूस दुसरा झाला नाहीं. आपल्याला वाटतें, तें स्पष्ट शब्दांत सांगायचें. मग ते शब्द टुपले तरी चालतील. शब्दही रामदासांच्या वाणींतून मोठे खडखडीत उमटत. रचनेच्या ओघांत त्यांनीं व्याकरणाची चिंता फारशी केलीच नाहीं. वृत्तांचें दास्य फारसें पत्करलेंच नाहीं.

दासबोधाहून त्यांच्या इतर प्रसिद्ध रचना म्हणजे करुणाष्टकें, मनाचे श्लोक आणि स्फुट प्रकरणें. पैकीं पहिलीं दोन मोठीं भावपूर्ण आहेत. आणि स्फुट प्रकरणांत बागा कशा लावाव्यात, विटा कशा भाजाव्यात, इमारतकामावर माणसें कोणतीं लावावींत—इथपर्यंत वर्णन केलें आहे. इतका व्यवहारी कवि दुसरा झालाच नाहीं.

यानंतर नांव घेतलें पाहिजे वामन पंडितांचें. जोरदार भाषा, वकिली थाट, पाणी भरीत असलेलें पांडित्य, या गुणांमुळें वामन पंडितांची यथार्थ-दीपिका बरीच गाजली. मात्र तिच्यांत भावलालित्य अगदीं कमी ! वामनांची 'वंशी नादनटी तिला कटितटीं खोवोनि पोटींपटीं' अशी टी टी ची रचनाही उपलब्ध आहे. पण हिच्यांतसुद्धां भक्तीपेक्षां पांडित्याची खटपटच

फार. यांची श्लोकरचना अत्यंत नेटकी. म्हणच पडली, कीं सुश्लोक वामनाचा !

नंतर आख्यानकाव्यांच्या यादींत नांव घेतलें पाहिजे रघुनाथ पंडितांच्या नलदमयंतीस्वयंवराचें. हें आख्यान अत्यंत सरस. पाठ करायला अगदीं सोपें, रसाळ. त्यामुळें महाराष्ट्रांतील रसिकांच्या मुखीं हें सहजच जाऊन बसलें. 'न सोडी हा नल भूमिपाल मातें। असें जाणोनी हंस वदे त्यातें' असे हे रघुनाथ पंडितांचे सुश्लोक तर पोरासोरांच्या तोंडीं !

महीपति ताहराबादकरांच्या संतचरित्रांचा उल्लेख केलाच पाहिजे. श्रीधरांचीं हरिविजय, रामविजय यांसारखीं अगदीं सोप्या भाषेंत लिहिलेलीं आख्यानकाव्येंहि खूपच गाजलीं. तसेंच कृष्णदयार्णवांचें. करुणा, आर्तता, या गुणांनीं त्यांचा 'हरिवरदा' हा ग्रंथ सज्जनांमध्यें मान्यता पावला.

पेशवेकालीं कवि तर बहुतच झाले. पैकीं मध्वमुनि, अमृतराय, शिवदिनकेसरी यांच्या रचना अत्यंत रसाळ म्हणून त्या लोकप्रियही झाल्या. मग सविस्तर उल्लेख केला पाहिजे मोरोपंतांचा. आर्या तर केवळ मयूरपंतांची ! हें एकच वृत्त त्यांनीं इतक्या सफाईनें हाताळलें कीं पुसूं नये ! आर्यावृत्तांत त्यांनीं काय काय रचलें ? 'आर्याभारत' हा त्यांचा सर्वमान्य ग्रंथ. भाषा तर जणूं पंतांच्या समोर हात जोडून उभी असे. कधीं कधीं त्यांनीं तिला कान धरून वाकवलेंही. पांच-पांच सहा-सहा अक्षरांचीं यमकें जुळविण्याचा मोरोपंतांना मोठा छंद. मायबोली मराठीनें त्यांचा तो छंद पुरविलाही.

पंतांनीं रचलेलीं अनेक रामायणें, मंत्रभागवत, सावित्रीगीत, रुक्मिणीगीत, हीं तर प्रसिद्ध आहेतच. पण केकावली आणि संशयरत्नमाला यांतील हृदयाला जाऊन भिडणाऱ्या सरसतेमुळें हीं दोन्ही प्रकरणें फारच लोकप्रिय झालीं.

तंवर मराठीचा ओघ भक्तिकाव्याकडून पंडिती काव्याकडे वळला होता. यांतून एक फाटा फुटला होता शाहिरी वाङ्मयाचा. लखलखीत आणि तरवारीच्या धारेसारखें वाङ्मय. भावना उचंबळविणारें. छातीचे बंद तटातट तोडणारें. यांचा अग्रणी म्हणावा अज्ञानदास—

शूर मर्दांचा पोवाडा शूर मर्दानं ऐकावा !

असें म्हणून जेव्हां अज्ञानदासानें डफावर थाप मारली असेल, तेव्हां श्रोत्यांच्या भुजा कशा फडफडल्या असतील.

मात्र पेशवाईतील सुखसमृद्धीच्या काळांत याच प्रवाहाला आणिक एक फाटा फुटला शृंगारिक लावण्यांचा. या भागांत कडी केली, 'सुंदरा मनामधिं भरली' वाल्या रामजोशांनीं. त्यांच्या मागोमाग फडांत उतरले प्रभाकर, सगनभाऊ, होनाजी बाळा, परशुराम हे शाहीर. पैकीं होनाजी बाळाची 'घनश्याम सुंदरा श्रीधरा' ही भूपाळी सानथोरांच्या मुखीं जाऊन बसली.

शिवकाळीं राधामाधवविलासचंपू, पर्णालपर्वतग्रहणाख्यान, शिवभारत, राज्यव्यवहारकोश, अशी कांहीं संस्कृत रचनाही झाली. तिचाही उल्लेख महाराष्ट्रीय वाङ्मयांतच केला पाहिजे.

सभासदाची बखर, भाऊसाहेबांची बखर, अशा कांहीं उत्कट वर्णन केलेल्या गद्य बखरींचें नांव घेतलें, कीं हा साहित्यविषय पुरा झाला म्हणायचा. महाराष्ट्रांतील साहित्याची ही यादी नव्हे. हें आहे महाराष्ट्रांतल्या प्राचीन भाषाप्रभूंचें केवळ स्मरण. भावभक्तीनें केलेलें. सगळ्यांचें करायची गरज नाहीं. त्या त्या शाखांच्या आचार्यांचें केलें म्हणजे झालें.

✤ ✤ ✤

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
वि: ..................
अनुक्रम ...................... नों. दि. ..................
क्रमांक ......................

## कांहीं धुरेचे वीर—

सच्चं भण गोदावरि, पुव्वसमुद्देण साहि आसन्ती
सालाहणकुलसरिसं जइ ते कूले कुलं अत्थि ।

‘सांग पाहूं गोदावरी ! तुझ्या उगमापासून मुखापर्यंत सातवाहन कुलाइतकें एक तरी श्रेष्ठ कुल तूं पाहिलें आहेस काय ?’

हें तर खरेंच आहे. गोदावरीचा तट सातवाहनांनीं पुण्यजलानें प्रक्षाळला. त्यांच्यासारखे कीर्तिमंत, बुद्धिवंत, यशवंत, दानशूर राजे त्यांच्या कालांत तेच होऊन गेले. गौतमीपुत्र सातकर्णी याची तुलना तर छत्रपति शिवप्रभूंशीं केली जाते. दोघेही पराक्रमी आणि सदाचारी. धर्मावर अत्यंत निष्ठा असलेले. दोघांनींही मातृभूमीला परदास्यांतून मुक्त केलें. दोघांच्याही मनांत आपल्या मातेविषयीं निरतिशय आदर.

जवळ जवळ सव्वा दोन हजार वर्षें व्हायला आलीं. त्या वेळीं महाराष्ट्रावर मौर्य साम्राज्याची सत्ता होती. अशोकाच्या राज्यकारभारांत बौद्ध धर्माच्या मिषानें शक, हूण, इत्यादि परकीयांचा प्रवेश झाला होता. अशोकाच्या मृत्यूनंतर हे शक आणि हूण आपापलीं राज्यें निर्माण करूं पहात होते. अशा वेळीं गोदातटाकीं आंध्र सातवाहनांनीं महाराष्ट्र देश स्वतंत्र झाल्याचें घोषित केलें !

आंध्र सातवाहन हे मावळांतल्या आंद्रा नदीच्या तटीं रहाणारे. यांचे कोरीव लेख, लेणीं मुख्यतः नाणेघाटांत आढळावींत. कांहीं नाशिक आणि कार्ल्याला. तेव्हां यांचें मूळ वसतिस्थान आंद्रा नदीचें खोरें, ही गोष्ट निर्विवाद.

सातवाहन कुल फार मोठें. पैकीं तीन-चार राजे आपल्या वैशिष्ट्यामुळें आपापलीं नांवें मागें ठेवून गेले. पहिला, सिमुक म्हणजे श्रीमुख सातवाहन. हा सातवाहन कुलांतला आद्य नृपति. दुसरें नांव घेतलें पाहिजे हाल सातवाहनाचें. गाथासप्तशती या अपूर्व ग्रंथाचें संपादकत्व हाल राजाकडे, खेडोपाडीं अनेक ग्रामीण कवि रसोत्कट रचना करीत होते. तीही हंसतां खेळतां. नानाविध रसांनीं भरलेली. कधीं शृंगार. कधीं शांत. कधीं हास्य. कधीं विनोद. कधीं परिहास.

हाल सातवाहनानें या रचनांमधली श्रीमंती जाणली. यांचें मोल ओळखलें आणि अशा सातशेंवर गाथा त्यानें एकत्र केल्या. तत्कालीन समाजरचनेचें दर्शन घडविणारा एवढा मोठा ग्रंथ संपादण्याचें पुण्य हाल राजाकडे !

नाशिकच्या पांडवलेण्यांच्या शिलालेखांत कृष्ण सातवाहनाचा उल्लेख आहे. सातकर्णी आणि त्याची पत्नी नागनिका या दोघांनीं केलेल्या धर्मकृत्यांची तर फार फार प्रसिद्धि ! नाणेघाटांतील शिलालेखांत नागनिकेचे उल्लेख अनेक आहेत. तसेंच गौतमीपुत्राची माता गौतमी बालश्री, हिचाही उल्लेख नाशिकच्या पांडवलेण्यांत मोठ्या कौतुकानें केला गेला आहे. ही तपस्विनी होती. क्षमाशील होती. सत्यवचनी होती. इंद्रियनिग्रही होती. हिनें या शिलालेखांत आपल्या पुत्राविषयीं मोठ्या गौरवपूर्ण भाषेंत लिहून ठेवलें आहे. हा गौतमीपुत्र सातकर्णीच बहुधा शककर्ता शालिवाहन असावा.

एवढें कर्तृत्वसंपन्न, दानशूर, सद्गुणी राजकुल गोदातटाकानें दुसरें पाहिलेंच नाहीं !

यानंतर वाकाटक हें समर्थ राजकुल विदर्भांत नांदून गेलें. पैकीं द्वितीय प्रवरसेन वाकाटकाची माता प्रभावती गुप्ता ही सम्राट् विक्रमादित्याची कन्या. हिच्या विवाहप्रसंगींच 'मालविकाग्निमित्र' हें श्रेष्ठ नाटक कविकुलगुरु कालिदासानें लिहिलें.

पुढें दुर्दैवानें प्रभावती गुप्ता विधवा झाली. पण ही स्त्री मोठ्या हिमतीची. तिनें आपल्या अल्पवयी पुत्रांना गादीवर बसविलें. राज्यकारभाराची धुरा तशीच पुढें रेटली. हिच्या दरबारीं कांहीं दिवस राहाण्यासाठीं कविकुलगुरु कालिदास आला. रामटेक त्यानें पाहिलें. बहुधा त्या शिखरावर आषाढाच्या

प्रारंभीं आकाशांतून येऊन टेकलेले मेघ त्यानें निरखिले असावेत. अन् मग त्याला स्फुरलें—आषाढस्य प्रथमदिवसे! 'मेघदूत' या जगन्मान्य काव्याचा प्रारंभ अशा रीतीनें महाराष्ट्रमंडळांत झाला.

नंतर उल्लेख करावा विक्रमादित्य चालुक्याचा. याच्या राजवटींत महाराष्ट्रिकांची राजसत्ता पार बंगाल-आसाम-कामरूपापर्यंत गाजत होती. विज्ञानेश्वरासारखा पंडित आणि 'विक्रमांकदेवचरित' या काव्याचा कवि बिल्हण, हे याच्याच दरबारीं नांदले.

नंतर महाराष्ट्रांत नांदले राष्ट्रकूट. त्यांनीं तीनदां उत्तरदिग्विजय केला. गोमांतकांत कदंबकुल नीतिमान् राजकुल म्हणून ख्याति पावलें. अपरार्क शिलाहाराचा उल्लेख त्याच्या राजसत्तेबरोबरच पांडित्याबद्दलही करायचा. 'अपरार्कटीका' हा याचा याज्ञवल्क्यस्मृतीवरील ग्रंथ मान्य गणला गेला. इतका, कीं काश्मीरमधील आजचे सामाजिक व्यवहार या टीकेला धरून व्हायचे!

याच शाखेंतल्या पश्चिमचक्रवर्ती भोजानें पन्हाळा किल्ला बांधला. शिलाहारकुलाची कुलस्वामिनी कोल्हापूरची जगदंबा. यांचा ध्वज गरुड-चिन्हांकित. मंदिरें बांधायचा शिलाहारकुलाला मोठा नाद. अंबरनाथ, वाळकेश्वर हीं शिवमंदिरें यांच्याच राजवटींतलीं.

यानंतर उदयास आलें यादवकुल. हें महापराक्रमी कुल द्वारावतीच्या यादवांपैकीं. दृढप्रहार नामें राजा, त्याची राजधानी सिन्नर—श्रीनगरला होती. बहुधा सिन्नरचें टोलेजंग श्रीगोंदेश्वराचें मंदिर याच्याच कालीं उभारलें गेलें असावें.

यादवकुलवीर सिंघणाची राजधानी देवगिरि. या प्रतापी राजानें सिंधचे मुसलमान, गुजराथचे चालुक्य, होयसळचे यादव, पांड्य, इत्यादि सत्तांशीं झुंजें घेतलीं. याचें राज्य गुजराथ, माळवा, कर्नाटकापर्यंत पसरलें होतें.

यादवकुल जसें पराक्रमासाठीं प्रसिद्ध, तसेंच तें पांडित्याच्या कौतुका-विषयींही. पंढरीचा वारकरी संप्रदाय याच्याच कारकीर्दींत उदयास आला. हेमाद्रि, बोपदेव, ज्ञानेश्वर, नरेंद्र असे पंडित आणि कविकुलतन्मणि यांच्याच राजवटींत नांदले. शार्ङ्गधरासारखा संगीतज्ञही यांच्याच राजसभा गाजवून गेला. अशा या राजकुलाचें शिखर होतें राजा रामदेवराय!

रामदेवरायाच्या काळीं यादवकुलाची कीर्ति दिगंतास गेली. ज्ञानेश्वरांसारख्या संतश्रेष्ठानें रामदेवरायाचें वर्णन करतांना म्हटलें—

तेथ यदुवंशावेलासु । जो सकळकळानिवासु ! न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचन्द्र ॥

यांत सर्व कांहीं आलें. याहून अधिक आगळ्या प्रशस्तिपत्राची जरूरीच नाहीं !

रात्रीचा गर्भ—

दुर्दैव असें, कीं रामदेवरायाच्या राजवटींतच त्याच्या वृद्धपणीं महाराष्ट्राचा भाग्यरवि मावळला ! तहत तीनशें-साडेतीनशें वर्षांसाठीं !

उत्तरेंतून आले अल्लाउद्दीन खिलजीचे तुराणी घोडेस्वार. तांबड्या डोळ्यांत सुरमे घातलेले. दाढ्यामिशा राखलेले. उग्र प्रकृतीचे. त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं जी धूळ उसळली, तिनें महाराष्ट्राचें सुख आणि समृद्धि पार दडपली गेली !

नंतर आल्या शाही राजवटी. आदिलशाही, बरीदशाही, इमादशाही अन् काय काय ? तीनशें वर्षें केवळ रक्तपाताचा इतिहास ! लुटालूट, जाळ-पोळ, अपहरण, यांनीं इतिहासाचीं हीं पानें नुसतीं बरबटलेलीं ! कितीही केलें तरी या शाह्यांची स्तुति करायला जीभ उचलतच नाहीं. महाराष्ट्रांतलीं असंख्य मंदिरें फोडलीं गेलीं. अनेक साधुसंतांचे छळ झाले !

लोहगडावरची एक कथा त्या दृष्टीनें अत्यंत मननीय. तिथें एक साधु शांतपणें ईश्वरचिंतनांत काळ घालवून जगाचें कल्याण चिंतायचा. तिथें आले अरबस्तानांतले एक वल्ली ! हे म्हणे खुद्द पैगंबरांचे दूरदूरचे संबंधी होते !

त्यांनीं काय केलें ? दुसरें कांहीं नाहीं. त्या बिचाऱ्या विरक्ताला लाथ मारून कड्यावरून खालीं ढकलून दिलें ! बिचारा पंचत्व पावला. समर्थांना म्हणावें लागलें,

सकळ सृष्टि आंदोळली, धर्म गेला !

तुकारामबावांसारखा विरक्त, उदासीन साधु. पण त्यानेंहि शेवटीं उदास होऊन म्हटलें,

प्रारंभीं आकाशांतून येऊन टेकलेले मेघ त्यानें निरखिले असावेत. अन् मग त्याला स्फुरलें—आषाढस्य प्रथमदिवसे! 'मेघदूत' या जगन्मान्य काव्याचा प्रारंभ अशा रीतीनें महाराष्ट्रमंडळांत झाला.

नंतर उल्लेख करावा विक्रमादित्य चालुक्याचा. याच्या राजवटींत महाराष्ट्रिकांची राजसत्ता पार बंगाल-आसाम-कामरूपापर्यंत गाजत होती. विज्ञानेश्वरासारखा पंडित आणि 'विक्रमांकदेवचरित' या काव्याचा कवि बिल्हण, हे याच्याच दरबारीं नांदले.

नंतर महाराष्ट्रांत नांदले राष्ट्रकूट. त्यांनीं तीनदां उत्तरदिग्विजय केला. गोमांतकांत कदंबकुल नीतिमान् राजकुल म्हणून ख्याति पावलें. अपरार्क शिलाहाराचा उल्लेख त्याच्या राजसत्तेबरोबरच पांडित्याबद्दलही करायचा. 'अपरार्कटीका' हा याचा याज्ञवल्क्यस्मृतिवरील ग्रंथ मान्य गणला गेला. इतका, कीं काश्मीरमधील आजचे सामाजिक व्यवहार या टीकेला धरून व्हायचे!

याच शाखेंतल्या पश्चिमचक्रवर्ती भोजानें पन्हाळा किल्ला बांधला. शिलाहारकुलाची कुलस्वामिनी कोल्हापूरची जगदंबा. यांचा ध्वज गरुड-चिन्हांकित. मंदिरें बांधायचा शिलाहारकुलाला मोठा नाद. अंबरनाथ, वाळकेश्वर हीं शिवमंदिरें यांच्याच राजवटींतलीं.

यानंतर उदयास आलें यादवकुल. हें महापराक्रमी कुल द्वारावतीच्या यादवांपैकीं. दृढप्रहार नामें राजा, त्याची राजधानी सिन्नर—श्रीनगरला होती. बहुधा सिन्नरचें टोलेजंग श्रीगोंदेश्वराचें मंदिर याच्याच कालीं उभारलें गेलें असावें.

यादवकुलवीर सिंघणाची राजधानी देवगिरि. या प्रतापी राजानें सिंधचे मुसलमान, गुजराथचे चालुक्य, होयसळचे यादव, पांड्य, इत्यादि सत्तांशीं झुंजें घेतलीं. याचें राज्य गुजराथ, माळवा, कर्नाटकापर्यंत पसरलें होतें.

यादवकुल जसें पराक्रमासाठीं प्रसिद्ध, तसेंच तें पांडित्याच्या कौतुकाविषयींही. पंढरीचा वारकरी संप्रदाय याच्याच कारकीर्दींत उदयास आला. हेमाद्रि, बोपदेव, ज्ञानेश्वर, नरेंद्र असे पंडित आणि कविकुलतन्मणि यांच्याच राजवटींत नांदले. शार्ङ्गधरासारखा संगीतज्ञही यांच्याच राजसभा गाजवून गेला. अशा या राजकुलाचें शिखर होतें राजा रामदेवराय!

रामदेवरायाच्या काळीं यादवकुलाची कीर्ति दिगंतास गेली. ज्ञानेश्वरांसारख्या संतश्रेष्ठानें रामदेवरायाचें वर्णन करतांना म्हटलें—

तेथ यदुवंशावेलासु । जो सकळकळानिवासु । न्यायातें पोषी क्षितीशु । श्रीरामचन्द्र ॥

यांत सर्व कांहीं आलें. याहून अधिक आगळ्या प्रशस्तिपत्राची जरूरीच नाहीं !

रात्रीचा गर्भ—

दुर्दैव असें, कीं रामदेवरायाच्या राजवटींतच त्याच्या वृद्धपणीं महाराष्ट्राचा भाग्यरवि मावळला ! तहत तीनशें-साडेतीनशें वर्षांसाठीं !

उत्तरेंतून आले अल्लाउद्दीन खिलजीचे तुराणी घोडेस्वार. तांबड्या डोळ्यांत सुरमे घातलेले. दाढ्यामिशा राखलेले. उग्र प्रकृतीचे. त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं जी धूळ उसळली, तिनें महाराष्ट्राचें सुख आणि समृद्धि पार दडपली गेली !

नंतर आल्या शाही राजवटी. आदिलशाही, बरीदशाही, इमादशाही अन् काय काय ? तीनशें वर्षें केवळ रक्तपाताचा इतिहास ! लुटालूट, जाळ-पोळ, अपहरण, यांनीं इतिहासाचीं हीं पानें नुसतीं बरबटलेलीं ! कितीही केलें तरी या शाह्यांची स्तुति करायला जीभ उचलतच नाहीं. महाराष्ट्रांतलीं असंख्य मंदिरें फोडलीं गेलीं. अनेक साधुसंतांचे छळ झाले !

लोहगडावरची एक कथा त्या दृष्टीनें अत्यंत मननीय. तिथें एक साधु शांतपणें ईश्वरचिंतनांत काळ घालवून जगाचें कल्याण चिंतायचा. तिथें आले अरबस्तानांतले एक वल्ली ! हे म्हणे खुद्द पैगंबरांचे दूरदूरचे संबंधी होते !

त्यांनीं काय केलें ? दुसरें कांहीं नाहीं. त्या बिचाऱ्या विरक्ताला लाथ मारून कड्यावरून खालीं ढकलून दिलें ! बिचारा पंचत्व पावला. समर्थांना म्हणावें लागलें,

सकळ सृष्टि आंदोळली, धर्म गेला !

तुकारामबावांसारखा विरक्त, उदासीन साधु. पण त्यानेंहि शेवटीं उदास होऊन म्हटलें,

न घडे यावरी न धरवे धीर । पीडितां हें राष्ट्र देखोनि जग ॥

अन् या साडेतीनशें वर्षांच्या काळांत मराठे काय करीत होते ?

तर आपआपसांत झगडत होते. एकमेकांच्या नरड्यांवर पाय देत होते. एकमेकांच्या लग्नांचीं वऱ्हाडें कापून काढीत होते. लहानग्या स्वार्थासाठीं शहांचे पाय चाटीत होते. त्यांच्या कृपाकटाक्षासाठीं विव्हळ होत होते. त्याचा लवलेश लाभतांच शहाच्या इशाऱ्यानें एकमेकांचे गळे चिरीत होते. एकमेकांच्या सुनालेकी पळवायला मदत करीत होते.

तसे तर हे सारे या पूर्वींच्या राजकुळांचे वंशज. मौर्यांचे मोरे. शिलाहारांचे शेलार. यादवांचे जाधव. पण यांनीं आपल्या कुळांना अगदीं लाज आणली होती. पूर्वजांचें तेज, पराक्रम, कीर्ति, प्रतिष्ठा—हें सारें सारें कसें मळलें कोण जाणे !

उषःकाल—

कांहीं दशकें कां, शतकें—अशीं काळ्याकुट्ट अंधाराचीं गेलीं, आणि मग अगदीं सावकाश शिवनेरीस फटफटलें. दिशा झळाळल्या. भोसल्यांच्या जिजाऊच्या पोटीं एक बाळ जन्मलें. याला आईकडून यादवकुळाचें यश लाभलें होतें. ही घटना महाराष्ट्राच्या इतिहासांत कांहीं पानें सुवर्णाक्षरांनीं लिहून गेली.

जिजाऊचें पूर्वसुकृत फळास आलें. मुलगा जन्मला, हें पाहातांच तिच्या डोळ्यांतून कृतार्थतेचीं आंसवें धांवलीं असतील. तिनें शिवनेरीच्या शिवाईला म्हटलें असेल, ‘ आई ग ! तुझें हें लेणें आतां मी जिवापलिकडे सांभाळीन. मी याच्याकरवीं तुझे पांग फेडीन ! महाराष्ट्रमंडळीं पुण्याईचा सडा घालीन ! ’

आणि जिजाऊच्या शिकवणुकीचें सार्थक झालें. केवळ वयाच्या आठव्या-दहाव्या वर्षीं शिवबांनीं रायरेश्वरीं स्वराज्याची शपथ केली—कांहीं जिवाभावाच्या संवगड्यांसवें.

मग उजाडायला लागलें. त्याची पहिली खूण उमटली तोरण्यावर. त्या सोनेरी किरणांच्या दिवशीं महाराष्ट्राला पुनः एकदां कळलें, कीं महाराष्ट्रांत आम्ही मराठेही आमचें राज्य निर्माण करूं शकतों.

महाराष्ट्राची अस्मिताच जणुं शिवछत्रपतींच्या रूपानें जागी झाली.

जेव्हां रायगडावर राज्याभिषेकाचीं शहाजणें वाजलीं, तेव्हां त्यांच्या नभांत आंदोळत असलेल्या प्रतिध्वनींनीं दिल्लीचें शाही तख्त देखील क्षणभर डळमळित झालें ! पातशहा पगडी आपटून बोलला,

'हिंदवानी तख्त हो गया !'

शिवछपत्रतींचें वर्णन म्या पामरानें काय करावें ! जो छत्रपतींच्या शिस्तींत नांदला, अशा म्हाताऱ्या रामचन्द्रपंताचे शब्द दिले कीं पुरे—

"हें एक राज्य, या राज्याची एक मर्यादा...हें राज्य म्हणजे केवळ ईश्वरदत्त. या राज्याची अभिवृद्धि व्हावी, हें ईश्वरास परम आवश्यक... तीर्थरूप श्रीमन्महाराज शककर्ते छत्रपतिसाहेब,......पंधरा वर्षांचें वय असतां त्या दिवसापासून तितकेच स्वल्पमात्र स्वास्तेवर उद्योग केला...... दृढबुद्धीनें, शरीरास्था न पाहतां, केवळ अमानुष पराक्रम—जे आजपर्यंत कोणींही केले नाहींत व पुढें कोणाच्यानें मनेंही कल्पवेना असे स्वांगें केले ......दक्षिणप्रांतीं इदिलशाही, कुतुबशाही व निजामशाही हीं पराक्रमें महान्, सकलार्थें समृद्धिमंत संस्थानें; तसेंच मोंगल, एक एक सुभा लक्ष लक्ष स्वारांचा. यांविरहित शामल, फिरंगी, इंग्रज, वलंदेज, रामनगर, पाळेगार, सोंदे, बिदनूर, म्हैसूरवाले, त्रिचनापल्ली आदिकरून संस्थानिक; तसेंच जागजागां पुंड, चंदरराव शिरके, सावंत, वरघांटे, निंबाळकर, घाटगे आदिकरून देशमुख व काटक सकलही पराक्रमें सज्ज. बुद्धिवैभवपराक्रमें कोणाची गणना न करतां, कोणावर चालून जाऊन, तुंबळ युद्ध करून रणाशीं आणिलें; कोणावर छापे घातले; कोणास परस्परें कलह लावून दिले. कोणाचे मित्रभेद केले; कोणाच्या डेऱ्यांत शिरोन मारामार केली; कोणाशीं एकागी करून पराभविले; कोणाशीं स्नेह केले; कोणाच्या दर्शनास आपणहून गेले, कोणास आणिलें; कोणास परस्परें दंगे करविले; कोणी इतर प्रयत्नें नाकळत त्यांच्या देशांत जबरदस्तीनें स्थळें बांधून अनुक्रमें आकळिले; जलदुर्गसहित त्यांस नूतनच जलदुर्ग निर्माण करून पराभविले. दुर्घट स्थळें नौकामार्गें प्रवेशिलीं. असे ज्या ज्या उपायें जो जो शत्रु आकळावा, त्या त्या उपायें तो तो शत्रु पादाक्रांत करून, सालेरी-अहिवंतापासून चंजी-कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले, तसेच जलदुर्ग, कितीएक विशाल स्थळें, चाळीस हजार

पागा व साठ-सत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोट्यवधि खजिना, तसेंच उत्तम जवाहीर, सकळ वस्तुजात संपादिलें. शहाण्णव कुळींचे मराठेयांचा उद्धार केला. सिंहासनारूढ होऊन, छत्र धरून ‘ छत्रपति ’ म्हणविलें. धर्मोद्धार करून, देव-ब्राह्मण स्वस्थानीं स्थापून यजनयाजनादि षट्कर्में वर्णविभागें चालविलीं. तस्करादि अन्यायियांचें नांव राज्यांत नाहींसें केलें. देशदुर्गादि सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविलें. केवळ नूतन सृष्टि निर्माण केली. औरंगझेबासारिखा महान् शत्रु परितापसागरीं निमग्न करून दिगंत विख्यातकीर्ति संपादिली, तें हें राज्य ! ”

मग शिवछत्रतींच्या नंतरही त्यांनीं पेटवलेलें हें यज्ञकुंड धडकतच राहिलें. खासा औरंगजेब प्रचंड सेनेनिशीं दक्षिणेंत उतरला. त्यानें राजा संभाजी हाल हाल करून मारला. धन्य त्या वीराची, कीं तो राजासारखा मर्दपणें मृत्यूस सामोरा गेला !

राजाराम तर औरंगजेबाशीं हुतुतूच खेळत शेवटीं सिंहगडीं निधन पावले. शिवछत्रपतींनीं माणसें गोळा केलीं, तीं काय वर्णावींत ! एकेक आगळ्या कीर्तीचा. बाजी फासलकर. बाजी प्रभु देशपांडे. जेधे. बांदल. तानाजी मालुसरे. पिंगळे. कावळे. बाळाजी आवाजी. प्रतापराव गुजर. बजाजी निंबाळकर. रामचन्द्रपन्त अमात्य—बहुत बहुत.

पुढें शाहूराजांच्या वेळीं उदयास आले बाळाजी विश्वनाथ. त्यांचे पुत्र बाजीराव बल्लाळ, यानीं तर तरवारीची शर्थच केली. असा पराक्रमी सेनापति पुढें झालाच नाहीं. त्यांनीं उदयास आणले महादजी शिंदे. मल्हारराव होळकर. सदाशिवराव भाऊंनीं पानपत गाजविली. थोरले माधवराव पेशवे—त्यांचा अत्यंत करडा अंमल आणि अत्यंत शुद्ध वर्तन. नाना फडणवीस यांच्याच आमदनींत नांवास चढले. रघुनाथराव पेशव्यांनीं मराठी शहाजणें थेट अटकेवर वाजविलीं.

अशी एकेकाची कीर्ति काय वर्णावी ? नांवें तरी कितीकांचीं घ्यावींत ? बापू गोखले वगळून चालायचें नाहीं. पटवर्धन वाखाणलेच पाहिजेत. सखाराम बापू बोकील टाळून कसें भागेल ? इतकें म्हटलें कीं पुरे, कीं या काळीं सारें महाराष्ट्रमंडळ इरेसरीनें पेटलें होतें. शौर्य आणि शृंगार,

दोन्ही रस हातांत हात घालून चालले होते. महाराष्ट्राची सत्ता थेट दिल्लीपर्यंत चालत होती. पातशहानें कसें वागावें, तें शिंदे ठरवीत होते !

धुमारे—

तंवर प्रबळ आंग्रेज भारतांत उतरले, आणि एका अशुभ दिवशीं मराठ्यांचें राजछत्र कोलमडून पडलें !

नंतर पेटलें अठराशें सत्तावन्न. त्यांत ज्यांची कीर्ति दिगंत पसरली, ते धुरेचे वीर महाराष्ट्रिकच. झांशीची राणी कोण होती ? नानासाहेब पेशवे कोण होते ? तात्या टोपे कोण होते ? कोणासाठीं सहृदय आंग्रेजांनींही आंसवें ढाळलीं ? कोणासाठीं त्यांचे रुमाल ओले झाले ?

हे सगळे तर महाराष्ट्रिकच ! महाराष्ट्राने त्यांचीं नांवें घ्यावींत, आणि मस्तक मानानें वर उचलावें !

अठराशें सत्तावनीं जी आग पेटली, तीं कालपरवांपर्यंत विझलीच नाहीं. या आगींत मुख्य आहुति पडल्या, त्यांपैकीं बहुसंख्य महाराष्ट्रिकच होते.

सातारच्या गादीसाठीं शेवटपर्यंत अटीतटीनें झुंजणारा रंगो बापूजी. तळहातावर शिर घेऊन आंग्रेजांविरुद्ध सशस्त्र बंड पुकारणारा वासुदेव बळवंत. महानेमस्त, पण दृढ निश्चयी गोखले. सर्वज्ञ माधवराव रानडे. दीनबन्धु महात्मा फुले. महर्षि पटवर्धन. कोंवळ्या वयाचा कान्हेरे. मृत्यूशीं लपाछपी खेळणारे चाफेकर बंधू. सतीचें वाण स्वीकारणारे सावरकर बन्धू. आईच्या बलिवेदींत सहर्ष आहुति देणारे पिंगळे आणि राजगुरु. स्थितप्रज्ञ सेनापति बापट. युगद्रष्टे डॉक्टर हेडगेवार—

आणि या सर्वांचा मेरुमणि, तेल्यातांबोळ्यांचा पुढारी—

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक !

पुण्यास गायकवाडवाड्यांत एक सिंह राहात होता. त्याला इंग्रजांनीं शिवी दिली, ‘ भारतीय असंतोषाचा जनक ! ’ किती खरी पदवी ! त्यानें स्वराज्याचा मंत्र दशदिशांत घुमवला. तो गायकवाडवाड्यांतून बाहेर ज्या दिशेस पाऊल टाकी, तिकडे देशाचीं पावलें वळत !

तो उग्रदर्शन होता, पण अंतरीं स्नेहाळ. वक्ता साधारण होता, पण त्याच्या भाषणांत अंगार फुलत. जितका कर्कश राजकारणी, तितकाच

प्रकाण्ड पण्डित. चारित्र्याच्या बाबतींत वसिष्ठ वामदेव. बुद्धिमत्तेंत बृहस्पति.

बाळ गंगाधर हें नांव घरोघरीं देवघरांतून पूजिलें जातें.

हिंगण्याचा ठेंगणा तपस्वी--अण्णा कर्वे. उग्र, भिंतीसारखा, अपार बुद्धिमत्तेचा बाबा आंबेडकर. केडगांवीं ठाण मांडून बसलेली पंडिता रमाबाई. हातीं शिक्षणाची दिवटी घेऊन शेतकऱ्याच्या झोंपडीझोंपडींत प्रकाश पोंचविणारा भाऊराव पाटील---

पुरें झालें. यांपैकीं कुणाचेंही नांव निघतांच मराठ्यानें उठून उभें राहावें. मस्तक नम्र करावें आणि मग अभिमानानें तें वर करावें-कारण हे सगळे महाराष्ट्रिक होते !

✤ ✤ ✤

०

# संकीर्ण

आतां कांहीं बाबी संकीर्ण—

पहिली, प्राचीन शिक्षणपद्धति. शिक्षण असें फारसें नसेच. बाळबोध किंवा मोडी लिहितां वाचतां आलें, अक्षर सुटें, मोठें वाटोळें आलें, उजळणी आली, कित्ते गिरवतां आले, कीं भागलेंच म्हणायचें. समर्थांनीं शाई कशी करावी, तें लिहिलें. शाईला म्हणत मसी. ती काळी कुळकुळीत असावी. काजळी घोटून घोटून तयार करावी. मग अक्षर कसें असावें, तर " कुळकुळीत चालिल्या वोळी, मुक्तमाळा जैशा ! "

शेतकरी आणि क्षत्रिय बहुधा शिकत नसतच. तरवार मारतां आली, कीं झालें. वाचील बामण ! तेही अगोदर घोडा फिरवून बोथाटी खेळत, अन् तरवार फिरवल्यावर मग बोरू घेऊन बसत. वर सांगितलें तेवढें आलें, कीं गंगेंत घोडें न्हालें !

यावर मग हिशेब करतां आले, बखरी वाचल्या, भारत-रामायण वाचलें, पत्रांचे मायने लिहितां आले, कीं धार मारली ! मायने लिहिण्याचेंही एक भलें थोरलें शास्त्रच असे. तीर्थरूप कोणाला म्हणावें, तीर्थस्वरूप कोणाला, राजमान्य कुणाला, राजश्री कुणाला, वडिलांचे सेवेसी कुणाला, कृतानेक साष्टांग नमस्कार कुणाला, दोन्ही कर जोडोन कुणाला, त्रिकाल चरणीं मस्तक ठेवोन कुणाला, आशीर्वाद कुणाला--असें तें एक तंत्रच. खालीं नांवें लिहितांनाही तीच परी. बालक, पोष्य, आश्रित, आज्ञाधारक, असे नाना मायने. खालीं सही करायची पद्धत कालपरवां सुरू झाली. पूर्वीं पत्र सुरू करतांनाच ' अमुक गांवाहोन अमुकचे नमस्कार ' असें लिहायचें असे. खालीं मग शिक्के

उठवले जात. लेखनसीमा, मर्यादेयं विराजते, इति, अशी पत्रसमाप्ति असे. शिवप्रभूंचा शिक्का तर मागेंच सांगितला. बाकी मग कुण्या देवतेच्या चरणीं तत्पर कोण आहे, त्याचा पत्ता सांगितला जाई. जसें, 'म्हाळसाकान्त-चरणीं तत्पर खंडोजीसुत काळोजी निरंतर.' किंवा कुणी अधिकारी असला, तर त्याची मुद्रा अशी, 'श्रीशाहूनरपति हर्षनिधान, बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान ''

बहुधा पत्रांतून ज्याला तें लिहिलें त्याच्या मागील पत्रांतील मजकुरापैकीं मुख्य मुद्दे पुनः एकवार उजळले जात. जसें—

'तुम्हीं मागील पत्रीं लेहिलें, जे अमुक, तमुक असें, तसें, त्या पक्षीं कळविण्यांत येतें कीं–' इत्यादि.

हें बहुधा प्रत्येक लिहित्या-वाचत्याला यावें लागे मात्र पेशव्यांसारख्या जबाबदारांची शिक्षणपद्धति याहून वेगळी असे. त्यांना पंचतंत्र, हितोपदेश, चाणक्यनीति, रघुवंश, शाकुंतल, कामापुरतें ज्योतिष, थोडें वैद्यक, व्याकरण, असें परोपरीचें शिकावें लागे. श्रीमंतांना शिकवायला शास्त्री ठेवलेले असत. मग श्रीमंतांबरोबर इतरांचें शिक्षण फुकट होई. किंबहुना श्रीमंतांबरोबर शिकायला म्हणून बुद्धिमान् मुलें मुद्दाम शोधलीं जात.

श्रीमंतांचे आणि सरदारांचे वाडे मोठे कलाकुसरीचे बांधलेले असत. पेशव्यांचा शनिवारवाडा, विश्रामबाग वाडा, बुधवार वाडा, नानावाडा, तळेगांवचा दाभाड्यांचा वाडा, सातारचा राजवाडा, जलमन्दिर, असें कांहीं वाडे फार मेहनतीनें बांधलेले असत. विशेषतः आंतलें लांकडी नक्स-काम बहुत सुबक असे. सुरूदार कोरीव खांब, त्यांचे आढ्याला मिळणारे भाग, तिथल्या बैसका, कंसाकृति कमानी, त्यांच्या वरल्या वेलबुट्ट्या, नागाकृति, आंत जडवलेला हस्तिदन्त, सभागृहाची नक्सदार पटई, कमान-दार खिडक्या--असें सगळेंच काम फार देखणें असे.

वाड्यांच्या दारांवर आणि आंतील भिंतीवर सुबक चित्रें काढलेलीं असत. दारांवर बहुधा जयविजय असत. भिंतीवर शिकारीचीं चित्रें. पशूंचीं. ऐतिहासिक पुरुषांचीं. कृष्णलीला इत्यादि. हीं चित्रें बहुधा चितारी काढीत. पैकीं अनेक चितार्‍यांचें कलम अत्यंत नाजूक असे. रंग अगदीं साधे. पिवडी, गेरू, काजळ, असे.

प्रत्येक वाड्यास दिंडीदरवाजा असे, आणि देवडी. आंत बरेच चौक असत. त्यांचीं निरनिराळीं नांवें. जसें, ताकदह्याचा चौक, काठीचा चौक—इत्यादि. या वाड्यांमधून प्रकाश कमी, अंधारच जास्त. दिवाणखान्यांमधून हण्ड्या टांगलेल्या असत. क्वचित् लोलकांचीं झुंबरें.

हे वाडे बांधणार नाना प्रकारचे लोक. बेलदार, चुनेवाले, लोणारी, छपरबंद, लोहार, सुतार. कुठें नवें गांव वसायला घातलें कीं अगोदर या लोकांची छावणी पडायची. हे सगळेच लोक कसबी. पैकीं चुनेवाले लोक चुन्यांत गूळ आणि हिरडा घालून चुना करायचे. तो इतका मजबूत व्हायचा, कीं त्यांत बसवलेला दगड वर्षानुवर्षें हालायचा नाहीं. वडार बहुधा सगळे कर्नाटकांतून यायचे. त्यांच्या किंचित् कर्कश कोंगाट करणाऱ्या भाषेवरून त्यांना नांव पडलें कोंगाडी.

वाड्यांतला पाणीपुरठा चुनगजी अथवा खापरी नळांनीं व्हायचा. शनिवारवाड्यांत कात्रजहून पाणी आणविलें होतें. जागोजाग हौदांतून तें सोडून नागरिकांचीही सोय केलेली. हे असे हौद पुण्यास अन् साताऱ्यास. नळांना जागोजाग उच्छ्वास असायचे.

शनिवारवाड्यांत तर एक अतिसुबक हजारी कारंजें होतें. शिवाय एक चौकोनी विहीर. तिच्या भिंतींना आडवे खण. त्यांत पेटत्या पणत्या ठेवायच्या. मग वरून सबंध भिंतभर रुंदीचा पाण्याचा पाट विहिरींत सोडायचा. कसें देखणें दिसे !

महाराष्ट्रांत मोठमोठे प्रकाण्ड पण्डित. त्यांच्या चरितार्थाची कांहीं तरी व्यवस्था राजसत्तेला करायला हवी. प्रत्येकाला इनाम कुठें देत बसणार ! त्यांत यांपैकीं कित्येक घरोघर पाठशाळा चालवीत असायचे. विद्यार्थ्यानें गांवांत मधुकरी मागावी, आणि गुरूजवळ शिकावें. नाना परींचें. व्याकरण, साहित्य, ज्योतिष, वैद्यक, न्याय, सांख्य.

गुरु निर्लोभ असायचे. कसाबसा प्रपंच रेटीत विद्यादानांत गर्क असायचे. त्यांनाही साहाय्य करायला हवें. कमींत कमी त्यांचा योगक्षेम तरी चालेल इतकें त्यांना पोंचायला हवें.

मग पेशव्यांनीं श्रावणांत दक्षिणा वांटणें सुरू केलें. त्यासाठीं पर्वतीजवळ मुद्दाम रमणे बांधले. रमणे म्हणजे चौ बाजूंनीं भिंत, तिला एक दार. सगळ्या

दक्षिणेच्छु ब्राह्मणांनीं रमण्यांत गोळा व्हायचें. दारावर बसत दक्षिणा वांटणारे अधिकारी. त्यांच्या शेजारीं परीक्षक शास्त्री ते परीक्षा घेत. मग त्या प्रमाणांत कमी-अधिक दक्षिणा वांटली जायची. दशग्रंथी ब्राह्मण, त्याला पंचवीस ते चाळीस रुपये. पंचग्रंथी, त्याला पंधरा ते वीस. नुसताच स्नानसंध्याशील असेल, त्याला पांच ते दहा रुपये. कुणी रोगी किंवा दुखणेकरी असेल, तर त्यालाही दक्षिणा दिली जाई.

ही दक्षिणा घेण्यासाठीं ब्राह्मण कुठून कुठून येत? लांबून! शृंगेरी, कांची. श्रीरंगपट्टणम्. कुंभकोणम्. तंजावर. रामेश्वर. काशी. कनोज. ग्वाल्हेर. मथुरा. पैठण. वाई. नाशिक. म्हणजे जिथें जिथें हे वसले असतील, तिथें तिथें निर्वेध पाठशाळा चालायच्या. असे कृष्णाकांठ, भीमातट, अन् गोदातट पाठशाळांनीं गजबजून गेले.

या शास्त्र्यांतले दिग्गज असतील ते दक्षिणा घेण्यासाठीं रमण्यांत येत नसत. त्यांना उतरले असतील तिथें सन्मानपूर्वक दक्षिणा पोंचविली जाई. असा वर्षांतून बारापंधरा लाख रुपयांचा देकार होई.

या पण्डितांच्या जोडीला कीर्तनकार, प्रवचनकार, गायक, नर्तकी, नट, अशांनाही देकार होई. बहुधा प्रत्येक मंदिरांतून कीर्तनें, प्रवचनें सुरू असत. चार चार महिने! ठाकुरदासबुवा, रामजोशी, अशांच्या कीर्तनाला फार रंग चढे. हे बहुधा स्वकृत कवनें म्हणत. कधीं मोरोपंतांच्या आर्यांचाही उपयोग करीत. क्वचित् कोटया करून हे दात्यांचें दातृत्व पणास लावीत!

एकदां घोरपड्यांसमोर कुण्या हरिदासाचें कीर्तन चाललें. देकार काय द्यावा, अशी धनी आणि कारभाऱ्यांत कुजबूज चालली. हें हेरून चतुर हरिदासानें लगेच आर्या रचून म्हटली—

भोजासम कविताप्रिय कर्णासम दानशूर घोरपडे
ऐसें असतां माझ्या देणगिचा कां तुम्हांस घोर पडे!!

झालें, घोरपड्यांच्या पिशवीचें तोंड मोकळें झालें!

उत्तर पेशवाईत लावण्यांना अन् त्या सुरांत म्हणणाऱ्या नर्तकींना तर जसा भाव चढला होता. "कुण्या ग सुभगाची मदनमंजिरी", "पंचकल्याणी घोडा अबलख", "सुंदरा मनामधिं भरली", अशा शृंगाराचा

चहूंकडे नुसता पूर वाहात होता. पुढें पुढें हा शृंगार बाष्कळ व्हायला लागला, बीभत्सही.

करमणुकीचा आणिक एक सात्त्विक प्रकार म्हणजे ललितें आणि बोहाडे. रात्र झाली कीं मग देवादिकांचे मुखवटे चढवून सोंगें निघायचीं. मशालींच्या उजेडांत हीं नाचायचीं. राक्षस नाचत असतां राळ पेटवली जायची. ते डुरकाळ्या फोडीत यायचे. ज्याच्या किंकाळीनें अधिक पोरें भ्यालीं किंवा अधिक स्त्रिया बेशुद्ध पडल्या तो राक्षस यशस्वी !

सरस्वती मोरावर बसून नाचत यायची. गणपति उंदरावर. कार्तिकेयही मोरावर. शंकर नंदीवर यायचा. म्हणजे नंदी आणि मोर खरे नव्हेत. यांचे मुखवटे.

या ललितांच्या वऱ्हाडी प्रकाराचें नांव ढंडार .यांत ढोल, झांजा आणि मुरली हीं वाद्यें वाजवलीं जायचीं. पण ढंडार हा प्रकार तमाशाकडे अधिक झुकलेला. दुसऱ्या रायबाजींच्या कारकीर्दींत तमाशेही बहुत भरास आले. होनाजी आणि बाळा ही जोडी. अनन्त फंदी. परशुराम. अशा नामांकितांचे फड उभे राहिले

यांच्यांत कलगीवाले अन् तुरेवाले, असे दोन प्रकार. रात्रीं दोन फड एकमेकांसमोर उभे राहिले, म्हणजे त्यांचे अटीतटीचे सामने व्हायचे. कोडीं घातलीं जायचीं. एक काय ! ब्रह्म. दोन काय ? नेत्र. तीन काय ? त्रिगुण. चार काय ? वेद !

एकदां समर्थांसमोर असा अटीतटीचा सामना उभा राहिला. समर्थांनीं कांहीं वेळ गंमत पाहिली. मग दोघांपुढेंही घातलें कोडें.

“ पृथ्वीचें वजन किती तें सांगा ! आकाश किती अंगुळें तें सांगा. आकाशांत तारे किती तें सांगा. समुद्राचें पाणी किती घागरी तें सांगा ! ”

असा महाराष्ट्र चहूं अंगांनीं परिपुष्ट होता. कोण्याच बाबतींत तो उणा नव्हता.

✤ ✤ ✤

विद्यालयें अन् कारखाने—अशा नव्हाळीनें आतां तें गजबजून जाणार आहे.

तीच कथा औरंगाबादची. शहर कसलें ? चहूंकडे चुन्यानें पांढऱ्या झालेल्या भगभगीत इमारती वागवीत बसलेलें इतिहासकालीन गांवढें—एक जरा थोराड गांवढें.

पण जुनेपणाची खोळ पांघरून बसलें हें 'खेटक' आतां डोळे चोळीत चहूंकडे पाहूं लागलें आहे. विद्यापीठाच्या इमारतींबरोबर किती नवे नवे इमले उभे राहाताहेत !

आणि नागपूर ? कालपरवांपर्यंत नागपूरची मर्यादा म्हणजे धनतोली आणि सीताबर्डी. पण आज पहावें, तों धर्मपेठ, रामदास पेठ, रविनगर—काय काय नि काय काय !

अशींच कांत टाकल्यासारखीं नाना नगरें वाढताहेत. नवीं निर्माण होताहेत. हेळवाक केवढें होतें ? आतांचें कोयनानगर केवढें ? किर्लोस्कर-वाडीचा विस्तार किती झाला आहे ? सोलापूर कसें हातपाय पसरीत आहे ? नाशिक आणि परभणी ?

अर्थ असा, कीं खेडीं क्षीण होताहेत. ग्रामीण समाजरचना ढेपाळत्ये आहे. तिथें नवी नागर संस्कृति जन्माला येत्ये आहे. पूर्वींची मराठीभाषिक होती. आतांची बहुभाषिक.

अन् सडका ? मुंबई-गोवा सडक रचली जात्ये आहे. मुंबई-पुणें रस्ता तर सीमेण्टचा. तेल सांडलें, तर निपटून घ्यावें. असा मऊसूत. तीच कथा कराड-कोयनानगर रस्त्याची. अमरावती ते नागपूर रस्ताही असाच सुखाचा. अशीं नांवें तरी किती घ्यावींत ! अवघा महाराष्ट्राचाच नकाशा असा सडकांच्या रेघा मारून आंखला जातो आहे. तीच कथा रूळवाटांची. लवकरच दासगांव-दिवा या रस्त्यावर रूळ अंथरले जातील. कराड-चिपळूण रस्त्याची बोलवा आहेच. हिंगोलीवरून एक फांटा निघून सोलापूरला मिळेल.

या सडका अन् रूळवाटा मोठमोठ्या नगरांना येऊन मिळतील. खेडोपाड्यांतले विद्यार्थी या नगरांतल्या विद्यापीठांत बसून त्या त्या शास्त्रांतले पारंगत होतील. महाविद्यालयें तर अगदीं बाजूंच्या गांवींही निघताहेत. पुणें, मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद, हीं चार केन्द्रें. इथें ज्याचें शिक्षण मिळत

नाहीं, असा विषयच नाहीं. ज्ञान म्हणजे कलाशास्त्र, विज्ञान म्हणजे पदार्थ-विज्ञान, वैद्यक, शल्यशास्त्र, स्थापत्यशास्त्र, संख्याशास्त्र, अवघे अवघे विषय शिकविणारे महापण्डित इथें एकवटले आहेत. खडकवासल्याजवळ, दुर्ग सिंहगडाच्या साक्षीनें उभें आहे भलें प्रचण्ड सैनिकी विद्यालय. मुंबई-पुण्यांत आहेत नाट्य-विद्यालयें. नृत्यशिक्षणाच्या संस्था. कुठल्याही मार्गानें रिघावें, कानीं येतात तंबोऱ्याचे घनगंभीर स्वर, अन् त्यांच्या सुरावटीवर सप्तसुरांचा विजेसारखा लखलखाट. तिथेंच रसिकाचें पाऊल मंत्र घातल्यासारखें खिळून राहातें. तों दुरून ऐकूं येतात घुंगरांचे छुमछुम आवाज. निरनिराळे तिय्ये, तोडे. असें अंग पुलकित होऊन जातें.

पुढें निघावें, तों महाविद्यालयांच्या मैदानांवरून चाललेले दिसतात सैनिकी वेशांतल्या विद्यार्थ्यांचे करोल थवे. ऐकूं येतात अधिकाऱ्यांच्या गगन गर्जविणाऱ्या आज्ञा. या संचलनांनीं धरणीमंडळ जणूं थरकांपतें. शेजारींच असलेल्या मल्लशाळांतून घुमतात शड्डूंचे ध्वनि. असें गगनमंडळही थिरकतें.

गिरण्या तर मुंबई–नागपूर–सोलापुरीं शेंशंभर होत्याच. त्यांचीं धुराडीं रात्रंदिवस धूर ओकतात. रात्रपाळ्या. दिवसपाळ्या. असें घनचक्कर चाललेलें असतें. अन् आतां त्यांच्या जोडीला असंख्य निघाले आहेत कारखाने. कशाकशाचे. काड्यांच्या पेट्या. कांचसामान. लोखंडी यंत्रें. ओटॉमोबाइल्स. रॅयॉन. प्लॅस्टिकच्या असंख्य वस्तु. रबरी सामान. निरनिराळीं औषधें. तिजोऱ्या. कुलपें. साबण. वनस्पति तुपें. विजेचे दिवे–लिहावें तरी किती?

तिकडली ती गोरेगांवजवळची प्रचण्ड दुग्धशाला. अंबरनाथचा दारूगोळ्याचा कारखाना. तसाच खडकीचाही. पिंपरीची पेनिसिलीन फॅक्टरी. खडकी–हडपसर–किर्लोस्करवाडीचे मशीनें अन् लोखंडी अवजारें घडविणारे प्रचण्ड कारखाने. तसेंच सातारारोड आणि चिंचवडचेही. ओगलेवाडीचा, अन् तळेगांवचा कांच कारखाना. तुर्भे इथें अणूंचा स्फोट घडवून त्याचा उपयोग मानवाच्या हितासाठीं करायची धडपड करणारी ती अप्सरा. तेल शुद्ध करणारे ते प्रचण्ड कारखाने.

असें लिहावें किती किती? चहूं अंगांनीं असा उठाव होतो आहे. महाराष्ट्र इतर प्रांतांच्या मानानें तिळभरही मागें नाहीं. उणा पडायचाही नाहीं.

आतां हेंच पहा ना ! पूर्वीचा ओसाड नगर जिल्हा. एखादें वर्ष पीक व्हायचें तर चारसहा वर्षें नुसता फुफाटा उडायचा. आभाळ धुळीनें नुसतें झांकून जायचें. अन् आतां ? पहावें तिकडे उसाचे तुरे, अन् साखर-कारखान्यांचीं धुराडीं. तीच तऱ्हा बारामती भागाची.

तळेगांवशेजारचे सगळे डोंगर काजूच्या रोप्यांनीं झांकून जाणार आहेत. पर्वतीवर एक सुरेख उपवन तयार होतें आहे. अजिंठ्याजवळ चंदनाचें बनच्या बन लावलें जातें आहे. सिंहगडावर तर जी वृक्षावळी लावली जात्ये आहे, तिला तोड नाहीं ! सारा सिंहगड पांच-दहा वर्षांत सावलीनें नुसता झांकून निघेल. मग तें होईल थंड हवेचें एक सुरेख ठिकाण–अनेक ऐतिहासिक स्मृतींनीं रोमांचित होऊन जाईल.

आजच तर महाराष्ट्रांत थंड हवेचीं ठिकाणें कितीतरी आहेत. माथेरान, महाबळेश्वर, पांचगणी, चिखलदरा, पन्हाळा, भंडारदरा, आंबोली–अक्षरशः कितीतरी.

प्रत्येक ठिकाणाचें एकेक वैशिष्ट्य. चिखलदऱ्याच्या कड्यांवर संध्याकाळीं उभें राहावें. थंड हवा अंग रोमांचित करीत वाहात असते, अन् अचानक खालून दरींतून उठतात गिरिजनांच्या ढोलांचे स्वर. हृदय थिरकविणारे.

महाबळेश्वरच्या मुंबई टोंकावरून दिसणारा सूर्यास्त एक अविस्मरणीय दृश्य. किंबहुना महाबळेश्वर एक स्वप्नभूमीच आहे. आपण वस्तुस्थितींत वावरतों आहोंत, यावर विश्वासच बसत नाहीं. रानगुलाबांचे ताटवे दिठी-समोरून ढळत असतात, अन् अचानक सोनकीच्या पिवळ्या धम्मक फुलांनीं झांकलेलीं मैदानें दिसूं लागतात.

भंडारदऱ्याला तळ्याच्या पाठीवर बसावें, अन् पाण्यांतलें ढगांचें नितळ प्रतिबिंब न्याहाळावें. कसे त्यांचे रंग ! कसें त्यांचें रूप ! या रंगच्छटांतच मिसळतें कळसूबाईचें रूप. मग जें काय दृश्य दिसतें, तें सांगतां पुरवत नाहीं.

कोयनामाई महाराष्ट्राची प्राणहिता—

भंडारदरा धरणापासून निघाले कालवे. त्यांनीं नगर जिल्हा भिजवला. खडकवासल्यानें पुण्यास पाणी पुरवलें, आणि पुण्याभोंवतालचीं शेतें फुलवलीं. भाटघर, वलवण, यांनीं मुंबईचीं घरोघरें विजेनें उजळलीं. तान्सा

अन् वैतरणा या मुंबईच्या पाणपोया. भाटघर धरणानें नीरा अडवली. गंगापूर प्रसिद्ध झालें धरणामुळें. खोडशीला कृष्णाही धरणानें अडवली.

अशीं नाना नद्यांना नाना धरणें. जें तें धरण आपापल्या परीनें महत्त्वाचें. आपल्या खालच्या शेतांमधून झुळुझुळु पाणी खेळविणारें. पण कोयनामाईचें धरण ?

तें तर महाराष्ट्राचा चैतन्यबिंदु आहे. कोयना महाराष्ट्राची दीपलक्ष्मी आहे. प्राणहिता आहे. महाराष्ट्राची दीपमाळ आहे.

कोयनेची कां एवढी स्तुति ?

कारण असें, कीं तें धरण महाराष्ट्रिकांनीं बांधलें आहे. तिथें डोंगराला चार-साडेचार मैलांचा वेध महाराष्ट्रिकांनीं घेतला आहे. तिथें डोंगर पोखरून भलें प्रचण्ड भुयार महाराष्ट्रिकांनीं खोदलें आहे. त्या भुयारांत विजेची प्रचण्ड निर्माणसामग्री महाराष्ट्रिक बसवणार आहेत. सहस्र सहस्र यंत्रें धांवूं शकतील, एवढी प्रचण्ड वीज तिथें निर्माण होईल. बाहेर मात्र कांहींच कळणार नाहीं !

त्या भुयाराला नांव द्यावें कैलास ! कारण कैलास हें जसें महाराष्ट्रिक शिल्पज्ञांच्या हातोडा-छिन्नींतून निपजलेलें एक अद्‌भुत, तसेंच हें. त्यांच्याच पावलांवर पाऊल ठेवून केलेलें. जसें कैलासवर शिल्पज्ञांचें नांव कोरलेलें नाहीं, तसेंच इथेंही कोरूं नये. म्हणावें, कीं वेरूळचें कैलास निर्माण करणाऱ्या शिल्पज्ञांच्या वंशजांनीं हें भुयार खोदलें !

या भुयारांत निर्माण झालेली वीज कुठें कुठें जाईल ? काय काय करील ?

ती जाईल मुंबईला. ती पोंचेल साऱ्या दक्षिण महाराष्ट्रांत. तिथल्या झोंपड्यांझोंपड्यांमधून ती शिरेल. तिथें ती कारखान्यांचीं चक्रें चालवील. तिच्या शक्तीवर चालणारीं इंजिनें भराभर पाणी उपसतील. शेतें पिकवतील. सारा दक्षिण महाराष्ट्र, त्याचें स्वरूप बदलून जाईल.

तसेंच रूप बदलेल कोंकणाचें. पोफळीजवळ भले प्रचंड कारखाने निघतील. ते तर साऱ्या कोंकणांत निघतील. काजू भाजण्याचे. आंबे डब्यांतून भरण्याचे. काथ्या वळण्याचे. हे आंबे अन् काजू विलायतेंत जातील. तिथून डॉलर मिळवून आणतील. शहरांकडे धांवणारा कोंकणी बाळूंचा प्रवाह थांबेल. ते कोंकणांतच श्रमूं खपूं लागतील.

कोयनामाईचें पाणी पश्चिमेकडे वाहूं लागेल. कधीं झालें नाहीं तें होईल. तें उतरेल वासिष्ठींत. तेंही वायां जाणार नाहीं. कारण मग तें पाटांमधून खेळविलें जाईल. त्या पाण्यांवर वायंगणीं भातें पिकतील. भाज्या-पाले होतील. गुरांना होईल चारा. मग गाई-म्हशी पान्हवतील. असें सारें कोंकण उजळेल. त्याची धणी पुरेल.

पुढें मग कोयना धरणांतलें पाणीही पाटांनीं देशभर खेळवलें जाईल. त्या पाण्यावर गहूं-हरभरा तरारेल. महाराष्ट्रांतलें दुर्भिक्ष कमी होईल. इथून धान्य बाहेर धाडतां येईल. बाहेरच्या दुष्काळी राज्यांना आश्वासन देतां येईल.

पण कोयनेला महाराष्ट्राची चैतन्यदायिनी म्हटलें, तें या प्रादेशिक लाभासाठीं नव्हे. महाराष्ट्र राज्य झाल्यावर महाराष्ट्राच्या हितासाठीं पुरी होणारी पहिली प्रचण्ड योजना हें आहे कोयनाबाईचें खरें महत्त्व. कोयनेच्या शक्तीचा कण न् कण आतां केवळ या दरिद्री देशासाठीं वेंचला जाईल.

कदाचित् पुढें कोयना योजनेहून मोठमोठे प्रकल्प रचले जातील. पण कोयनाबाईचें हें अद्वितीयत्व मात्र शेवटपर्यंत कायम राहील. महाराष्ट्रिकांनीं महाराष्ट्रिकांच्या अंगमेहनतीनें, महाराष्ट्रिकांच्याच हितासाठीं पुरी केलेली पहिली प्रचण्ड योजना, हें आहे कोयना योजनेचें खरें स्वरूप.

ही कोयनाबाई महाराष्ट्राच्या राकट, कणखर शरिरांत प्राण फुंकील. मग या महाराष्ट्रपुरुषाची पेंग नाहींशी होईल. याचे सारे दुर्गुण झडतील. दुर्गुण ही रिकामटेकड्या माणसाची मिराशी आहे. उद्योगी माणसाला दुर्गुणांचें प्रदर्शन करण्यापुरता वेळही सांपडत नाहीं.

तसा महाराष्ट्र किंचित् तापट आहे. कांहींसा आडमुठाही आहे. देईल, त्याला नेसूंचें सोडून देईल. अन् भांडण उभें राहिलें, तर फारसा बोलत बसणार नाहीं. तडाखा चढवून मोकळा होईल. तसा तो मनाचा निर्मळ आहे. पण हें निर्मळपण किंचित् एकाकारलें आहे. आपल्या अगत्याचें प्रदर्शन करायची त्याला संवय नाहीं. औत्तरीय अदब तर कशी ती त्याच्या अंगीं नाहींच. भाषा जरी कितीही संपन्न असली, तरी ती ग्रंथांतली. बोलभाषेंत थोडें खडखडीतपणच. किंचित् थोडासा अहंकारही.

वाटतें, कीं हा महाराष्ट्राचा स्वभाव घडायला कारण झाला असावा

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.

सह्याद्रि-सातपुड्यावरचा भराट वारा. त्यांचे दरे. खोरीं.

पण आतां हे सारे वारे अनुकूल वाहोत. नद्या अमृतवाहिनी होवोत. वनस्पति आरोग्यवर्धिनी असोत. धरित्री सस्यश्यामळ होवो. मनांतलीं कल्मषें जळोत. अवघ्यांच्या मनींचा पुरुषार्थ जागा होवो. शरीरें सुदृढ होवोत.

मागें एकदां इथें रायगडीं शहाजणें वाजलीं होतीं, त्यांचा ध्वनि ऐकून साऱ्या परकी सत्तांच्या मनीं गजबज झाली होती.

आतां महाराष्ट्र जागा असो, अन् त्याच्या भरंवशावर साऱ्या देश-भरच्या विद्यापीठांत विद्यार्थी निश्चिंत मनानें वृक्षातळीं बसून आपापलीं अध्ययनें संपवोत.

महाराष्ट्र जागा असो, आणि देशभराच्या पाणवठ्यांवरून लेकीसुनां पाण्याच्या घागरी घेऊन निश्चिंत मनानें घरीं परतूं शकोत !

दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो।
जो जें वांछील तो तें लाहो। महाराष्ट्रिक ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९७२२७
दा.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

REFBK-0017224

REFBK-0017224